# हजरत महंमद पैगंबर

( मराठी चरित्र )

सुधारून वाढविलेली

आवृत्ती दुसरी

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
088117

सय्यद अहंमद अमीन

सांगली

नगर
वाचनालय
सातारा

[ सर्व हक्क स्वाधीन ]

सन १९३५

किंमत १ रुपया

८८

प्रकाशकः—
सय्यद अहमद अमीन,
सांगली, ( एस्. एम्. सी. )

मुद्रकः—
सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी.ए., एलएल्.बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा समर्थ भारत छापखाना
९४७ सदाशिव पेठ, पुणें २.

माझ्या पुण्यशील आईस
अर्पण

# निवेदन

परमेश्वरकृपेनें हजरत महंमद पैगंबर चरित्राची सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति वाचकांच्या हातीं देतांना मनास अत्यंत आनंद वाटत आहे.

चार वर्षांपूर्वी विलिंग्डन कॉलेजमध्यें विद्याभ्यास करीत असतां, अन्य-धर्मीयांच्या इस्लाम धर्माविषयीं ज्या चमत्कारिक व वेडगळ कल्पना बनल्या आहेत त्यांचें निराकरण व्हावें व अज्ञ मुसलमान बंधूंना त्यांच्या थोर धर्माचें सत्य स्वरूप पटवून द्यावें, या हेतूनें हजरत पैगंबरांचें छोटेंसें चरित्र लिहावयास घेतलें. त्याच वेळेस लाहोरचे प्रसिद्ध पुढारी मौलाना महंमद अल्ली, प्रो. अबदुल कादर व सय्यद काशफी शहा यांनीं हजरत पैगंबरांचें चरित्र हिंदु-स्थानच्या सर्व भाषांमधून प्रसिद्ध करण्याचा संकल्प जाहीर केल्यामुळें, मीं लिहिलेल्या छोट्याशा चरित्राची पहिली आवृत्ति ताबडतोब प्रसिद्ध झाली.

माझी मराठी मातृभाषा नसतां, मराठी भाषेंत चरित्र प्रसिद्ध करण्याचें मी भीतभीत धाडस केलें; महाराष्ट्रांतील व महाराष्ट्राबाहेरील दिलदार मराठी वाचकांनीं माझ्या धाडसाचें मोठ्या प्रेमानें कौतुक करून मला अत्यंत ऋणी करून टाकलें आहे. त्यांच्या प्रोत्साहनामुळेंच मी प्रस्तुत विस्तृत चरित्र लिहावयास घेतलें ही गोष्ट अवश्य नमूद करावीशी वाटते. हें चरित्र लिहिते वेळीं अरबी, उर्दू व इंग्लिश वाङ्मयांतील उत्कृष्ट ग्रंथांचा आधार घेतला आहे; त्याबरोबरच हिंदुस्थानांतील विद्वान मुसलमान पंडितांकडून मिळविलेली माहिती या चरित्रांत संग्रहित केली आहे.

विशेषतः पंजाबचे सुप्रसिद्ध पुढारी मौलाना महंमद अल्ली, एम्.ए. ( केंब्रिज ), यांची मला फार मदत झाली आहे. आपला अमूल्य वेळ खर्च करून, सुरवातीपासून अखेरपर्यंत सदरहू चरित्र त्यांनीं माझ्याकडून वाचवून घेतलें व अत्यंत महत्त्वाची माहिती मला दिली याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहें.

श्रीमंत सरकार चीफ ऑफ मिरज यांची सुरवातीपासूनच मला मदत आहे. त्यांनीं ईजिप्तमधून उत्कृष्ट अरबी ग्रंथ मागविल्यामुळें, त्या ग्रंथांचा

मला अतिशय उपयोग झाला. या कामीं श्रीमंतांचे आश्रित मौलाना नुरुद्दीन मदनी यांचें फार साहाय्य झालें आहे. चरित्र लिहून झाल्यानंतर तें प्रसिद्ध करण्याकरितां पहिल्या प्रथम श्रीमंत सरकारनींच मदत केली आहे. श्रीमंतांच्या स्पृहणीय औदार्याबद्दल मी त्यांचा सदैव आभारी राहीन.

श्रीमंत सरकार हिज हायनेस राजेसाहेब, सांगली, यांनीं तर मला कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. त्यांच्या कृपाछत्राखालीं मी लहानाचा मोठा झालों; त्यांच्या मेहेरनजरेखालीं माझें शिक्षण झालें. जन्मदात्या पित्याप्रमाणें राजेसाहेबांनीं माझ्यावर केलेलें प्रेम मी कधींहि विसरणें शक्य नाहीं. माझ्या मोडक्यातोडक्या लेखनाचें कोडकौतुक करून श्रीमंत राजेसाहेबांनीं मला वेळोवेळीं उत्तेजन दिलें आहे. सदर चरित्राच्या प्रसिद्धीकरणाकरितां राजेसाहेबांनीं मोठी मदत करून आपलेपणा प्रदर्शित केला आहे.

मुंबईचे मेयर हुसेनभाई अबदुल्ला, दानशूर अबदुर रझाक अबदुल्ला, रिटायर्ड इन्कम-टॅक्स ऑफिसर सय्यद सुलतान अल्ली इनामदार ( मंचर ), यांनीं मदत करण्यांत मोठा भाग उचलला आहे. पुण्याचे लोकप्रिय मुसलमान पुढारी व सुप्रसिद्ध वकील ए. ए. खान, एम्.ए., एलएल. बी., यांनीं प्रकाशनाकरितां आर्थिक साहाय्य मिळविण्याची अतिशय खटपट केली. त्यांच्या खटपटीमुळेंच चरित्र लवकर प्रसिद्ध होऊं शकलें. त्याप्रमाणें प्रोफेसर जहुरुद्दीन अहंमद, एम्.ए., मि. फैजुल्लाखान, बी.ए., मि. यूसफखान पठाण, बी.ए., यांनींहि मदत मिळविण्याकरितां परिश्रम घेतले. ज्यांनीं ज्यांनीं मला सहानुभूति दाखविली व लहान मोठी हस्तेंपरस्तें मदत केली त्या सर्व दिलदार हिंदु-मुसलमान बांधवांचा मी अत्यंत आभारी आहें. त्याचप्रमाणें प्रस्तुत चरित्र वाचून ज्यांनीं अभिप्राय पाठविण्याची कृपा केली, त्या मराठी भाषा जाणणाऱ्या विद्वान मुसलमान पंडितांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

मला संस्कृत शिकविणारे गुरुवर्य वेदशास्त्रसंपन्न श्रीपादशास्त्री देवघर यांनींच मला मराठी वाङ्मयाची गोडी लावल्यामुळें, शेवटीं त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्याखेरीज राहवत नाहीं.

सर्वांचा नम्र
**एस्. ए. अमीन**

# अनुक्रमणिका


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| भाग १ ला—पहाटेपूर्वीचा काळोख | ... | ... | १ |
| ,, २ रा—जीवनवृत्तान्त | ... | ... | ११ |
| ,, ३ रा—स्वभावचित्र | ... | ... | ६० |
| ,, ४ था—आरोप-निरसन | ... | ... | ७१ |
| ,, ५ वा—भूमिका | ... | ... | ८३ |
| ,, ७ वा—व्यक्ति-माहात्म्य | ... | ... | १२१ |
| ,, शेवटचा—विद्वान परधर्मीयांच्या चष्म्यांतून | ... | ... | १४४ |


---

[ प्रुफें तपासतेवेळीं राहून गेलेलीं व प्रोफेसर शेख यांनीं दुरुस्त केलेलीं अशुद्धें ग्रंथाच्या शेवटीं जोडलीं आहेत. त्यांकडे वाचकांनीं अवश्य लक्ष द्यावें. ]

महाराष्ट्रांतील सुविख्यात मुसलमान पंडित व अनेक भाषांचे तज्ज्ञ खानबहादुर प्रोफेसर शेख अबदुल कादिर, एम्.ए., आय्.ई.एस्. (रिटायर्ड), यांनीं प्रस्तुत पुस्तक वाचून पुस्तक-प्रकाशनास अनुमति दिली याबद्दल ग्रंथकार त्यांचा अत्यंत आभारी आहे.

# हजरत महंमद पैगंबर

## भाग १ ला

## पहाटेपूर्वीचा काळोख

“ जळीं स्थळीं अनाचार माजला होता.”

पवित्र कुराण, ३०:४१

**अरबस्तान**

जगांत सौख्य व शांति प्रस्थापित करणाऱ्या इस्लाम धर्माचे प्रणेते हजरत महंमद पैगंबर यांना जन्म देण्याचें भाग्य ज्या वालुकामय देशास लाभलें होतें, तो प्रदेश ‘ अरबस्तान ’ या नांवानें सुप्रसिद्ध आहे. हाच अरबस्तान झिरत-उल-अरब या नांवानें ओळखला जातो. हा प्रदेश आशिया, आफ्रिका आणि यूरोपच्या मध्यावर असून त्याच्या दक्षिणेस हिंदी महासागर, पश्चिमेस तांबडा समुद्र आणि पूर्वेस पर्शियाचें आखात आहे. अरबस्तानचा जवळजवळ एक तृतीयांश भाग वालुकामय प्रदेशानें व्यापला आहे. वाळवंटाचा मोठा पट्टा दक्षिण भागांत असून तो अद्-धान नांवानें प्रसिद्ध आहे.

अरबस्तानांत नांवें घेण्याजोग्या मोठ्या नद्या नाहींत. परंतु ठिकठिकाणीं लहान लहान नद्या पसरलेल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं अरबस्तानच्या सरहद्दीला वळसा घालून समुद्रास मिळाल्या आहेत. कांहीं वाळवंटांमध्येंच गडप झाल्या आहेत. कांहीं ठिकाणीं लहान लहान डोंगरांच्या रांगा आहेत. सर्वांत मोठी

रांग दक्षिणोत्तर पसरली असून ती जबल-उस-सरात नांवानें संबोधिली जाते. ही जी डोंगराची रांग पसरली आहे, तिची सर्वांत जास्त उंची ८००० फूट आहे. कित्येक ठिकाणीं ही रांग समुद्रालगत आहे. अरबस्तानचें मुख्य पीक खजुराचें आहे. अरबस्तानचा बराचसा भाग वालुकामय असल्यामुळें त्या ठिकाणीं उंट हेंच मुख्य वाहन आहे.

अरबस्तान निरनिराळ्या भागांत विभागलेला आहे. हिजाझ हा मुख्य भाग असून याच भागांत हरम या नांवानें प्रसिद्ध असलेला प्रदेश अत्यंत पवित्र समजला जातो; ह्या ठिकाणीं कधींहि रक्तपात होत नाहीं. मक्का, मदीना आणि ताईफ हीं याच प्रदेशांत वसलेलीं आहेत. ताईफ हें अरबस्तानचें थंड हवेचें ठिकाण समजलें जातें. या ठिकाणीं निसर्गाची शोभा अवर्णनीय असून विपुल फळफळावळ मिळते. मक्का हें मुसलमानांचें अत्यंत पवित्र क्षेत्र असून उम्म-उल-कुरा ( सर्व शहरांची आई ) या नांवानें त्यास पुष्कळ लोक संबोधितात. मक्केच्या सभोंवर लहान लहान डोंगर पसरलेले आहेत. मक्केच्या उत्तरेस २७० मैलांवर मदीना शहर वसलेलें आहे.

अरबस्तानचा दुसरा मोठा भाग यमन आणि तिसरा भाग नेज्द या नांवानें प्रसिद्ध आहे. अरबस्तानचें क्षेत्रफळ जवळ जवळ फ्रान्सच्या दुप्पट होईल. येथील रहिवाश्यांना अरब ही संज्ञा असून, ते जगांत सुंदर आणि पराक्रमी म्हणून प्रसिद्ध आहेत. देखणा घोडा आणि तलवार हीच त्यांची मुख्य संपत्ती समजली जाते. अरब-उल-बैद, अरब-उल-मुतरीब व अरब-उल मुस्तरीब असे अरब लोकांचे तीन पोटभेद मानले जात असत. अरबस्तानच्या इतिहासाचें मनन करणारास सहाव्या शतकांत हजरत पैगंबरांच्या जन्मापूर्वी अरबस्तानची अत्यंत अवनती झाली होती ही गोष्ट कबूल करावी लागेल. या काळीं अरबस्तानचा दुर्लौकिक सगळीकडे पसरला होता. अरब लोकांचीं नीतिबंधनें शिथिल झालीं होतीं. आपसांत लढाया व मारामाऱ्या करून त्यांनीं आपली शक्ती कमी करून घेतली होती. वेडगळ समजुतींच्या आहारीं

पडून अरबांची प्रखर बुद्धिमत्ता निकामी झाली होती. राष्ट्रास ललामभूत असणाऱ्या स्त्रियांचा उपमर्द करून ' सतींचा शाप ' त्यांनीं घेतला होता. निरनिराळ्या व्यसनांत गुरफटल्यामुळें प्रगतीचा सोपान चढण्याऐवजीं अवनतीच्या गर्तेंत पडून राहण्यांत त्यांना भूषण वाटत होतें. अरबस्तानची अधोगती कशी झाली होती, याचें चित्र पुढील शब्दांत चितारतां येईल.

## बेबंदशाही

त्या काळीं अरबस्तानांत राज्यपद्धति अशी अस्तित्वांत नव्हतीच. जो प्रबल असेल तोच सत्ताधारी म्हणून मिरवीत असे. पण त्याची ही सत्ता प्रत्येकाकडून पाळली जात असली पाहिजे, अशी जर कुणाची कल्पना असेल तर ती चुकीची आहे. आपल्या हिताच्या आड जर ही सत्ता आली तर ती सत्ता अरब बेलाशक झुगारून देण्यास कचरत नसत, आणि ' ज्याच्या मनगटांत जास्त जोर तितका तो थोर ' असें अरब समजत असत. न्याय, अन्याय सर्व मनगटाच्या जोरावर अवलंबून असे. गरीब स्वभावाच्या माणसानें केलेली न्यायाची गोष्ट अन्यायाची ठरत असे; याच्या उलट उन्मत्त माणसानें कितीहि अन्याय केले तरी आपल्या तरवारीच्या जोरावर तो न्यायी ठरत असे. इतकेंच काय पण सगळीकडे त्याचा जयजयकार होत असे.

अरबस्तानांत विवक्षित राज्यपद्धति नसल्यामुळें अरब लोकांस जबाबदारीची जाणीव वाटत नसे. हे अरब लोक ठिकठिकाणीं टोळ्याटोळ्यांनीं राहत. प्रत्येक टोळी स्वतःस श्रेष्ठ समजून दुसऱ्या टोळीवर हल्ला करीत असे. हा निष्कारण हल्ला कां केला असें विचारलें कीं, " आमच्या तरवारीचें पाणी जिवंत आहे कीं नाहीं हें पडताळून पाहण्याकरितां आम्हीं हल्ला केला ! " असें बेदरकारपणें पहिली टोळी उत्तर देत असे. आपल्या शब्दाप्रमाणें प्रत्येकानें वागलेंच पाहिजे अशी अरेरावीची भाषा त्यांचा पुढारी बोलत असे. या पुढाऱ्याची आज्ञा मोडण्याचें जो धाडस करील त्याला लागलीच तो पुढारी द्वंदयुद्धास आव्हान करीत असे.

क्षुल्लक गोष्टीवरून रक्तपात करण्याचें शिक्षण प्रत्येक अरबाला लहानपणापासून मिळत असे. आपल्या जिवाला भाजीपाल्याइतकें देखील महत्त्व अरब लोक देत नसत. रक्ताचा सूड फक्त रक्तानेंच घेतला पाहिजे, ही सैतानी वृत्ति त्या काळीं बोकाळली होती. जर आपण हा रक्ताचा सूड घेतला नाहीं तर मृत माणसाच्या कबटींतून एक भुंगा निघतो व तो 'मला रक्त प्यावयास द्या' असें म्हणत घिरट्या घालीत राहतो, असें ते समजत. या भुंग्यास 'हमा' अगर 'सदी' या नांवानें अरब लोक संबोधितात. हा सूड घेतल्याविना त्यांना खाणें पिणें कांहीं सुचत नसे. आपल्या शत्रूशीं सहकार्याच्या गोष्टी करणें किंवा त्याला सोडून देणें, ह्या गोष्टी नामर्द लोकांच्या आहेत, अशी कल्पना त्या काळीं जारीनें प्रसार पावत होती. स्वतःचा कार्यभाग साधण्याकरितां, लांचलुचपत देण्याचा प्रकार शिष्टसंमत मानला जात असे. असे प्रकार उघडउघडपणें करण्यास त्यांना कोठल्याही प्रकारचा कमीपणा वाटत नसे. एखाद्या प्रवाशाला लुटणें हा तर त्यांचा नित्याचाच व्यवसाय होऊन बसला होता. लूटमार हाच कित्येकांचा कायमचा पेशा होता. एखाद्या श्रीमंत माणसाच्या घरावर दिवसाढवळ्या दरोडे घालण्यास त्यांना काडीमात्र दिक्कत वाटत नसे. वित्ताची, जीविताची शाश्वति नसल्यामुळें सगळीकडे बेबंद स्वरूप पसरलें होतें.

## धार्मिक अनास्था

त्या वेळीं लोकांना धर्म ही काय चीज आहे हें माहीत देखील नव्हतें. आपले वाडवडील करीत आले त्याप्रमाणें वागण्यांत आपण धर्म पाळीत आहोंत, अशीच त्यांची समजूत होती. जिकडे पाहावें तिकडे मूर्ती बसविलेल्या असत. एकादा चांगला दगड दिसला कीं, त्याला देव समजून त्याच्यापुढें साष्टांग नमस्कार घातल्याखेरीज कोठलाही अरब सहसा पुढें जात नसे. मूर्तींपुढें हजारों जीवांची हत्या होत असे. सणावारीं

अशा मूर्तींपुढें जमून अरब लोक वेडावांकडा नाच करीत. सर्वांत शरमेची गोष्ट म्हणजे कित्येक स्त्रियांना नग्नावस्थेंत आपल्याबरोबर मूर्तीसमोर नाचावयास भाग पाडीत. कोणाला मुलगा होत नसला तर अशा मूर्तीपुढें जाऊन तिची करुणा भाकीत. आपण वाटेल तीं दुष्कृत्यें केलीं आणि या मूर्तीसमोर आपण एकादा बकरा बळी दिला कीं, आपल्या पापाचें परिमार्जन होतें असें ते समजत असत. मक्केतील 'काबा' मंदिरांतील मूर्ती अत्यंत पूज्य मानल्या जात असत. या मंदिरांत एकंदर ३६० मूर्ती बसविलेल्या होत्या. आणि प्रत्येक दिवशीं एकेका मूर्तीची पूजा केली जात असे. ही पूजा चालू असतांना अरब लोक कल्पनातीत पैसे खर्च करीत असत. आपलीं मुलेंबाळें उपाशी राहिलीं तरी चालतील, पण नैवेद्य चुकतां कामा नये असें अरब लोकांस वाटत असे. आपला नैवेद्य चुकला तर देव आपलीं पाळेंमुळें खणून काढल्याखेरीज राहणार नाहीं या भीतीनें ते किडूकमिडूक विकून हा पूजेचा उत्सव साजरा करीत. याच मंदिरांतील मूर्तीसमोर माणसांचेहि बळी दिले जात असत.

या मूर्तींखेरीज अरब लोकांचे अनेक देव होते. सूर्य, तारे आणि तीन चंद्रदेवता यांना सर्व देवांत फार मान असे. या तीन चंद्रदेवतांचीं नांवें अनुक्रमें अल्-लाट, मन्नत आणि अल्-उझ्झा अशीं असून त्या आभाळांत राहणाऱ्या देवांच्या कन्या समजल्या जात. यांखेरीज वृक्ष, डोंगर यांनादेखील कधीं कधीं देव होण्याचा मान मिळत असे. वाऱ्यानें वाळू उडून तिचा उंचवटा झाला कीं, लागलीच त्या उंचवट्यास देव समजून त्याची पूजाअर्चा होत असे. आपल्या भक्तांस पुनरपि पूजा करावयाचा त्रास पडूं नये म्हणून हा उंचवटा ( देव ) लागलीच उडून जात असे! याखेरीज प्रत्येकाच्या घरांत देव असे तो निराळाच. बाहेर पडायचें झाल्यास प्रत्येक अरब ह्या देवास नमस्कार करून बाहेर पडत असे. एकंदरींत निर्जीव वस्तूंत देवाला डांबून बसविण्याचा धर्म सगळीकडे पसरला होता.

## सामाजिक अनाचार

बाहेरील जगाचा अनुभव नसल्यामुळें किंवा चांगल्या गोष्टींचें अवलंबन करण्याची प्रवृत्ती नसल्यामुळें अरब लोक सामाजिक आचारविचारांच्या बाबतींत पूर्णपणें जंगली होते. आपण समाजाचे घटकावयव आहोंत, आपल्या आचारविचारांवर आपल्या देशाचें स्थैर्य अवलंबून आहे, इत्यादि सुविचारांचें त्यांना कायमचेंच वावडें होतें. प्रत्येक व्यक्तीला बेछूट वागण्याची जेथें हौस, तेथें समाज हा शब्द अरब लोकांस अनभ्यस्त वाटावा हें साहजिकच होय. या प्रवृत्तीमुळें अरब लोक निरनिराळ्या व्यसनांच्या पूर्णपणें आहारीं गेले होते. त्यांचें सर्वांत मोठें व्यसन म्हणजे दारू. ज्या घरांत दारूचा एक थेंब देखील मिळत नाहीं तें घर आणि त्या घरांतील माणसें दुर्दैवी समजलीं जात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना दारूचा प्रसाद मिळालाच पाहिजे असा त्यांच्या समाजाचा नियम होता. थोरामोठ्यांच्या घरांत तर दारूचे हंडेच्या हंडे भरून ठेवलेले असत. एखाद्या दिवशीं भरपूर दारू प्यावयास मिळाली नाहीं म्हणजे अरब कावरेबावरे होत. दारू प्यावयास मिळण्याकरितां ते खून देखील करावयास मागेंपुढें पाहत नसत.

दुसरें मोठें व्यसन म्हणजे जुगार खेळण्याचें. जुगार खेळण्यांत अरबांचा कोणी हात धरीत नसे. गल्लोगल्लीं जुगारांचे अड्डे असत. या अड्ड्यांवर जाऊन प्रत्येक अरब मनसोक्त जुगार खेळत असे. जुगार न खेळणारांची कंजूष म्हणून टिंगल उडविली जाई. जुगार खेळण्याकरितां अरबांना पैशाची अत्यंत नड असे. त्या वेळीं अरब लोकांच्या घरांत गुलाम स्त्रिया असत. या स्त्रियांचा जबरदस्तीनें देहविक्रय करून अरब पैसे मिळवीत. हे सगळे पैसे संपले म्हणजे अरब लोक स्वत:ला पणाला लावीत असत. या पणांत ते हरले म्हणजे ज्यांनीं त्यांना जिंकलें त्यांचे ते गुलाम बनत असत. आपण गुलाम बनल्यावर आपणांस भयंकर हाल सोसावे लागतील ही कल्पना असतांना देखील ते जुगार खेळावयास बसत! एवढ्यावरून ते जुगाराच्या

किती आहारीं गेले होते याची कल्पना येईल. हे जुगाराचे खेळ राजरोस चालत. इतकेंच काय पण खेळ कसा काय रंगांत येतो हें पाहण्याकरितां जुगार खेळण्याच्या जागीं तमासगिरांची गर्दी जमत असे. सर्वांत अंगावर शहारे आणणारा अनाचार म्हणजे अरबस्तानांतील गुलामगिरी. त्या काळचीं गुलामांचीं वर्णनें वाचलीं म्हणजे अंगावर शहारे येतात. मोठमोठ्या शहरीं गुलामांचा व्यापार जोरांत चालत असे. गुलामांचे मालक या गुलामांना मेंढरांप्रमाणें हांकीत बाजारांत घेऊन येत असत. या गुलामांत स्त्रियांचाहि समावेश होत असे. मालकाची मर्जी संभाळण्याकरितां या गुलामांना रात्रंदिवस मरेमरेतों काम करावें लागे. काम करीत असतांना एकादी चूक झाली कीं, त्या चुकीकरितां तीनतीनशें कोरडे गुलामांच्या पाठीवर उडवीत. अंगांतून रक्ताच्या चिळकांड्या उडून तो गुलाम बेशुद्ध पडला तरी पाषाणहृदयी मालकास त्याची दया येत नसे. अविश्रांत मेहनत, बेदम मार यांमुळें गुलामांचे सुकलेले चेहरे गल्लोगल्लीं पाहावयास मिळत. या बिचाऱ्यांस खावयास कधीं भरपूर अन्न किंवा अंगावर जाडाभरडा कपडा मिळत नसे. आपली पाशवी कामेच्छा तृप्त करण्याकरितां मालक आपल्या गुलाम स्त्रियांस फराफरा ओढीत आपल्या रंगमहालांत नेत. त्यांनीं थोडा प्रतिकार केला कीं त्यांच्या अंगावर विस्तवाचे चटके देत. अशा तऱ्हेचीं अनेक पापी कृत्यें करण्यांत त्यांना मोठेपणा वाटे. या सर्व पापांच्या वांटेकरिणी करण्याकरितांच कीं काय, प्रत्येक अरब स्वतःला दहाबारा बायका करीत असे. स्वतःच्या पोटाला भरपूर अन्न न मिळालें तरी हरकत नाहीं पण अनेक बायकांचा पति म्हणून अभिमानानें मिरविण्यांत प्रत्येक अरबास धन्यता वाटे.

## स्त्रियांचा उपमर्द

गुलामांच्या खालोखाल स्त्रियांच्या माथीं साडेसाती लादली गेली होती. जगांतील सारीं पापें करावीं आणि अरबस्तानांत स्त्रीच्या जन्माला यावें, अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. स्त्री पाहिली कीं अरब लोकांच्या

कपाळास आंठ्या पडत. आपण जिच्या पोटीं जन्म घेतला, ती देखील स्त्रीजातीचीच होती, या गोष्टीचाहि त्यांना विसर पडत असे. स्त्रियांचें नांव काढलें कीं, एकादा अपशकुन व्हावा त्याप्रमाणें अरबांच्या छातींत धस्स होत असे. एकादी बाई रस्त्यावरून आडवी गेली कीं, आपल्या कार्यांत खास अपयश येणार असें सर्वजण समजत. स्त्रियांना अपशकुनी समजून त्यांचा तिरस्कार करण्याचा धडा प्रत्येकास लहानपणापासून मिळत असे. स्त्रियांना महत्त्व द्यावयाची गोष्ट अत्यंत अन्यायाची समजली जात असे. स्त्रियांविषयीं खोट्यानाट्या कंड्या पिकविण्यांत अरब लोकांस धन्यता वाटत असे. रस्त्याच्या बाजूस उभें राहून स्त्रियांकडे पाहून निर्लज्जपणें फिदीफिदी हंसण्यांत आपण एक पुण्यकार्य करीत आहोंत असें त्यांना वाटे. स्त्री ही एक उपभोग्य वस्तू समजून तिला जास्त महत्त्व देण्यांत ते पाप मानीत असत. नवऱ्याची प्रत्येक आज्ञा बायकोनें मान्य केलीच पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. स्त्रियांचा सल्ला घ्यावयाची गोष्ट तर बाजूलाच राहो पण त्यांना आपले विचार देखील कळूं न देण्याची खबरदारी ते घेत. आपले बेत आपल्या बायकांना कळले कीं, हटकून आपल्या कार्यांत अपयश आलेंच अशी त्यांची ठाम समजूत होती. त्या वेळीं स्त्रियांविषयीं खालील म्हणी अरबस्तानांत प्रचलित होत्या.

( १ ) स्त्रिया ह्या सैतानाच्या सूत्रधार आहेत. ( २ ) स्त्रिया, घोडा, किंवा राजा यांपैकीं एकहि विश्वासास पात्र नाहीं. ( ३ ) स्त्रियांचें नांव काढलें कीं, पुरुषांचा संताप हा व्हावयाचाच. ( ४ ) राष्ट्रकार्य स्त्रियांस घेऊन काय करावयाचें आहे! ( ५ ) स्त्री म्हणजे मनुष्य जातीवरील महासंकट आहे. ( ६ ) कार्यास निघते वेळीं स्त्रियांचें तोंड पाहिलें कीं, कार्याचा बिघाड झालाच म्हणून समजावें.

वरील म्हणींवरून अरबस्तानांत स्त्रियांचा दर्जा कसा होता याची थोडीशी तरी कल्पना येईल. कित्येक अरब असे होते कीं, आपल्या गुलाम स्त्रियांना वेश्यावृत्ति पत्करावयास भाग पाडीत. रहदारीच्या ठिकाणीं कुंटिण-

खाने असत. या कुंटिणखान्यांत सुंदर स्त्रियांना फूस लावून नेण्यांत निरनिराळे अरब टपून बसत. भर रस्त्यावर एखाद्या सुंदर अनाथ स्त्रीचा पदर धरून ओढण्यास त्यांना काडीमात्र शरम वाटत नसे. बाप मेल्यानंतर त्याची इस्टेट समजून आपल्या सावत्र आईशीं लग्न लावणारे पुष्कळ सुपुत्र होते. एकाद्याला मुलगी झाली कीं, ती स्त्रीजातीची आहे म्हणून "शांतं पापं" समजून तिला जमिनींत गाडून टाकीत.

प्रतिभा हा अरब लोकांचा अभिजात गुण होता. पण या गुणाचा उपयोग नीच कार्यांकडे होत असे. सरस नीरस प्रतिभा ठरविण्याकरितां काव्य-गायनाचे मोठमोठे समारंभ होत. पण दुर्दैवानें काव्य-विषय स्त्रियांची नालस्ती हा असे. ही नालस्ती परिणामकारक करण्याकरितां अरबांची सर्व प्रतिभा खर्च होत असे. प्रतिभा ही परमेश्वराची केवढी उच्च देणगी; पण तिचा उपयोग अशा कार्याकडे झालेला पाहिला म्हणजे अंतःकरण विषण्ण होतें. सुंदर भरजरीची झूल गाढवावर घालणें, तेजस्वी रत्नें उकिरड्यावर फेंकणें, गुलाबाचें नयन-मनोहर फूल पायदळीं तुडविणें, आणि उच्च प्रतिभा शीलसंपन्न स्त्रियांची बदनामी करण्यांत खर्चणें, या गोष्टी सारख्याच योग्यतेच्या नव्हेत काय ?

स्त्रियांचें कार्य केवढें पवित्र; स्त्रियांची योग्यता केवढी थोर; स्त्रियांचीं अंतःकरणें केवढीं दिलदार; पण अरबस्तानच्या नादान लोकांना त्याचें काय होय ? ज्यांच्या नुसत्या स्पर्शानें आपण पुनीत होतों, ज्यांच्या आशीर्वादानें आपलें कार्य यशस्वी होतें, त्या स्त्रियांचा, त्या देवतांचा अपमान करणारे अरब खरोखरी पशू बनले नव्हते काय ?

## लोकभ्रम

शिक्षणाचा अभाव असल्यामुळें चमत्कारिक समजुतींचा प्रसार अरब लोकांमध्यें फार झाला होता. असुक एक वेडगळ समजूत आपल्यामध्यें कां पसरली याचा विचार करण्याची तसदी न घेतां 'बाबावाक्यं प्रमाणं' म्हणून ती समजूत स्वतःच्या आचरणांत आणावयाची संवयच अरब लोकांत

पडून गेली होती. एकादा मनुष्य मेला तर त्याच्या कबरेजवळ अन्नपाणी न देतां उंट बांधीत असत. कांहीं दिवसांनीं अन्नपाण्याविना तो उंट तडफडून मरत असे. मेल्यानंतर मनुष्याचा आत्मा प्रवास करीत असतां त्याला बसून जाण्याकरितां हा उंट आहे, असें अरब सांगत असत. गाईच्या शेपटीला गवत बांधून तें पेटवीत असत. आणि त्या गाईला रानोमाळ पिटाळीत असत. त्या शेपटीला वीज समजून लवकरच पाऊस पडणार अशी भ्रामक कल्पना ते करून घेत. एकादा पक्षी डाव्या बाजूकडून उजव्या बाजूस उडत गेला तर तें सुचिन्ह समजलें जात असे. याच्या उलट पक्षी उजव्या बाजूकडून डाव्या बाजूस गेला तर हटकून अपशकून होणार असें समजून ते देवतांची पूजाअर्चा करीत. एकाद्यावर संकट आलें तर अरब लोक मागच्या दरवाज्यानें घरांत प्रवेश करीत. याखेरीज सामुद्रिकावर त्यांचा फार विश्वास असे. सामुद्रिकानें हात पाहून सांगितलेली गोष्ट खरी झालीच पाहिजे अशी वेडगळ समजूत अरब लोकांत फार फैलावली होती. वाटेल त्या थापा मारून हे सामुद्रिक लोक अरब लोकांपासून पैसे उकळीत असत. तसेंच भुताखेतांवर त्यांचा फार विश्वास असे. भुताखेतांना प्रसन्न राखण्याकरितां ते बकऱ्याचे बळी देत. भूत प्रसन्न झालें कीं, तें आपणांस अगणित द्रव्य मिळवून देतें असें ते समजत.

वरील विवेचनावरून अरबस्तानची अधोगती किती झाली होती हें सहज समजण्यासारखें आहे. सबंध अरबस्तान अज्ञानाच्या गाढ अंधःकारांत गुरफटून गेला होता. पण अरबस्तान कल्पान्तापर्यंत तसाच अंधःकारांत पडून राहावा अशी त्या सर्वशक्तिमान परमेश्वराची इच्छा नव्हती. आपली पापी वृत्ती टाकून अरबस्तानला साऱ्या जगास सौख्य आणि शांतीचा संदेश ऐकविण्याची महत्तम कामगिरी पार पाडावयाची होती म्हणून कीं काय, अंधःकाराचें पटल बाजूला सरकूं लागलें, घुबडांचे घूत्कार बंद झाले, पहांटेचा प्रशांत समय आला, दशदिशा फांकूं लागल्या, पक्षीसमूह सुस्वर आवाजांत गाऊं लागला, जिकडेतिकडे आनंदाचें साम्राज्य पसरलें व इस्लामचा भाग्यसूर्य उदयास आला.

---

भाग दुसरा

# जीवन-वृत्तान्त

" सद्धर्म आणि सन्मार्गासहित परमेश्वरानें आपला उपदेशक पाठविला. "

पवित्र कुराण, ५८ : १–३

## कुलवृत्तान्त

त्या काळांत व्यापारी केंद्र व तीर्थस्थान यांमुळें सबंध अरबस्तानांत ' मक्का ' शहर अत्यंत प्रसिद्धीस आलें होतें. व्यापाराकरितां किंवा यात्रेकरितां म्हणून अरबस्तानाच्या प्रत्येक भागांतून हजारों अरब लोकांची मक्का शहरांत रहदारी सुरू असे. मक्का शहराची सर्व व्यवस्था हाशिमी नांवाच्या एका प्रसिद्ध व खानदानी घराण्याकडे सोंपविली होती. या घराण्यांतील मूळ पुरुषाचें नांव हाशिम असल्यामुळें त्याच्याच नांवानें त्याचें घराणें प्रचलित होतें. शौर्य आणि सदाचार हें या घराण्याचें वैशिष्ट्य असल्यामुळें या घराण्याचा सबंध अरबस्तानभर विलक्षण बोलबाला झाला होता. अरबस्तानांतील विषारी वातावरणांत या घराण्याचें रोपटें किडून न जातां शाबूद व निरोगी कसें राहिलें याबद्दल बाहेरच्या लोकांना अचंबा वाटत असे. हाशिम घराण्याचें नांव काढलें कीं, उन्मत्त माणसाची गर्दन झुकत असे, कैफी माणसांची धुंदी खाडकन् उतरत असे, इतकेंच काय पण अहोरात्र अभद्र व अचकटविचकट बोलणाऱ्या माणसाच्याहि तोंडून त्या घराण्याबद्दल आदराचे उद्गार निघत.

या भाग्यशाली घराण्याचे जनक, मक्केचे सर्वाधिकारी झाल्याबरोबर त्यांनीं खडकाळ जागेंत प्रस्थापित झालेल्या मक्केंत नाना तऱ्हांच्या सुधारणा व सुखसोयी निर्माण करून मक्का हें नमुनेदार शहर केलें. मक्का शहरांत मालाचा

पुरवठा करण्याकरितां, हाशिम दरवर्षी हिवाळ्यांत यामेन शहरीं व उन्हाळ्यांत सिरीया प्रान्तांत उंटांचे काफिले पाठवून माल आणवीत असत. यामुळें नागरिकांस व इतर व्यापाऱ्यांस मालाची ददात पडत नसे. अरब लोकांनीं अत्यंत पवित्र मानलेलें ' कावा ' मंदीर मक्केमध्येंच असल्यामुळें दरवर्षी लाखो लोक यात्रा करण्याकरितां येथें येत असत. हाशिम हे तेथील रहिवाशांपासून कर वसूल करीत व त्या वसुलांत स्वतःचा पैसा घालून तो सर्व पैसा अनाथ यात्रेकरूंना अन्नदान करण्यांत व वस्त्रप्रावरणें पुरविण्यांत खर्च करीत. यात्रा पार पडल्यानंतर गरीब यात्रेकरू हाशिम यांना दुवा देत आपापल्या शहरांस निघून जात. लोकांचे धन्यवाद मिळविणारे हाशिम हेच आपल्या चरित्रनायकांचे पणजे. हाशिम स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांचे बंधू मुतालिब मक्केचे सर्वाधिकारी झाले. हाशिम यांच्याप्रमाणें मुतालिब यांनीं आपल्या उदार वृत्तीनें लोकप्रियता मिळविली. त्यांच्या उदार वृत्तीकडे पाहून मक्कानगरस्थ त्यांना अलफैस ( उदारधि ) या नांवानें संबोधीत. दहा वर्षांनंतर मुतालिब यांनीं इहलोक सोडला. त्यांच्या मागून हाशिम यांचे एकुलते एक चिरंजीव अबदुल मुतालिब त्यांच्या जागेवर अधिष्ठित झाले. यांना पुष्कळ मुलें झालीं. यांचे तिसरे चिरंजीव अबदुल्ला यांचा विवाह सुप्रसिद्ध अशा झोरी घराण्यांतील अमीनाबी नांवाच्या सच्छील स्त्रीशीं झाला. अबदुल्ला यांना हें विवाहसौख्य फार दिवस लाभलें नाहीं. विवाहानंतर थोड्याच दिवसांनीं अबदुल्ला निजधामाला गेले व अमीनाबींवर आकाशाची कुऱ्हाड कोसळली.

## जन्म व बालपण

या वेळीं अमीनाबींस कांहीं दिवस गेले होते. आपल्या पोटीं जन्म घेणारें बालक पोरकें होणार या कल्पनेनें त्यांना भडभडून येत असे. पण अमीनाबी जन्मतः शांत विचाराच्या असल्यामुळें त्यांनीं हा शोकावेग मोठ्या मुष्किलीनें आवरून धरला. तारीख २२ एप्रिल ५७१ रोजीं अमीनाबींच्या पोटीं **हजरत महंमद पैगंबर** यांनीं जन्म घेतला. त्या पितृ-

विहीन गोजिरवाण्या बालकाकडे पाहिलें म्हणजे त्यांच्या डोळ्यांतून टपटप अश्रू येत. आपल्याखेरीज या बालकाचें आतां कोणी नाहीं या विचारानें आपल्या मुलास क्षणभर देखील त्या विसरत नसत. आपल्यामागें आपल्या मुलाचें कसें होईल हीच चिंता अमीनाबींस लागली होती. सतत शोक व चिंता यांमुळें त्यांचें दूध आटलें व नाइलाजानें त्यांनीं आपल्या बालकास हालिमा नांवाच्या दाईच्या हवालीं केलें. या दाईनें पांच वर्षेपर्यंत अत्यंत प्रेमानें हजरत महमंद पैगंबरांचें पालनपोषण केलें. पुढें आपल्या सर्व आयुष्यभर हजरत महमंद पैगंबर त्या दाईचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत. उत्कर्षाच्या चढत्या काळांत एकदां हालिमा त्यांना भेटावयास आली असतां आपल्या अंगावरचें उपरणें पसरून त्यांनीं तिला उत्थापन दिलें आणि बहुमोल देणगी देऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली.

आपल्या प्रेमळ आईच्या सहवासांत एकच वर्ष काढल्यानंतर हजरत पैगंबर मातृसुखास कायमचे आंचवले. साऱ्या जगांत आईचा एक आधार होता तोहि तुटला व हजरत पैगंबर आज उघडे पडले. आईबापांच्या शीतल छत्राखालीं बेफिकीरीनें व आनंदानें बागडावयाचे सुखाचे दिवस, पण दुर्दैवानें तेंहि सुख पैगंबरांस फार दिवस लाभलें नाहीं. आईजवळ लडिवाळपणा करण्याचें सौख्य त्यांच्या नशिबीं नव्हतें त्याला ते तरी बिचारे काय करणार? पुढें अनाथ पैगंबरांचा सांभाळ त्यांच्या आजोबांनीं तीन वर्षें केल्यानंतर तेहि स्वर्गवासी झाले. शेवटीं त्यांचे चुलते अबू तालीब यांनीं त्यांस आपल्या घरीं नेऊन त्यांचें अत्यंत प्रेमानें पालनपोषण केलें. बाळपण संपण्यापूर्वींच त्यांची विचारवृत्ती जागृत झाली होती. सवंगड्यांनीं खेळण्याचा किती जरी आग्रह केला तरी ते खेळावयास जात नसत. अरबस्तानांत चाललेले अनाचार कां व्हावेत, लोकांनीं एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यास कां पाहावें, चांगल्या विचाराचा एक शब्द देखील कां ऐकूं येऊं नये, आपणांस जन्म देणाऱ्या स्त्रियांची बदनामी करून त्यांना विटंबनेचा विषय लोकांनीं कां म्हणून करावा, असे

विचार त्यांच्या डोक्यांत भ्रमण करूं लागले म्हणजे ते कोठें तरी एकान्त जागीं जाऊन स्वतःशींच विचार करीत बसत.

त्यांच्या विचारांस जोराची चालना मिळण्याचा एक प्रसंग लवकरच घडून आला. निरनिराळ्या पक्षांच्या लोकांनीं आपापसांत द्वेषभाव एक महिनाभर कां होईना विसरावा म्हणून जिल्काद महिन्यांत उकाझ शहरीं मोठा उत्सव होत असे. या उत्सवांत भाग घेण्याकरितां लांबलांबचे लोक येत असत. या लोकांत कवी, नट, गवई यांचा भरणा असे. गाणेंबजावणें, शर्यती वगैरे कार्यक्रम या उत्सवांत होत असत. सर्वांत महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे कवितागायन. मोठमोठे कवी आपल्या रसभरित कविता गाऊन दाखवून लोकांकडून वाहवा म्हणवून घेत. कवितांचा विषय दुसरा तिसरा कांहीं नसून स्वतःच्या पक्षाची प्रौढी हा असे. आपला पक्ष श्रेष्ठ अशा प्रकारची कविता एकादा कवी म्हणूं लागला कीं, दुसऱ्यास संताप चढून तो आपली कविता चुरशीनें म्हणत असे. एकदां या चुरशीमुळें दोन पक्षांत बोलाचाली होऊन एकमेकांनीं तरवारी उपसल्या व रक्ताचा सडा घातला! ताबडतोब ही बातमी सबंध अरबस्तानमध्यें फैलावून युद्धाचा एकच डोंब उसळला. हें युद्ध कित्येक वर्षें चाललें होतें. हजारों माणसांचे मुडदे पडलेले पाहून हजरत पैगंबरांचें अंतःकरण पोळलें. कोणीं रक्तपात करूं नये म्हणून असे उत्सव करावेत आणि या उत्सवांत भाग घेणाऱ्या लोकांनीं युद्धाची आग लावून देऊन हजारों माणसांची हत्या स्वस्थ चित्तानें पाहात बसावी या गोष्टीचा त्यांना अतिशय विषाद वाटला व त्यांची वृत्ति जास्तच उदास बनली.

एवढ्या लहान वयांत ही उदास वृत्ती बरी नव्हे असें त्यांच्या प्रेमळ चुलत्यांस वाटून त्यांनीं हजरत पैगंबरांचें मन रमविण्याकरितां त्यांना आपल्याबरोबर सीरियास नेलें. त्या ठिकाणीं तरी शांतता-समाधान नांदत असेल अशी त्यांची कल्पना होती; पण तेथील झगडे, मारामाऱ्या, नैतिक शिथिलता पाहून त्यांची साफ निराशा झाली. साऱ्या राष्ट्राची अशी हीन वृत्ति कां

व्हावी या विचारांत त्यांचे तासचे तास जाऊं लागले. त्यांचे चुलते त्यांचें मन रमविण्याकरितां प्रवासामधील निरनिराळ्या शहरांतील लोकांच्या रीतिरिवाजांची ओळख करून देत; पण त्यांचें मन रमण्याऐवजीं असे चमत्कारिक रीतिरिवाज पाहून त्यांच्या मनाची गंभीरता सारखी वाढूंच लागली. अशाच परिस्थितींत त्यांच्या वयाचीं पंचवीस वर्षे निघून गेलीं.

## खदीजाबींशीं लग्न

व्यापाऱ्याच्या निमित्तानें तरी प्रत्येक शहराची परिस्थिति न्याहाळतां येईल या विचारानें हजरत पैगंबरांनीं व्यापारी पेशा पत्करला. एका सधन व्यापाऱ्याचे एजंट म्हणून ते शहरोशहरीं फिरूं लागले. जितक्या बारकाईनें ते निरनिराळ्या शहरांतील परिस्थितीचा अभ्यास करीत तितक्याच कसोशीनें व्यापार करीत. त्यांचा स्वभाव जन्मतः गोड असल्यामुळें व्यापारामध्यें त्यांनीं चांगलीच प्रगती करून घेतली. व्यापारामधील त्यांची प्रगती पाहून मक्केमधील खदीजाबी नांवाच्या एका धनाढ्य स्त्रीनें आपला व्यापार त्यांच्या हवालीं केला. हजरत पैगंबरांनीं या व्यापारांत खदीजाबींचा अतिशय फायदा करून दिला. त्यांचें अनुपम सौंदर्य, त्यांचा सच्चेपणा, दयाशील वृत्ति, दिलदार स्वभाव पाहून खदीजाबींचें त्यांच्यावर प्रेम जडलें. आणि याच निर्मल प्रेमाचें पर्यवसान लवकरच विवाहांत झालें. हजरत पैगंबरांना हा लग्नसंबंध अत्यंत सुखाचा झाला. खदीजाबींवर त्यांचें निरतिशय प्रेम होतें. त्यांचा सल्ला घेतल्याखेरीज ते कोठलेंहि कार्य करीत नसत. संकटकाळीं खदीजाबी त्यांस धीर व प्रोत्साहन देत. हजरत महंमद पैगंबरांच्या आयुष्याच्या पूर्वार्धांत जी संकटपरंपरा कोसळली ती निवारण करण्यांत खदीजाबींनीं वेळोवेळीं अपूर्व धैर्य दाखविलें आहे. शत्रूंच्या छळामुळें त्रस्त झालेल्या हजरत पैगंबरांस त्या आपल्या गोड शब्दांनीं विरंगुळा देत. लोकांनीं त्यांचा तेजोभंग केला तर आपल्या अधिकारवाणीनें त्यांस त्या कार्यप्रवृत्त करीत. पत्नीच्या या सहानुभूतीमुळें हजरत पैगंबरांस अंगीकृत कार्य करण्यास दुप्पट हुरूप येई. इस्लाम

धर्म-प्रचार करावयाचें जें अचाट कार्य हजरत पैगंबरांनीं हातीं घेतलें होतें त्याच्या यशाचें बरेंचसें श्रेय खदीजाबींस दिलें पाहिजे. स्त्रियांस उठल्यासुटल्या अबला म्हणून हिणवून स्वयंमन्यतेचें प्रदर्शन करणाऱ्या पुरुषांनीं एकदां खदीजाबींचें कार्यकर्तृत्व नीट न्याहाळून पाहावें. आज साऱ्या जगतांत व्यापून राहणाऱ्या इस्लाम धर्माची मुहूर्तमेढ रोंवतांना एका स्त्रीची प्रेरक शक्ती कारणीभूत झाली होती ही एकच गोष्ट पुरुषांस शरमिंदी करण्यास पुरेशी आहे.

## लग्नानंतर

खदीजाबींच्या प्रोत्साहनामुळें हजरत महंमद पैगंबरांच्या मनांत घोळणारे विचार मूर्त स्वरूपांत येऊं लागले. त्या वेळीं उन्मत्त लोकांनीं मक्केंत धुमाकूळ माजविला होता. अनाथ लोकांस छळणें, गरीब व असहाय वाटसरूंना लुटणें, परस्थ लोकांच्या सुंदर बायका व मुली दिवसाढवळया पळविणें वगैरे निंद्य प्रकार अव्याहत चालले होते. या प्रकारांना आळा घालण्याकरितां हजरत पैगंबरांनीं खदीजाबी व आप्तेष्ट यांच्या साहाय्यानें हलीफ-उल्-फझुल् या नांवाची संस्था स्थापन केली. या संस्थेनें २५ वर्षेपर्यंत बदमाष लोकांच्या अनाचारांस पायबंद घालून गोरगरिबांचें व प्रवाशांचें संरक्षण केलें.

कांहीं दिवसांनीं ' काबा ' मंदिराच्या जीर्णोद्धाराचें काम सुरू झालें. त्या वेळीं मंदिरांतील पवित्र दगड आंत बसवावयाचा मान आपणांस मिळावा याबद्दल मक्केंतील चार प्रमुख जमातींत तंटा सुरू झाला. प्रत्येक जमात आपण तो दगड बसविणार असें म्हणूं लागली. आपापसांत तडजोड होण्याचीं चिन्हें दिसेनात. इतकेंच काय, पण रक्तपात होण्यापर्यंत पाळी आली. हजरत पैगंबरांच्या न्यायी वृत्तीबद्दल फार ख्याती होती. त्यांनीं येऊन या प्रश्नाचा निकाल द्यावा असें सर्वानुमतें ठरलें. पैगंबरांना त्या ठिकाणीं बोलावण्यांत आल्यावर सर्वांनीं आपली कैफियत त्यांच्यासमोर मांडली. सर्वांची कैफियत शांतपणें ऐकून घेतल्यानंतर त्यांनीं आपलें उपरणें खालीं अंथरून त्यावर दगड ठेवला व प्रत्येक जमातीनें एक एक कोपरा धरून तो दगड आंत बसवावा असें सुचविलें.

हजरत पैगंबरांच्या या युक्तीमुळें आपसांतला रक्तपात टळून चारी पक्षांच्या लोकांस अत्यंत आनंद झाला व पैगंबरांवरची त्यांची भक्ती अधिक दृढ झाली.

लवकरच हजरत पैगंबरांनीं जनतेस भूतदयेचा धडा घालून दिला. खदीजाबींच्या पुतण्यानें 'झैद' नांवाचा गुलाम विकत घेऊन खदीजाबींला नजर केला. खदीजाबींनीं देणगीदाखल म्हणून त्या गुलामास हजरत महंमद पैगंबरांच्या हवालीं केल्यामुळें त्यांची त्या गुलामावर मालकी झाली. त्या वेळीं अरबस्तानांत गुलामांचा व्यापार जोरांत चालला होता. गुलाम विकत घेऊन त्याला वाटेल तसें राबवावयाचें, एखादें जनावर देखील खाणार नाहीं अशा प्रकारचें अन्न त्यास खावयास द्यावयाचें आणि क्षुल्लक कारणासाठीं अंगावरची कातडी सोलली जाईपर्यंत त्यास फटके मारायचे, अशी अमानुष पद्धत अरबस्तानांत शिष्टसंमत मानली जात असे. गुलामांची ही अवस्था पाहून पैगंबरांचें अंतःकरण तिळतिळ तुटत असे. ही रानटी पद्धत मोडावी म्हणून त्यांनीं आपल्या 'झैद' नांवाच्या गुलामास बिनशर्त स्वातंत्र्य दिलें. इतकेंच काय पण त्याला सार्वजनिक आयुष्यांत अडचण पडूं नये म्हणून आपल्या नात्यांतल्या मुलीशीं त्याचें लग्न करून देऊन त्याचा सामाजिक दर्जा वाढविला. त्यांनीं लोकनिंदेची किंवा रूढीची पर्वा न करतां एका गुलामास स्वातंत्र्य देऊन साऱ्या जगास भूतदयेचें महत्तम तत्त्व पटवून दिलें.

लग्न झाल्यानंतर पंधरा वर्षांत त्यांनीं या स्वरूपाचीं पुष्कळ सार्वजनिक कामें केलीं. प्रत्येक वेळीं ते आपल्या उदार धोरणाची ओळख साऱ्यांना पटवून देत. त्यांचा दिलदार स्वभाव, निष्कलंक चारित्र्य, उदात्त ध्येय व न्यायनिष्ठा पाहून मक्केंतील सर्व लोक त्यांना अल्-अमीन (विश्वासू) या नांवानें संबोधूं लागले.

## साक्षात्कार

वयाच्या पसतीस वर्षांपर्यंत हजरत पैगंबरांनीं समाजसुधारणेचीं कामें केलीं, तरी त्यांच्या मनाची शांती होईना. अरबस्तानांत चाललेल्या

अनाचारांच्या वार्ता त्यांच्या कानांवर आल्या म्हणजे ते अस्वस्थ होत. जनतेची चाललेली नैतिक अधोगती पाहिली म्हणजे त्यांच्या मनास धक्का बसत असे. लोकांचा हा चाललेला अधःपात थांबविण्याकरितां काय उपाय योजावेत याचा विचार करण्यासाटीं ते हीरा पर्वतावरील एका गुहेंत ध्यानस्थ बसत असत. ते ध्यानस्थ असले म्हणजे कित्येक वेळां रात्र संपून केव्हां उजाडलें याचें त्यांस भान देखील राहत नसे. अशा तऱ्हेचा उपक्रम त्यांनीं कित्येक वर्षे चालविला होता. नेहमींप्रमाणें एका रात्रीं ते गुहेंत ध्यानस्थ बसले असतां त्यांना साक्षात्कार झाला व अरबस्तानचीच नव्हे तर जगाची अधोगति थांबविण्याकरितां सद्धर्माचा प्रसार करण्याची त्यांस परमेश्वरी आज्ञा झाली. हजरत पैगंबर तंद्रींतून खडबडून जागे झाले. त्यांना दरदरून घाम सुटला व अंगांत कांपरें भरलें. ते गुहेंतून बाहेर पडले व तडक आपल्या घरीं आले. हा काय प्रकार झाला आहे याचा खदीजाबींस कांहींच उलगडा होईना. हजरत पैगंबर म्हणाले, "मला वेड लागायची पाळी आली आहे." खदीजाबी पैगंबरांस धीर देत म्हणाल्या, "अशी गोष्ट कधींहि घडणार नाहीं. परमेश्वर आपला साहाय्यकर्ता आहे. आपण असें घाबरून जाऊं नये. आपण सत्य भाषण करणारे आहांत, विश्वासू आहांत, गरिबांचे कैवारी आहांत, अनाथांचे वाली आहांत, परमेश्वराला आवडणारे सारे गुण आपल्या अंगीं आहेत. मग आपणांस भ्यायचें काय कारण?" खदीजाबींच्या गोड शब्दांनीं पैगंबरांस थोडा धीर आला व गुहेंत घडलेली सर्व हकीकत त्यांनीं त्यांस सांगितली. ती हकीकत ऐकल्याबरोबर खदीजाबी आनंदानें म्हणाल्या, "प्रिय खाविंद, उठा व आनंदीआनंद करा. साऱ्या जगांत सद्धर्माची घोषणा करण्याचा मान आज परमेश्वरानें आपणांस दिला आहे. आज सद्धर्माची मुहूर्तमेढ रोवून आपल्या कार्यास लागा." खदीजाबींच्या या उत्साहपूर्ण शब्दांनीं हजरत पैगंबरांच्या मनांत नवचैतन्य निर्माण झालें.

## इस्लामची मुहूर्तमेढ

परमेश्वराच्या आज्ञेनुसार इस्लाम धर्माची मुहूर्तमेढ रोंवल्याबरोबर इस्लाम धर्माचा पहिला अनुयायी होण्याचा बहुमान खदीजाबींनीं पटकाविला. आपला जुना धर्म सोडून इस्लाम धर्माचे अनुयायी होणें म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूला आव्हान करण्यासारखें धाडसाचें काम होतें. जेथें तुमची धार्मिक पद्धति सदोष आहे असें नुसतें विधान करण्याची सोय नव्हती, तेथें ती धार्मिक पद्धति पायाखालीं तुडवून नवीन धर्म स्वीकारण्याचें धाडस अपूर्व ठरेल यांत काडीमात्र शंका नाहीं. अशा प्रकारचें अपूर्व धाडस एका स्त्रीनें पहिल्या प्रथम करून दाखविलें ही एकच गोष्ट स्त्रियांची तेजस्वी वृत्ति साऱ्या जगास पटवून देण्यास पुरेशी आहे. केवळ सत्याकरितां, न्यायाकरितां जगाची पर्वा न करितां रूढींचीं बंधनें तोडून "बंधनापलीकडे" पदार्पण करणाऱ्या खदीजाबींकडे पाहिलें म्हणजे नकळत स्त्रियांबद्दल धन्योद्गार बाहेर पडतात.

खदीजाबींनंतर हजरत पैगंबरांचे चुलत बंधू हजरत अली व झैद यांनीं इस्लामधर्म स्वीकारला. अबू बक्र, उस्मान, अबदुल रहिमान, साद, झबीर वगैरे त्यांच्या ऋणानुबंधांतील लोकांनीं नवीन धर्माची ताबडतोब दीक्षा घेतली. तीन वर्षेपर्यंत इस्लामधर्माचा अव्याहत प्रचार केल्यानंतर मोठ्या मुष्किलीनें त्यांना ३० अनुयायी मिळाले. तेथील जनता अज्ञानांधः-कारांत खितपत पडल्यामुळें इस्लामधर्माचीं तत्त्वें त्यांच्या अंतःकरणांवर बिंबविण्यास अतिशय त्रास पडला. कित्येक वेळां त्यांना अपमानास्पद बोलणीं ऐकून घ्यावीं लागलीं. हजरत पैगंबरांचा आशावाद मोठा असल्याकारणानें इस्लामधर्माची ही कासवासारखी प्रगति पाहून ते निराश झाले नाहींत. शेवटीं मक्केंतील लोकांना जाहीर रीतीनें इस्लामधर्माची ओळख करून देण्याचें ठरवून त्यांनीं सफा टेकडीवर एक मोठी सभा बोलावली. सभेंत त्यांनीं इस्लाम धर्मा-तील सत्य, न्याय, सदाचार, भूतदया वगैरे सुंदर तत्त्वांचा परिचय करून दिला व अन्यायाचा पुरस्कार करणाऱ्या जुन्या धर्माचा त्याग करून या नव्या इस्लाम

धर्माचें अनुयायित्व स्वीकारण्यास कळकळीनें सांगितलें. पण जमलेल्या सर्व लोकांनीं हजरत पैगंबरांची हुर्यो उडविली. त्यांनीं पैगंबरांस वेड्यांत काढलें. विकट हास्य करीत व टोमणे देत सर्व लोक परत फिरले. पहिला प्रयत्न फिसकटलेला पाहून मक्केस येणाऱ्या पांथस्थ लोकांस हजरत पैगंबरांनीं उपदेश करण्यास सुरुवात केली. पण मक्केच्या लोकांनीं या पांथस्थ लोकांस, हा जादूगार आहे, तो वाटेल त्या थापा देईल, त्यावर विश्वास ठेवूं नका, असें बजावून सांगितलें. अशा तऱ्हेनें सुरुवातीस हजरत पैगंबरांचा तेजोभंग करण्याचा प्रयत्न झाला.

## विरोध

राष्ट्रांत सौख्य आणि शांति निर्माण करणारी एखादी चळवळ सुरू झाली म्हणजे ती चळवळ करणाऱ्या सत्पुरुषावर त्याच्याच देशबांधवांकडून आग पाखडण्यांत येते, त्याचा द्वेष केला जातो, त्याला मूर्ख ठरविलें जातें. इतकेंच नव्हे तर त्याच्या हालअपेष्टा करून त्या चळवळीपासून परावृत्त करण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला जातो. त्या चळवळीमुळें आपल्या राष्ट्रांतच काय पण जगांत सौख्य आणि शांति प्रस्थापित होणार आहेत अशी कल्पना असतांना देखील ती चळवळ घात करणारी आहे अशी कोल्हेकुई करण्यांत येते. अडाणी लोकांना तर हा आपल्या धर्मावर घाला आहे असें भासविण्यांत येतें. या चळवळीविरुद्ध ओरड करण्याचा शिष्टांचा अंतस्थ हेतू निराळाच असतो. सध्यांच्या परिस्थितींत आपल्यास जें चरावयास मिळतें, आपली जी चैन चालते ती यापुढें या चळवळीमुळें बंद होण्याची भीति असल्यामुळेंच होतां होईलतों या चळवळीविरुद्ध काहूर माजवून चळवळ सुरू करणारास वेडा ठरविण्यांत येतें. या सृष्टिक्रमास अनुसरूनच हजरत महमंद पैगंबरांच्या इस्लाम धर्माच्या नवीन चळवळीची अवहेलना करण्यास मक्केच्या स्वार्थसाधू लोकांनीं सुरुवात केली. या नवीन धर्मामुळें आपल्यास वाटेल तशी लूटमार करण्यास मिळणार नाहीं, फुकट पुढारी म्हणून मिरवितां येणार नाहीं, वाटेल त्या स्त्रीचा

उपभोग घेतां येणार नाहीं; सारांश, आपल्या स्वार्थाची गळचेपी होणार या भीतीनें या सद्धर्माच्या चळवळीविरुद्ध त्यांनीं शिंग फुंकलें. लोकांनीं प्रथम त्यांचा उपहास करण्यास सुरुवात केली. धर्माची ढाल पुढें करून अडाणी लोकांस त्यांनीं आपल्या बाजूस वश करून घेतलें व सर्व जनता या सद्धर्माच्या चळवळीविरुद्ध आहे असें भासविण्याचा प्रयत्न सुरू केला. पण असल्या उपायांनीं हजरत महमंद पैगंबर डगमगणारे नाहींत असें त्यांना कळून आल्यावर त्यांचा छळ करण्यास त्यांनीं सुरुवात केली. अनन्वित छळ करून त्यांना व त्यांच्या चळवळीस नेस्तनाबूद करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पण जी चळवळ सत्य, न्याय आणि प्रेम यांचा पुरस्कार करते ती चळवळ किंवा तिचा जनक यांना असल्या जालीम उपायांनीं नेस्तनाबूद करतां येईल काय?

## छळ व गांजणूक

इस्लाम धर्माची नवीन चळवळ सुरू केल्याबरोबर कुरेश ( मक्केच्या लोकांस कुरेश म्हणतात. ) पुढाऱ्यांनीं हजरत महमंद पैगंबरांस काबा मंदिरांत प्रार्थना करण्यास मनाई केली. ते जातील तेथें त्यांचा पाठलाग करून त्यांना हिणवण्यास सुरुवात केली. ते आणि त्यांचे अनुयायी हे प्रार्थना करीत बसले म्हणजे त्यांच्या अंगावर गटारांतील घाण टाकूं लागले. त्यांचा पिच्छा पुरवून त्यांची कुचेष्टा करण्यास शहरांतील टारगट पोरांना व उडाणटप्पू लोकांना शिकविलें. हजरत पैगंबरांना भररस्त्यावर उभें करून त्यांच्या तोंडावर अश्लील शिव्या देण्यास त्यांनीं सुरुवात केली. ते ज्या ठिकाणीं प्रार्थनेस बसतील त्या जागीं कांटेकुटे पसरून ठेवीत. पदोपदीं त्यांची मानखंडना होऊं लागली. तरी तत्त्वाकरितां, सद्धर्माकरितां त्यांनीं वरील सर्व प्रकार शांतपणें सहन केले. तोंडांतून एक चकार शब्द न काढतां किंवा कोणालाही दुरुत्तरें न देतां सर्व त्रास ते सहन करून घेत. हजरत पैगंबरांची ही अलोट सत्यनिष्ठा पाहून बऱ्याच लोकांनीं त्यांच्या इस्लाम धर्माची दीक्षा घेतली. हमजा नांवाच्या पराक्रमी व समशेरबहादर वीरानें इस्लाम धर्म स्वीकारलेला पाहून कुरेशांना मोठा पेंच पडला.

वेळींच आपण आळा घातला नाहीं तर ही क्रांतिकारक चळवळ फोंफावत जाऊन आपला सर्वांचा सत्यानाश झाल्याखेरीज राहणार नाहीं, या भीतीनें त्यांनीं नवीन धर्म स्वीकारणारांवर आपला मोर्चा फिरविला. नवीन अनुयायांचे हाल केले म्हणजे ते हाल पाहून इतर लोक या नवीन धर्मापासून परावृत्त होतील अशा खुळचट समजुतीनें नवीन अनुयायांस खड्यासारखे हुडकून काढून त्यांचे हाल करण्यास कुरेशांनीं सुरुवात केली.

पण अनुयायांचे हाल केले म्हणून चळवळीस थोडाच बाध येणार आहे? किंवा त्यांना ठार मारून चळवळ थोडीच मरणार आहे? लहान लहान फांद्या खच्ची करून वृक्ष कां कोठें उन्मळून पडतो? उलट खच्ची केलेला वृक्ष जोरानें फोंफावतो ही साधी गोष्ट द्वेषानें धुंद झालेल्या मत्त लोकांस कशी कळणार? या मत्त कुरेशांनीं हजरत पैगंबरांच्या अनुयायांचे अनन्वित हाल करण्यास सुरुवात केली. कुरेश त्यांना पकडून रमधा टेकडीवर नेत व त्यांच्या अंगावरचे कपडे काढून काठ्यांनीं बडवीत असत. कांहींना तुरुंगांत टाकून त्यांना अन्नपाणी न देतां उपाशी ठेवीत. कांहीं स्त्री-पुरुषांना शहराबाहेर नेऊन तापलेल्या वाळूवर उभे करीत. घरांतील एकाद्या माणसानें इस्लाम धर्म स्वीकारला तर घरांतील सर्व मंडळी त्यास त्रास देऊन सळो कां पळो करून टाकीत. एकादा गुलाम इस्लामधर्मी झाला अशी बातमी लागली कीं, त्याचा मालक त्या गुलामास मरेमरेतों मारीत असे. बिलाल नांवाच्या गुलामानें इस्लाम धर्म स्वीकारला हें कळल्याबरोबर उमय्या नांवाच्या त्याच्या धन्याच्या तळव्याची आग मस्तकास पोहोंचली. रक्त ओकेपर्यंत मार दिला तरी बिलाल इस्लाम धर्मापासून च्युत होत नाहीं, असें पाहून उमय्यानें निराळ्याच मार्गाचा अवलंब केला. बिलाल यास दररोज तापलेल्या वाळूवर उघड्या अंगानें निजवून तो त्याच्या छातीवर एक मोठा दगड ठेवीत असे. त्याचा जीव कासावीस झाला म्हणजे बिकट हास्य करीत उमय्या म्हणे, "आतां तरी इस्लाम धर्म सोडशील कीं नाहीं?" घशास कोरड पडल्या-

मुळें नुसत्या मानेनें तो नकार दाखवीत असे. बिलालाचे हे हाल पाहून अबू बक्र यांचें अंतःकरण द्रवलें आणि जब्बर किंमत देऊन त्यांनीं तो गुलाम उमय्यापासून विकत घेतला.

कुरेशांनीं यासर आणि त्याची पत्नी समिय्या यांचे हालहाल करून त्यांस ठार मारलें. खाबेब नांवाच्या तरण्याबांड तरुणाच्या अंगाची कातडी सोललं व त्याला सांगितलें, " इस्लाम धर्म सोड, तुला जीवदान देतों. " " सारें जग मला दिलेंत तरी मी इस्लाम धर्म सोडणार नाहीं, " हे करारी उद्गार ऐकल्याबरोबर कुरेशांचें पित्त खवळलें व त्यांनीं खाबेबच्या अंगाचे लचके तोडून त्याचा प्राण घेतला.

सद्धर्माकरितां प्राणार्पण करणाऱ्या हुतात्म्यांची पुण्याई समोर उभी असतां हजरत महमंद पैगंबरांची सद्धर्माची, इस्लामची चळवळ चिरंजीव झाल्याखेरीज कशी राहील ?

## पहिलें प्रयाण

हजरत महमंद पैगंबर हळुवार अंतःकरणाचे होते. एकाद्याचें मन दुखावलें तरी त्यांच्या अंतःकरणास वेदना होत. आपल्या अनुयायांचे अंगावर शहारे आणणारे हाल पाहिले म्हणजे त्यांच्या अंतःकरणाची कालवाकालवा होत असे. त्यांना आपल्या डोळ्यांदेखत अनुयायांच्या हालअपेष्टा पाहवेनात. कुरेशांचा राग थंड होईपर्यंत आपल्या अनुयायांस जवळच असणाऱ्या नेगसच्या राज्यांत जाण्याची परवानगी त्यांनीं दिली. पहिल्याप्रथम त्यांचे अनुयायी त्यांना एकटेच सोडून जावयास तयार होईनात. पण त्यांचा अत्यंत आग्रह झाल्यामुळें त्यांच्या अनुयायांपैकीं ८३ जणांनीं मुष्किलीनें नेगस देशांत प्रयाण केलें. या प्रयाणास मुहाजिरात ( पहिलें प्रयाण ) अशी संज्ञा आहे. आपल्या तावडींतून आपले शत्रू सहीसलामत नेगसला गेलेले पाहून कुरेशांच्या अंगाचा भडका उडाला. त्यांनीं नेगसच्या राजाकडे आपलें एक शिष्टमंडळ पाठविलें व पळून आलेल्या इस्लामधर्मीयांची मागणी केली. नेगसचा राजा उदार अंतः-

करणाचा होता. त्यानें त्या इस्लामधर्मीयांना बोलावलें व त्यांनीं कोणता गुन्हा केला म्हणून कुरेश त्यांची मागणी करतात, याबद्दल त्यांना खुलासा विचारला. सर्व इस्लामधर्मीयांच्या तर्फे हजरत अलींचे वडील बंधू जाफर यांनीं आपली कैफियत नेगसच्या राजासमोर मांडली. ते म्हणाले:—

" खाविंद, आम्ही अज्ञानांधःकारांत खितपत पडलों होतों. दगडांच्या मूर्तीसमोर हजारों जीवांच्या हत्या करण्यांत आम्ही धर्म पाळीत आहोंत अशी आमची भ्रामक कल्पना होती. अनीतीच्या गर्तेंत डुंबून राहण्यांत आम्हांस फार मौज वाटत असे. आमच्यांत दीर्घद्वेष माजून राहिला होता. आम्ही मृत जनावरांचें मांस आनंदानें भक्षण करीत होतों. भूतदया म्हणजे काय हें आमच्या गांवींहि नव्हतें. साध्या शिष्टाचाराच्या गोष्टी देखील आमच्या हातून घडत नसत. 'बळी तो कान पिळी' हा न्याय आमच्यामध्यें प्रचलित होता. आमचा अधःपात टाळण्याकरितां परमेश्वरानें अत्यंत थोर दानतीचा पुरुष निर्माण केला. त्यानें लहान लहान जीवांची हत्या करण्यास भाग पाडणाऱ्या मूर्तिपूजेचा प्रघात बंद करण्यास सांगितलें, सत्य, न्याय व प्रेम या अत्युत्कृष्ट तत्त्वांचा परिचय करून दिला, स्त्रियांची चाललेली विटंबना बंद केली, अनाचारापासून परावृत्त केलें, औदार्याची ओळख करून दिली आणि आपणांस निर्माण करणाऱ्या जगच्चालकाची प्रार्थना करण्यास शिकविलें. आम्हांस अमूल्य उपदेश करणाऱ्या हजरत पैगंबरांवर आमची अत्यंत भक्ती आहे. आम्ही हजरत पैगंबरांच्या शिकवणीबरहुकूम वागतों म्हणून हे आमची मागणी करणारे कुरेश आमच्यावर संतापून गेले आहेत. या कुरेश लोकांनीं, हजरत पैगंबरांच्या शिकवणीपासून आही परावृत्त व्हावें म्हणून आमचे हालहाल केले. त्यांच्या त्रासांतून सुटून आम्ही आपल्या आश्रयार्थ आलों आहोंत. आपण या सैतानी कुरेशांपासून आमचा सांभाळ कराल अशी उमेद आहे."

इस्लाम धर्माची सर्वसाधारण कल्पना आणून देणारें जाफर यांचें अत्यंत परिणामकारक भाषण ऐकून नेगसच्या राजानें आपल्या आश्रयार्थ आलेल्या

दा. क्र. ८८९१८७५ ४१२५

या इस्लामधर्मीयांना कुरेशांच्या स्वाधीन करण्याचें नाकारलें. तेव्हां कुरेशांच्या शिष्टमंडळाची अत्यंत निराशा झाली, व चडफडत तें शिष्टमंडळ मक्केस परत आलें.

## आमीष

आपण वाटेल त्या हालहपेष्टा केल्या तरी हजरत महंमद पैगंबर आणि त्यांचे अनुयायी आपल्या सद्धर्मापासून रतिमात्र ढळत नाहींत, हें पाहून कुरेशांनीं मोहअस्त्राचा उपयोग करण्याचें ठरविलें. त्यांनीं नुकत्याच यौवनप्रदेशांत पदार्पण करणाऱ्या सुंदर मुलींचा तांडा त्यांच्याकडे पाठवून दिला. खडतर तपश्चरण करणाऱ्या महामुनींना देखील स्त्रियांचा मोह आवरतां आला नाहीं असें आपण पुराणांतरीं वाचतों. पण हें अमोघ अस्त्र हजरत महंमद पैगंबर यांच्या जाज्वल्य तत्त्वनिष्ठेपुढें निष्प्रभ ठरलें. त्यांनीं सन्मानानें त्या स्त्रिया कुरेशांकडे परत पाठवून दिल्या. नंतर कुरेश पुढारी हजरत पैगंबरांच्या घरीं गेले. या कुरेशांनीं हजरत पैगंबरांचा अनन्वित छळ केला होता, तरी आदरातिथ्याला अनुसरून कुरेशांचें त्यांनीं स्वागत केलें. सर्व जण बसल्यानंतर कुरेशांचा पुढारी हजरत पैगंबरांस म्हणालाः—

" आपण खानदानी घराण्यांतले आहांत. आपण इस्लाम धर्माची नवी चळवळ सुरू करून सबंध अरबस्तानांत खळबळ उडविली आहे. त्यामुळें कित्येक कुटुंबांत तंटेफिसाद माजले आहेत. आपण आमच्या देवांना नांवें ठेवतां आणि आमच्या पूर्वजांच्या पदरीं मूर्खपणा बांधतां. अशा चळवळीपासून आपण अलिप्त राहावें अशी आमची इच्छा आहे. केवळ पैसा मिळावा या हेतूनें आपण ही चळवळ सुरू केली असेल तर आम्ही आपणांस वाटेल तितका पैसा द्यावयास तयार आहोंत; आपणांस सन्मान मिळवावयाचा असेल तर आम्ही आपणांस सर्वाधिकारी म्हणून नेमण्यास तयार आहोंत. आपणांस विचारल्याखेरीज कोठलीही गोष्ट आम्ही करणार नाहीं अशी हमी देतों."

"संपलें तुमचें म्हणणें! बरें, आतां माझें म्हणणें ऐका." हजरत पैगंबर म्हणाले.

"मी तुमच्या संपत्तीचा, मानाचा किंवा राज्याचा भुकेला नाहीं. मी आपणांस आनंदाचा सन्देश घेऊन आलों आहें. या संदेशाबरहुकूम आपण वागाल तर इहलोकीं व परलोकीं, परमेश्वराची आपणांवर कृपादृष्टि होईल."

यावर कुरेश म्हणाले, "आपलें विधान आम्हीं खरें कसें मानावयाचें? आम्हांला चमत्कार करून दाखवा म्हणजे आम्ही आपलें विधान सत्य समजूं. या जमिनींतून पाण्याचा झरा निर्माण करा, किंवा या ठिकाणीं खजुराच्या झाडांची बाग तयार करून दाखवा, किंवा हा समोरचा पर्वत चालवून दाखवा."

त्या काळीं चमत्कार करून दाखवून आपल्या भजनीं लोकांना लावावयाचा फार प्रघात होता. एखाद्या ढोंगी गुरूनें लोकांची दिशाभूल करणारे चमत्कार केले कीं, लोक त्याच्या भजनीं लागत, त्याचा शब्द मानीत; त्याला देव समजून नवससायास करीत. या अंधश्रद्धेमुळें अरबस्तानांत गुरूबाजी फार जोरांत बोकाळली होती. पण असे खोटेनाटे चमत्कार करून मिळविलेली लोकांची अंधश्रद्धा हजरत महंमद पैगंबरांस नको होती. अंधश्रद्धेवर उभा राहणारा डोलारा अल्पजीवी असतो हें त्यांना पूर्णपणें कळून चुकलें होतें. अंधश्रद्धेपेक्षां विवेकबुद्धीची श्रद्धा चिरायु ठरते व कार्यनिष्पत्ति करते अशी त्यांची ठाम समजूत होती. एवढ्याकरतां सद्धर्माचा प्रचार करीत असतां लोकांच्या भावनेपेक्षां त्यांच्या बुद्धीस ते पाचरण करीत. इस्लामधर्म दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेला व जात आहे याचें कारण तरी हेंच होय.

कुरेशांनीं चमत्काराचा पुरावा मागतांच हजरत पैगंबर शांतपणें त्यांना म्हणाले, "परमेश्वरानें मला चमत्कार करण्यास पाठविलें नाहीं. त्यानें मला आपल्यास उपदेश करावयास पाठविलें आहे. परमेश्वराचा संदेश पोहोंचविणारा मी एक साधा मनुष्य आहें...परमेश्वराचें सर्व भांडार माझ्या ताब्यांत आहे असें मीं कधींही सांगितलें नाहीं किंवा मी देवदूत आहें म्हणून लोकांची दिशाभूलही पण केली नाहीं. मती गुंग करणारी ढोंगबाजी

करून किंवा सत्याचा आलाप करणारी भाषा वापरून परमेश्वराच्या उज्ज्वल स्वरूपास मीं कधींही कलंक लावला नाहीं. मी मानवजातीस परमेश्वराचा संदेश पोहोंचविणारा मनुष्य आहें. तुम्हांला चमत्कार पाहावयाचे असतील तर आपल्या सभोंवार पाहा. निसर्गाची प्रत्येक क्रिया म्हणजेच एक चमत्कार आहे. आकाशांत लुकलुकणारे तारे, जगास प्रकाश देणारे सूर्य-चंद्र, वृक्षांची पैदास व वाढ, तुमच्या शरीराची एकंदर रचना, जन्म आणि मरण यांचा चाललेला अव्याहत क्रम, हे सगळे चमत्कार परमेश्वराच्या अस्तित्वाची साक्ष देत नाहींत काय ? ”

हातचलाखी किंवा दिशाभूल करणाऱ्या चमत्कारांवर कुरेशांचा सर्व विश्वास केंद्रीभूत झाला असतां निसर्गाच्या खऱ्याखुऱ्या चमत्कारांचा त्यांचा अंतःकरणांवर कसा परिणाम होणार ?

## तत्त्वनिष्ठा

कुरेशांनीं हजरत पैगंबरांना इस्लाम धर्माची चळवळ बंद करण्याकरितां परोपरीनें विनंती केली; पण त्या विनंतीचा हजरत पैगंबरांनीं अव्हेर केला. शेवटीं कुरेश चिडून म्हणाले, “ लक्षांत ठेव, तुझी चळवळ बंद केल्या-खेरीज आम्ही स्वस्थ राहणार नाहीं. ही चळवळ बंद करतांना एक तूं तरी मरशील किंवा आम्ही तरी मरूं. ”

या धमकावणीला न भितां हजरत पैगंबरांनीं आपलें कार्य चालू ठेवलें. त्यांच्या नवीन धर्माचा लोकांच्या मनावर चांगला परिणाम होऊं लागला. असा प्रकार आपण चालू दिला तर थोड्याच दिवसांनीं सबंध शहर इस्लाम-धर्मी होईल या भीतीनें कुरेशांनीं हजरत पैगंबरांच्या नव्या धर्माचा निःपात करण्याचे अनेक बेत केले; पण ते सर्व फसले. शेवटीं अगदीं निकरावर येऊन कुरेशांनीं हजरत पैगंबरांना स्वस्थ बसविण्याबद्दल त्यांच्या चुलत्यांस सांगितलें. हजरत पैगंबरांच्या चुलत्यांचें त्यांच्यावर अतिशय वजन होतें. अबू तालीब यांनीं हजरत पैगंबरांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला; पण ते आपल्या तत्त्वा-

पासून ढळतील असें चिन्ह दिसेना. ते म्हणाले, "कुरेशांनीं माझ्या एका हातांत सूर्य व दुसऱ्या हातांत चंद्र दिला तरी माझ्या कार्यापासून मी रतिमात्र ढळणार नाहीं. या कार्याकरितां मी माझ्या जीविताचीदेखील पर्वा करणार नाहीं."

हजरत पैगंबरांची ही उज्ज्वल तत्त्वनिष्ठा पाहून उमर नांवाचे पराक्रमी तरुण त्यांचे अनुयायी झाले. उमर यांचा गांवांत फार दरारा होता. त्यांच्यासारख्या आपल्या पराक्रमी नेत्यानें इस्लाम धर्म स्वीकारलेला पाहून कुरेशांना मोठा धक्का बसला. हजरत पैगंबरांना ठार मारण्यासाठीं उमर यांची योजना कुरेशांनीं केली होती. पण त्यांना ठार मारणारा गृहस्थच त्यांचा अनुयायी झाल्यामुळें कुरेश कावरेबावरे झाले.

अबू बक्र व उमर यांच्यासारखे मक्का शहरांतले नामांकित योद्धे व पुढारी इस्लामधर्माचे अनुयायी झाल्यामुळें नवमुसलमानांस फार आनंद झाला. त्यांनीं सार्वजनिक ठिकाणीं प्रार्थना करण्यास सुरुवात केली. हा प्रकार पाहून कुरेश जास्तच संतापले व हा सर्व संताप त्यांनीं हजरत पैगंबरांवर व त्यांच्या घराण्यावर काढला. हजरत पैगंबरांशीं किंवा त्यांच्या नातेवाइकांशीं कोणीहि सोयरीक करूं नये, त्यांना माल विकत देऊं नये किंवा त्यांच्याशीं कोठलाही व्यवहार करूं नये असें कुरेशांनीं ठरविलें. हा तीन वर्षें चालू असलेला बहिष्कार हजरत महंमद पैगंबरांना व त्यांच्या कुटुंबांतील माणसांना फार जाणवला. बाहेरून अन्नाचा पुरवठा बंद झाल्यामुळें कित्येकांना चार चार दिवस उपवास पडत, कित्येकांना नुसतें पाणी पिऊनच भूक शमवावी लागे. पण तत्त्वाकरितां या सर्व मंडळींनीं हे उपासमारीचे दिवस आनंदानें घालविले.

## खदीजाबींचा मृत्यु

याच सुमारास हजरत महंमद पैगंबर यांस एक असह्य धक्का बसला. त्यांची सद्गुणी सहचारिणी खदीजाबी यांचा शोचनीय अंत झाला. हजरत पैगंबरांस कार्यप्रवृत्त करणारी प्रचंड शक्ति निघून गेली. खदीजाबींनीं

अव्याहत २५ वर्षें आपल्या गोड व अधिकारी वाणीनें हजरत पैगंबरांस धीर व भरंवसा देऊन त्यांच्या हातून अलौकिक कामगिरी करविली. लोकमताच्या खवळलेल्या दर्यांत हेलकावे खात असलेलें इस्लामचें तारूं पैलतीरास पोहोंचविण्याचें बरेंचसें श्रेय खदीजाबींना आहे, यांत काडीमात्र संदेह नाहीं.

खदीजाबींवर हजरत पैगंबरांचें निरतिशय प्रेम होतें. त्यांना आवडणार नाहीं अशी एकहि गोष्ट ते कधीं करीत नसत. प्रत्येक कामांत त्यांचा ते सल्ला घेत. त्यांना खदीजाबींबद्दल विलक्षण आदर वाटे. एकदां ते म्हणाले, " परमेश्वरसाक्ष खदीजाबींसारखी थोर व उदार अंत:करणाची सहचारिणी मिळणें शक्य नाहीं. ज्या वेळीं मी दरिद्री होतों, त्या वेळीं त्यांनींच मला सधन केलें. ज्या वेळीं सगळ्यांनीं लुच्चा म्हणून माझी संभावना केली, त्या वेळीं त्यांनींच माझ्यावरचा विश्वास प्रगट केला; ज्या वेळीं सगळया जगानें माझ्या विरुद्ध द्वाही फिरविली, त्या वेळीं त्याच माझ्याशीं इमानानें वागल्या. "

खदीजाबींना पुष्कळ मुलें झालीं, पण सर्वांचा अकालीं मृत्यु झाला. फक्त फातमाबी नांवाची एकच मुलगी आईमागें राहिली. यांचेंच पुढें हजरत अलींशीं लग्न झालें. करबलाच्या रणांगणावर रक्त सांडणारे हुतात्मे सय्यद हुसेन हे यांचे चिरंजीव होत. फातमाबींच्या वंशजांना 'सय्यद' अशी संज्ञा आहे.

खदीजाबी कालवश झाल्या; पण त्यांनीं आपल्या तेजस्वी वृत्तीनें साऱ्या जगास धडा घालून दिला आहे. रूढीचीं बंधनें तोडल्याखेरीज स्त्रियांस महत्त्व येत नाहीं, हें त्यांनीं सप्रमाण दाखवून दिलें आहे. स्त्रिया अबला असतात, त्यांची बुद्धिमत्ता हिणकस असते, हा वेडगळ लोकापवाद त्यांनीं खोडून टाकला आहे. स्त्रियांच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती चूल व मूल यांपुरतीच नसून जगांत शांति निर्माण करण्याची परिस्थिति उत्पन्न करण्यापर्यंत आहे हें आपल्या चरित्रावरून त्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. स्त्रियांविषयीं गढूळ झालेली जगाची दृष्टी खदीजाबींच्या उद्बोधक चरित्रानें साफ होणार नाहीं काय !

## हिजरात

हजरत महंमद पैगंबरांचे चुलते अबु तालीब व प्रिय पत्नी खदीजाबी यांचे लागोपाठ झालेले मृत्यु पाहून त्यांचे मन अत्यंत उदास झालें. त्यांना सारी सृष्टी भयाण वाटूं लागली. थोडे दिवस मक्का शहराचा त्याग करून दुसऱ्या गांवीं गेल्यास मनास थोडा विरंगुळा वाटेल या कल्पनेनें हजरत महंमद पैगंबरांनीं आपल्या आवडत्या झैद नोकराबरोबर ताईफला प्रयाण केलें.

ताईफला गेल्यानंतर त्या ठिकाणीं स्वस्थ न बसतां त्यांनीं आपल्या सद्धर्माचा प्रचार सुरू केला. ताईफच्या रहिवाशांना आपल्या धर्मांतील उज्ज्वल तत्त्वें समजावून सांगितलीं. पण ताईफचे रहिवासी सवाई कुरेश होते. त्यांनीं त्यांची कुचेष्टा केली व त्यांना उडाणटप्पू ठरवून त्यांच्यावर दगडधोंड्यांचा वर्षाव करीत त्यांना आपल्या शहराच्या बाहेर घालवून दिलें. दगडांच्या माऱ्यानें हजरत पैगंबरांचें सर्व शरीर रक्तबंबाळ झालें होतें. ते शहराबाहेर येऊन एका खजुराच्या झाडाखालीं बसले व हात जोडून त्यांनीं अनन्यभावानें प्रार्थना केली. त्यांच्या डोळयांतून अश्रुप्रवाह चालला होता. ते म्हणाले, " देवाधिदेवा, तूं दयानिधि आहेस. गरिबांचा त्राता आहेस, माझा वाली आहेस. तूं तरी माझा त्याग करूं नकोस. माझ्या शत्रूंपासून संरक्षण करण्यास तूंच सर्वथैव समर्थ आहेस. माझ्यावर न रागावतां मला संकटांतून मुक्त कर. सर्व शक्तींचा, सर्व औदार्याचा तूं सागर आहेस."

एवढी प्रार्थना केल्यानंतर विषण्ण अंतःकरणानें ते मक्केस परत फिरले. एक दिवस अकबा टेकडीवर सद्धर्मावर प्रवचन करीत असतां यसरब नांवाच्या शहरांतून सहा वाटसरू आले. हजरत पैगंबरांचें प्रवचन ऐकून त्यांना फार आनंद झाला व त्यांनीं इस्लाम धर्माची दीक्षा घेतली. पुढच्या वर्षी हे सहा लोक पुन्हां आणखी कांहीं लोकांसह हजरत पैगंबरांकडे आले व त्यांनीं इस्लाम धर्म स्वीकारला. या लोकांबरोबर आपला एक प्रचारक त्यांनीं यसरब शहरास पाठविला. या प्रचारकानें आपलें कार्य चांगलें करून दाखविलें.

यसरब शहरांत इस्लाम धर्माचा चांगला बोलबाला झाला. कांहीं दिवसांनीं यसरब शहरांतील ७५ मंडळी—यांत कांहीं स्त्रियाहि होत्या ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.—हजरत पैगंबरांस आपल्या शहरीं भेट देण्याकरितां आमंत्रण द्यावयास आली. त्यांच्या शहरास भेट देण्याचें अभिवचन देऊन हजरत पैगंबरांनीं त्यांना आपल्या गांवीं रवाना केलें.

ही बातमी कुरेशांना कळतांच त्यांनीं ताबडतोब या पंचाहत्तर इस्लाम-धर्मीयांना पकडण्याकरतां आपले लोक पाठविले. पण हे लोक अगोदरच यसरबला पोहोंचल्यामुळें हात हालवीत कुरेशांना परत फिरावें लागलें. इस्लाम धर्माची फैलावत असलेली ही सांथ पाहून त्यांना कांहीं सुचेना. कुरेश कांहीं तरी जालीम उपाय शोधून काढण्यांत गुंतले आहेत अशी हजरत पैगंबरांस बातमी लागतांच त्यांनीं आपल्या सर्व अनुयायांना यसरब येथें पाठवून दिलें. आपलें संरक्षण करणारे सर्व अनुयायी यसरबला गेले तरी हजरत महंमद पैगंबर आपल्या दोन अनुयायांसह मक्केसच राहिले. यावरून त्यांचा स्वभाव केवढा निधडा होता याची अंधुकशी कल्पना आपणांस सहज येणार आहे.

हजरत पैगंबर एकटे आहेत तोंपर्यंत त्यांचा फन्ना उडवावा या हेतूनें नगर-मंदिरांत कुरेशांनीं आपली सभा बोलविली. त्या सभेंत पैगंबरांना ठार मारण्याचा विडा कांहीं तरुणबांड कुरेशांनीं उचलला. रात्र पडल्याबरोबर रक्तपिपासु कुरेशांनीं त्यांच्या घरास गराडा घातला व आपल्या तरवारी उपसून ते दबा धरून बसले. हजरत अलींना ही बाहेरची चाहूल लागतांच त्यांनीं हजरत पैगंबरांस सूचना दिली. वेळ मोठी आणीबाणीची होती. अलींनीं त्यांस तेथून निघून जाण्याचा आग्रह केला. अलींना एकटेच त्या ठिकाणीं सोडून जाण्याचें त्यांच्या जिवावर आलें. पण अलींच्या आग्रहावरून त्यांना बाहेर जाणें भाग पडलें. एका खिडकींतून बाहेर पडून कुरेशांना न दिसतां ते तडक अबू बक्र यांचे घरीं गेले. अबू बक्र व हजरत महंमद पैगंबर यांनीं ताबडतोब आपल्या मातृभूमीस रामराम ठोकला.

हजरत महंमद पैगंबर व अबू बक्र यांनीं मक्का सोडली त्या वेळीं रात्रीची मध्यान्ह उलटून गेली होती. अंधारांतच ते दोघे मार्ग आक्रमण करीत होते. अरुणोदय झाला त्या वेळीं ते सार टेकडीजवळ आले व त्या टेकडीवरील एका गुहेंतच लपून राहिले. इकडे पैगंबर आपल्या तावडींतून निसटले हें कळतांच कुरेशांच्या अंगाचा तिळपापड झाला. त्यांनीं त्यांच्या तपासाकरितां भरधांव घोडेस्वार सोडले. ‘ पैगंबरांस जो पकडून देईल त्यास शंभर उंट इनाम दिले जातील ’ अशी दवंडी पिटविली. कुरेशांच्या हातीं आपण सांपडलों तर आपल्या चिंधड्या उडविल्याखेरीज ते राहणार नाहींत या विचारानें अबू बक्र यांचा थरकांप होत असे. ते पैगंबरांना म्हणत, “ आपण अशा असहाय्य स्थितींत दोघेजणच आहोंत. ” परंतु हजरत पैगंबर त्यांना धीर देत म्हणत, “ नाहीं, आपण तिघे आहोंत. परमेश्वर आपला पाठीराखा आहे.”

तीन दिवस अहोरात्र कुरेशांनीं हजरत पैगंबरांचा तपास केला. मक्केसभोंवतींचा सर्व प्रदेश पायांखालीं तुडविला. त्यांना पकडण्याकरितां आपल्या प्रयत्नांची यांनीं शिकस्त केली, पण व्यर्थ. हे तीन दिवस हजरत पैगंबर अबू बक्र त्यांचेसह त्या गुहेंतच होते. रात्र झाली कीं, अबू बक्र यांची कन्या त्यांना अन्न नेऊन देत असे. हजरत पैगंबरांच्या नरडीचा घोट घेण्यास तयार झालेले लोक आजूबाजूस फिरत असतां त्यांच्या जवळून पैगंबरांकरितां अन्न घेऊन जाणारी मुलगी निधड्या स्वभावाची असेल यांत शंका नाहीं. तिसऱ्या दिवशीं रात्रीं हे दोघे आडमार्गानें यसरबच्या वाटेला लागले. वाटेंत अनेक अडचणी उपस्थित झाल्या. पण परमेश्वरकृपेनें त्या सर्व अडचणी दूर झाल्या. तीन दिवसांनंतर यसरबच्या प्रदेशांत त्यांनीं पाऊल टाकलें व कोबा नांवाच्या खेड्यांत त्यांनीं मुक्काम केला. या ठिकाणीं हजरत अली, पैगंबरांच्या घराण्यांतील मंडळी व त्यांचीं मुलेंमाणसें लवकरच दाखल झालीं. नंतर सर्व मंडळींसह हजरत महंमद यांनीं शुक्रवार तारीख २ जुलई ६२२ इसवी रोजीं सकाळीं यसरब शहरांत पाऊल टाकिलें.

हजरत पैगंबरांनीं मक्केहून मदिनेस जें प्रयाण केलें, त्या प्रयाणास 'हिजरात' ही संज्ञा आहे.

## मदीना शहरीं

हजरत महंमद पैगंबर आपल्या शहरीं येणार आहेत, ही बातमी कळतांच यसरबच्या लोकांना अतिशय आनंद झाला व तो आनंद व्यक्त करण्याकरितां त्यांचें जंगी स्वागत करण्याचें लोकांनीं ठरविलें. ज्या दिवशीं ते येणार त्या दिवशीं तेथील लोकांनीं आपलीं घरें लतापल्लवांनीं सुशोभित केलीं होतीं. त्यांनीं शहरांत पाऊल टाकतांच शहरांतील प्रमुख मंडळी त्यांना सामोरी गेली, व त्यांनीं त्यांचें प्रचंड स्वागत केलें. त्यांना पाहण्याकरितां लोकांची एकच गर्दी उसळली. जिकडे तिकडे त्यांचा जयजयकार ऐकूं येऊं लागला. त्यांच्या आप्तेष्टांना धन्यता वाटली.

मदिनेच्या लोकांनीं हजरत महंमद पैगंबर यांच्या मक्केहून आलेल्या अनुयायांस राहावयास फुकट घरें दिलीं. हजरत पैगंबरांस आपल्या नवीन धर्माचा प्रसार करण्याकरितां वाटेल ती मदत करण्याचें यसरबच्या लोकांनीं अभिवचन दिलें. त्यांचा झालेला असह्य छळ व त्यांची तत्वनिष्ठा पाहून सर्वांचीं अंत:करणें गहिंवरून गेलीं. त्यांनीं आपल्या शहराचें नांव बदलून मदीनत्-उन् नबी ( हजरत पैगंबरांचें शहर ) असें ठेविलें व हजरत पैगंबरांबद्दल वाटणारें प्रेम व्यक्त केलें.

मदीनेमध्यें हजरत पैगंबरांस भराभर अनुयायी मिळूं लागले. आपल्या अनुयायांना प्रार्थना करतां यावी म्हणून त्यांनीं त्या ठिकाणीं मशीद बांधली. त्या मशिदींत येऊन ते लोकांसमोर दररोज प्रवचन करीत. प्रवचन करीत असतां सत्य, सदाचार व प्रेम यांवर त्यांचा फार भर असे. एक दिवस त्यांनीं औदार्यावर अत्यंत सुंदर प्रवचन केलें. ते म्हणाले:—

"प्रत्येक सत्कार्य म्हणजे औदार्य. लोकांना सन्मार्गावर आणण्याकरितां उपदेश करणें म्हणजे औदार्य होय;

चुकलेल्या वाटसरूस वाट दाखविणें म्हणजे औदार्य; आंधळ्या-पांगळ्यांना दानधर्म करणें म्हणजे औदार्य; रस्त्यावर पडलेले काटेकुटे काढून टाकणें म्हणजे औदार्य; तहानलेल्यांना पिण्यास पाणी देऊन त्यांना तृप्त करणें म्हणजे औदार्य होय."

हजरत महंमद पैगंबर विश्वप्रेमावर फार भर देत. जगांतील सर्व लोकांत प्रेम व सहानुभूति उत्पन्न झाली पाहिजे असें ते आपल्या अनुयायांना सांगत. विश्वप्रेमावर प्रवचन करीत असतां ते म्हणाले:—

"परमेश्वरानें निर्माण केलेल्या मानवजातीवर जो प्रेम करीत नाहीं त्याच्यावर परमेश्वर कधींहि प्रेम करणार नाहीं. आपल्या मुलांबाळांवर, आपल्या आप्तेष्टांवर, आपल्या देशबांधवांवर, जगांतील यच्चयावत् मानवांवर आपण प्रेम कराल तर आपणांवर परमेश्वर संतुष्ट होईल. परमेश्वराची भक्ति करूं इच्छितां तर प्रथम आपल्या बांधवांवर प्रेम करा."

अशा तऱ्हेचीं कित्येक सुंदर प्रवचनें त्या नवीन बांधलेल्या मशिदींत हजरत पैगंबरांनीं केलीं. हजरत पैगंबर स्वतः बोलतात त्याप्रमाणें वागतात हें पाहून मदिनेच्या लोकांची त्यांचेवर विलक्षण भक्ति बसली. ते प्रत्येक बाबतींत पैगंबरांचा सल्ला घेऊं लागले. एवंच, थोड्याच अवधींत आपल्या पवित्र आचरणानें मदिनेच्या सर्व लोकांस त्यांनीं आपलेसें केलें.

### लोकशाहीचा उदय

मदिनेंत कोणाच्याहि हातीं एकत्रित सत्ता त्या वेळीं नव्हती. त्या ठिकाणीं दोन तीन प्रबळ पक्ष होते. मदीना शहराची सत्ता आपल्याकडे असावी याकरतां त्यांचेमध्यें तक्रार चालली होती. ही तक्रार अशीच वाढत जाईल तर या तक्रारीचें रूपांतर यादवीमध्यें होऊन निष्कारण रक्तपात होईल या भीतीनें तेथील कांहीं शहाण्यासुरत्या नागरिकांनीं मदीनेची

सत्ता कोणत्याही पक्षाच्या हातीं न देतां ती हजरत पैगंबरांच्या हातीं सुपूर्द करावी असें सुचविलें. ही कल्पना सर्वांना पसंत पडल्यानंतर कांहीं नवमुसलमान पैगंबरांकडे गेले आणि त्यांनीं मदिनेचें सर्वाधिकारित्व स्वीकारावें अशी विनंती केली. या सुमारास मदिनेंत मुसलमानच बहुसंख्याक होते. आपले अनुयायी बहुसंख्याक आहेत म्हणूनच सर्वाधिकारी होण्याबद्दल त्यांनीं आपलें नांव सुचविलें असावें या कल्पनेनें त्यांनीं सर्वाधिकारी होण्याचें नाकारिलें. मुसलमान बहुसंख्याक आहेत म्हणून बहुसंख्याकीच्या जोरावर आपण सर्वाधिकारी व्हावें ही गोष्ट त्यांना पसंत पडेना. मदिनेंतील ज्यू व ख्रिश्चन लोकांनीं आपणांस बिनविरोध संमत्ती दिली तरच आपण सर्वाधिकारी होऊं अशी त्यांनीं अट घातली.

मदिनेंत ज्यू, ख्रिश्चन वगैरे पुष्कळ धर्मांचे लोक होते. त्या सर्वांनीं एकमतानें निवडल्यावर हजरत पैगंबरांनीं सर्वाधिकाऱ्याची जागा स्वीकारली. अशा रीतीनें हजरत पैगंबरांच्या शिकवणीमुळें अरबस्तानांत लोकशाहीचा प्रथम उदय झाला.

आतांपर्यंत हजरत महंमद पैगंबर धर्मप्रचारक होते; पण मदिनेच्या लोकांनीं राज्याची धुरा त्यांच्या खांद्यावर दिल्यामुळें ते राजकारणी बनले. आपल्या हातीं सत्ता आल्याबरोबर त्यांनीं, मदिनेंत जे निरनिराळे पक्षोपपक्ष होते त्यांच्यांत दिलजमाई करून त्यांत ऐक्य घडवून आणलें. राज्यांत निरनिराळे पक्षभेद असले म्हणजे राज्यकारभाराचा गाडा सुरळीत चालत नाहीं, अशी खूणगांठ मनाशीं बांधून त्यांनीं सर्व पक्षांचें ऐक्य करण्यांत राज्यनिपुणता जगाच्या निदर्शनास आणिली आहे. आपल्या हातीं अनियंत्रित राज्यसत्ता आल्यानंतर त्या सत्तेच्या जोरावर आपला धर्म फैलावण्याचा त्यांनीं कधींही प्रयत्न केला नाहीं, किंवा तसें करावयास अप्रत्यक्षपणें प्रोत्साहनही दिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर परधर्मीयांच्या भावना न दुखविण्याचें उदार धोरण त्यांनीं आपल्यासमोर ठेविलें होतें.

हजरत पैगंबरांनीं एक जाहीर फर्मान काढून त्या फर्मानांत जनतेचीं कर्तव्यें कोणतीं असतात याचा स्पष्ट खुलासा त्यांनीं केला आहे. त्या फर्मानांतला महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे:—

> " हें राष्ट्र सर्व लोकांचें म्हणून यापुढें उल्लेख करण्यांत येईल. राष्ट्रांतील शांततेची किंवा युद्धाची जबाबदारी सर्वांवर सारखी राहील. परधर्मीयांच्या शत्रूशीं तह करण्याचा कोणालाही हक्क नाहीं. आमच्या लोकसत्ताक राज्यांत राहणाऱ्या ज्यू लोकांचा अपमान किंवा छळ केला जाणार नाहीं. त्यांना इतर नागरिकांप्रमाणें सारखे हक्क दिले जातील. त्यांना मुसलमानांइतकेंच पूर्ण धर्मस्वातंत्र्य दिलें जाईल. ज्यू लोकांच्या आप्तेष्टांस पूर्ण स्वातंत्र्य भोगण्याचा अख्त्यार आहे. आपल्या राष्ट्राचें संरक्षण करते वेळीं सर्व ज्यू लोकांनीं आपल्या देशबांधवांच्या मदतीस धांवून आलें पाहिजे. . .गुन्हेगार माणसास सक्त शासन केलें जाईल. तो अमक्या मुसलमान गृहस्थाचा नातेवाईक आहे म्हणून त्याची गय न करितां त्याला शिक्षा देण्यांत येईल. . .आपसांतील तंटे बखेडे असतील ते पैगंबरांसमोर कथन करावेत. "

वरील फर्मान वाचल्यानंतर धर्मवेड राजकारणांत घुसडूं न देण्याची हजरत पैगंबरांनीं किती खबरदारी घेतली आहे हें स्पष्टपणें दिसून येईल. त्याबरोबर नागरिकांचे हक्क शाबीत राखण्यांत त्यांनीं अगदीं अलीकडच्या राज्यकर्त्यांसहि लाजविलें आहे असें आपणांस कबूल करावें लागेल. राज्यसूत्रें हातीं घेतल्याबरोबर त्यांनीं आपला तोल जाऊं दिला नाहीं एवढ्यावरूनच त्यांची राजकारणपटुता चांगल्या तऱ्हेनें व्यक्त होत आहे.

## बदरची लढाई

हजरत महंमद पैगंबर यांनीं मदिनेंतील परधर्मीयांबद्दल उदार धोरण दाखविलें, त्यांना धर्मस्वातंत्र्य दिलें, त्यांचे हक्क सांभाळले; पण परधर्मीयांचें ( ज्यू लोकांचें ) कांहीं समाधान झालें नाहीं. याच ज्यू लोकांनीं एकमतानें हजरत पैगंबरांना सर्वाधिकारी केलें, पण ते आपल्या उदार धोरणामुळें दिवसेंदिवस 'लोकमान्य' होत चाललेले पाहून त्यांच्या मनांत असूया उत्पन्न झाली. परधर्माच्या मनुष्याचा इतका बोलबाला व्हावा, आपल्या हातून सुराज्याची जी गोष्ट झाली नाहीं ती एका परधर्मीयानें करून दाखवावी या गोष्टीचा त्यांना अत्यंत विषाद वाटला. सर्वाधिकारी मुसलमान असल्यामुळें सर्व राष्ट्र मुसलमानी होऊन आपली या देशांतून हकालपट्टी होईल या वेडगळ कल्पनेनें त्यांनीं हजरत पैगंबरांचा द्वेष करण्यास सुरवात केली.

त्या वेळचे ज्यू लोक अत्यंत धर्मवेडे होते. मनुष्य धर्मवेडा झाला म्हणजे त्याला सारासार विचार राहत नाहीं, उज्ज्वल ध्येयाची मातब्बरी वाटत नाहीं, सत्कार्याचें महत्त्व पटत नाहीं; त्याला परधर्मीयांची सुंदर कृति विद्रूप वाटूं लागते, त्यांचे सुंदर बोल कटु वाटूं लागतात, त्यांच्या उदार धोरणाबद्दल संशय येऊं लागतो. एकाद्या सुंदर घटनेचा विध्वंस करण्याचें महत्पुण्य हेच धर्मवेडे आपल्या पदरीं बांधून घेतात. हा विध्वंस करण्याकरितां परप्रांताच्या लोकांना वाटेल तसें साहाय्य करावयास यांना काडीमात्र शरम वाटत नाहीं. पण हा विध्वंस करतांना आपलीहि यांत राखरांगोळी होणार आहे, याचें त्यांना भानहि राहत नाहीं.

हजरत पैगंबरांनीं मदिनेंत येऊन केवढें सत्कृत्य केलें, केवढी सुंदर राज्यघटना केली; पण धर्मवेड्या ज्यू लोकांना त्याचें कोठलें महत्त्व वाटायला? उलट पैगंबरांच्या या राज्यघटनेचा विध्वंस करण्याकरितां मक्केच्या कुरेशांशीं त्यांनीं संधान बांधिलें. कुरेशांकडे गुप्त हेर पाठवून त्यांना मदिनेवर चाल करून येण्यास सांगितलें. हजरत पैगंबरांचा वाढता उत्कर्ष व त्यांना मिळालेलें

राज्यपद पाहून कुरेश संतापानें भडकून गेले होते. ज्यू लोक फितूर होऊन आपणांस मदत करावयास तयार आहेत हें कळल्याबरोबर त्यांना अतिशय आनंद झाला व मदिनेवर हल्ला करून हजरत पैगंबरांस धुळीस मिळविण्याची त्यांनीं तयारी केली.

हजरत पैगंबरांस कटाची बातमी लागली. अंतस्थ फितुरी व बाहेरून शत्रूचा हल्ला या दुहेरी माऱ्यांतून आपल्या प्रजाजनांचा त्यांना बचाव करावयाचा होता. या वेळीं ते नुसते धर्मप्रचारक नव्हते तर आपल्या प्रजेच्या जीवाचे संरक्षक होते. नुसते धर्मप्रचारक असते तर ते चाललेल्या फंदफितुरीकडे पाहून परमेश्वराचें नांव घेत स्वस्थ बसले असते. पण आतां ते मदिनेचे सर्वाधिकारी असल्यामुळें या फंदफितुरीचा योग्य बंदोबस्त करून शहराचें संरक्षण करणें त्यांचें कर्तव्यकर्म होतें. त्यांनीं ताबडतोब या फितूर लोकांना कैद करून हद्दपार केलें. इतक्यांत त्यांना कुरेशांचें सैन्य चाल करून येत आहे अशी बातमी लागली.

हजरत महंमद पैगंबरांनीं आतांपर्यंत कधींहि हातांत शस्त्र घेतलें नव्हतें. ते पराक्रमी अरब घराण्यांत जन्मले तरी त्यांचें अंतःकरण अतिशय मृदुल होतें. मक्केमध्यें आपल्या अनुयायांचे चाललेले हाल पाहून त्यांच्या अंतःकरणाची कालवाकालव होत असे. कोणाचें अंतःकरण दुखविलेलें त्यांना पाहवत नसे! दुसऱ्यास नुसती दुखापत झाली कीं त्यांचा जीव कळवळत असे. पण त्यांना नाइलाजानें शत्रूंपासून आपल्या राज्याचें संरक्षण करण्याकरतां हातांत शस्त्र धरावें लागलें.

एक हजार सैन्यानिशीं कुरेश मदीनेनजीक येऊन ठेपले. त्यांनीं शहराबाहेर असलेल्या बागबगीच्यांची नासधूस केली. ही बातमी कळतांच हजरत पैगंबर हे ३०० सैन्य घेऊन बदरच्या दरींत कुरेशांना प्रतिकार करण्याकरतां दबा धरून बसले. कुरेशांचें सैन्य त्याच रोखानें येऊं लागलें.

कुरेशांचें अफाट सैन्य पाहतांच हजरत पैगंबरांनीं दोन्ही हात जोडून परमेश्वराची प्रार्थना केली. ते म्हणाले, "परमेश्वरा, आम्हांला मदत करावयास विसरूं नकोस. या लढाईत माझ्या लहानशा सैन्याचा चुराडा उडाला तर तुझें नामसंकीर्तन करावयास मागें कोणीच उरणार नाहीं."

थोड्याच वेळांत अबु ज्याहिलच्या अधिपत्याखालीं कुरेशांचे १००० लढवय्ये बदरच्या दरीजवळ येऊन ठेपले. हजरत पैगंबरांचे मूठभर लोक पाहून सेनापति अबु ज्याहिल तिरस्कारानें हंसला व आपल्या सैन्यास हल्ला करावयास त्यानें आज्ञा दिली. लढाईला तोंड लागलें. हजरत पैगंबरांचे लोक हातावर शीर घेऊन लढत होते. लढाई ऐन रंगांत आली; इतक्यांत तुफान वादळ झालें. सोसाट्याचा वारा सुटून आजूबाजूस पसरलेली वाळू कुरेशांवर उधळली गेली. वाळूचा होत असलेला जोरदार मारा कुरेशांना सहन न झाल्यामुळें त्यांच्या सगळ्या सैन्याची वाताहात झाली. कुराशांचे पुष्कळ सेनानी मारले गेले. अशा रीतीनें मुसलमानांनीं पहिली बदरची लढाई जिंकली.

मुसलमानांनीं कुरेशांना कैद केलें. हजरत पैगंबरांनीं ताबडतोब हुकूम करून कैद्यांना दयाळूपणानें वागविण्यास आपल्या लोकांना बजाविलें. त्यांच्या आज्ञेप्रमाणें कुरेश कैद्यांना अत्यंत दयाळूपणानें वागविण्यांत आलें. त्यांना भूक लागली असतां हजरत पैगंबरांच्या सैनिकांनीं आपल्याजवळच्या भाकऱ्या त्यांना खावयास दिल्या व आपण नुसत्या खजुरावरच भूक भागविली.

लढाईत शत्रूंना कैद केलें तर त्यांना गुलाम करण्याची पद्धत होती. हजरत पैगंबरांनीं ही पद्धत बंद करून अमानुषतेस आळा घातला. आपल्या शत्रूंबद्दल त्यांनीं स्वीकारलेलें उदार धोरण पाहिलें म्हणजे त्यांच्या दिलदार अंतःकरणाची ओळख पटावयास फारसा वेळ लागणार नाहीं. आपल्या प्राणांवर उठलेल्या शत्रूंबद्दल त्यांनीं दाखविलेल्या प्रेमास इतिहासांत जोड मिळणें शक्य नाहीं.

## ओहोदची लढाई

बदरच्या लढाईत कुरेशांची दाणादाण होऊन विजयश्रीनें हजरत पैगंबरांस माळ घातलेली पाहून कुरेशांनीं पुन्हा पैगंबरांचा सूड घेण्याकरतां जय्यत तयारी केली. त्यांनीं अरबस्तानांत अत्यंत पराक्रमी म्हणून नांवाजलेल्या थिहाम व किनान नांवांच्या टोळ्या सामील करून घेतल्या. अबू सुफियन नांवाचा सैन्याधिकारी कुरेशांचें ३००० सैन्य घेऊन मदिनेवर हल्ला करावयास निघाला. हजरत पैगंबरांस ही बातमी लागतांच १००० सैन्यासह ते कुरेशांना तोंड देण्याकरतां मदिनेच्या बाहेर पडले. मदिनेपासून थोड्या अंतरावर असणाऱ्या ओहोदच्या टेकडीजवळ दोघांची गांठ पडली. युद्धाच्या ऐन वेळीं ज्यू लोकांनीं आपले ३०० लोक हजरत पैगंबरांच्या सैन्यांतून काढून घेतले. हजरत पैगंबरांस ऐन वेळीं दगा देण्याच्या हेतूनें त्यांनीं हें नामुष्कीचें कृत्य केलें; पण पैगंबरांनीं आपला धीर सोडला नाहीं.

युद्ध सुरू झालें. कुरेशांचा पहिला हल्ला परतविण्याकरतां मुसलमानांचा लढवय्या सेनानी हमजा कुरेशांवर आपल्या सैन्यानिशीं बेधडक तुटून पडला. मुसलमान सैनिकांनीं पराक्रमाची शिकस्त केली. थोड्याच वेळांत कुरेशांचें सैन्य उधळलें गेलें. विजयश्री मुसलमानांच्या गळ्यांत माळ घालणार होती, इतक्यांत कुरेशांची पांगापांग दिसतांच त्यांचेवर तसाच मारा करीत राहण्याकरितां हजरत पैगंबरांनीं टेकडीवर उभे केलेले योद्धे लूट करण्याकरतां टेकडीवरून खालीं उतरून गर्दीत मिसळले. युद्धाचा रंग पालटला. कुरेशांनीं पलट खाल्ली व जोराचा हल्ला मुसलमानांवर चढविला. कुरेशांनीं मुसलमानांची कत्तल चालविली. इतक्यांत त्यांचें लक्ष हजरत पैगंबरांवर गेलें. दांत ओंठ खात कुरेश त्यांच्यावर तुटून पडले. परंतु मुसलमानांनीं हजरत पैगंबरांना वांचविण्याकरतां आपला कोट केला आणि कुरेशांचे सर्व घातकी वार आपल्या अंगांवर झेलले. हजरत पैगंबरांच्या कपाळावर मोठी जखम झाली. ती जखम डाव्या हातानें तशीच दाबून धरून ते निकरानें लढूं लागले.

इतक्यांत अली हे हजरत पैगंबरांच्या संरक्षणाकरतां धांवून आले व त्यांनीं कुरेशांची कोंडी फोडून हजरत पैगंबरांना टेकडीवर नेलें. त्या ठिकाणीं त्यांनीं हजरत पैगंबरांची जखम धुतली. हजरत पैगंबरांचें बाकीचें सैन्य टेकडीवर चढलें व त्यांनीं कुरेशांवर मारा चालविला.

इतका वेळपर्यंत कुरेश दमून गेले होते. टेकडीवर जाऊन मुसलमानांवर हल्ला करावयाचें त्राण अंगांत न राहिल्यामुळें कुरेशांचें सैन्य मागें फिरलें. मागें फिरतांना त्यांनीं रणांगणावर पडलेल्या मृतांना लाथाडलें, त्यांचीं डोकीं तोडून भाल्यांच्या टोंकांवर लटकावून दिलीं, त्यांचा कोथळा चिरून आंतील आंतडीं आपल्या गळ्यांत अडकाविलीं. हजरत पैगंबरांना हा प्रकार कळतांच त्यांना अत्यंत दुःख झालें. व्यथित अंतःकरणानें हजरत पैगंबर मदिनेस परत फिरले. अशा रीतीनें ही दुसरी ओहोदची लढाई झाली.

## खंदकाची लढाई

वरील दोन्ही लढायांमध्यें कुरेशांची पिछेहाट झाली याबद्दल मदिनेंतल्या ज्यू लोकांना अत्यंत वाईट वाटलें. हजरत पैगंबरांचा पराभव होऊन इस्लामधर्म नेस्तनाबूद व्हावा एवढ्याकरतांच त्यांनीं फितूर होऊन कुरेशांना मदत केली. पण ही मदत वांया गेल्याचें पाहून त्यांना फार दुःख झालें. हजरत पैगंबरांस ज्यू लोकांचें हें कारस्थान कळतांच त्यांना त्यांनीं मदिनेच्या हद्दपार केलें. हद्दपार केल्यानंतरही त्यांनीं आपलीं कारस्थानें सुरू ठेवलीं होतींच. निरनिराळ्या प्रांतांत जाऊन त्यांनीं हजरत पैगंबरांची यथेच्छ निंदा सुरू केली व त्यांच्याविरुद्ध लढण्याकरतां कुरेशांना प्रवृत्त केलें.

कुरेशांनीं दोन वेळां लढाईत मार खाल्ल्यामुळें त्यांच्या अंतःकरणांतला सूडाग्नि अधिकच भडकला होता. या खेपेला हजरत पैगंबरांवर पूर्ण विजय मिळविण्याची त्यांनीं सर्वांगीण तयारी केली. ज्यू लोकांची त्यांना संपूर्ण सहानुभूति होती हें सांगावयास नकोच. अरबस्तानांतील निरनिराळ्या प्रांतां-तील लोकांनीं व कुरेशांनीं एक गट करून इस्लामी धर्मावर शेवटचा व

यशस्वी प्रहार करण्याचें योजिलें व १०,००० कसलेल्या सैन्यानिशीं मदिनेवर चाल केली. वाटेंत कोणत्याही प्रकारचा अडथळा न झाल्यामुळें हें कुरेशांचें सैन्य लवकरच मदिनेच्या सरहद्दीवर येऊन ठेपलें व तेथेंच त्यांनीं आपला तळ दिला.

कुरेश चाल करून येत आहेत अशी बातमी हजरत पैगंबरांना लागतांच त्यांनीं शहराबाहेर खंदक खणला व शहरांतील बायकामुलांस निरनिराळ्या मजबूत किल्ल्यांत बंदोबस्तानें ठेवून दिलें. या वेळीं ते आपलें ३००० सैन्य घेऊन मदिनेच्या बाहेर पडले व खंदकाच्या अलीकडे आपला तळ दिला. रणांगणाजवळ ज्यू लोकांचे मजबूत किल्ले होते. संकटाचे वेळीं मदिनेच्या लोकांना आश्रय देण्याचा करार या ज्यू लोकांनीं मदिना सरकारबरोबर केला होता. पण हे ज्यू कुरेशांना फितूर झाले व त्यांनीं संकटाचे वेळीं मदिनेच्या सैन्याला आश्रय देण्याचें नाकारिलें. यदाकदाचित् हजरत पैगंबरांचा पराभव झाला असता आणि ज्यू लोकांनीं त्यांना आपल्या किल्ल्यांत आश्रय दिला नसता तर पैगंबरांच्या सैन्याची भयंकर कत्तल होणें क्रमप्राप्तच होतें.

कुरेशांनीं खंदक ओलांडून हजरत पैगंबरांचे सैन्यावर हल्ला करण्याचा अनेक वेळां प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. एखादी घोडेस्वारांची तुकडी खंदक ओलांडून आलीच तर मुसलमान त्यांचा फडशा उडवीत. अशा रीतीनें हा वेढा वीस दिवस टिकला.

कुरेशांनीं आपल्याबरोबर जे बाजारबुणगे निरनिराळ्या प्रांतांतून गोळा केले होते, त्यांना त्या वेढ्याचा कंटाळा आल्यामुळें कुरेशांचें सैन्य सोडून जाण्याचा ते विचार करूं लागले. वीस दिवस एका ठिकाणीं राहिल्यामुळें घोड्यांची चंदीवैरण संपली व त्यांची उपासमार होऊं लागली. सैन्याचा दाणागोटा संपुष्टांत येऊं लागला. एके दिवशीं रात्रीं जोराचा पाऊस व वादळ सुटून कुरेशांच्या राहुट्या उडून गेल्या. दिवे विझले; जिकडे तिकडे एकच गोंधळ माजला. इतक्यांत हजरत पैगंबरांच्या सैन्यानें आपल्यावर हल्ला

केला अशी कोणीं हूल उठविल्यामुळें भीतीनें कुरेशांनीं पळ काढला. कांहीं कुरेश ज्यू लोकांच्या किल्ल्यांत घुसले. अशा रीतीनें फारशी प्राणहानी न होतां ही खंदकाची लढाई पार पडली. सकाळीं आपल्या सैन्यासह हजरत पैगंबर मदिनेकडे परत फिरले.

लढाईच्या ऐन वेळीं शत्रूला फितूर होऊन मदिनेच्या लोकांस तोंडघशीं पाडण्याचा भयंकर गुन्हा कांहीं ज्यू लोकांनीं केला होता. राज्यकर्ता या नात्यानें फितुरी लोकांचें पारिपत्य करणें हजरत पैगंबरांचें कर्तव्यकर्म होतें. त्यांच्या सैनिकांनीं ज्यू लोकांना कैद करून त्यांच्यासमोर उभें केलें. फितूर लोकांचीं बायकामुलेंहि कैद करून आणिलीं होतीं. परंतु बायकामुलांना निरपराधी म्हणून सोडून देण्यांत आलें. फितुरी लोकांना त्यांच्या भयंकर गुन्ह्याला अनुसरून शिक्षा देण्यांत आल्या.

निष्कारण धर्मवेडाला बळी पडून हजरत पैगंबरांचा व त्यांच्या राज्याचा निःपात करण्याचें अघोर कृत्य ज्यू लोकांनीं केलें. राज्यसूत्रधार ज्या धर्माचा असेल त्या धर्माचेंच राज्य होणार अशी वेडगळ कल्पना ज्यू लोकांनीं करून घेतली होती. वास्तविक मदिनेचें राज्य हें त्यांचेंच राज्य होतें. आपल्या राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी इतर लोकांप्रमाणें त्यांचेवरही होती. शत्रू चाल करून आल्यावर आपल्या राज्याकरितां प्राण देणें हा त्यांचा धर्म होता. आपल्या राज्याचा उत्कर्ष करावयास झटणें हें त्यांचें कर्तव्यकर्म होतें. पण धर्मवेडाच्या होळींत ती जबाबदारी, तो धर्म, तें कर्तव्यकर्म हीं जळून खाक झालीं. आणि त्याच होळींत त्यांची स्वतःचीही आहुति पडली.

## तह व वकिलात

वरील मोठ्या लढायांत हजरत पैगंबरांचा विजय झाल्यामुळें त्यांचा सगळीकडे चांगला दरारा बसला. लहानसहान दंगेधोपे चालले होते तेही बंद होऊन सगळीकडे शांतता नांदूं लागली. हजरत पैगंबरांच्या अनुयायांना मक्का सोडून बरींच वर्षें झालीं होतीं. आतां एकदा आपल्या

मातृभूमीस परत जाऊन तेथें यात्रा करावी अशी त्यांच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली. हजरत पैगंबरांनाहि मक्केची यात्रा करावयाची होती. आपल्या गैरहजिरींत मदिनेच्या राज्याची कोणत्याहि रीतीनें हेळसांड होऊं नये म्हणून त्यांनीं योग्य बंदोबस्त केला व ७०० अनुयायांसह ते मक्केस निघाले. मक्केस गेल्यानंतर हजरत पैगंबर आणि कुरेश यांच्यांत तह होण्याचें ठरलें. पैगंबरांना युद्धाचा अत्यंत तिटकारा आला होता, म्हणून आपण होऊन त्यांनीं तहास संमती दिली. त्या तहाचीं कलमें पुढीलप्रमाणें:—

(१) दहा वर्षेंपर्यंत मुसलमानांनीं व कुरेशांनीं आपसांतील यादवी बंद ठेवावी.

(२) आपल्या अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय एखादा कुरेश पैगंबरांकडे आला तर त्याला परत कुरेशांच्या हवालीं करावें.

(३) एखादा मुसलमान कुरेशांकडे आला तर त्याला कुरेशांनीं हजरत पैगंबरांच्या हवालीं करूं नये.

(४) कुरेश किंवा पैगंबर यांच्याशीं दोस्तीचा तह वाटेल त्या टोळीनें करावयास हरकत नसावी.

(५) मुसलमानांनीं पुढें चाल न करतां मदिनेस परत फिरावें.

(६) मुसलमानांनीं दरवर्षी मक्केची यात्रा करावी. त्यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा करूं नये. मुसलमानांनीं यात्रेकरतां फक्त ३ च दिवस मक्केंत राहावें.

हजरत पैगंबर मक्केहून मदिनेस येतात तोंच त्यांना खायबर शहरांतील ज्यू लोक मदिनेवर हल्ला करणार आहेत अशी बातमी लागली. हजरत पैगंबरांनीं हद्दपार केलेले ज्यू लोक खायबर शहरांत राहिले होते. त्यांनीं

खायबरमधील इतर ज्यूंना मदिनेवर हल्ला करण्यास चिथावून दिलें; पण पैगंबरांनीं वेळींच खबरदारी ठेवल्यामुळें त्या ज्यू लोकांना, हल्ला करणें तर राहोच, पण हजरत पैगंबरांना शरण यावें लागलें.

खायबरहून परत आल्यानंतर हजरत पैगंबरांनीं आसपासच्या राजांकडे इस्लामधर्म स्वीकारण्याची विनंति करण्याकरतां वकील पाठविले. पर्शियाचा बादशहा खुश्रु परवीझ यानें हजरत पैगंबरांच्या पत्राचे तुकडे तुकडे करून ते पायाखालीं तुडविले आणि त्या वकिलाचा अपमान करून त्यास हांकून दिलें. ग्रीसचा राजा हॅबिक्लीयास यानें पैगंबरांच्या वकिलाचा सन्मान केला व आपल्यास तो धर्म स्वीकारतां येत नाहीं असें नम्रपणें कळविलें. ही वकिलात अयशस्वी झाली तरी हजरत पैगंबर नाउमेद झाले नाहींत. निरनिराळ्या राजे लोकांच्या कानांवर आपल्या सद्धर्माची वार्ता गेली हाच आपला बराच कार्यभाग झाला असें त्यांस वाटलें.

## जाहीरनामा

मक्केच्या तहानंतर हजरत पैगंबरांनीं आपल्या राज्याविरुद्ध उठलेल्या दोनतीन शत्रूंचा बींमोड केल्यानंतर आपल्या राज्यांत पुष्कळ सुधारणा केल्या. आपण प्रस्थापित केलेल्या लोकसत्ताक राज्यांत सुव्यवस्था नांदून तें खरोखरींचें सुराज्य व्हावें एतदर्थ त्यांनीं जाहीरनामा काढला. या लोकसत्ताक राज्यांत अल्पसंख्याक असलेल्या परधर्मीयांचे हक्क न तुडविले जातांआपली राज्यपद्धति अत्यंत निर्दोष व्हावी अशीच हजरत पैगंबरांची सदिच्छा असावी असें जाहीरनाम्यांतील कलमें वाचल्यानंतर प्रत्येकास वाटेल. जगाच्या इतिहासांत प्रस्तुत जाहीरनामा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. तो जाहीरनामा असा:—

"दयाघन आणि करुण वत्सल अशा परमेश्वराला स्मरून, परमेश्वराचे प्रेषित हजरत महंमद यांचेकडून ख्रिश्चन लोकांविषयीं हा जाहीरनामा प्रसिद्ध केला जात आहे. खरोखरी परमेश्वर अत्यंत थोर व भव्य आहे. त्याच्या-

कडूनच सर्व प्रेषित आले. परमेश्वराजवळ अन्यायाचा मागमूस नाहीं. परमेश्वराचे प्रेषित व अबदुल्ला यांचे चिरंजीव हजरत महंमद हे, त्यांच्या राष्ट्रांतील लोकांनीं ख्रिश्चन लोकांशीं ( मग ते उच्च असोत वा नीच असोत ) कसें वागावें याची माहिती करून देण्याकरितां हा जाहीरनामा प्रसिद्ध करीत आहेत.

( १ ) जो कोणी आमचा नागरिक या जाहीरनाम्याचें उल्लंघन करील तो विश्वासघातकी ठरून परमेश्वराचें वचन मोडल्याचें पाप त्याच्या पदरीं पडेल. जाहीरनाम्याचें उल्लंघन करणारा, मग तो राजा असो, रस्त्यांतील भिकारी असो वा कोणीहि असो, तो शिक्षेस पात्र होईल.

( २ ) ख्रिश्चन लोकांचे धर्मगुरू यांना प्रवास करतांना एकाद्या पर्वतावर अगर खेडयामध्यें अगर प्रार्थनामंदिरांत उतरण्याचा प्रसंग आला तर सर्व ठिकाणीं मी आहें असें समजून त्यांच्या मालमत्तेचें किंवा त्यांचें संरक्षण केलें पाहिजे. कारण ते माझे नागरिक आहेत; आणि ते माझे नागरिक आहेत याबद्दल मला अभिमान वाटतो.

( ३ ) मी सर्व अंमलदारांस हुकूम करितों कीं, त्यांनीं ख्रिश्चन लोकांपासून कर वसूल करूं नये किंवा त्यांचेकडून इतर पैसेहि उकळूं नयेत.

( ४ ) ख्रिश्चन लोकांचे न्यायाधीश किंवा प्रांताधिकारी यांना बडतर्फ करावयाचा अधिकार कोणासहि नाहीं. ते आपल्या अधिकारावर कायम राहतील.

( ५ ) प्रवास करते वेळीं कोणाहि ख्रिश्चन माणसाला कोणीं त्रास देऊं नये.

नगर वाचनालय सातारा
जाहीरनामा
संगणकीकृत

(६) त्यांच्या प्रार्थनामंदिरांत ते जात असतां त्यांना कोणींहि प्रतिकार करावयाचा नाहीं.

(७) युद्धाचे वेळीं युद्धामध्यें सामील होण्याकरितां त्यांच्यावर जबरदस्ती केली जाणार नाहीं किंवा युद्धाकरितां त्यांचेजवळून करहि वसूल केला जाणार नाहीं.

(८) एकाद्या ख्रिश्चन स्त्रीनें मुसलमान माणसाशीं विवाह केला तर त्या मुसलमान माणसास आपल्या ख्रिश्चन स्त्रीला तिच्या इच्छेविरुद्ध तिच्या धर्मापासून परावृत्त करण्याचा अधिकार नाहीं.

(९) प्रार्थनामंदिरें बांधतांना ख्रिश्चन लोकांची गैरसोय कोणींहि होऊं देऊं नये. प्रार्थनामंदिरें किंवा मठ बांधतांना त्यांना मदतीची जरूर लागेल तर मुसलमान लोकांनीं त्यांना मदत केली पाहिजे.

(१०) त्यांच्याविरुद्ध कोणींहि शस्त्र उचलतां कामा नये. उलट त्यांच्याकरितां मुसलमानांनीं लढावयास तयार झालें पाहिजे. आपल्या राज्याबाहेरील ख्रिश्चन लोकांशीं मुसलमानांनीं युद्ध पुकारलें तर आमच्या येथील ख्रिश्चन नागरिक आपल्या शत्रूच्या धर्माचा आहे म्हणून मुसलमानांनीं त्याचा द्वेष किंवा तिरस्कार करूं नये.

(११) माझ्या कोणीहि नागरिकानें या जाहीरनाम्याचा भंग करूं नये. एकादा मुसलमान या जाहीरनाम्याविरुद्ध वागला तर तो परमेश्वराचा व आमचा गुन्हेगार होईल.

वरील जाहीरनाम्यांतील कलमें वाचल्यानंतर हजरत महंमद पैगंबर परधर्मीयांबद्दल केवढे सहिष्णु असत व त्यांच्या हक्कांविषयीं ते किती जागरूक

राहत याची कल्पना सहज करतां येईल. वरील जाहीरनामा सहिष्णुतेचा उत्कृष्ट नमुना म्हणून जगाच्या इतिहासांत चिरंजीव राहील.

ज्या काळांत स्वधर्मीयांचे हक्क पायदळीं तुडविण्याची प्रथा पडून गेली होती त्या काळांत परधर्मीयांचे हक्क शाबूत राखण्यांत हजरत पैगंबरांनीं आपल्या उदार धोरणाची कमाल करून सोडली आहे, असेच उद्गार प्रत्येकाच्या तोंडांतून निघाल्याखेरीज राहणार नाहींत. प्रत्येक जातीचा मनुष्य या असामान्य सहिष्णुतेबद्दल त्यांना धन्यवाद देत राहील. न्यायाचा, प्रेमाचा आणि सहिष्णुतेचा मूर्तिमंत पुतळा म्हणून सारें जग अभिमानानें त्यांच्याकडे अंगुलिनिर्देष करील.

## मक्केवर विजय

हजरत पैगंबरांनीं हद्दपार केलेल्या ज्यू लोकांच्या चिथावणीवरून कुरेशांनीं त्यांच्या लोकांवर हल्ला करून त्यांस कापून काढलें आणि त्यांच्याबरोबर केलेला शांततेचा तह मोडून टाकिला. आपल्या लोकांची निष्कारण कत्तल केल्यामुळें आणि कुरेशांनीं तहास हरताळ फासल्यामुळें हजरत पैगंबरांना कुरेशांचें पारिपत्य करणें भाग होतें. त्यांनीं आपल्या दहा हजार सैन्यानिशीं मक्केवर चाल केली आणि मक्केजवळील गर-उझ-झुरत नांवाच्या टेकडीजवळ आपला तळ दिला.

हजरत पैगंबरांच्या सैन्याची रात्रीं टेहेळणी करण्याकरतां कुरेशांचा क्रूर सेनापती अबू सुफियन आला असतां त्याला त्यांच्या सैनिकांनीं पकडलें आणि त्यांच्यासमोर उभें केलें. त्याला पाहतांच हजरत पैगंबरांच्या सेनापतींचा हात तलवारीकडे वळला; पण त्यांनीं आपल्या सेनापतींना शांत राहण्यास खुणविल्यामुळें ते स्वस्थ राहिले. हजरत पैगंबरांनीं एक वेळ त्याचेकडे शांतपणें नजर टाकली. अबू सुफियन थरथर कापत खालीं मान घालून उभा होता. त्यांच्या जिवावर उठणारा कट्टा दुष्मन आज आयता त्यांच्यासमोर उभा होता. त्यांच्या एका शब्दाबरोबर त्याच्या अंगाच्या चिंधड्या

उडविण्याकरितां त्यांचे सैनिक सज्ज होते. हजरत पैगंबर शांतपणें म्हणाले, "अबु सुफियन, तुला मीं क्षमा केली आहे." त्यांचे हे शब्द ऐकतांच त्यांचे सैनिक थक्क झाले. त्यांची ही दयाशील वृत्ती पाहून अबू सुफियनचे डोळे पाण्यानें भरून आले व त्यानें त्यांच्या पायांवर लोटांगण घातलें. त्याच क्षणीं इस्लामचा कट्टा वैरी अबू सुफियन इस्लामचा अनुयायी झाला.

आपला सेनापतीच मुसलमान झाल्यामुळें कुरेशांच्या तोंडचें पाणी पळालें; त्यांचा धीर खचला. हजरत पैगंबरांचें अफाट सैन्य पाहून कुरेशांच्या सैन्यांत फाटाफूट झाली. मूठभर लोकांनिशीं इक्रम नांवाचा कुरेश सेनाधिपति हजरत पैगंबरांना प्रतिकार करण्याकरितां मक्केच्या वेशीजवळ उभा होता. पण थोड्याच वेळांत इक्रमच्या सैन्यानें पळ काढला.

विशेष रक्तपात न होतां हजरत पैगंबरांनीं आपल्या सैन्यानिशीं मक्का शहरांत प्रवेश केला. ज्या मक्का शहरांतून त्यांना पिटाळून लावण्यांत आलें होतें, ज्या मक्का शहरांत त्यांचा अनन्वित छळ करण्यांत आला, त्याच मक्का शहरांत आज विजयी वीर म्हणून त्यांचें आगमन झालें. कुरेशांवर सूड उगविण्यास ही फार छान संधि होती. त्यांचे व त्यांच्या अनुयायांचे हाल करणारे सर्व बदमाष कुरेश आतां त्यांच्या हातांत सांपडले होते. त्यांच्या अंगाचे लचके लचके तोडून त्यांस ठार मारण्याकरितां हजरत पैगंबरांच्या अनुयायांचे हात शिवशिवत होते. आपल्या शत्रूंच्या रक्तानें मक्केचे रस्ते भिजवून टाकण्याकरितां संतप्त मुसलमानांच्या समशेरी म्यानाबाहेर निघाल्या होत्या. फक्त हजरत पैगंबरांचा हुकूम व्हावयाचा काय तो अवकाश होता. पण शत्रूवर विजय मिळविण्याच्या अगोदरच हजरत पैगंबरांनीं स्वतःच्या मनोवृत्तींवर विजय मिळविल्यामुळें त्यांच्या सैनिकांची अत्यंत निराशा झाली. त्यांनीं हुकूम सोडला:—

"विजयमदानें धुंद होऊन आपल्या शत्रूवर हत्यार चालवूं नका; त्यांचीं घरेंदारें लुटूं नका; त्यांचा अपमान

करूं नका; त्यांच्या मुलांबाळांना छळूं नका; त्यांच्या स्त्रियांची बेइज्जत करूं नका. ”

हजरत पैगंबरांचा हा हुकूम ऐकतांच सैनिकांनीं आपल्या तलवारी म्यान केल्या. कुरेश आश्चर्यानें थक्क झाले. इतका उदारधी जेता त्यांनीं आजन्मांत पाहिला नव्हता. कुरेशांच्या तोंडांतून धन्योद्गार बाहेर पडले व नकळत त्यांची हजरत पैगंबरांवर भक्ति बसली.

काबा मंदिरांतील जुन्या धर्मचिन्हांचा नाश करण्यांत आला. दुपारीं त्याच काबा मंदिरांत हजरत पैगंबरांनीं आपल्या अनुयायांसह परमेश्वराची प्रार्थना केली. प्रार्थनेनंतर आपल्या धर्मातील सुंदर तत्त्वांची ओळख त्यांनीं सर्वांना करून दिली.

हजरत पैगंबरांचें उदात्त ध्येय आणि इस्लाम धर्मातील सुंदर तत्वें पाहून कुरेशांच्या झुंडीच्या झुंडी इस्लाम धर्म स्वीकारण्याकरितां त्यांच्याकडे लोटूं लागल्या. ते सफा टेकडीवर बसले असतां त्यांच्यासमोर हजारों कुरेशांनीं इस्लाम धर्माची दीक्षा घेतली. समोर पसरलेला अनुयायांचा अफाट समुदाय पाहून हजरत पैगंबरांचे डोळे अश्रूंनीं डबडबले आणि आपल्या कार्यांत यश दिल्याबद्दल त्यांनीं परमेश्वराची अनन्यभावानें प्रार्थना केली. मदिनेस निघण्यापूर्वीं त्यांनीं मक्केच्या आजूबाजूस आपले धर्मप्रचारक पाठविले. धर्म-प्रसार करतांना लोकांवर जबरदस्ती किंवा रक्तपात न करण्याची सक्त ताकीद त्यांनीं आपल्या प्रचारकांना दिली. परंतु खालीद नांवाच्या एका प्रचारकानें रक्तपात केला आहे असें कळतांच त्यांना फार दुःख झालें. ते हात जोडून परमेश्वरास म्हणाले, “ परमेश्वरा, खालीदच्या कृत्याबद्दल मला क्षमा कर.” त्यांनीं ताबडतोब हजरत अली यांना पाठवून रक्तपाताची चौकशी करून नुकसानभरपाई देण्यास आज्ञा केली. हजरत अलींनीं त्या ठिकाणीं जाऊन ज्यांच्या येथें रक्तपात झाला

८८११५

होता, त्यांच्या मुलांबायकांस भरपूर नुकसानभरपाई दिली. यानंतर थोड्या दिवसांनीं हजरत पैगंबर आपल्या अनुयायांसह मदिनेस परत फिरले.

## शत्रूवर प्रेम

हजरत पैगंबरांच्या आतांपर्यंतच्या चरित्रांत प्रामुख्यानें दिसून येणारी गोष्ट म्हणजे त्यांचें शत्रूवरचें प्रेम होय. शत्रू शरण आला कीं त्यांचें अंतःकरण विरघळत असे. आपला द्वेष करणारा शत्रू आपल्या हातीं आला तर आपण त्याचेवर सूड उगविल्याखेरीज सहसा राहत नाहीं. हजरत पैगंबरांचे शत्रू त्यांचा द्वेषच करून राहिले नाहींत तर त्यांच्या जिवावरही उठले होते. अशा शत्रूंवरही त्यांनीं प्रेम केलें आहे असें आपणांस आढळून येईल. शत्रूचा सूड उगविण्यांत आपण द्वेषाच्या—आपल्या एका प्रबल शत्रूच्या—आहारीं जातों म्हणून हजरत पैगंबर आपल्या अंतःकरणांत सुडास थाराच देत नसत. त्यांच्या चरित्रांत त्यांनीं आपल्या शत्रूवर प्रेम केलेलीं उदाहरणें शेंकड्यांनीं दाखवितां येतील.

सुरॉक बीन जसम नांवाच्या कुरेशानें हजरत पैगंबरांचें शीर तोडून आणण्याचा बेलभंडारा उचलला होता. त्यानें तीन वेळां त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. पण सुदैवानें त्यांस कांहीं इजा झाली नाहीं. मक्का काबीज केल्यानंतर हजरत पैगंबर त्याला ठार करतील असा सर्वांचा कयास होता; पण त्यांनीं त्याचा सूड घेण्याचें नाकारिलें, इतकेंच काय पण त्याच्या कृत्याचा जाब विचारावयास देखील त्याला बोलाविलें नाहीं !

सफवान बीन उमय्या नांवाच्या कुरेशानें हजरत पैगंबरांस ठार मारण्याचा कट केला होता. पण कट उघडकीस येतांच तो फरारी झाला. त्याच्या स्नेह्यांनीं हजरत पैगंबरांजवळ रदबदली करून त्याला क्षमा करण्याचें वचन त्यांचेकडून घेतलें. त्याच्या स्नेह्यांनीं त्याला ही बातमी सांगून परत येण्याबद्दल सांगितलें. पण सफ्वानचा त्यांजवर विश्वास बसला नाहीं. शेवटीं "आपण सफवानला क्षमा केली आहे" याबद्दलची खूण म्हणून

हजरत पैगंबरांनीं आपला फेटा त्याच्या स्नेह्यांच्या हवालीं केला. फेटा पाहिल्या-नंतर सफवानची खात्री होऊन तो मक्केंत आला व त्यांचेजवळ येऊन त्यानें क्षमेची याचना केली. हजरत पैगंबर म्हणाले, " तूं येथें येण्यापूर्वीच तुला क्षमा केली आहे. "

एकदां हजरत पैगंबर ज्यू लोकांना त्यांच्या फितुरी कृत्याचा जाब विचा-रण्याकरतां गेले असतां ज्यू लोकांनीं त्यांना एका घरांत सन्मानानें बसविलें आणि ' आपण आतां येतों ' म्हणून बाहेर गेले. हजरत पैगंबरांच्या अंगावर सबंध भिंत पाडून त्यांचा खून करावयाचा त्यांचा इरादा होता; पण ते आकस्मिक बाहेर आल्यामुळें ज्यू लोकांचा बेत फसला. हजरत पैगंबरांच्या सैनिकांनीं त्यांनाही पकडून त्यांच्यासमोर आणलें; पण पैगंबरांनीं उदार अंतःकरणानें त्यांना क्षमा केली.

एकदां ज्यू लोकांनीं हजरत पैगंबरांना कांहीं कामाकरतां किल्ल्यांत बोलाविलें. त्यांना खाण्याकरतां म्हणून विषारी मिठाई त्यांच्या समोर एका ज्यू स्त्रीनें ठेविली. त्यांनीं ती मिठाई खाल्ली असती तर ते एका क्षणांत ठार झाले असते. पण मिठाई न खातांच ते उठल्यामुळें या ज्यू स्त्रीची मोठी निराशा झाली. पुढें त्या बाईला पकडून हजरत पैगंबरांसमोर उभें केलें तेव्हां त्यांनीं तिला क्षमा केली व सन्मानपूर्वक तिच्या गांवीं तिला पोहोंचती केली.

झबर नांवाच्या नोकरानें हजरत पैगंबरांच्या लाडक्या मुलीच्या पाठींत भाला मारून तिला ठार केलें. झबरनें क्षमेची याचना करतांच त्यानें बुद्धि-पुरस्सर खून केला नाहीं म्हणून त्यास शिक्षा न करतां त्यांनीं त्यास सोडून दिलें !

हदीस( पैगंबरी वाङ्मय )मध्यें अशीं कितीतरी उदाहरणें सांपडतील. या उदाहरणांकडे पाहिलें म्हणजे आपल्या मनोवृत्तींवर हजरत पैगंबरांनीं केवढा विजय मिळविला होता याची अंधुकशी कल्पना आपणांस येईल. शत्रूवर सूड उगविण्यापेक्षां त्याच्यावर प्रेम करून त्याच्या अंतःकरणाचा पालट करणें

जास्त पुण्यप्रद आहे अशीच हजरत पैगंबरांची शिकवण असावी, असा वरील उदाहरणांवरून निष्कर्ष निघत नाहीं काय ?

## इस्लामचा प्रसार

इस्लामच्या इतिहासांत हिजराचें नववें वर्ष अत्यंत महत्त्वाचें ठरतें. इस्लामला धुळीस मिळविण्याचें कंकण हातीं बांधणारे इस्लामचे कट्टे दुष्मन अखेर इस्लामचेच अनुयायी झाले. इस्लामला लाखोली वाहणारे गृहस्थ इस्लामची मुक्तकंठानें स्तुति करूं लागले. इस्लाम हा शब्द तोंडांतून काढतांच तीन वेळ सचैल स्नान करणारे कर्मठ धर्म-मार्तंड, इस्लामचीं महातत्त्वें तोंडपाठ करूं लागले. इस्लाम हा भयंकर सांसर्गिक रोग आहे असें समजून इस्लामचें नांव ऐकल्याबरोबर पळ काढणारे लोक मशिदीमध्यें येऊन इस्लाम धर्मास कवटाळूं लागले. कुराणाचा एकही शब्द घरांत कोणीं काढिला तर सबंध घर धुवून काढणारे गृहस्थ त्याच घरांत पवित्र कुराणाचीं पारायणें करूं लागले. नमाज पढत असतांना मुसलमानांच्या मुसल्ल्या( प्रार्थनेची बिछाईत )खालीं कांटे पसरणारे कुटाळ, सद्गदित अंतःकरणानें नमाजमध्यें सामील होऊं लागले.

अरबस्तानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत इस्लामचा आवाज निनादित होऊं लागला. दूरदूरच्या प्रांतांतून इस्लाम धर्म स्वीकारण्याकरितां शिष्टमंडळें आलीं. या शिष्टमंडळांचा मदिनेंत मोठा सत्कार झाला. इस्लाम धर्म स्वीकारल्यानंतर हीं शिष्टमंडळें आपापल्या देशांस निघून जात. इस्लाम धर्माच्या सुंदर तत्त्वांचा बोलबाला या शिष्टमंडळांकडून अतिशय झाला. इस्लाम धर्म स्वीकारण्यास आलेल्या शिष्टमंडळांत महत्त्वाचें शिष्टमंडळ म्हणजे ताईफच्या लोकांचें होय. याच लोकांनीं हजरत पैगंबरांवर शिव्याशापांचा वर्षाव केला होता; इतकेंच नव्हे पण दगडांच्या माऱ्यानें त्यांना रक्तबंबाळ करून त्यांना शहराबाहेर हाकून दिलें होतें. त्यांनीं या शिष्टमंडळाला मोठ्या सत्कारानें वागवून त्यांना इस्लाम धर्माची दीक्षा दिली. ताईफ प्रांतांतील लोकांनीं इस्लाम धर्म

स्वीकारलेला पाहतांच यामेन, महरा, आम्न, येथील राजे लोकांनीं आपापल्या लोकांतर्फे मदिनेस हजरत पैगंबरांकडे शिष्टमंडळें पाठविलीं. याही शिष्टमंडळांतील लोकांनीं इस्लाम धर्माची दीक्षा घेतली.

अरबस्तानांत 'ताय' नांवाची एक प्रचंड टोळी होती. या टोळीचा दरारा सर्व अरबस्तानांत होता. या टोळीचा नायक आदि यानें इस्लामधर्म कसा स्वीकारला याचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. आपल्या उदार वृत्तीनें पौर्वात्य देशांत कर्ण म्हणून नांवाजलेला प्रख्यात राजा हातिमताई याचा आदि हा जेष्ठ पुत्र होता. एकदां हजरत अल्ली यांनीं आदीच्या प्रांतावर स्वारी केली. हजरत अल्ली आपल्या शहराजवळ आले असें कळतांच आदि सिरीयांत पळून गेला. अल्लीच्या सैनिकांनीं आदीच्या परिवारास व बहिणीस कैद करून मदिनेस आणिलें. हजरत पैगंबरांच्या समोर तिला उभी करतांच ती म्हणाली, "आपण परमेश्वराचे प्रेषित आहांत असें मीं ऐकिलें. माझे वडील कालवश झाले असून माझा एकुलता एक भाऊ तुमचे सैनिक येतांच मला एकटीला सोडून पळून गेला आहे. आतां मला कोण सोडविणार? आपल्यापाशीं मी दयेची याचना करीत आहें. माझे पिताजी सुविख्यात होते; त्यांनीं कित्येक कैद्यांस सोडून दिलें आहे, कित्येक गोरगरीबांस अन्नसंतर्पण केलें आहे, कित्येक दुःखी माणसांचें शांत्वन केलें आहे, कित्येक स्त्रियांची इज्जत राखिली आहे. आपल्या उभ्या आयुष्यांत त्यांनीं कोणाचीही मागणी अमान्य केली नाहीं. मी त्यांचीच कन्या असून माझें नांव सुफाना आहे."

हजरत पैगंबर म्हणाले, "मुली, सच्चा मुसलमानाच्या अंगीं असणारे सर्व गुण तुझ्या बापामध्यें संकलित झाले होते; तुझ्या बापाच्या आत्म्याला शांति मिळण्याकरितां प्रथम मी परमेश्वराजवळ प्रार्थना करीन." नंतर ते आपल्या लोकांकडे वळून म्हणाले, "हातीमच्या मुलीला सोडून द्या. तिचा बाप दयेचा पुतळा होता. परमेश्वर दयाळू माणसावर प्रेम करतो व त्यास संकटांतून सोडवितो."

सुफाना आणि तिच्या परिवारांतील लोकांना अत्यंत सन्मानपूर्वक तिच्या शहरीं पोहोंचतें करण्यांत आलें. जगद्विख्यात कवी सादी यानें आपल्या बोस्तान नांवाच्या फारशी काव्यांत हा प्रसंग अत्यंत बहारीनें रंगविला आहे.

सुफाना तडक सिरीयांत गेली व तिनें आपल्या भावास सर्व वृत्तान्त सांगितला. हा वृत्तान्त ऐकून आदीचें अंतःकरण गहिंवरून आलें व तो मदिनेस हजरत पैगंबरांच्या दर्शनाकरितां निघाला. हजरत पैगंबरांना पाहिल्याबरोबर त्यानें त्यांच्या पायांवर लोटांगण घातलें व तो इस्लाम धर्माचा अनुयायी झाला. आपल्या शहरीं तो परत गेल्यानंतर त्याच्या राज्यांतील सर्व लोकांनीं इस्लामधर्म स्वीकारला आणि अशा रीतीनें अरबस्तानचा सगळा भाग इस्लाममय झाला !

## अखेरचे दिवस

परमेश्वराच्या प्रेरणेनें आपण प्रस्थापित केलेल्या सद्धर्माचा प्रसार अरबस्तानच्या कोनाकोपऱ्यांत झालेला पाहून, हजरत महंमद पैगंबरांस अत्यंत धन्यता वाटली. त्यांना आपलें या जगांतील कार्य संपलें असें वाटलें. आपला अंतकाळ जवळ आला आहे असें पाहून त्यांनीं आपल्या अनुयायांसह मक्केची शेवटची यात्रा करण्याचा निश्चय जाहीर केला. जिल्हाद महिन्याच्या २५ व्या तारखेस ( २३ फेब्रुवारी ६३२ ) त्यांनीं अफाट जनसमुदायासह मदिना शहर सोडिलें. हजरत पैगंबर आपल्या शहरीं येणार म्हणून मक्केच्या लोकांस अतिशय आनंद झाला. त्यांनीं हजरत पैगंबर आणि त्यांचे अनुयायी यांचें जंगी स्वागत करण्याचें ठरविलें.

थोड्याच दिवसांत एक लाख लोकांनिशीं हजरत पैगंबर मक्का शहराजवळ येऊन पोहोंचले. या वेळीं मक्केंत जिकडे पाहावें तिकडे उत्साह पसरला होता; जिकडे पाहावें तिकडे आनंद उसळत होता. आपला "**प्यारा पैगंबर**" पाहण्याकरितां मक्केच्या वेशीजवळ लोकांचा तोबा उसळला होता. लहानथोर, म्हातारेकोतारे वगैरे सर्वजणांनीं या समारंभांत भाग घेतला होता.

मक्केचा मुख्य रस्ता लोकांनीं फुलून गेला होता. प्रत्येकाच्या मुद्रेवर हास्य व आतुरता दिसत होती.

हजरत पैगंबर मक्का शहरांत प्रवेश करितांच "अल्ला हो अकबर" ची गर्जना झाली. लोकांनीं कृतज्ञतेच्या अश्रूंनीं हजरत पैगंबरांचें स्वागत केलें. हजरत पैगंबरांनीं सर्वांना अभिवादन केलें.

यात्रेचे विधि उरकण्यापूर्वी हजरत पैगंबरांनीं आरफातच्या व्यासपीठावरून यात्रेकरितां आलेल्या सर्व लोकांसमोर शेवटचें व्याख्यान दिलें. आपल्यासमोर पसरलेला अफाट जनसमूह पाहून पैगंबरांचा कंठ दाटून आला. ते म्हणाले:—

"आजची यात्रा सगळ्यांनीं मिळून केली याबद्दल मला अत्यंत आनंद वाटत आहे. माझ्यासमोर पसरलेला अफाट जनसमुदाय इस्लामच्या उज्ज्वल ध्येयाची साक्ष देत आहे. ज्या ठिकाणीं आपला छळ झाला, त्या ठिकाणींच आज आपला सत्कार होत आहे ही एकच गोष्ट, आपला प्यारा इस्लाम धर्म किती उदात्त व थोर आहे हें सिद्ध करण्यास समर्थ आहे. जगांत शांति उत्पन्न करणाऱ्या इस्लाम धर्माचे तुम्ही अनुयायी आहांत हें लक्षांत ठेवून सर्व लोकांशीं प्रेमानें वागा. दुसऱ्याच्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न होईल अशा तऱ्हेचें आचरण ठेवा. रक्तपात किंवा अनाचार करून तुमचा केव्हांहि उद्धार होणार नाहीं. तुमचा कट्टा शत्रू असला तरी त्याच्याशीं प्रेमानें वागा. प्रेम हें आपल्या धर्मांतील महान् तत्त्व आहे. तुमच्या हृदयांत द्वेषबुद्धीस थारा देऊं नका. द्वेषानें तुमच्या चांगल्या भावना देखील गढूळ होऊन जातील. अन्यायाची एकदेखील गोष्ट करूं नका. तुमच्या इस्लाम धर्मास काळीमा लागेल असें

> कोणतेंहि कृत्य न करण्याची खबरदारी घ्या...त्याबरोबरच स्त्रियांचा मान राखीत जा. स्त्रियांची तुमच्यावर व तुमची स्त्रियांवर सत्ता आहे हें विसरूं नका. आपल्या स्त्रियांवर निस्सीम प्रेम करा आणि त्यांना दयाळूपणानें वागवा. स्त्रियांची इज्जत राखा आणि तुमच्या प्रत्येक कार्यांत त्यांस भागीदार करा....तुमच्या नोकरचाकरांशीं प्रेमानें वागा. तुम्ही खाल तें अन्न-वस्त्र व तुम्ही वापराल तीं प्रावरणें त्यांना द्या. त्यांच्या शक्तीबाहेरचें काम करण्यास त्यांस सांगू नका. तुमच्या सर्व कृत्यांचा जाब परमेश्वर शेवटच्या दिवशीं विचारील हें लक्षांत ठेवून कोठलेंहि अनाचाराचें कृत्य करूं नका. त्या सर्वशक्तिमान् परमेश्वरास शरण जा. तो दयाघन तुम्हांआम्हां सर्वांचा उद्धार करणारा आहे."

हजरत पैगंबरांचा प्रत्येक शब्द जनतेच्या अंतःकरणांत जाऊन भिडत होता. वरील उपदेश विचारपूर्वक वाचला तर हजरत पैगंबरांच्या शब्दाशब्दांत सत्य, न्याय, सहिष्णुता, आणि प्रेम हीं प्रतिबिंबित झालेलीं दिसून येतील.

ही मोठी यात्रा आटोपल्यानंतर त्यांनीं लोकसत्ताक राज्याखालील प्रांतांची सुव्यवस्थित घटना करण्यांत आपले दिवस घालविले. प्रजेची कोणत्याही तऱ्हेनें गैरसोय होऊं नये याबद्दल त्यांनीं शक्य ती खबरदारी घेतली. आपण प्रस्थापित केलेली लोकसत्ताक राज्यपद्धति नमुनेदार करण्याकरितां त्यांनीं अत्यंत परिश्रम घेतले. या परिश्रमांचा परिणाम हळूहळू त्यांच्या प्रकृतीवर होऊं लागला. त्यांची तब्येत क्षीण होऊं लागली.

दिवसेंदिवस आपण क्षीण होत चाललों आहोंत याची कल्पना असतां देखील ते नियमानें मशिदींत जाऊन सर्व लोकांसमवेत प्रार्थना करावयास चुकत नसत. "आपण प्रार्थनेस मशिदींत न येतां घरींच प्रार्थना करावी,"

असें त्यांना परोपरीनें सांगण्यांत आलें; पण त्या सांगण्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अंतकाळच्या पूर्वी एका मध्यरात्रीं ते एकटेच कबरस्थानांत गेले आणि सद्धर्माकरितां प्राणार्पण करणाऱ्या हुतात्म्यांच्या आत्म्यांना सद्गति मिळण्यासाठीं त्यांनीं परमेश्वराची करुणा भाकली. परमेश्वराची करुणा भाकतांना त्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू येऊं लागले, त्यांचा कंठ दाटून आला. भरलेल्या डोळ्यांनीं सभोंवार पसरलेल्या हुतात्म्यांच्या थडग्यांवर पुन्हां एकवार नजर टाकून ते जड पावलांनीं स्वस्थानीं परत फिरले.

आतां त्यांच्या अंगांत दोन पावलें चालण्याची देखील शक्ति उरली नव्हती. आपल्या सर्व अनुयायांसमवेत परमेश्वराची शेवटची प्रार्थना करावी अशी हजरत पैगंबरांच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली. पण ते अत्यंत अशक्त झाल्यामुळें त्यांचे अनुयायी त्यांना मशिदींत येण्याचा त्रास घेण्यास परवानगी देईनात. त्यांना न जुमानतां, आपल्या दोन पुतण्यांच्या खांद्यांवर हात टाकून ते कसेबसे मशिदींत येऊन पोहोंचले. मशिदींत आल्यावर सुहास्य करून त्यांनीं सभोंवार आपल्या अनुयायांकडे नजर टाकली. प्रार्थना झाल्यानंतर त्यांनीं पुन्हां एकवार शांति व प्रेमाचा सदुपदेश केला. शेवटीं कुराणांतील एक ऋचा म्हणून त्यांनीं आपला उपदेश संपविला.

नमाज पढून घरीं आल्यावर त्यांना भयंकर मूर्च्छा आली. ते जे एकदा बिछान्यावर झोंपले ते पुन्हां उठलेच नाहींत. जगत्-शांतीचा अहर्निश जप करणारे, इस्लामधर्माचे प्रणेते हजरत महंमद पैगंबर तारीख ८ जून ६३२ इसवी रोजीं चित्स्वरूपीं विलीन झाले.

मानवजातीच्या उद्धारार्थ प्रत्येक क्षण खर्ची घालणाऱ्या उज्ज्वल व भाग्यशाली आयुष्याचा शेवट झाला. वेळोवेळीं अनाचाराच्या अंधःकारांत ठोकरा खात फिरणाऱ्या दुर्दैवी जनतेस मार्गदर्शक होणारी पुण्यस्मृती चिरंजीव झाली !

## फलश्रुति

आतांपर्यंत आपण वाचलेल्या हजरत पैगंबरांच्या चरित्राचा काळजीपूर्वक विचार केला तर आयुष्याच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत सौख्य व शांति

* लोकोत्तर.



निर्माण करण्याकरितां हजरत पैगंबरांनीं केवढे परिश्रम केले, किती संकटें सोसलीं, किती खस्ता खाल्ल्या याची आपणांस सहज कल्पना होईल. त्यांच्यासारखा लोकोत्तर पुरुष जगाच्या इतिहासांत धुंडाळूं गेल्यास मिळेल कीं नाहीं याची शंकाच आहे. संकटांचे डोंगरच्या डोंगर कोसळले तरी तत्त्वापासून रतिमात्र न ढळणारे त्यांच्यासारखे महात्मे आपणांस किती सांपडतील ? प्राणांवर गदा आली असतां आपल्या अंगीकृत कार्यापासून च्युत न होणारे त्यांच्यासारखे महाभाग आपणांस कितीसे भेटतील ? सुज्ञ माणसास देखील भुरळ पाडणारीं आमिषें दाखविलीं गेलीं असतां, निर्विकार अंतःकरणानें ठरविलेला मार्ग चोखाळणारे तपस्वी आपणांस कितीसे मिळतील ? हातांत अमर्याद सत्ता आली असतां त्या सत्तेचा काडीमात्र दुरुपयोग न करणारे हेच ते त्यागी राजे म्हणून किती जणांकडे आपणांस बोट दाखवितां येईल ?

हजरत पैगंबरांचा एकंदर इतिहास नजरेसमोर आणला तर आतांपर्यंत त्यांच्यासारखा थोर पुरुष झाला नाहीं असेंच आपणांस म्हणावें लागेल. त्यांनीं केलेल्या कार्यांचा आढावा काढला तर त्यांच्याइतकें अभूतपूर्व व अनेक दृष्टींनीं परिपूर्ण असें उत्कृष्ट कार्य कोणींहि करून दाखविलें नसेल. वीस वर्षांपूर्वी अधःपात पावलेला सारा अरबस्तान त्यांच्या कार्याची श्रेष्ठता सप्रमाण सिद्ध करावयास तयार आहे. इतकेंच काय पण त्या देशानें साऱ्या जगांत हजरत पैगंबरांना अद्वितीय म्हणून ठरविण्याची सिद्धता केली आहे.

आणि तें सर्वस्वीं खरें आहे. कारण, हजरत महंमद पैगंबरांनीं आपल्या तपोबलानें रानटी मुलुखांत उच्च संस्कृति निर्माण केली, रक्तास चटावलेलीं अंतःकरणें प्रेमाच्या बंधनांनीं जखडून टाकलीं, दिशाभूल करणाऱ्या अंधःश्रद्धेची जागा विवेकबुद्धीस दिली आणि सभोंवार पसरलेला अस्वस्थतेचा काळकभिन्न अंधार नाहींसा करून सौख्य आणि शांतीची सुप्रभात केली.

यापेक्षा हजरत पैगंबरांच्या उज्ज्वल कार्याची फलश्रुति ती कोणती ?

---

भाग ३ रा

# स्वभाव-चित्र

" जो परमेश्वराची आराधना करतो, त्याच्याकरितां पैगंबर मूर्तिमंत आदर्श होत. "

—पवित्र कुराण–३३:२१

आपलें अंतःकरण वेधून टाकणारें आतांपर्यंतचें हजरत महंमद पैगंबरांचें उज्ज्वल चरित्र वाचल्यानंतर, त्यांच्या खासगी आयुष्याची माहिती मिळविण्याची उत्कंठा वाचकांच्या मनांत उद्भूत होणें साहजिक आहे. थोर लोकांच्या चरित्रांकडे दृष्टिक्षेप केल्यानंतर त्यांचें खाजगी आचरण समजावून घेण्याबद्दल आपण नेहमीं अधीर झालेले असतों. थोर लोक बोलतात कसे, दिसतात कसे, राहतात कसे याविषयीं जितकी माहिती मिळेल तितकी मिळविण्याची आपली पराकाष्ठा चाललेली असते. आणि अशी हकीकत समजल्यानंतर ती दुसऱ्यांना सांगण्यांत आपणांस एक प्रकारचा आनंद वाटत असतो. खासगी आचरणांत देखील थोर लोकांचें असिधाराव्रत स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेलें असतें, हीच महत्त्वाची गोष्ट त्या आनंदाच्या बुडाशीं असते. या आनंदांत सर्वांनीं समभागी व्हावें एतदर्थ आपण हजरत पैगंबरांच्या वागणुकीचें पर्यालोचन करूया.

हजरत महंमद पैगंबर जात्याच अतिशय सुंदर होते. सौंदर्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून, मक्केंतील कित्येक लोक त्यांच्याकडे अंगुलिनिर्देश करीत. त्यांचा बांधा मध्यम तऱ्हेचा असून रुंद खांदे, भरदार छाती आणि मजबूत हाडपेर यांमुळें ते बरेच सशक्त दिसत. त्यांचा चेहरा तेजस्वी असून त्यावर

आत्मविश्वास उमटलेला असे. त्यांची दाढी त्या चेहऱ्याला उठावदार दिसत असे. त्यांच्या डोक्यावरील काळेकुळकुळीत केस मानेवर व्यवस्थित कापलेले असत. भव्य कपाळ, हरिणासारखे टपोरे डोळे, चांफेकळीसारखें नाक, कुंदकळ्यासारखी शुभ्र दंतपंक्ति आणि या सर्वांत उठावदार दिसणारा हंसरा चेहरा यांमुळें प्रत्येक माणसावर त्यांची छाप पडत असे. त्यांचे हात स्त्रियां-सारखे नरम होते आणि हातांचीं बोटें बारीक व लांब होतीं. त्यांचा आवाज गोड असल्यामुळें तासचे तास त्यांच्याशीं संभाषण करीत राहावें असें प्रत्येकास वाटे.

ते अत्यंत खुल्या अंतःकरणाचे होते. त्यांच्याजवळ छपवाछपवीचा कारभार नव्हता. आपल्या हातून चूक झाली तर ती कबूल करण्यांत त्यांना काडीमात्र अपमान वाटत नसे. त्यांच्याजवळ येणारा मनुष्य, तो श्रीमंत असो वा गरीब असो, त्याच्याशीं ते मनमोकळेपणानें चर्चा करीत. आपण मोटे आहोंत हा अहंमन्यपणा त्यांना आजन्मांत शिवला नाहीं. कोणाचीही निंदा केलेली त्यांना काडीमात्र खपत नसे. आपल्या प्रतिस्पर्ध्यावर आपल्या अनुयायांनीं ताशेरा झाडलेला पाहून स्वतः आनंदित होण्याचा हलकेपणा त्यांनीं कधींही दाखविला नाहीं किंवा प्रतिस्पर्ध्यांची निंदा होत असतां आपण स्तब्ध राहून अप्रत्यक्षपणें प्रोत्साहान देण्याची कुत्सित वृत्ती त्यांनीं कधींही प्रकट केली नाहीं. आपल्या शत्रूनें एकादं सत्कृत्य केलें तर हजरत पैगंबरांचा तोंडून अभि-नंदनाचे उद्गार प्रथम बाहेर पडत. आपला वैरी झाला म्हणून त्यानें केलेल्या प्रत्येक कृत्याबद्दल तिरस्कारयुक्त मुद्रेनें पाहणें त्यांना आवडत नसे. त्यांच्या या दिलदार अंतःकरणामुळें त्यांचे वैरी नकळत त्यांचेवर प्रेम करीत असत.

त्यांच्या गोड स्वभावामुळें त्यांच्या घरीं मंडळींचा घोळका जमे. या मंडळींत सर्व जातींचे व पक्षांचे लोक असत. त्यांच्या घरीं कोणीही जावो, त्याचा ते स्वतः आदरसत्कार करीत. हजरत पैगंबर आपल्या कामांत कितीही व्यग्र असले तरी भेटावयास आलेल्या मंडळीबरोबर चार शब्द बोलल्याखेरीज त्यांना

राहवत नसे. मदिनेचे सर्वाधिकारी झाल्यावर देखील त्यांनीं हा क्रम अव्याहत चालू ठेवला होता. बाहेर मंडळींना तासचे तास तिष्ठत ठेवून शेवटीं कामाच्या गर्दीमुळें भेटावयास सवड नाहीं असा राजशाही निरोप त्यांनीं भेटावयास आलेल्या मंडळींना कधींही पाठविला नाहीं.

हजरत पैगंबरांच्या घरीं मंडळी जमली कीं ते त्यांच्याबरोबर लोककल्याणाची चर्चा करीत. कित्येक वेळां ते इतक्या कळकळीनें बोलत कीं बोलतां बोलतां त्यांच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू होई. हजरत पैगंबरांच्या भाषणाचा सर्व रोख मानवांच्या कल्याणाकडे व सौख्याकडे असे. जगांत चाललेले अनाचार व चोहोंकडे पसरलेली विषमता, यांमुळें मानवजात हैराण झाली आहे, तिला शनीच्या फेऱ्यांतून कशी सोडविली पाहिजे याचें ते अत्यंत मार्मिकपणें विवेचन करीत. चर्चा संपल्यानंतर मंडळी आपआपल्या घरीं जावयास निघत, त्या वेळेला आपण आज कांहीं तरी नवें शिकून चाललों असें त्यांना वाटे.

शहरांत एखादी सभा झाल्यास, त्या सभेस हजरत पैगंबर जात आणि जागा मिळेल तेथें बसत. आपल्याकरितां कोणीं उत्थापन दिलेलें त्यांना आवडत नसे. जागा भरली असल्यास ते कोणालाही बाजूला सरकवत नसत. कित्येक वेळां सर्वांच्या शेवटीं त्यांना बसावें लागे! आणि त्या ठिकाणीं ते मोठ्या आनंदानें बसत. आपण एका साम्राज्याचे सूत्रधार असलों तरी जनतेंत व आपल्यांत तफावत आहे असें त्यांना कधींच वाटत नसे. आपण सर्व एकाच परमेश्वराचीं लेंकरें असून आपल्यामध्यें उच्चनीचपणा नाहीं अशी त्यांची उच्च भावना होती. त्यांच्या अनुयायांना त्यांच्याविषयीं अत्यंत आपलेपणा वाटे याचें कारण त्यांची थोर दर्जाची समता होय. ते एकाद्या माणसाशीं बोलू लागले म्हणजे त्याच्याबरोबर चाललेलें संभाषण संपल्याखेरीज दुसऱ्याबरोबर कधींच बोलत नसत. एकाद्या गरीब माणसाशीं बोलत असतां मध्येंच एखादा मोठा श्रीमंत गृहस्थ आला तरी त्या गरीब माणसाकडे दुर्लक्ष करून त्या श्रीमंताबरोबर बोलत राहणें त्यांना मुळींच आवडत नसे.

त्यांच्या तोंडून चुकून देखील अपशब्द निघत नसे; किंवा दुसऱ्यांनीं अपशब्द काढलेला त्यांना खपत नसे. त्यांचा कोणीं अपमान केला किंवा त्यांना दुरुत्तरें दिलीं तर ते कधींही रागावत नसत. त्या दुरुत्तरांस प्रत्युत्तर म्हणून फक्त स्मित हास्य करीत. ‘ दुसऱ्यानें आपणाला गुद्दा मारला म्हणून आपण त्याचें थोबाड फोडावयाचें ’ ही वृत्ती त्यांच्यामध्यें नव्हती. जशास तसें या न्यायानें ठोशास ठोसा देणें त्यांना आवडत नसे. ते अपमानाचा बदला प्रेमानें देत, ही गोष्ट त्यांनीं आपल्या शत्रूवर केलेल्या प्रेमावरून स्पष्टपणें सिद्ध होते. जसें ते कोणीं शिव्या दिल्या म्हणून रागावत नसत तसें कोणीं त्यांची प्रशंसा केली म्हणून शेफारूनहि जात नसत; किंबहुना त्यांना स्तुति केलेली आवडतच नसे. त्यांची कोणी जास्त स्तुति करूं लागला तर ते म्हणत, “ माझी स्तुति करण्यापेक्षां त्या सर्वशक्तिमान् परमेश्वराची स्तुति कराल तर तुम्हांस अधिक पुण्य लाभेल. ”

सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते सर्वसाधारण नागरिक असतां त्यांचें जें आचरण होतें, त्यामध्यें मदीनेचे राज्याधिकारी झाल्यानंतर काडीमात्र फरक झाला नाहीं, ही होय. कालमानाप्रमाणें मनुष्याच्या आचरणांत थोडा फार फरक पडतो असा सर्वसाधारण नियम आहे. पण या नियमास हजरत पैगंबर अपवाद होते. हातीं आलेली राजसत्ता, दारीं उभें असलेलें गजान्त वैभव, जगांत होणारा कीर्तिनिनाद त्यांच्या आचरणास तिळमात्र ढळवूं शकला नाहीं. त्यांच्या ठायीं वास करणाऱ्या पुढील स्वभावगुणांकडे पाहिलें म्हणजे हजरत महमंद पैगंबर केवढ्या थोर वृत्तीचे महात्मे आहेत याची थोडीफार कल्पना येईल.

## साधी वृत्ती

हजरत महमंद पैगंबरांच्या एकंदर आयुष्यक्रमाकडे नजर फेकल्यास पहिल्याप्रथम अंतःकरण वेधून टाकणारी कोठली गोष्ट असेल तर ती त्यांची साधी वृत्ति होय. ऐश्वर्य, ऐषआराम व बडेजाव यांचा त्यांना मनापासून तिटकारा असे. त्यांनीं सर्व राज्याचीं सूत्रें आपल्या हातांत घेतलीं तरी अखेरपर्यंत

आपली साधी वृत्ती सोडली नाहीं. त्यांच्या साध्या पोषाखाकडे पाहिलें म्हणजे ‘ हेच ते राज्याधिकारी हजरत महंमद पैगंबर ’ असें सांगावें लागे. ते गर्दीत मिसळले म्हणजे ते ओळखूं येत नसत. आपल्या अंगावरचा कपडा फाटला तर तो टाकून न देतां त्याला हजरत पैगंबर स्वतः ठिगळ लावून तो कपडा वापरीत असत. स्वतःचे कपडे दुसऱ्यास धुवावयास न देतां, ते स्वतःच धूत असत. चांगले कपडे करण्याबद्दल कोणीं आग्रह केला तर ते म्हणत “ पावित्र्य हाच सर्वांत चांगला कपडा होय. ”

घराची झाडलोट करणें, विस्तव पेटविणें, बाजार करणें वगैरे घरचीं सर्व कामें ते स्वतः करीत. त्यांचें घर म्हणजे मातीच्या चार भिंती व वर खजुरीच्या पानांचें छपर. चार लोक आले तर त्यांना बसण्याकरितां एक गोणपाट आंथरलेलें असे. याच गोणपाटावर हजरत पैगंबर रात्रीं निजत असत. सकाळीं उठल्यानंतर त्यांच्या नाजूक अंगावर त्या गोणपाटाचे वळ उठलेले त्यांच्या घरच्या मंडळींच्या दृष्टीस पडत.

त्यांच्या खाण्यापिण्याकडे पाहिलें तर प्रत्येक जण थक्कच होत असे. धान्याची ओबडधोबड भाकरी, बकरीचें दूध व खजूर हाच त्यांचा आहार असे. घरीं पाहुणे मंडळी आली तर त्यांना आपलें अन्न घालून आपण उपाशीं निजत. असे हृदयविदारक प्रसंग त्यांच्यावर कित्येक वेळां येत. पण त्याबद्दल त्यांनीं एकवेळ देखील कुरकूर केली नाहीं.

कोणी भिकारी दारीं आला तर आपणांस उपाशीं राहावें लागेल याचा विचार न करतां घरीं असलेलें सर्व अन्न त्या भिकाऱ्यास वाढून त्यास संतुष्ट करीत; आणि अशा रीतीनें तो भिकारी संतुष्ट झाला म्हणजे त्यांच्या डोळ्यांत आनंदाचे अश्रु येत.

आपली योग्यता व दर्जा यांचा विचार न करतां ते गोरगरिबांच्या उपयोगी पडत. शेजाऱ्यापाजाऱ्यांचा बाजारहाट ते स्वतः करून देत. वेळ पड-

त्यास ते मजुराचें देखील काम करावयास कचरत नसत. एकदां एक मशीद बांधीत असतां हजरत पैगंबरांनीं आपल्या डोक्यावरून दगड वाहिले होते !

हजरत पैगंबरांना एकुलती एक मुलगी होती. या मुलीवर त्यांचें निरतिशय प्रेम होतें. पण तिला देखील घरचें दळणकांडण करावें लागे. मदीनेचे सर्वाधिकारी झाल्यानंतर देखील त्यांच्या मुलीनें हा परिपाठ कायम चालू ठेविला होता ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

## लीनता

हजरत पैगंबरांची लीन वृत्ती अत्यंत प्रशंसनीय होती. वाटेल त्या दर्जाचा इसम जरी त्यांच्याजवळ गेला तरी त्याच्याशीं ते अत्यंत लीनतेनें वागत. उद्धटपणाचा एकहि शब्द त्यांच्या तोंडून कधीं निघत नसे. वैभव आणि लीनता या परस्परविरोधी गोष्टी असलेल्या आपण पाहतों. पण हजरत पैगंबरांच्या अंगीं या दोहोंचा सुंदर मिलाफ झाला होता. मदीनेचें राज्य हातीं आल्यावरदेखील त्यांच्या लीनतेंत तिळमात्र फरक झाला नव्हता. एखाद्या गुलामानें जरी त्यांना जेवावयाचें आमंत्रण दिलें तरी हजरत पैगंबर तें आमंत्रण अत्यंत आनंदानें स्वीकारीत.

त्याबरोबरच त्यांना कोणीं त्रास दिला तर त्याबद्दल ते चुकूनदेखील चकार शब्द काढीत नसत. एकदां एक ज्यू त्यांच्या घरीं पाहुणा म्हणून राहिला होता. रात्रीं खूप खाल्ल्यामुळें त्याला अतिसार झाला व त्यानें खोलींत जिकडेतिकडे घाण करून टाकिली. सकाळीं आपली फजिती होईल या भीतीनें रात्रीं कोणाला न कळवितांच पाहुणा पसार झाला. सकाळीं उठल्याबरोबर हजरत पैगंबरांनीं ती घाण पाहिली व एक शब्दहि न बोलतां ते आपल्या हातांनीं खोली स्वच्छ करूं लागले ! इतक्यांत तो ज्यू रात्रीं तरवार विसरली म्हणून ती नेण्याकरितां नेमका त्याच वेळीं परत आला. हजरत पैगंबरांनीं पुनः त्याचें स्वागत केलें. त्यांची ही लीनता पाहून तो बिचारा ज्यू पाहुणा शरमिंदा झाला.

## सच्चेपणा

हजरत पैगंबरांच्या सच्चेपणाबद्दल त्यांच्या शत्रूंनादेखील कधीं शंका वाटत नसे. त्यांना नेहमीं पाण्यांत पाहणारे शत्रू आपल्या ठेवी त्यांच्याजवळ ठेवावयास देत. यावरून हजरत पैगंबरांची वृत्ती केवढी सच्चेपणाची होती, हें आपणांस सहज समजून येईल. हजरत पैगंबरांच्या वैऱ्यांनींच त्यांना 'अल् अमीन' ( विश्वासू ) हा किताब दिला होता. हिजरत करण्यापूर्वी त्यांच्याजवळ लोकांच्या लाखो रुपयांच्या ठेवी होत्या. या ठेवी त्यांना सहज गिळंकृत करतां आल्या असत्या. पण हजरत पैगंबर सच्चा वृत्तीचे असल्यामुळें मक्का शहर सोडण्यापूर्वी त्यांनीं त्या ठेवी ज्यांच्या त्यांच्याकडे पोहोंचत्या करण्याची व्यवस्था केली. या सच्चेपणामुळेंच त्यांनीं लोकांचा उत्कृष्ट विश्वास संपादन केला होता.

बाजू उलटली किंवा अपमान होण्याचा प्रसंग आला तर माणसाच्या सच्चेपणास ग्रहण लागतें, असा जगाचा अनुभव आहे; पण हजरत पैगंबरांच्या आयुष्याकडे पाहिलें तर अपमान होण्याचा प्रसंग आला तरी त्यांनीं सच्चेपणा सोडला नाहीं, असेंच आपणांस म्हणावें लागेल. एकदां एक ज्यू हजरत पैगंबरांकडे असलेले पैसे मुदतीच्या तीन दिवस अगोदरच मागावयास आला व त्यानें त्यांस गालिप्रदान करून त्यांचा उघड उघड अपमान केला. हा चाललेला प्रकार पाहून त्यांच्या जवळ बसलेले हजरत उमर त्या ज्यूवर अतिशय रागावले व त्यांनीं रागाच्या भरांत त्यास धक्के देऊन बाहेर काढलें. हजरत पैगंबरांना हजरत उमर यांचें हें आचरण आवडलें नाहीं. त्यांनीं त्या ज्यू गृहस्थास परत बोलावून त्याचे सर्व पैसे परत दिले आणि हजरत उमर यांनीं अन्यायानें धक्काबुक्की केली म्हणून दीड मण धान्य त्याच्या हवालीं केलें !

## औदार्य

हजरत महंमद पैगंबर म्हणजेच मूर्तिमंत औदार्य होत. औदार्याची त्यांनीं केलेली सुंदर व्याख्या आपण मागें पाहिलीच आहे. ही व्याख्या त्यांच्या

आचरणांत पूर्णपणें प्रतिबिंबित झाली होती. त्यांच्याकडे कोणी कांहीं मागावयास आला तर तो रिक्त हस्तानें परत जात नसे. एकदां एका गृहस्थानें त्यांच्याजवळ असलेल्या सर्व बकरी मागितल्या. त्यांनीं त्या सर्व बकरी आनंदानें त्याला दिल्या! जेवणाच्या वेळीं कोणी पांथस्थ आला तर त्याचा आदरसत्कार करून प्रथम ते त्याला जेवूं घालीत. कित्येक वेळां चार पांच पांथस्थ एकदम आले तर हजरत पैगंबरांस त्या दिवशीं उपास पडे. रात्रीं कोणी दिव्यास तेल मागावयास आला तर त्याला तेल देऊन आपण अंधारांतच ती सर्व रात्र काढीत. त्यांच्या या उदार कृतीबद्दल त्यांचे स्नेही त्यांचेवर संतप्त होत. पण ' परमेश्वर मला अशीच बुद्धी देवो ' असें हजरत पैगंबर त्यांना उत्तर देत.

त्यांचें हें औदार्य फक्त त्यांच्या कुटुंबांतील मंडळीपुरतें किंवा त्यांच्या धर्मबांधवांपुरतें नव्हतें. त्यांच्या औदार्याचा परिघ अत्यंत विस्तृत होता. जगांतील प्रत्येक व्यक्तीशीं, मग ती स्वधर्मी असो अगर विधर्मी असो, त्यांची वृत्ती औदार्याची होती. एखादा परधर्मीय आहे म्हणून त्याला उदार वृत्ती दाखवूं नये, असें हजरत पैगंबरांना स्वप्नांत देखील वाटत नसे. संकटाचे वेळीं परधर्मीयांना मदत करण्यास ते जातीनें धांवत. स्वतः झीज सोसून त्यांच्या गैरसोयी ते दूर करीत. सणावारीं आपल्या परधर्मीय प्रजाजनांना ते देणग्या पाठवीत. हजरत पैगंबरांनीं काढलेला जाहीरनामा वाचला म्हणजे परधर्मीयांबद्दल त्यांनीं केवढें औदार्य दाखविलें आहे याची आपणांस कल्पना येईल. अशा प्रकारचें औदार्य आपणांस जगाच्या इतिहासांत फारच क्वचित् ठिकाणीं दिसून येईल.

## शांत वृत्ती

हजरत पैगंबरांची शांत वृत्ती उदाहरणादाखल घेण्यासारखी आहे. त्यांना आपल्या आयुष्यांत निरनिराळ्या दिव्यांतून जावें लागलें; पण त्यांनीं अपवादादाखल सुद्धां शांत वृत्तीचा कधीं भंग केला नाहीं. इस्लाम धर्माचें

प्रचारकार्य करते वेळीं त्यांचा उघड उघड अपमान करण्यांत आला, त्यांना दगड मारण्यांत आले, गटारांतील घाण पाणी त्यांच्या अंगावर फेंकण्यांत आलें, रक्ताच्या गुळण्या होईपर्यंत बेदम मारण्यांतहि आलें. पण त्यांनीं चुकून देखील आपल्या अंत:करणाचा संताप होऊं दिला नाहीं. समोर मृत्यु आ वासून उभा राहिला असतां देखील आपलें कार्य शांतपणानें करणाऱ्या हजरत पैगंबरांसारख्या व्यक्ती जगाच्या इतिहासांत फारच थोडया निघतील. त्यांच्या आयुष्याचें पर्यालोचन केलें तर त्यांच्या सहनशीलतेला सीमाच नव्हती असें आपणांस म्हणावें लागेल.

एकदां एका गृहस्थानें हजरत पैगंबरांच्या गळ्यास आपल्या उपरण्याचा विळखा घातला व निर्दयपणें त्यांना ओढलें. मानेला जोराचा हिसका बसल्यामुळें त्यांची मान सुजली. एक चकार शब्द न काढतां त्यांनीं एक वेळ शांतपणें त्या गृहस्थाकडे पाहिलें. एका क्षणांत त्या मत्त गृहस्थाची धुंदी त्यांना उतरवितां आली असती; पण त्यांनीं त्या वाममार्गाचें अवलंबन केलें नाहीं. एकदां हजरत पैगंबर आपल्या अनुयायांसह मशिदींत नमाज पढावयास आले होते. त्यांच्यासमोर एका ज्यू गृहस्थानें येऊन लघुशंका केली. पवित्र मशिदींत येऊन एका परधर्मीयानें केलेला हा अनाचार पाहतांच हजरत पैगंबरांच्या अनुयायांचें पित्त खवळलें व ते त्या परधर्मीयास मारावयास धांवले. पण हजरत पैगंबरांनीं त्यांना अडवून धरलें व त्या ज्यू गृहस्थास जवळ बोलावून प्रार्थनेच्या जागीं असें कृत्य न करण्याबद्दल अदबीनें सांगितलें. नंतर ते आपल्या अनुयायांकडे वळून म्हणाले, “ तुम्ही मुसलमान आहांत, तुम्ही रागावून उपयोगी नाहीं. ” हजरत पैगंबरांचे वरील उद्गार वाचल्यानंतर त्यांच्या शांत वृत्तीबद्दल कोणाला शंका वाटेल काय ?

## न्यायप्रियता

हजरत पैगंबरांच्या न्यायप्रियतेची त्यांच्या वैऱ्यांनीं देखील प्रशंसा केली आहे. त्यांनीं नवीन धर्माची चळवळ सुरू केली म्हणून मक्केतील लोक

त्यांचे कट्टे दुष्मन बनले होते. हजरत पैगंबरांना शिव्याशाप देण्यांत त्यांच्यांत अहमहमिका लागे. पण त्यांच्यामध्यें जेव्हां फिसाद ( तंटा ) होई तेव्हां निकाल मागण्याकरितां ते हजरत पैगंबरांकडेच येत. एवढ्यावरून हजरत पैगंबर केवढे न्यायी होते हें स्पष्टपणें दिसून येतें.

न्यायदानाच्या वेळीं हजरत पैगंबरांनीं आपली दृष्टी कधींही जात्यंध बनविली नाहीं. ज्यानें गुन्हा केला असेल त्याला ते बिनदिक्कत दोषी ठरवीत. न्यायाच्या वेळीं वशिला, लांचलुचपत बिलकुल चालत नसे. त्यांच्या या न्यायी वृत्तीमुळेंच मदीनेंतील परधर्मीय टिकून राहिले होते. एकदां त्यांचेसमोर एक ज्यू आणि एक मुसलमान यांच्यामधला तंटा आला होता. त्यांनीं खटल्याची चौकशी करून त्या मुसलमानास गुन्हेगार ठरविलें आणि त्यास शिक्षा फर्माविली. हें पाहून कांहीं मुसलमानांनीं त्या मुसलमानाबद्दल मध्यस्थी केली; पण हजरत पैगंबर म्हणाले, " न्यायाचा विचार करते वेळीं मी जातीकडे केव्हांही पाहणार नाहीं. हाच गुन्हा माझ्या एकुलत्या एका लाडक्या मुलीनें केला असता तरी तिलादेखील हीच शिक्षा केली असती." ज्या ठिकाणीं न्याय त्या ठिकाणीं परमेश्वर हेंच त्यांचें ब्रीदवाक्य होतें.

एकदां बेदरच्या लढाईत त्यांचे चुलते अब्बास यांना कैद करण्यांत आलें. इतर कैद्यांप्रमाणें त्यांच्याहि हातापायांत घट्ट बेड्या ठोकल्या. बेड्या करकचून बसल्यामुळें, अब्बास यांना वेदना होऊं लागल्या. अब्बास हे हजरत पैगंबरांचे चुलते आहेत हें पाहून शिपायांनीं त्यांच्या बेड्या सैल केल्या. हजरत पैगंबरांना हा प्रकार पसंत पडला नाहीं. " इतर कैद्यांना घट्ट बेडया ठोकल्या असतां अब्बास यांच्याच बेडया सैल करणें न्यायाचें होणार नाहीं; इतर कैद्यांप्रमाणें त्यांच्या बेडया घट्ट ठोका किंवा सर्वांच्याच बेडया सैल करा." असा हजरत पैगंबरांनीं हुकूम दिला. त्यांची न्यायी वृत्ति किती श्रेष्ठ दर्जाची होती हें सिद्ध करण्यास वरील उदाहरण पुरें आहे.

## दयाशील वृत्ति

न्यायाचे वेळीं कठोरपणें वागणाऱ्या हजरत पैगंबरांचें अंतःकरण अत्यंत हळुवार होतें. कोणाला दुःख झालें तर त्यांचें अंतःकरण तिळतिळ तुटत असे. दुःखी जनांचा दुःखभार हलका करण्यासाठीं ते आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत. रस्त्यांतून जातांना एकादा आर्त स्वर ऐकूं आला तर तो आर्त स्वर कोठून आला याची ते चवकशी करीत. ज्या घरांतून तो आर्त स्वर ऐकूं आला असेल त्या घरांत जाऊन तेथील मंडळींचें ते सांत्वन करीत.

एखादा हमाल जास्त ओझ्यानें मेटाकुटीस आला असेल तर त्या हमालाचें ओझें हजरत पैगंबर स्वतःच्या डोक्यावर घेत. कोणी आजारी पडला तर ते स्वतः त्या रोग्याची शुश्रूषा करीत. एखादा गरीब मनुष्य पैशाच्या अडचणींत असला तर स्वतःच्या नांवावर उसनवार पैसे काढून त्या गरीब माणसास देत. आईबाप नसलेल्या अनाथ मुलांवर ते अत्यंत प्रेम करीत, त्यांचें कोडकौतुक पुरवीत. अनाथ मुलांचें परिपालन करणें हें श्रेष्ठ दर्जाचें पुण्य आहे असें ते म्हणत. गोरगरिबांस मदत करण्यास त्यांचा हात नेहमीं पुढें असे. अंध, पंगू, हीन, दीन माणसास प्रत्येक मुसलमानानें दानधर्म करावा अशीच हजरत पैगंबरांची शिकवणूक आहे.

वरील विवेचनावरून हजरत पैगंबरांचा स्वभाव कसा अष्टपैलू होता हें लक्षांत यावयास फारसा वेळ लागणार नाहीं. आत्मोन्नती करूं पाहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें हजरत पैगंबरांच्या स्वभावाचें काळजीपूर्वक मनन केलें पाहिजे.

भाग ४ था

# आरोप-निरसन

"लोकांमध्यें पैगंबर अवतीर्ण होतो; पण लोक त्याच्याकडे पाहून तिरस्कारानें हंसतात."

—पवित्र कुराण, ३६ : २९

ज्या वेळीं सत्य पायदळीं तुडविलें जातें, न्यायाची मुस्कटदाबी होते, स्वातंत्र्यास पायबंद बसतो, मानवी हक्कांची पायमल्ली होते, दडपशाहीचें थैमान सुरू होतें, आणि अनाचाराचें साम्राज्य माजतें त्या वेळीं जग अधःपाताच्या कक्षेंत गेलेलें असतें. हा अधःपात टाळून जगांत सौख्य आणि शांति प्रस्थापित करण्याकरितां पैगंबरांचा अवतार होत असतो. जगाचें कल्याण हेंच ध्येय आपल्या समोर ठेवून पैगंबर आपल्या कार्यास सुरुवात करतात. पैगंबरांचें अवतारकार्य अत्यंत पवित्र आणि उदात्त असतें.

पण या अवतारकार्याची ओळख काळ्याकुट्ट स्वरूपांत करून देण्याची कांहीं लोकांची पराकाष्ठा चाललेली असते. जगाचें कल्याण करावयाचा भंडारा उचलणाऱ्या पैगंबरांची शक्य तितकी बदनामी करून त्यांच्याविषयीं तिरस्कार उत्पन्न होईल अशा तऱ्हेचे भयंकर आरोप त्यांच्यावर करण्याचा प्रयत्न चाललेला असतो. अधिक बारकाईनें विचार केल्यास त्या सर्वांच्या बुडाशीं द्वेष हाच कारणीभूत झालेला दिसून येईल. अमुक एका धर्माच्या पैगंबराकडे जगाच्या उद्धाराचें श्रेय न जातां 'तें आपल्या धर्मातील पैगंबराला मिळावें असें या लोकांना वाटत असतें. याकरितांच परधर्मीय पैगंबराची नालस्ती करण्याचा अटोकाट प्रयत्न कांहीं मूर्ख लोक करीत असतात; पण उद्यां त्या परधर्मीय पैगंबराच्या अवतारकार्याची ओळख पटल्यावर आपल्या

दुष्ट मनोवृत्तींचें आविष्करण होईल या गोष्टीचें त्यांना भान कसें राहत नाहीं याचेंच आश्चर्य वाटतें.

हजरत पैगंबरांची बदनामी करण्याकरितां परधर्मीय टीकाकारांनीं त्यांच्यावर भयंकर आरोप केलेले आहेत. ज्यांना त्यांच्या चरित्राची ओळख नाहीं त्यांना हे आरोप खरे वाटून, ते त्यांच्याकडे अनुदारतेनें पाहूं लागतात. कित्येक वेळां हजरत महंमद म्हणजे एक जगावरची आपत्ति आहे असें त्यांना वाटूं लागतें. दुसऱ्याच्या चरित्राचा नीट अभ्यास केल्याशिवाय त्यावर मत देण्याची सर्वसाधारण लोकांची संवय असल्यामुळें त्या लोकांस हजरत पैगंबरांवरील आरोप म्हणजे एक प्रकारचा पुरावा आहे असें वाटूं लागतें. हा पुरावा खरा आहे किंवा खोटा आहे याची शहानिशा न करतां त्या पुराव्याच्या जोरावर हजरत महंमद पैगंबरांवर कित्येकांनीं आग पाखडली असेल; कित्येकांनीं त्यांना मनसोक्त शिव्यांचा अहेर केला असेल; कित्येकांनीं त्यांना माथेफिरूच्या सदरांत काढलें असेल; पण हजरत पैगंबरांविषयीं तिरस्कार उत्पन्न करणाऱ्या या आरोपांची नीट विचक्षणा केली तर त्यांना आपली भयंकर चूक कबूल करावी लागेल; त्याबरोबरच आपली दिशाभूल करणाऱ्या टीकाकारांची लेखणी किती द्वेषी आहे याचें त्यांना सत्वर प्रत्यंतर येईल.

## विलासलोलुपता (?)

हजरत महंमद पैगंबर अत्यंत विलासलोलुप होते असा विरोधकांचा त्यांचेवर मोठा आरोप आहे. थोर व वंदनीय व्यक्तींची बदनामी करावयास कोठेंच जागा सांपडली नाहीं तर त्यांच्या खासगी आयुष्यांत कोठें बिंग सांपडतें कीं काय याचा विरोधक काळजीपूर्वक विचार करूं लागतात. खासगी आयुष्यहि निर्मल दिसलें तर महत्प्रयासानें एखादा प्रसंग हुडकून काढून आणि त्या प्रसंगाला शक्य तितका भडक, काळ्या रंगाचा मुलामा देऊन तो समाजापुढें मांडण्याचा त्या विरोधकांचा अट्टाहास चाललेला असतो. वास्तविक अशा तऱ्हेचा प्रसंग आपद्धर्म म्हणून घडलेला असतो, आणि त्याचें फारसें महत्त्वही

पण नसतें; पण तो प्रसंग म्हणजे जणूं काय त्या महान् व्यक्तीची इतिकर्तव्यता समजून साऱ्या जगाचें लक्ष त्याकडे खेचण्याची या विरोधकांची धडपड पाहिली म्हणजे खरोखरी या विरोधकांची कींव येते. काळ्याकुट्ट स्वरूपांत रंगलेला प्रसंग कां घडला, त्याचीं कारणें काय किंवा कोठला उद्देश त्याच्या बुडाशीं होता याचा मात्र पत्ता लागूं न देण्याची या विरोधकांची शिताफी पाहिली म्हणजे फक्त त्या थोर व्यक्तीस बदनाम करण्याचा त्यांचा उद्देश असला पाहिजे असा अंधुक संदेह मनांत डोकावल्याखेरीज राहत नाहीं.

हजरत महंमद पैगंबरांचीं बऱ्याच स्त्रियांशीं झालेलीं लग्नें हा त्यांच्या विलासलोलुपतेचा दाखला म्हणून दाखविला जातो. त्यांनीं आठनऊ बायका केल्या, यावरून ते विलासी असले पाहिजेत, असा सिद्धांत या विरोधकांनीं ठोकून दिला आहे. हा सिद्धांत ठोकून देतांना त्या वेळची परिस्थिति व लग्नाचीं कारणें मात्र त्यांनीं लपवून ठेविलीं आहेत. हीं कारणें उजेडांत आणलीं म्हणजे हजरत पैगंबरांनीं बरींचशीं लग्नें कां केलीं याचा आपोआप खुलासा होईल, आणि त्यांच्यावर केलेला विलासलोलुपतेचा आरोप किती बनावट आहे याची खात्री पटेल.

तारुण्य हें विलासवृत्तीचें क्रीडांगण समजलें जातें. पण या क्रीडांगणावर नाचण्या बागडण्याचा हा काळ नव्हे हें लक्षांत आणून हजरत पैगंबरांनीं तारुण्यास कर्मयोगाची भूमि बनविली. श्रीमान् घराणें, अनुपम सौंदर्य आणि उमलतें तारुण्य यांचा विनियोग सुंदर स्त्रियांच्या सहवासांत न करितां जगत्-सौख्य चिंतण्यांत त्यांनीं केला. वायफळ विलासी बडबड न करितां सदसद्-विवेकबुद्धीशीं गुजगोष्टी करण्यांत त्यांनीं तारुण्यांतील अमूल्य वेळ खर्च केला. विलास करावयाचें त्यांचें ध्येय असतें तर त्या वेळच्या पद्धत्यनुसार अनेक सुंदर स्त्रियांस आपल्या पदरीं ठेवून त्यांच्यांतच ते रममाण झाले असते; आपला रंगमहाल हेंच जग समजून बाह्य जगाची त्यांनीं पर्वा केली नसती.

हजरत महंमद पैगंबर विलासी असते तर तारुण्याच्या ऐन भरांत, कुरेशांनीं भेट म्हणून पाठविलेल्या सुंदर स्त्रियांचा त्यांनीं स्वीकार केला असता. विलासप्रिय माणसाचें कर्तृत्व गिळंकृत करावयाचें सामर्थ्य स्त्रियांच्या सौंदर्यांत असतें. हजरत पैगंबर कर्तृत्ववान् होते पण ते विलासी नव्हते. ते विलासप्रिय असते तर त्या सौंदर्याच्या नादांत त्यांनीं आपलें कर्तृत्व पायदळीं तुडविलें असतें आणि कुरेशांचा—त्यांच्या शत्रूंचा—कार्यभाग सहज झाला असता. पण हजरत पैगंबरांनीं त्या स्त्रियांना कुरेशांकडे साभार परत पाठविलेलें पाहिलें म्हणजे विलासापेक्षां कोठलें तरी उच्च ध्येय त्यांनीं आपल्यासमोर ठेवलें असलें पाहिजे हें स्पष्ट होतें.

हजरत पैगंबरांचें लग्न त्यांच्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी खदीजाबीशीं झालें, हें पूर्वी सांगितलेंच आहे. लग्न झाल्यानंतर २५ वर्षे खदीजाबी जिवंत होत्या; तोंपर्यन्त हजरत पैगंबरांनीं त्यांच्याखेरीज कोणाबरोबरही लग्न केलें नाहीं. आपल्या आयुष्याच्या पन्नास वर्षांपर्यन्त त्यांनीं खदीजाबीशीं अत्यंत आनंदानें संसार केला. त्या वेळीं अरबस्तानांत प्रत्येकास आठदहा बायका करण्याची मुभा असतां २५ वर्षेपर्यंत हजरत पैगंबर एकपत्निव्रतानें राहिले ही महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्यांना विलासलोलुप म्हणणें केवढें धाष्टर्याचें आहे याचा वाचकांनींच विचार करावा. ऐन तारुण्याचे, उमेदीचे व उत्कर्षाचे दिवस एकाच पत्नीच्या सहवासांत घालविणारे हजरत पैगंबर विलासी होते असें कोणीं विधान केलें तर तें मूर्खपणाचें ठरेल !

हजरत पैगंबरांनीं वयाच्या ५० वर्षांनंतर इतर लग्नें केलीं ! या लग्नांचा शेवटचा आधार घेऊनच विरोधक आपला आरोप शाबीत करूं पाहत आहेत. आपल्या उतार वयांत त्यांनीं ७।८ लग्नें केलीं याचें कारण ते विलास-लोलुप होते हेंच होय, असें विरोधक जगास भासवीत आहेत. विरोधकांचें हें विधान खरें मानावयाचें झाल्यास निसर्गास खोटें ठरविलें पाहिजे. वयाच्या ५० व्या वर्षापासून मनुष्याची विषयपिपासा कमी होत जाते, असा निसर्गाचाच

CC-0 ... २५५ २५५

नियम आहे. वयाच्या ५० व्या वर्षानंतर हजरत पैगंबर विलासी बनले असें मानणें म्हणजे वार्धक्यांत विलासवृत्तीची पालवी फुटते हें सिद्ध करणें होय. वार्धक्य आणि विलास यांचा मेळ घालण्यांत विरोधकांनीं जी अक्कलशून्यता प्रदर्शित केली आहे, ती हजरत पैगंबरांवरील विलासलोलुपतेचा आरोप निष्फळ ठरवीत आहे असा निकाल कोठलाही सुज्ञ मनुष्य दिल्याखेरीज राहणार नाहीं.

हजरत पैगंबरांनीं बरींचशीं लग्नें केलीं खरीं, पण तीं कोणत्या कारणासाठीं केलीं, याचा विचार केल्यास उरलासुरला संदेह नष्ट होणार आहे. त्या काळीं हजरत पैगंबरांच्या अनुयायांचा विटाळ मानला जात असे. मुसलमान झालेल्या कोठल्याही माणसाबरोबर सहकार्य करणें हें अरब लोक मोठें पाप समजत. आपल्या कुटुंबांतील एखादा मनुष्य मुसलमान झाला कीं तो आपल्यास मेला असें समजून त्याचें और्ध्वदेहिक करण्यापर्यंत मजल जात असे. धारातीर्थी देह ठेवलेल्या मुसलमान सैनिकाच्या विधवा बायकोस तिचे नातेवाईक, अन्न-पाणी तर दूर राहोच पण आसऱ्यास जागा देखील देत नसत. अशा दुर्धरावस्थेंत काळ कंठणाऱ्या अनाथ विधवांस आश्रय देण्याकरितां हजरत पैगंबरांना त्यांच्याशीं लग्नेंच करावीं लागलीं. हजरत पैगंबरांच्या लग्नाचा उद्देश विलास नसून दीनवाण्या स्त्रियांचा प्रतिपाळ होता.

हजरत पैगंबरांनीं राज्याचीं सूत्रें आपल्या हातांत घेतलीं होतीं. राज्य-कारभार सुरळीत चालविण्यासाठीं निरनिराळ्या प्रबळ टोळ्यांना एकत्रित करणें त्यांचें कर्तव्यकर्म होतें. पण या टोळ्यांमध्यें हाडवैर असल्यामुळें त्यांची एकी होणें दुरापास्त होतें. ही एकी करण्याकरितां त्यांनीं प्रबल अशा चारपांच टोळ्यांच्या म्होरक्यांच्या एकेका मुलीशीं लग्नें केलीं. तीं लग्नें झाल्याबरोबर आपापसांतील हाडवैर नष्ट होऊन, सर्वजण हजरत पैगंबरांच्या कार्यांत सामील झाले. या लग्नांमुळें एकमेकांत आप्तसंबंध निर्माण झाले आणि एकमेकांचें तोंडदेखील न पाहणारे वैरी, या आप्तसंबंधांमुळें स्नेही व सहकारी बनले. या झालेल्या लग्नांचें ध्येय ऐषआराम नसून राष्ट्राचें ऐक्य होतें.

हजरत पैगंबरांनीं वर लिहिल्याप्रमाणें जीं सात आठ लग्नें केलीं तीं एक अपवाद सोडून सर्व विधवा स्त्रियांबरोबर केलीं, आणि या विधवा सौन्दर्याबद्दल कधींहि प्रसिद्ध नव्हत्या, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पैगंबरांना विलासच करावयाचा असता तर प्रौढ व देखण्या नसलेल्या विधवांबरोबर लग्नें न लावतां, तारुण्यांत पदार्पण केलेल्या सुंदर युवतींशींच त्यांनीं विवाह लावले असते; किंवा विवाह न लावतां त्यांना आपल्या रंगमहालांत ठेवून दिल्या असत्या. पण हजरत पैगंबरांचें ध्येय विलास नसून कर्तव्य होतें. केवळ हौस म्हणून त्यांनीं लग्नें लाविलीं नव्हतीं. अनाथ स्त्रियांचा प्रतिपाळ करण्याकरितां आणि आपसांतील दुही मिटविण्याकरितां आपद्धर्म म्हणून केलेल्या लग्नांच्या बुडाशीं पैगंबरांची विलासी वृत्ति होती असें विधान करणें नादानपणाचें ठरणार नाहीं काय ?

## तरवारीच्या जोरावर (?)

हजरत महंमद पैगंबरांनीं तरवारीच्या जोरावर आपला धर्म फैलावला असा विरोधकांचा दुसरा मोठा आरोप आहे. हजरत महंमद पैगंबर आणि तरवार या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत. ज्या ठिकाणीं हजरत पैगंबरांचें नांव निघतें त्या ठिकाणीं तरवारीचें नांव देखील निघून उपयोगी नाहीं. हजरत पैगंबरांचें कार्य व ध्येय शांततेचें होतें; ज्या ठिकाणीं शांततेचा जयघोष चालला आहे त्या ठिकाणीं शांततेचा भंग करणाऱ्या तरवारीचें नांव काढणें अप्रयोजकपणाचें होईल. हजरत पैगंबरांचा इस्लाम धर्म शांततावादी व प्रेमाचा पुरस्कार करणारा असल्यामुळें हा धर्म प्रस्थापित करतांना त्यांनीं तरवारीचा मनसोक्त उपयोग करून घेतला असें म्हणणें म्हणजे, पुण्याचा संचय पापामुळें झाला असें विधान करण्याइतकें मूर्खपणाचें ठरणार आहे. आपल्या धर्मावर इस्लाम धर्म लौकरच मात करणार या कल्पनेनें वेडावून गेलेल्या विरोधकांना, इस्लामचें सत्यस्वरूप जगापुढें आल्यावर आपल्या दुष्ट आरोपाचें प्रदर्शन झाल्याखेरीज राहणार नाहीं अशी शंकादेखील आली नाहीं हें खरोखरी त्यांचें दुर्दैव होय.

हजरत पैगंबरांच्या चरित्राचें काळजीपूर्वक निरीक्षण केलें आणि त्यांना मार्गदर्शक होणाऱ्या पवित्र कुराणाचा अभ्यास केला तर विरोधकांचा प्रस्तुत आरोप किती विसंगत आहे याची ओळख पटावयास फारसा वेळ लागणार नाहीं.

" ला इकराहा फिद्दीन. "

—पवित्र कुराण, २:२५६

म्हणजे " धर्माच्या बाबतींत जबरदस्ती करूं नका, " असें पवित्र कुराण स्पष्टपणें बजावत आहे. जबरदस्ती आणि तरवार हे दोन शब्द सुसंगत आहेत. धर्मप्रसारार्थ तरवारीचा उपयोग करणें याचा अर्थ धर्माच्या बाबतींत जबरदस्ती करणें असाच होतो. पण पवित्र कुराण ज्याअर्थी जबरदस्ती करूं नका अशी स्पष्ट आज्ञा देत आहे, त्याअर्थी धर्माच्या बाबतींत तरवारीचा उपयोग संभवत असेल असें वाटत नाहीं. पवित्र कुराणामधील वरील वाक्याचा गर्भितार्थ लक्षांत घेतला म्हणजे हजरत पैगंबरांनीं तरवारीच्या जोरावर धर्मप्रसार केला हें विधान असत्य वाटूं लागतें.

" लोकांनीं तुमचें म्हणणें मानलें नाहीं, तर तुमचें काम उपदेश करीत राहण्याचें आहे. "

—पवित्र कुराण, १६:८२

ज्यास्त विस्तारपूर्वक बोलावयाचें म्हणजे लोकांनीं इस्लामधर्माचें महत् तत्त्व नाकबूल केलें तर कोठल्याही तऱ्हेची जबरदस्ती न करतां फक्त त्यांना उपदेश करीत राहा, अशी पवित्र कुराण शिकवण देत आहे. आपला धर्म लोकांनीं कबूल करावा म्हणून त्यांच्यावर हत्यार चालविणें म्हणजे पवित्र कुराणाची आज्ञा डोळ्यांआड करण्यासारखें आहे. आपलीं तत्त्वें जगापुढें मांडण्याचा प्रत्येक व्यक्तीला हक्क आहे; हीं तत्त्वें लोकांना पटविण्यासाठीं त्यांना उपदेश करावयाचा प्रत्येक व्यक्तीला अधिकार आहे. पण हा उपदेश करतांना लोकांची दिशाभूल न करण्याबद्दल पवित्र कुराण सूचना देत आहे.

"शहाणपणानें आणि अत्यंत विचारपूर्वक रीतीनें त्यांना तुमच्या परमेश्वराच्या मार्गाकडे बोलवा."

—पवित्र कुराण, १६ : १२५

आपलें तत्त्व प्रस्थापित करीत असतां किंवा त्या तत्त्वाचा उपदेश करीत असतां समतोल वृत्ति नष्ट होण्याचा पुष्कळ संभव असतो. ही समतोल वृत्ति नष्ट न व्हावी याकरितां पवित्र कुराण किती खबरदारी घेत आहे हें वरील वाक्यावरून सिद्ध होईल. आपल्या तत्त्वाच्या पुष्ट्यर्थ दुसऱ्यांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणें, खोट्यानाट्या कंड्या उठविणें, अघळपघळ बाता मारणें याचा पवित्र कुराणाला अत्यंत तिटकारा आहे. तुम्ही आपलीं तत्त्वें मांडा पण सत्याचा अपलाप न करतां शहाणपणानें व विचारर्पूक मांडा असें पवित्र कुराण सांगत आहे. जेथें शहाणपणानें व विचारवृत्तीनें कार्यभाग व्हावयाचा आहे त्या ठिकाणीं तरवारीची आवश्यकता संभवेल काय ?

शहाणपणानें व विचारपूर्वक उपदेश केल्यानंतरही आपला कार्यभाग झाला नाहीं तर कोणीही संताप करून घेऊं नये किंवा संतापाच्या भरांत गैर-कृत्य करूं नये याकरितां पवित्र कुराण पुढील आज्ञा करीत आहे.

"हें परमेश्वरी सत्य आहे; ज्याला विश्वास ठेवावयाचा असेल त्याला ठेवूं दे; ज्याला नसेल त्याला न ठेवूं दे."

—पवित्र कुराण, १८ : २९

उपदेश केल्यानंतर त्याप्रमाणें वागणें अगर न वागणें हा ज्याच्या त्याच्या मनाचा प्रश्न आहे. मनाला वाटेल त्याप्रमाणें वागावयाचा प्रत्येकाचा हक्क आहे. हा हक्क किंवा हें मतस्वातंत्र्य यास काडीमात्र धक्का न लावण्याबद्दल कुराण बजावीत असतां, हजरत पैगंबरांनीं आपल्या धर्माचा प्रसार तरवारीच्या जोरावर केला असें विधान करणें सयुक्तिकपणाचें होईल काय ?

कुराणांतील प्रत्येक वाक्यानुसार हजरत पैगंबरांनीं आपलें आचरण ठेविलें होतें. तरवारीच्या जोरावर अर्थात् जबरदस्तीनें धर्माचा फैलाव त्यांनीं केला असें मानिलें तर कुराणांतील वचनास त्यांनीं हरताळ फांसला हें सिद्ध होण्यासारखें आहे. पण अशा तऱ्हेचा दाखला सबंध इस्लामी वाङ्मयांत सांपडत नाहीं. हजरत पैगंबर मतस्वातंत्र्याचे चाहते असल्यामुळें जबरदस्तीनें दुसऱ्यावर आपलीं मतें लादण्याचा शिरजोरपणा त्यांनीं कधींही केला नाहीं, ही गोष्ट त्यांनीं काढलेल्या जाहीरनाम्यावरून सहज सिद्ध होण्यासारखी आहे. हजरत पैगंबर मदिनेचे सर्वाधिकारी झाल्यावर अधिकाराच्या जोरावर परधर्मीयांना छळणें, त्यांच्या हक्कांची पायमल्ली करणें वगैरे दडपशाहीचे प्रकार त्यांनीं चुकून देखील केले नाहींत. वास्तविक त्यांच्या हातीं कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् अशी सत्ता होती. ज्या धोरणाचा ते पुरस्कार करतील तें धोरण शिरोधार्य मानलें गेलें असतें. तरवारीच्या जोरावर आपल्या धर्माचा फैलाव करण्याचें त्यांच्या मनांत आलें असतें तर साऱ्या अरबस्तानमधील परधर्मीयांना इस्लाम धर्माची दीक्षा द्यावयास त्यांना फारसा वेळ लागला नसता. विशेषत: मदिना शहरांतील हजारों परधर्मीय लोक एका दिवसांत मुसलमान झाल्याचा देखावा दृष्टीस पडला असता. पण जाहीरनाम्यांतील '**तुमचे धार्मिक हक्क संभाळले जातील**' या वाक्यावरून व हजरत पैगंबरांनीं परधर्मीयांबरोबर ठेवलेल्या प्रेमळ वर्तनावरून इस्लामचा प्रसार त्यांनीं तरवारीच्या जोरावर केला असें विधान करणें कधींही सुसंगतपणाचें होणार नाहीं.

हजरत पैगंबरांच्या एकंदर आयुष्याकडे नजर टाकली तर त्यांना कांहीं वेळां हातांत तरवार धरावी लागली ही गोष्ट प्रांजलपणें कबूल करावी लागेल. त्यांनीं कांहीं लढाया केल्या खऱ्या; पण त्या कोणत्या कारणासाठीं केल्या याचा खुलासा झाला म्हणजे वर लिहिल्याप्रमाणें हजरत पैगंबर व तरवार हे दोन परस्परविरोधी शब्द अपवाद म्हणून कसे जवळ आले याचा उलगडा व्हावयास फारसा वेळ लागणार नाहीं. हजरत पैगंबरांच्या वेळची परिस्थिति बेबंद

स्वरूपाची होती हें आपण मागें पाहिलेंच आहे. एखाद्या व्यक्तीवर हल्ला झाला म्हणजे हल्ला करणारास त्याचा जाब विचारणारा कोणी शास्ता नसल्यामुळें त्या व्यक्तीसच स्वतःच्या संरक्षणासाठीं लढणें भाग पडे. त्या वेळीं हजरत पैगंबरांच्याविरुद्ध लोक होते. हजरत पैगंबरांना व त्यांच्या अनुयायांना नेस्तनाबूद करण्याचे त्यांचे भगीरथ प्रयत्न चालू होते. आपल्या शत्रूंपासून आपल्या अनुयायांचें संरक्षण करण्याकरितां हजरत पैगंबरांना लढाया कराव्या लागल्या. अशा वेळीं ते स्वस्थ बसले असते तर विरुद्ध पक्षाच्या लोकांनीं जिकडे तिकडे धुमाकूळ माजवून पुन्हा अनाचाराचें राज्य स्थापिलें असतें. केवळ संरक्षणाकरितां ( for defence ) म्हणून हजरत पैगंबरांनीं हातांत शस्त्र धरिलें. त्यांनीं शस्त्र धरिलें असें म्हणण्यापेक्षां शस्त्र धरणें त्यांना भाग पडलें असें म्हणणें ज्यास्त सयुक्तिक दिसेल.

> " ज्यांच्याशीं युद्ध पुकारलें गेलें आहे व ज्यांच्यावर जुलूम होत आहे अशांनाच लढण्याची परवानगी दिली आहे. "
>
> —पवित्र कुराण, २२ : ३९

निष्कारण आपल्यावर कोणीं हत्यार उपसलें व त्यामुळें आपल्यास जुलूम होऊं लागला तर स्वतःच्या संरक्षणाकरितां व जुलुमांतून मुक्त होण्याकरितां लढा, अशी पवित्र कुराणाची आज्ञा आहे. स्वतःच्या मतलबाकरितां किंवा जबरदस्तीनें धर्मप्रसार करण्याकरितां लढण्याची परवानगी देण्यांत आली नाहीं, हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. लढाईचा उद्देश खालील श्लोकांत अधिक स्पष्ट करण्यांत आला आहे.

> " जुलूम थांबेपर्यंत लढत राहा. "
>
> —पवित्र कुराण, २ : १९३

आपल्यावर होत असलेला जुलूम थांबला कीं आपण लढण्याचें बंद केलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर ज्यांनीं आपल्यावर जुलूम केला होता " त्यांच्याशीं

वैरभाव देखील ठेवतां कामा नये" अशी याच श्लोकांत पुढें आज्ञा आहे. वरील श्लोकांवरून लढाईचा उद्देश जबरदस्तीचा धर्मप्रसार नसून जुलमाचा निःपात आहे हें वाचकांच्या लक्षांत यावयास फारसा वेळ लागणार नाहीं. आपल्या हातांत तरवार येऊन हजरत पैगंबरांनीं ज्या लढाया केल्या त्या लढायांचा उद्देश जुलुमापासून स्वसंरक्षण करावयाचा होता असें प्रत्येक निःपक्षपाती व्यक्तीस म्हणावें लागेल.

हजरत पैगंबरांनीं हातांत तरवार घेतली पण तरवारीचे भीषण परिणाम न होण्याची त्यांनीं खबरदारी घेतली होती. लढाईनंतर शत्रूंची होणारी कत्तल, त्यांच्या स्त्रियांची होणारी बेइज्जत*, त्यांच्या मुलाबाळांची दैना, सबंध देशाची दुर्दशा वगैरे, अंगावर शहारे आणणारे प्रकार कधींच घडून आले नाहींत. यावरून तरवार हें हजरत पैगंबरांचें साध्यसाधन नव्हतें असेंच प्रत्येकास म्हणावें लागेल. आपद्धर्म म्हणून एखादी गोष्ट स्वीकारावी लागली म्हणून ती गोष्ट ध्येय होऊं शकत नाहीं. हजरत पैगंबरांनीं प्रसंग पडल्यामुळें हातांत तरवार घेतली म्हणून तरवारीच्या जोरावर धर्म फैलावण्याचें त्यांचें ध्येय होतें असें आपणांस कधींहि म्हणतां येणार नाहीं. त्यांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर अबदुल रहिमान बिन औफ या सेनाधिकाऱ्यानें त्यांच्या शत्रूंची रग जिरविण्याकरितां त्यांच्याशीं लढण्याची हजरत पैगंबरांजवळ परवानगी मागितली; या वेळीं शत्रूंची धूळधाण उडविणाइतकें हजरत पैगंबरांचें लष्करी सामर्थ्य वाढलेलें होतें. लढाई करण्याची आज्ञा दिली गेली असती तर सूड उगवावयास फारसा वेळ लागला नसता. पण रक्तपात हें हजरत पैगंबरांचें ध्येय नसल्यामुळें त्यांनीं आपल्या सेनाधिकाऱ्यांची विनंति नामंजूर केली. त्या वेळीं त्यांनीं काढलेले उद्गार किती तरी सुंदर आहेत! ते त्या अधिकाऱ्यास म्हणाले,

"दया आणि क्षमा करण्याकरितां मला परमेश्वराची आज्ञा झाली आहे; येवढ्याकरितां आपणांस हातांत

> तरवार घेऊन शत्रूंशीं लढाई करण्यास मी परवानगी देऊं शकत नाहीं. "

वरील उद्‌गार वाचल्यानंतरही हजरत पैगंबर रक्तपिपासु होते असें छातीठोकपणें सांगावयास कोणी तयार होईल काय ?

वरील विवरणाखेरीज कालाचा जबरदस्त पुरावा आपल्याजवळ आहे. जबरदस्तीनें कोठलेंही तत्त्व चिरंजीव होत नसतें, हें कालानें अनेक वेळां सिद्ध केलें आहे. जबरदस्तीनें ज्या धर्माचा प्रसार झाला ते धर्म जगाच्या पाठीवर नामशेष झाले आहेत. हजरत पैगंबरांनीं तरवारीच्या जोरावर जर आपला धर्म प्रस्थापित केला असता तर त्या धर्माची केव्हांच वाताहत झाली असती. तरवारीच्या जोरावर प्रस्थापित झालेल्या धर्मांचें किंवा तत्त्वांचें जीवित क्षणैक असतें ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे.

अलीकडच्या काळांतील मोठमोठ्या विद्वानांनीं इस्लाम धर्म तरवारीच्या जोरावर फैलावला नाहीं ही गोष्ट साधार सिद्ध केली आहे. आपल्या साधुत्वानें दिगंत कीर्ती मिळविलेले हिंदभूचे सुपुत्र व कर्णधार **महात्मा गांधी** यांनीं इस्लाम धर्माचा अभ्यास केला आहे. इस्लाम धर्म कसा प्रसृत झाला याचें उत्तर महात्माजींच्या पुढील शब्दांत दिलें आहे:--

> " हजरत महंमद पैगंबर यांचें चरित्र वाचल्यानंतर इस्लाम धर्माचा प्रसार तरवारीच्या जोरावर झाला नसून हजरत महंमद पैगंबरांचें पावित्र्य, निरपेक्षवृती, सच्चेपणा, परमेश्वरावर अढळ विश्वास या त्यांच्या बहुमोल गुणांमुळेंच इस्लाम धर्म फैलावला व फैलावत आहे, अशी माझी पक्की खात्री झाली. "

इतका पुरावा मिळाल्यानंतर हजरत महंमद पैगंबर यांनीं तरवारीच्या जोरावर इस्लाम धर्माचा प्रसार केला, असें म्हणावयाचें धाडस कोणी करील काय ?

---

भाग ५ वा

# भूमिका

"तुम्ही प्रत्येक राष्ट्रास सावध करणारे व दिशा दाखविणारे आहांत."

—पवित्र कुराण, १२:८

हजरत महंमद पैगंबरांच्या आयुष्यांतील घडामोडींचा विचार केला म्हणजे त्यांचें आयुष्य अभूतपूर्व झालें असेंच प्रत्येकाचें मत होईल. त्यांच्याइतकीं जडजोखमीचीं कामें आतांपर्यंत कोठल्याही व्यक्तीनें आपल्या आयुष्यांत करून दाखविलीं नाहींत. निव्वळ धर्मप्रसारार्थ त्यांनीं आपलें सर्व आयुष्य खर्ची घातलें नाहीं. समाज-सुधारक आणि राजकारण-धुरंधर असें साऱ्या जगाकडून म्हणवून घेण्याइतकी चिरंजीव कामगिरी त्यांनीं करून दाखविली आहे. त्यांनीं केलेल्या सामाजिक व राजकीय सुधारणा आपल्या आजच्या काळांत ग्राह्य मानल्या जातात; इतकेंच नव्हे तर आज प्रसरत असलेल्या सामाजिक व राजकीय अन्यायावर तोडगा म्हणून त्यांचा उपयोग केला जात आहे. त्यांच्या या त्रिविध भूमिकेबद्दल एक विद्वान् ख्रिश्चन धर्माधिकारी म्हणतातः—

> "हजरत महंमद पैगंबर ज्या देशांत जन्मले त्या देशास राजकीय घटना, सद्धर्म आणि सामाजिक नीति यांची माहिती नव्हती. त्यांनीं या तिन्ही गोष्टींची प्राणप्रतिष्ठा केली. आपल्या असामान्य बुद्धिमत्तेनें राजकीय परिस्थिती, धार्मिक ध्येय आणि सामाजिक प्रघात यांमध्यें एकाच वेळीं सुधारणा करण्याचें श्रेय मिळविलें."

—रेव्हरंड स्टीफन्स्

आपल्या आयुष्याच्या अवघ्या ६० वर्षांच्या अवधींत हजरत पैगंबरांनीं धार्मिक, सामाजिक व राजकीय सुधारणा यशस्वी करून दाखविल्या, यावरून

त्यांचा कामाचा उरक आणि बुद्धिमत्ता किती श्रेष्ठ दर्जाची असली पाहिजे याचा वाचकांनीं विचार करावा. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे, त्यांच्या आयुष्यांत त्यांनीं कलेल्या सुधारणांचें दृश्यफल त्यांना पाहावयास मिळालें. त्यांनीं केलेल्या सुधारणा सहाव्या शतकापुरत्याच जिवंत राहिल्या नसून आजतागायत त्यांच्या जिवंतपणाबद्दल जगाची खात्री झाली आहे. या निरनिराळ्या सुधारणा करतांना त्यांनीं स्वीकारलेल्या भूमिका किती यशस्वी ठरल्या याचा आपणांस थोडक्यांत विचार करावयाचा आहे.

**धर्म-प्रवर्तक**

त्या काळच्या चमत्कारिक व अमानुष वाटणाऱ्या धार्मिक कल्पना काढून टाकून सदसद्विवेकबुद्धीस पटणाऱ्या व मानवांचें कल्याण करणाऱ्या अभिनव कल्पनांचा हजरत पैगंबरांनीं आपल्या सद्धर्मांत अंतर्भाव केला. त्या वेळीं मूर्तीची पूजा करणारा मनुष्य अत्यंत धर्मात्मा समजला जात असे. या धर्मात्म्यानें वाटेल तेवढीं अनन्वित कृत्यें केलीं, वाटेल ते अनाचार केले तरी ते क्षम्य समजले जात. हजरत पैगंबरांनीं या चमत्कारिक कल्पनेच्या बुडाशीं हात घातला व धर्मात्मा केवळ मूर्तिपूजेच्या जोरावर बनत नसून सद्भावनांच्या व सच्छीलपणाच्या जोरावर बनतो असें सिद्ध केलें. मूर्तिपूजेमुळें अरबस्तानांतील जनता अधोगतीच्या मार्गास लागली होती. मूर्तीची पूजा करण्याकरितां दूरदूरचे लोक मक्केस येत व अफाट पैसा खर्च करीत. हा पैसा तेथील पुजाऱ्यांच्या हातांत जात असल्यामुळें ते अतिशय उन्मत्त बनले होते. हे पुजारी तो पैसा सत्कार्यांत खर्च न करतां ऐषारामांत व ख्याली-खुशालींत खर्च करीत. राष्ट्राचा पैसा राष्ट्राच्या उपयोगीं न पडतां तो मूठभर मस्तवाल लोकांचे ताब्यांत जावा आणि तो अशा रीतीनें खर्चीं पडावा ही गोष्ट कोणालाही दुःसह वाटेल. या मूर्तीला प्रसन्न करण्याकरितां दररोज हजारों बकऱ्यांचा बळी दिला जात असे व खंडोगणती अन्न शिजत असे. राष्ट्रांतील गरीब लोकांनीं अन्नान करीत रानोमाळ हिंडावें आणि देवाच्या

नांवावर शिजविलेलें खंडोगणती अन्न पायाखालीं तुडविलें जावें अशी दुर्धरावस्था प्राप्त झाली होती. कांहीं मूर्तींपुढें तर **मानवांचे बळी** दिले जात असत. असले अमानुष प्रकार बंद होण्याकरितां हजरत पैगंबरांनीं अंतःकरण एकाग्र करणारी निर्गुणोपासना प्रस्थापित केली. मानवांचा अंत पाहणाऱ्या हजारों देवांपेक्षां मानवांचें कल्याण करणाऱ्या करुणवत्सल परमेश्वराचें नामस्मरण करा अशी त्यांनीं घोषणा केली.

परमेश्वरावर अढळ बिश्वास हें इस्लाम धर्माचें आद्य तत्त्व आहे. इस्लाम धर्माचा अर्थ "परमेश्वरास सर्वस्वीं शरण जाणें" असा आहे. परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रांवर प्रेम करणें, त्यांच्या कल्याणाकरितां झटणें, परमेश्वरास आवडणारीं सत्कृत्यें करून दाखविणें या सर्व गोष्टींचा अंतर्भाव इस्लाम या शब्दांत होतो. इस्लाम धर्मांतील परमेश्वर कोठल्याही एका राष्ट्राचा किंवा धर्माचा नसून तो सर्व जगाचा परमेश्वर ( रब्बुल-आलमीन ) आहे. ज्यू लोकांच्या देवाप्रमाणें किंवा कांहीं राष्ट्रांतील देवतांप्रमाणें इस्लाम धर्माच्या परमेश्वराचें स्वरूप संतप्त, क्रूर, किंवा अकाळविकाळ नाहीं. पवित्र कुराणाच्या प्रत्येक अध्यायाचे सुरुवातीस अर्-रहमान ( उपकारकर्ता ) व अर्-रहीम ( दयेचा सागर ) अशा सुंदर नांवांनीं परमेश्वरास संबोधिलें आहे.

हजरत महंमद पैगंबरांनीं माणसास कर्जबाजारी करून टाकणारे अवघड धार्मिक विधी काढून टाकले. प्रत्येक माणसास सहज आचरितां येतील असे बिनखर्चाचे धार्मिक विधी कसे उरकावे याचें यथातथ्य ज्ञान त्यांनीं आपल्या अनुयायांस दिलें आहे. मुसलमानांचा सर्वांत श्रेष्ठ धार्मिक विधी म्हणजे नमाज ( परमेश्वराची प्रार्थना ) होय. हा विधी करण्याकरितां सुशोभित मंडपाची जरूर लागत नाहीं, किंवा तासेवाजंत्र्यांची गरज भासत नाहीं. एखाद्या मशिदींत, घरीं किंवा उघड्या मैदानावरहि हा विधी सहज उरकून घेतां येतो. हा विधी करावयास एकाच गोष्टीची जरूर आहे; ती गोष्ट म्हणजे शुचिर्भूतपणा होय. मनुष्य शुचिर्भूत असला कीं हा विधी करावयास त्यास

कोठल्याहि प्रकारची आडकाठी राहत नाहीं. प्रत्येकव्यक्तीनें—मग ती स्त्री असो वा पुरुष असो—नमाज पढलीच पाहिजे अशी सक्त धर्माज्ञा आहे. एखाद्या व्यक्तीस पगार ठरवून त्यानें घरांतील सर्व माणसांकरितां म्हणून केलेली प्रार्थना त्यांनीं त्याज्य ठरविली. हा प्रार्थनेचा मक्ता इतर धर्मांत प्रचलित असला तरी इस्लाम धर्मानें तो धर्मबाह्य ठरविला आहे. त्याचप्रमाणें एकानें प्रार्थना करावयाची व बाकीच्यांनीं पेंगत ऐकायची अशी परोच्चारित प्रार्थनाहि हजरत पैगंबरांनीं निषिद्ध ठरविली. लहानांपासूनथोरांपर्यंत परमेश्वराची प्रार्थना स्वतः करण्याचा प्रघात त्यांनीं पाडला आहे. त्याचप्रमाणें परमेश्वरप्राप्तीकरतां कुठल्याहि मध्यस्थाची जरुरी इस्लाम धर्मांत लागत नाहीं. प्रत्येक व्यक्तीला सत्कृत्य करून परमेश्वरप्राप्ती करून घेतां येते.

दुसरा धार्मिक विधी म्हणजे जकात ( दानधर्म ) होय. ज्यांच्याजवळ संपत्ति आहे, त्या लोकांनीं दानधर्म केलाच पाहिजे, अशी इस्लाम धर्माची स्पष्ट आज्ञा आहे. त्याबरोबरच दानधर्माचें प्रमाणहि ठरलें आहे. आपल्या संपत्तीचा $\frac{१}{४०}$ भाग दरवर्षी प्रत्येक मुसलमानानें खर्च केलाच पाहिजे. उदाहरणार्थ, ज्याच्याजवळ हजार रुपये असतील त्याला वरील प्रमाणाबरहुकूम पंचवीस रुपये दरवर्षी दानधर्मांत खर्चावे लागतात. हजरत पैगंबरांची दानधर्माची व्याख्या अत्यंत विस्तृत आहे. गोरगरीब, लुले-पांगळे, अनाथ व पंगू यांना दानधर्म अवश्य केलाच पाहिजे; पण अडचणींत सांपडलेले, संकटांनीं ग्रस्त झालेले, बंदिवासांत असणारे, कर्जबाजारी झालेले असे जे लोक असतील यांना मदत करणें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे. ही मदत म्हणजे एक प्रकारचा दानधर्मच होय. पण ज्यांच्याजवळ पैसा नाहीं किंवा जे ऋणकरी आहेत त्यांनीं दानधर्म करावाच अशी सक्ती नाहीं. पण हजरत पैगंबरांनीं त्यांच्यावर दुसरी कामगिरी सोंपविली आहे. जे दानधर्म करावयास असमर्थ असतील त्यांनीं लोकांना सत्कार्य करण्यास प्रवृत्त करावें. लोकांस सत्कार्यी लावणें हा देखील दानधर्मच होय असें हजरत पैगंबर म्हणतात. गोरगरिबांस

दानधर्म केल्यानें जेवढें पुण्य एखाद्या धनिकास मिळेल तितकेंच पुण्य एखाद्या गरिबास लोकांना सत्कार्यास प्रवृत्त करण्यानें मिळणार आहे.

तिसरा धार्मिक विधि म्हणजे उपवास होय. वर्षांतून एक महिना ( रमजान ) प्रत्येक मुसलमानानें उपवास करावयाचा असतो. उपवासाचा मुख्य हेतु म्हणजे चित्तशुद्धि होय. मनुष्यास नामोहरम करणाऱ्या निरनिराळ्या षड्रिपूंच्या आधीन त्यानें जाऊं नये येवढ्याकरितां उपवासाचें तत्त्व हजरत पैगंबरांनीं आपल्या धर्मांत गोविलें आहे. कोणाचेंही मन दुखवूं नये, कोणाचेंहि नुकसान करूं नये, मनांत वाईट विचार येऊं देऊं नयेत वगैरे अटी उपवास करतांना पाळाव्या लागतात. आजारी माणसें, प्रवासी आणि लहान मुलें यांनीं उपवास केलाच पाहिजे अशी अट नाहीं.

चौथा धार्मिक विधी म्हणजे मक्केची यात्रा होय. जगांतील सर्व लोकांनीं एकत्र जमावें आणि या सर्व लोकांस विश्वबंधुत्वाची जाणीव व्हावी एवढ्याकरतांच हा यात्रेचा विधी प्रत्येकानें करावयाचा असतो. पण ही यात्रा करणाऱ्या माणसास पुढील अटी पाळाव्या लागतात.

१. त्यानें आपलें कर्ज फेडून टाकलें पाहिजे, आणि यात्रेच्या अवधींत त्यानें आपल्या मुलाबाळांची व आपल्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबीयांची तरतूद करून ठेविली पाहिजे. २. प्रवासास आवश्यक असणाऱ्या वाहनांची आणि अन्नपाण्याची व्यवस्था करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं असलें पाहिजे. ३. प्रवासाच्या शक्याशक्यतेचा त्यानें विचार केला पाहिजे. ४. त्यानें आपल्या शत्रूंना मोकळ्या अंतःकरणानें क्षमा केली पाहिजे. ५. त्यानें एखाद्याचा गुन्हा केला असेल तर तो कबूल केला पाहिजे व त्या व्यक्तीशीं त्यानें मैत्री केली पाहिजे. या सगळ्या अटी पाळील त्यालाच मक्केची यात्रा करण्याचा अधिकार आहे.

हजरत पैगंबरांनीं जुन्या समजुतींचें खूळ धर्मांतून काढून टाकलें आहे. मांजर आडवें गेलें, एखादी गरीब विधवा बाई सामोरी आली किंवा एखादा पक्षी डाव्या बाजूनें गेला म्हणून कार्यसिद्धि होत नाहीं असें समजणें

चुकीचें आहे. या शकुन-अपशकुनी गोष्टींचा व कार्यसिद्धीचा काडीमात्र संबंध नाहीं अशी हजरत पैगंबरांनीं शिकवणूक दिल्यामुळें इस्लाम धर्मांत शकुनापशकुनांचें बंड अजिबात दिसत नाहीं. त्याप्रमाणेंच मंगलामंगल वेळेचें प्रस्थहि त्यांनीं मोडून टाकलें आहे. अमूक एक क्षण चांगला व अमूक एक वाईट असें न सजमतां प्रत्येक क्षण मंगलच आहे असें समजून कार्याला लागलें पाहिजे. त्याप्रमाणेंच विधिनिषेधाची भानगड त्यांनीं कायमची मिटवून टाकली आहे. एखाद्या मनुष्यानें समुद्रपर्यटन केलें किंवा एखाद्या परजातीच्या माणसाबरोबर दोन घांस खाल्ले म्हणून विधिनिषेध बाळगण्याकरतां प्रायश्चित्त घेण्याची पद्धत त्यांनीं आपल्या धर्मांत ठेविली नाहीं. ज्या गोष्टी आपल्या सदसद्विवेकबुद्धीस पटतात व ज्या चांगल्या आहेत, त्यांबद्दल प्रायश्चित्त घेण्याचें कांहींच कारण नाहीं, असें ते म्हणतात.

इस्लाम धर्मांत आईबापांविषयीं आत्यंतिक आदर आहे. ज्यांनीं आपणांस जन्म दिला, ज्यांनीं आपलें लालनपालन केलें, ज्यांच्या कृपेमुळें आपण लहानाचे मोठे झालों त्या आईबापांविषयीं सहृदयता दाखवावयास इस्लाम धर्म प्रत्येकास आज्ञा करीत आहे.

> **“ त्यांच्याशीं ( आईबापांशीं ) सहृदयतेनें वागा, आणि ‘परमेश्वरा, लहानपणीं माझें पालनपोषण करणाऱ्या माझ्या आईबापांवर दया कर’ अशी प्रार्थना करा. ”**
>
> **—पवित्र कुराण, २४:१७**

आपल्या प्रेमळ आईबापांस आपण काडीमात्र दुखवतां कामा नये; त्यांच्या अंतःकरणास प्रसन्नता वाटेल अशा तऱ्हेनें आपण वागलें पाहिजे; आईबापांना प्रसन्न करणें हा स्वर्गप्राप्तीचा एक मार्ग आहे, असें हजरत महंमद पैगंबर म्हणतात.

इस्लाम धर्मांत उत्कृष्ट चालीरीतींचें संवर्धन झालें आहे. या धर्मांत अतिथि-सत्कार हें महत्कृत्य समजलें जातें. आपल्या घरीं कोणी पाहुणा आला तर

त्याला अत्यंत सन्मानानें वागविलें पाहिजे, त्याच्याशीं गोड भाषण केलें पाहिजे, हें इस्लाम धर्मानें आपल्या अनुयायांस शिकविलें आहे. आपणांस त्रास झाला किंवा आपली गैरसोय झाली तर त्याची पर्वा न करतां आपण पाहुण्याच्या सुखसोयींकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें आपणांस कोणी भेटावयास आला तर त्याचें स्वागत करून त्याची आस्थापूर्वक विचारपूस केली पाहिजे, असा धडा हजरत पैगंबरांनीं स्वतःच्या कृतीनें घालून दिला आहे. इस्लाम धर्मांत उच्चनीचपणा असा भेदाभेद नसल्यामुळें भेटावयास आलेला गृहस्थ जगाच्या दृष्टीनें कितीहि हलक्या दर्जाचा असला तरी त्याला आदरपूर्वक उत्थापन मिळतें.

एकमेकांस अभिवादन करणें हें इस्लाम धर्मांत कर्तव्य समजलें जातें. मशिदींत, समारंभांत, रस्त्यांत, किंवा कोठेंही एखाद्याची गांठ पडली तर त्याला अभिवादन करून त्याच्याविषयीं आपलेपणा प्रदर्शित केला पाहिजे. अभिवादन किती सुंदर शब्दांत केलें जातें तें पहाः—“ अस्सलामालेकुम्. ” याचा अर्थ ‘ आपल्यास शांति लाभो ’ असा आहे. दुसऱ्या व्यक्तीसही तितक्याच आदरपूर्वक प्रत्युत्तर द्यावें लागतें. एकमेकांमध्यें आदर वाढेल, प्रेम उत्पन्न होईल अशा प्रकारच्या चालीरीति व आचारविचार यांना इस्लाम धर्मांत फार महत्त्व आहे. दुसऱ्याला वाईट वाटेल किंवा त्याचें अंतःकरण दुखवलें जाईल अशा प्रकारची वर्तणूक अत्यंत अश्लाघ्य समजली जाते. एकाद्याची निंदा करणें, त्याच्यावर निष्कारण तोहमत घेणें, चार चौघांत त्याची बदनामी करणें वगैरे प्रकार इस्लाम धर्मांत अत्यंत निंद्य मानले जातात. स्त्रियांची नालस्ती करणाऱ्या नीच माणसांचा तर कडक शब्दांत धिक्कार केला आहे ( अध्याय १८ ). दुसऱ्याकडे पाहून कुत्सितपणें हंसणें, एखाद्याचे दोष हुडकीत बसणें, किंवा त्याला टोपणनांवानें संबोधणें या गोष्टी इस्लाम धर्मानें त्याज्य मानल्या आहेत.

"लोकांनीं दुसऱ्याकडे पाहून कुत्सितपणें हंसू नये... तुम्ही दुसऱ्या लोकांचे दोष हुडकीत बसूं नका किंवा त्यांना टोपणनांवानें संबोधूं नका."

—पवित्र कुराण, ४९ : ११

या क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींमुळें आपसांतील बंधुभाव व प्रेम नष्ट होऊन निष्कारण द्वेष वाढतो; याकरितां अशा गोष्टींपासून अलिप्त राहण्याविषयीं इस्लाम धर्म बजावीत आहे.

पुण्यसंचय हें अत्यंत महत्त्वाचें कलम हजरत पैगंबरांनीं आपल्या धर्मांत घातलें आहे. प्रत्येक सत्कृत्य म्हणजेच पुण्य होय. इस्लाम धर्मांत सत्कृत्य करणारी व्यक्ति अत्यंत श्रेष्ठ समजली जाते. नुसता अफाट पैसा, उच्च प्रतीचा मानसन्मान, किंवा खानदानी घराणें यामुळेंच थोरपणा प्राप्त होत नाहीं. थोरपणा मिळवावयास आपण सत्कृत्यें केलीं पाहिजेत अशी त्यांनीं आपल्या अनुयायांना शिकवण दिली आहे.

"परमेश्वर सत्कृत्यें करणाऱ्यांवर प्रेम करतो."

—पवित्र कुराण, २ : १९५

परमेश्वराला प्रसन्न करून घ्यावयाचें असेल तर प्रत्येकानें सत्कृत्य केलें पाहिजे या उदार तत्त्वाचा अंगिकार इस्लाम धर्मानें केला आहे.

इस्लाम धर्माचें ध्येय मानवता होय. मानवांचीं सर्व दुःखें नष्ट करून त्यांना सुखी करावयास आपल्या अनुयायांनीं एकनिष्ठपणें झटावें अशी अंतिम इच्छा इस्लाम धर्मानें प्रगट केली आहे.

"मानवांच्या कल्याणाकरितां मुसलमानांची जात निर्माण झाली आहे. तुम्ही सत्याचा पुरस्कार करणारे आहांत व *न्यायाचा त्याग करणारे आहांत."

—पवित्र कुराण, ३ : १०९

* अन्यायाचा

मानवांचें कल्याण हें आपल्या जीविताचें सारसर्वस्व आहे, असें प्रत्येक मुसलमानानें समजलें पाहिजे, असा स्पष्ट संदेश इस्लाम धर्मानें दिला आहे.

हजरत पैगंबरांचा धर्म हटवादी नसून उदारमतवादी आहे. या धर्मांत परधर्माची हेटाळणी नाहीं, परधर्मसंस्थापकांची निंदा नाहीं, किंवा शास्त्राची (science) अवहेलना नाहीं. जगामधील अत्युत्कृष्ट ज्ञानाचा संग्रह करण्यास इस्लाम नेहमीं तयार असतो. जागतिक प्रगतीशीं वितंडवाद न घालतां, त्या प्रगतीचा उपयोग करून घेण्यास इस्लाम नेहमीं सज्ज राहतो. मानवजातीचें कल्याण ज्यांमुळें होईल अशा सुधारणांचें स्वागत करण्यास इस्लाम धर्मास नेहमीं आनंद वाटतो. इस्लाम धर्माचें स्वरूप आपल्या जातीपुरतें आकुंचित नाहीं. इस्लाम धर्म हा अखिल जगाचा धर्म आहे. महर्षी सर रवींद्रनाथ टागोर यांच्या ' विश्वभारती ' विद्यालयाचे एक विद्वान् अध्यापक डॉ. ज्यूलियस यांनीं केलेली इस्लाम धर्माची व्याख्या मननीय आहे.

> **" इस्लाम हा मानवतेचा धर्म आहे. असहाय्यांचें संरक्षण करणारा, जातीजातींमध्यें उभे असलेले अभेद्य तट जमीनदोस्त करणारा आणि परमेश्वरानें ठरवून दिलेल्या ध्येयाकडे जाणाऱ्या सर्व लोकांत विश्वबंधुत्वाचें नातें निर्माण करणारा असा हा धर्म आहे. "**

—डॉ. ज्युलियस् जर्मनस्, पीएच्.डी.

जगांतील यच्चयावत् व्यक्तींचें कल्याण व्हावें असें उदात्त ध्येय इस्लाम धर्मानें आपल्यासमोर ठेविलें आहे. इस्लाम धर्म कोणामध्येंच भेदभाव करीत नाहीं.

> **" आम्हीं तुम्हांस एकाच आईबापांपासून निर्माण केलें. "**

—पवित्र कुराण, ४९:१३

आज जगांतील लोक निरनिराळ्या देशांत पसरलेले दिसतात, पण त्या सर्वांचा उगम एकाच ठिकाणापासून झाला आहे; आपली भाषा, आपला वेष,

आपलें आचरण निरनिराळें असलें तरी आपण सर्वजण एकाच कुटुंबांतील आहों; आपल्यामध्यें उच्चनीच, स्पृश्यास्पृश्य, काळागोरा असा पंक्तिप्रपंच नाहीं; आपण सर्व एक आहोंत, असा धडा घालून देऊन इस्लाम धर्मानें विश्वबंधुत्वाचा मार्ग सुकर करून ठेविला आहे. मानवजातीच्या कल्याणाकरितां अवतरलेल्या या सुंदर धर्माची ओळख साऱ्या जगास करून देणारे हजरत महंमद पैगंबर सद्धर्मप्रवर्तक ठरत नाहींत काय ?

## समाजसुधारक

हजरत महंमद पैगंबर जितके निधडे धर्मप्रवर्तक तितकेच ते कट्टे समाजसुधारक होते. त्यांची धर्मकारणांतील निर्भय वृत्ति समाजकारणांत अप्रतिहत संचार करीत होती. त्या वेळच्या लोकांची अडाणी वृत्ति आणि हजरत पैगंबरांच्या यशस्वी सुधारणा या दोन गोष्टींचा मेळ हजरत पैगंबरांची समाजाविषयीं अनुकंपा व तळमळ स्पष्टपणें सिद्ध करीत आहे व त्याबरोबर त्यांच्या जबर आशावादाशीं जगाचा परिचय करून देत आहे. त्यांनीं केलेल्या सामाजिक सुधारणांचा इतिहास वाचला म्हणजे आजच्या युगांतील सुधारकांनादेखील हजरत पैगंबरांनीं आपणांला निष्प्रभ करून टाकलें आहे असें वाटेल. चोहों बाजूंनीं विरोधाचा सारखा भडिमार होत असतां साध्यासुध्या नव्हे तर उच्च प्रकारच्या सामाजिक सुधारणा घडवून आणणाऱ्या हजरत पैगंबरांकडे सारें जग कुतूहलानें आणि अभिमानानें पाहत राहील. फक्त आपल्या हयातींत टिकून राहतील अशा प्रकारच्या गुळमुळीत सुधारणा न करतां, जगाच्या कल्पांतापर्यंत टिकतील अशा चिरंजीव सुधारणा करण्याचें श्रेय हजरत महंमद पैगंबरांनीं मिळविलें आहे. धर्मप्रवर्तक व समाजसुधारक या परस्परविरोधी तत्त्ववेत्त्यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या ठिकाणीं झाला होता असें प्रत्येकास कबूल करावें लागेल. अशा प्रकारचा मिलाफ त्यांच्याखेरीज फारच क्वचित् व्यक्तींमध्यें संभवत असेल. त्यांनीं ज्या चिरंजीव सुधारणा केल्या त्यांचा या ठिकाणीं संक्षेपानें विचार करावयाचा आहे.

हजरत पैगंबरांच्या काळचा समाज अत्यंत विस्कळीत झाला होता. एकत्रित लोकांचा समाज असतो ही कल्पनाच मुळीं जनतेंत नव्हती. दहा दहा किंवा पंधरा पंधरा लोकांचा एकेक स्वतंत्र गट असे. असे अनेक गट त्या वेळीं अस्तित्वांत असल्यामुळें त्यांच्यामध्यें एकसूत्रीपणाचा अभाव होता. एका गटानें केलेलें कार्य दुसऱ्या गटानें हाणून पाडावयाचें असा संप्रदाय त्या काळीं असल्यामुळें चांगल्या कार्यांची फलनिष्पत्ति होत नसे. या चमत्कारिक परिस्थितीमुळें समाजाच्या कल्याणाची वाताहत होत असल्यास नवल तें कसलें? ही परिस्थिति अशीच कायम राहिल्यास सगळी जनता नामशेष होईल म्हणून हजरत पैगंबरांनीं या निरनिराळ्या गटांना एकत्रित करण्याचा संकल्प केला. हा संकल्प पुरा करून जनतेंत ऐक्य प्रस्थापित करण्याकरितां त्यांना विलक्षण सायास करावे लागले, लोकांचा रोष सहन करावा लागला, आणि हजारों संकटांना तोंड द्यावें लागलें. अरब लोकांस नुसत्या वेदांताचे घुटके देत न बसतां हजरत पैगंबरांनीं त्यांचेमध्यें रोटी व बेटीव्यवहारास प्रत्यक्ष सुरवात केली. कुलाचा किंवा उच्चनीचपणाचा काडीमात्र विचार न करतां त्यांनीं आपलें रोटीबेटीव्यवहाराचें तत्त्व अमलांत आणलें. त्या काळीं आमची जात उच्च, आमचें कुलशील श्रेष्ठ, आमचें घराणें थोर इत्यादि जातिभेद निर्माण करणाऱ्या वायफळ बडेजावीचा लोकांना अभिमान असल्यामुळें हजरत पैगंबरांनीं सर्रास रोटीबेटीव्यवहार सुरू करतांच त्या पुराणमतवादी लोकांनीं 'धर्म बुडाला,' अशी एकच कोल्हेकुई केली, निषेधाचा बदसूर काढला आणि हजरत पैगंबरांस लाखोली वाहण्याचें पुण्यव्रत पतकरलें. परंतु त्यांनीं या विरोधास काडीमात्र न जुमानतां आपलें कार्य सुरू ठेवलें. जगांत प्रेम व सहिष्णुता निर्माण करणाऱ्या समतेस विघातक होणाऱ्या जातिभेदाच्या भुतास गाडून टाकण्याचा रोटीबेटीव्यवहार हा एकच एक मार्ग असल्यामुळें हजरत पैगंबरांनीं जनतेस त्या मार्गावर पदार्पण करावयास लाविलें.

तो काळ गुलामगिरीचा होता. त्या काळीं साऱ्या जगभर गुलामगिरीचा सैतान थैमान घालीत होता. सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर पोहोंचलेल्या रोमन साम्राज्यांतहि गुलामगिरीची प्रथा सुरू होती. सुज्ञ समजल्या जाणाऱ्या त्या काळच्या तत्त्ववेत्त्यांनीं देखील गुलामगिरीची तळी उचलून धरली होती. अरिस्टॉटल्सारखा महान् तत्त्ववेत्ता 'गुलामगिरीची समाजास आवश्यकता आहे' असें प्रतिपादन करीत असे. एपिक्यूरियन, स्टूइक्स वगैरे तत्त्वज्ञानांतून अरिस्टॉटलचा सूर निघत होता. सुधारलेल्या राष्ट्रांची ही कथा, मग जंगली अरबस्तानांत गुलामगिरीचें प्राबल्य दिसून यावें यांत नवल तें काय? अरबस्तानामध्यें गुलामांची एक निराळीच जात समजली जात असे. ह्या जातीवर त्यांच्या दैवानेंच बहिष्कार टाकल्यामुळें सारें जग या गुलामांच्या जातीकडे तुच्छतेनें पाहत असे. गुलामाशीं सहानभूतीचे एक दोन शब्द बोलणें जेथें पाप समजलें जाई तेथें त्यांच्या कल्याणाची गोष्ट काढणें वेडगळपणाचें ठरल्यास आश्चर्य नाहीं. त्या काळीं गुलामांचे होणारे हाल वाचले म्हणजे अंगावर शहारे आल्याखेरीज राहणार नाहींत. जीव असलेला पण वाचा नसलेला, हृदय असलेला पण समर्थ नसलेला असा दुर्दैवी प्राणी भूतलावर कोठें आढळेल काय असा प्रश्न कोणीं केला तर त्या प्रश्नास उत्तर म्हणून गुलामांकडे बोट दाखवितां येईल. वाचा असून बोलतां येत नसल्यामुळें टपकणाऱ्या अश्रूंनीं आपल्या हालअपेष्टांचें वर्णन करणाऱ्या गुलामांकडे पाहून हजरत महंमद पैगंबरांचें अंतःकरण कळवळलें. या गुलामांना स्वतंत्र केल्याखेरीज समाजाचा उत्कर्ष कदापिहि होणार नाहीं असा विचार हजरत पैगंबरांच्या मनांत येऊन त्यांनीं गुलामांना स्वतंत्र करण्याचा पुकारा केला. "गुलामांभोंवतीं करकचून आवळलेलीं सामाजिक बंधनें तोडून टाकून त्यांना आपली जीवनयात्रा सुखकर करूं द्या" असा हजरत पैगंबरांनीं जाहीर उपदेश जनतेस केला. गुलामांस मुक्त करून त्यांना स्वातंत्र्य देणें म्हणजे महत् पुण्य आहे, अशी कल्पना त्यांनीं जनतेच्या अंतःकरणावर बिंबविली. एकदां एक गृहस्थ

हजरत पैगंबरांकडे आले व म्हणाले, "नरकापासून मुक्त होऊन स्वर्गप्राप्ति होण्याचा मार्ग कोणता?" हजरत पैगंबरांनीं उत्तर दिलें, "गुलामांना मुक्त करणें हाच मार्ग आहे!" गुलामांना स्वातंत्र्य देणें म्हणजे मुक्ति मिळविणें होय अशी घोषणा करून मानवतेच्या इतिहासांत हजरत पैगंबरांनीं श्रेष्ठ स्थान मिळविलें आहे.

हजरत पैगंबरांच्या आज्ञेप्रमाणें गुलामांना मुक्त करण्याकरतां सार्वजनिक फंडाचा विनियोग होऊं लागला. गुलाम स्वतंत्र झाल्यावर त्यानें आपल्या आयुष्याची सुरुवात चांगल्या तऱ्हेनें करावी म्हणून मालकानें त्याला कांहीं संपत्ति द्यावी असा हजरत पैगंबरांनीं जनतेस उपदेश करून स्वतंत्र झालेल्या गुलामांच्या आयुष्यांस स्थैर्य आणलें. गुलामगिरीस आळा घालण्यासाठीं हजरत पैगंबरांनीं भगीरथ प्रयत्न केले. आणि हेच प्रयत्न जगांतील गुलामगिरी नेस्तनाबूद करण्यास कारणीभूत होणार आहेत. या विधानाच्या पुष्ट्यर्थ एका विद्वान् प्रोफेसरचें मत देतां येईल. लीडन युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर स्नोक हुर ग्रोरीज हे आपल्या 'महॉमेडॅनिझम्' या ग्रंथाच्या १५०व्या पानावर म्हणतात, "इस्लाम धर्माच्या तत्त्वामुळें गुलामगिरी जगांतून नामशेष झाल्याखेरीज राहणार नाहीं." हजरत महंमद पैगंबरांनीं केलेलें गुलामगिरीचें उच्चाटन म्हणजे श्रेष्ठ दर्जाची सामाजिक सुधारणा होय.

समाजाच्या ऐक्यावर समाजाचा पर्यायानें जगाचा उत्कर्ष अवलंबून असल्यामुळें तें ऐक्य प्रस्थापित करते वेळीं जातगोताचा, उच्चनीचपणाचा काडीमात्र विचार करतां कामा नये. क्षुल्लक भेदभाव विसरून आम्ही सर्वजण बंधु आहोंत, समसमान आहोंत अशी कल्पना प्रत्येकानें बाळगली पाहिजे. परमेश्वराजवळ भेदभाव नाहीं; त्याच्याजवळ गरीब श्रीमंत, लहान थोर, उच्च-नीच असा पंक्तिप्रपंच नाहीं; आपणहि असा भेदभाव बाळगूं नये, पंक्तिप्रपंच करूं नये या उद्देशानें हजरत पैगंबरांनीं गुलामगिरीवरील व इतर कनिष्ठ

जातींवरील निर्बंध उठवून सर्व जनतेंत समता व बंधुता प्रस्थापित करण्याची श्रेष्ठ सामाजिक सुधारणा अमलांत आणिली.

ही समता किंवा बंधुता प्रस्थापित करते वेळीं हजरत पैगंबरांनीं कोठल्याहि गोष्टी आड येऊं दिल्या नाहींत. अमुक एक मनुष्य अस्पृश्य आहे किंवा गुलाम आहे, त्याच्याशीं आपण बंधुत्वाच्या नात्यानें कसें राहावें, त्याच्याशीं सोयरीक कशी करावी अशा तऱ्हेचा संदेह जनतेच्या मनांत उद्भूत होऊन समतेच्या व बंधुतेच्या कार्यास धुणा लागूं नये म्हणून हजरत पैगंबरांनीं आपली आते-बहीण एका गुलामाला देऊन अचाट मनोधैर्य व्यक्त केलें आणि जनतेच्या मनांतील संदेह दूर करून टाकला. हजरत पैगंबरांचें घराणें केवढें थोर, त्यांचा दर्जा केवढा श्रेष्ठ; पण समतेच्या व बंधुतेच्या तत्त्वापुढें त्यांना आपल्या घराण्याची, दर्जाची मातब्बरी वाटली नाहीं. हजरत पैगंबरांच्या सर्वश्रेष्ठ घराण्यांतील ज्या मुलीचें पाणिग्रहण करण्यासाठीं अरबस्तानांतील संपन्न, कुलशीलवान आणि एकापेक्षां एक सुंदर अशा अरब तरुणांमध्यें स्पर्धा लागली होती, ती मुलगी हजरत पैगंबरांनीं एका बहिष्कृत समजल्या गेलेल्या गुलामास दिली, यावरून हजरत पैगंबरांची तत्त्वनिष्ठा केवढी जाज्वल्य होती आणि त्यांच्या समतेच्या व बंधुतेच्या कल्पना किती उच्च होत्या यांची वाचकांना सर्व-साधारण कल्पना आली असेल. हजरत पैगंबर बोलघेवडे समाजसुधारक नव्हते, किंवा वेळ पडल्याबरोबर मतें बदलणारे वाचावीर नव्हते. त्यांनीं एकादें तत्त्व अंगिकारलें म्हणजे तें तडीस नेल्याखेरीज राहत नसत. हजरत महंमद पैगंबरांनीं एखाद्या तत्त्वाचा प्रसार सुरू केला तर ते जिवाची देखील पर्वा करीत नसत. लोकांना त्या तत्त्वाचा उपदेश करण्यापूर्वीं तें तत्त्व ते स्वत: अमलांत आणीत असत. त्यांच्या या तत्त्वनिष्ठेमुळेंच त्यांनीं केलेल्या सुधारणा कल्पनेबाहेर यशस्वी झाल्या व आजतागायत चिरकाल टिकल्या. आज आपण कोठेंहि मुसलमान समाजांत गेलां तर हजरत पैगंबरांनीं केलेल्या सुधारणा दृश्य स्वरूपांत दिसतील. गोत्र प्रवर, उच्च दर्जा, थोर घराणें वगैरे अडचणी मुसलमानी

लग्नाच्या आड येऊं शकत नाहींत. एखादा खानदानी व श्रीमंत घराण्यांतील मुसलमान आपली मुलगी एखाद्या गरीब मुसलमानास आनंदानें देतो. मुसलमान वराची योग्यता पैशाच्या, दर्जाच्या, किंवा उच्च घराण्याच्या मापानें न मोजतां कर्तृत्वाच्या मापानें मोजली जाते. हेंच समतेचें तत्त्व मुसलमानांच्या रोजच्या व्यवहारांत स्पष्टपणें दिसून येतें. मशिदींत प्रार्थनेच्या वेळीं बादशाहा-शेजारीं एखादा मजूर उभा राहतो; समारंभाच्या ठिकाणीं नोकर मालकाच्या पुढें बसलेला दिसून येतो; जेवणाच्या पंक्तींत सरदाराशेजारीं फाटक्या कपड्याचा हमाल बसलेला आढळून येतो. हजरत पैगंबरांच्या सुधारणेचा अम्मल त्यांच्या मृत्यूनंतर कसा कायम आहे हें वाचकांच्या लक्षांत यावयास फारसा वेळ लागणार नाहीं.

नंतर हजरत पैगंबरांनीं समाजांत पसरलेल्या वाईट व्यसनांवर मोर्चा फिरविला. समाज पोखरून काढून त्यास निःसत्त्व करण्याचें सामर्थ्य या व्यसनांत असल्यामुळें त्यांनीं हीं व्यसनें निषिद्ध ठरविलीं. त्या काळचीं मोठीं व्यसनें म्हणजे बदफैली, जुगार आणि मदिराप्राशन हीं होत. वाटेल त्या स्त्रीवर बेधडक हात टाकावयाचा, दिवसाढवळ्या हमरस्त्यावर एखाद्या स्त्रीची विटंबना करावयाची, पैशांकरतां स्त्रियांना जबरदस्तीनें देहविक्रय करावयास लावावयाचें, हे बदफैलीचे प्रकार हजरत महंमद पैगंबरांनीं बंद केले व लोकांना स्त्रीदाक्षिण्याची दिशा दाखवून दिली. जुगाराचें दुसरें एक जबरदस्त व्यसन होतें. गल्लोगल्लीं रात्रंदिवस जुगार चालत असे. या जुगारामध्यें हजारों कुटुंबांची धुळधाण होत असल्यामुळें हजरत पैगंबरांनीं जुगार बंद पाडला. यापेक्षां सर्वांत मोठें व न सुटण्याजोगें व्यसन म्हणजे दारू पिण्याचें. दारू प्यावयास मिळावी म्हणून एखादा अरब आपला प्राण देखील गहाण टाकावयास तयार होत असे. रात्रंदिवस दारूचे गुत्ते उघडे असत. पैशाबरोबर शरिराची व मनाची राखरांगोळी करणाऱ्या या महान् व्यसनापासून जनतेस मुक्त करण्याचा त्यांनीं निश्चय केला.

जगामधील कोठल्याही व्यसनानें जनतेचें नुकसान झालें नाहीं इतकें नुकसान या दारूमुळें झालें आहे. या व्यसनाचें उच्चाटन करण्याकरतां जंगजंग पछाडण्यांत आले; पण दुर्दैवानें ते सर्व निष्फळ ठरले. आजकालच्या सुधारलेल्या राष्ट्रांवर देखील या दारूचा पगडा कायम आहे. या व्यसनाच्या भीषणतेबद्दल इंग्लंडचे प्रख्यात मुत्सद्दी **लॉइड जॉर्ज** यांनीं महायुद्धाचे वेळीं अगदीं यथार्थ उद्गार काढले आहेत. ते म्हणतात,

> **"आम्ही जर्मन, ऑस्ट्रिया व दारू यांबरोबर लढत आहोंत. पण सर्वांत दारूसारखा जबरदस्त व कट्टा शत्रू आम्हांस भेटला नाहीं. सर्व जर्मन पाणबुड्यांनीं आमचें नुकसान केलें नाहीं इतकें नुकसान दारूनें केलें आहे व करीत आहे!"**

आतांपर्यंत जनतेस दारूपासून परावृत्त करण्याचा निर्धार अनेक लोकधुरीणांनीं केला; पण दुर्दैवानें तो फोल ठरला. उलट या निर्धारास प्रत्युत्तर म्हणून दारू पिणाऱ्यांची संख्या मात्र दुप्पट वाढली. दारूमुळें राष्ट्राचें अत्यंत नुकसान होत आहे, याची जाणीव असतांना देखील तेथील सत्ताधारी दारूविरुद्ध ब्र उच्चारूं शकत नाहींत. उलट आपलें आसन टिकविण्याकरतां या सत्ताधाऱ्यांना दारू पिण्यास परवानगी द्यावी लागते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे दारूनें आजचें राजकारण हातीं घेऊन आपलें महत्त्व जगास पटवून दिलें आहे. पण हजरत पैगंबरांनीं आपल्या कर्तृत्वानें हें महत्त्व धुळीस मिळवून टाकलें. दारू पिणें हराम ( निषिद्ध ) आहे असा हजरत पैगंबरांनीं पुकारा करतांच मदिनेचे रस्ते दारूनें वाहूं लागले. त्यांचा हुकूम सुटतांच प्रत्येक जण आपल्या घरीं दारू साठविलेलीं भांडीं रस्त्यावर आणून फोडूं लागला. मदिना शहरांतील मुसलमान नागरिकांच्या घरांत दारूचा एक थेंबही शिल्लक राहिला नाहीं. हजरत पैगंबरांच्या आज्ञेनुसार प्रत्येक मुसलमान दारू पिणें अत्यंत मोठें पाप समजतो. आजकालच्या सुधारणेचें वारें मुसलमानी राष्ट्रास लागलें

असतां देखील तीं राष्ट्रं दारू पिण्यापासून अलिप्त आहेत. यावरून हजरत पैगंबरांच्या शिकवणीचा केवढा जबरदस्त परिणाम झाला आहे, याची सर्व-साधारण कल्पना यावयास फारसा वेळ लागणार नाहीं.

यानंतर हजरत महंमद पैगंबरांची सामाजिक सुधारणा म्हणजे त्यांनीं वाढविलेला स्त्रियांचा दर्जा होय. त्यांच्या जन्माआधीं स्त्रियांची फारच दैना झाली होती. स्त्रियांना समाजांत इज्जत नव्हती, घरीं अधिकार नव्हता. पुरुषांच्या लहरीप्रमाणें वागणारी एक चैनीची वस्तु यापलीकडे स्त्रियांना किंमत नसे. स्त्रियांविषयीं इतकी अनुदार वृत्ति पसरली होती कीं, मुलगी जन्मास आली कीं तिला ठार मारून टाकीत असत. परंतु हजरत महंमद पैगंब-रांनीं ही अमानुष चाल बंद केली व स्त्रियांच्या अभिजात थोरपणास विघा-तक होणाऱ्या कल्पना समाजांतून काढून टाकिल्या. स्त्री ही बटीक नसून पुरुषाची सहधर्मचारिणी आहे, हें पटवून देऊन तिच्याशीं दयाळूपणानें वाग-ण्याची आपल्या अनुयायांना आज्ञा दिली. पवित्र कुरणाच्या " अन्निसा " या अध्यायांत पुरुषांनीं स्त्रियांबरोबर कसें वागावें, याविषयीं उत्कृष्ट शिकवण दिली आहे.

> **" त्यांच्याशीं ( स्त्रियांशीं ) दयाळूपणानें वागा. जर तुम्ही त्यांचा द्वेष कराल तर ज्यांत परमेश्वरानें चांगुलपणा भरला आहे अशा व्यक्तीचा द्वेष केल्यासारखें होईल."**
>
> **—पवित्र कुराण, ४ : १९**

चांगुलपणानें भरलेली व्यक्ति म्हणून परमेश्वरानें स्त्रियांना निर्माण केलें आहे. आपण जर स्त्रियांचा अपमान करूं तर परमेश्वराच्या चांगुलपणाचा अपमान केल्यासारखें होईल. स्त्रियांचा द्वेष किंवा तिरस्कार न करतां त्यांना ममताळूपणानें वागवा असा पवित्र कुराणामध्यें स्पष्ट उल्लेख आहे. हकीम इब्न-इ-माविया नांवाच्या सद्गृहस्थांनीं स्त्रियांना कसें वागवावें असा प्रश्न हजरत पैगंबरांना विचारला. त्यावर हजरत पैगंबर म्हणाले,

" तुम्ही जें अन्न खातां तेंच अन्न स्त्रियांना खावयास द्या; तुम्ही जीं वस्त्रप्रावरणें वापरतां तशा प्रकारचीं वस्त्रप्रावरणें त्यांना वापरावयास द्या; त्यांना कधींहि मारूं नका. "

आपण पंचपक्वान्नें खावयाचीं आणि स्त्रियांना शिळी भाकर खावयास लावावयाची, आपण उंची कपडे वापरावयाचे आणि स्त्रियांना ठिगळ लावलेली गोधडी नेसावयास द्यावयाची, क्षुल्लक कारणावरून स्त्रियांना झोंडपावयाचें असे निंद्य प्रकार हजरत पैगंबरांनीं त्याज्य व निषेधार्ह ठरविले. ते पुढें म्हणतातः—

" आपल्या बायकांना वागवितांना परमेश्वराची भीति बाळगा. तुमच्या बायका खरोखरीं तुमच्या मदतनीस आहेत. परमेश्वरास साक्ष ठेवून तुम्ही त्यांचा स्वीकार केला आहे."

स्त्रियांना आपण क्रूरपणानें वागविलें तर परमेश्वर आपल्यावर नाराज होईल हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. आपल्या सहधर्मचारिणी अडचणीच्या वेळीं आपल्यास मदत करणाऱ्या आहेत. मनुष्यावर संकटें कोसळूं लागलीं म्हणजे त्याचे मदतीस स्नेही सोबती येत नाहींत, भाऊबंद धावत नाहींत; त्याच्या मदतीस धावून येणारी, त्याच्या दुःखांत समभागी होणारी, आपल्या गोड शब्दांनीं त्याला धीर देणारी, त्याच्याकरतां आपल्या सर्वस्वास तिलांजली देणारी कोणती व्यक्ति जगांत असेल तर ती त्या मनुष्याची सहृदय पत्नी होय. स्त्रीजातीविषयीं वाटणारा आदर अत्युच्च शिखरास जावा म्हणून हजरत पैगंबर म्हणतात,

" मातेच्या पायाखालीं स्वर्ग आहे. "

जगांतील कोठल्याहि धर्मात्म्यानें हजरत महंमद पैगंबरांइतका स्त्रीजातीचा गौरव केला नसेल. लहानपणीं मातेच्या स्वरूपांत, तरुणपणीं पत्नीच्या स्वरूपांत आणि वृद्धापकाळीं कन्येच्या स्वरूपांत अखिल मानवजातीचें कल्याण चिंत-

णाऱ्या स्त्रीजातीविषयीं हजरत पैगंबरांनीं केवढा आदर प्रदर्शित केला आहे याची पुसट कल्पना वाचकांना आल्याखेरीज राहणार नाहीं.

हजरत पैगंबरांनीं स्त्रीजातीविषयीं जितका आदर प्रदर्शित केला आहे, तितकाच त्यांच्या हक्कांचा पुरस्कार केला आहे. स्त्रियांना पुरुषांइतकेच हक्क आहेत हें जगाच्या निदर्शनास आणून देणारे हजरत महंमद पैगंबर हे पहिलेच महात्मे होत. नुसता आदर प्रदर्शित करून त्यांनीं स्त्रियांची बोळवण केली नाहीं तर त्यांना सारखे हक्क देऊन त्यांचा सामाजिक दर्जाहि वाढवून ठेविला आहे.

**" जितके पुरुषांचे स्त्रियांवर हक्क आहेत, तितकेच स्त्रियांचे पुरुषांवर आहेत. "**

—पवित्र कुराण, २ : २२९

स्त्रियांचे हक्क पायदळीं तुडविण्याचा पुरुषांना काडीमात्र हक्क नाहीं; इतकेंच नव्हे तर " **स्त्रियांचे हक्क पवित्र आहेत** " असा पुकारा करून हजरत महंमद पैगंबरांनीं स्त्रियांच्या हक्कांविषयीं जागरूकता प्रदर्शित केली आहे.

हजरत महंमद पैगंबरांनीं स्त्रियांना विवाहाच्या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे. मुसलमान मुलीच्या इच्छेविरुद्ध तिचे आईबाप तिचें लग्न करूं शकत नाहींत. आपण सांगूं त्या तरुणाबरोबर आपल्या मुलीनें लग्न केलेंच पाहिजे अशी अरेरावी मुलीच्या बापाला करतां येत नाहीं. मुलीला न कळत लग्नाचा घाट घातला तरी लग्न लागण्यापूर्वी मुलीची संमति घ्यावी लागते. लग्नाचे वेळीं आपणांला हा नवरा नको असें मुलगी म्हणेल तर तें लग्न रद्द होतें. मुलगी अज्ञान असल्यास तिच्या संमतीशिवाय तिचें लग्न बापाच्या संमतीवरून होऊं शकतें, परंतु पुढें ती मुलगी सज्ञान झाल्यावर तिला नवरा नापसंत वाटला तर तो लग्नसंबंध रद्द होतो.

लग्नाचे वेळीं नवरा मुलगी ठराविक रकमेची ( यालाच मेहेर म्हणतात ) अट नवऱ्यास घालते. एकादे वेळीं नवऱ्यानें काडीमोड केल्यास निर्वाहाचे

[library stamp] ८८९१८ ... १३

साधन म्हणून या रकमेचा विनियोग तिला करतां येतो. काडीमोड झाल्याबरोबर नवऱ्यास ही रक्कम बायकोच्या हवालीं करावी लागते.

लग्न झाल्यानंतर बायकोची इस्टेट उधळण्याचा नवऱ्याला काडीमात्र अधिकार नाहीं. बायकोच्या संमतीखेरीज एका पैलाहि नवरा हात लावूं शकत नाहीं. मुसलमान स्त्रीला नवऱ्याच्या नांवावर अवलंबून राहावें लागत नाहीं. कोर्टांत ऋणकोविरुद्ध फिर्याद करावयाची झाली तर ती फिर्याद नवऱ्याच्या नांवावर न करतां स्वतःच्या नांवावर मुसलमान स्त्री करूं शकते. बापाची इस्टेट फक्त मुलाच्या वांट्यास न जातां त्या संपत्तीचा ठराविक हिस्सा मुलीकडे येत असतो. बापाच्या संपत्तीचा तिला मिळालेला हिस्सा पूर्णपणें तिच्या मालकीचा होतो. या हिश्यांत तिच्या नवऱ्यास ढवळाढवळ करतां येत नाहीं.

पुरुषांना घटस्फोट करण्याची परवानगी हजरत पैगंबरांनीं दिली आहे. पण हा घटस्फोट करतांना हजरत पैगंबरांनीं कांहीं निर्बंध घालून स्त्रियांना निष्कारण त्रास होणार नाहीं अशी खबरदारी घेतली आहे. हजरत पैगंबरांनीं घटस्फोट ही बाब सार्वजनिक न ठेवितां ती अगदीं खासगी स्वरूपाची ठेविली आहे. भर कोर्टांत जाऊन त्या ठिकाणीं स्त्रियांची मानहानी करणारीं घटस्फोटाचीं कारणें निर्लज्जपणें सांगण्याचा अधिकार पुरुषांना ठेवला नाहीं. "मीं तुझ्याशीं काडीमोड केली आहे," असें नवऱ्यानें एका वाक्यांत एकाच वेळीं सांगितल्यानें तो घटस्फोट मान्य होत नाहीं. महिन्यांतून एकदां याप्रमाणें तीन महिन्यांत तीन वेळां वरील वाक्य उच्चारल्यानंतर तो घटस्फोट पुरा होतो. नवऱ्याच्या लहरीप्रमाणें किंवा क्षणिक संतापामुळें त्याच्या हातून घटस्फोटाचा प्रमाद होऊन एका स्त्रीचें नुकसान होऊं नये म्हणून तीन महिन्यांचा अवधि दिला आहे. या तीन महिन्यांच्या आंत नवरा-बायकोचें जुळलें तर दोन वेळां उच्चारलेला घटस्फोट रद्द होऊं शकतो. घटस्फोट पूर्ण झाला आणि त्या वेळीं ती स्त्री गर्भवती असेल तर ती प्रसूत होईपर्यंत तिला घराबाहेर न काढतां नवऱ्यानें तिचा संभाळ करावयाचा असतो. घटस्फोट झाल्यानंतर त्या स्त्रीला

अपत्य होईल तर तिला त्या अपत्याचें संगोपन करण्याकरितां नवऱ्यास सर्व खर्च द्यावा लागतो.

ज्याप्रमाणें नवऱ्याला घटस्फोटाचा अधिकार आहे त्याप्रमाणें बायकोलाहि घटस्फोटाचा अधिकार हजरत पैगंबरांनीं दिला आहे. नवरा वाटेल तेवढा दुर्वर्तनी असला, बदमाष असला, तरी जन्मभर त्याच्याशीं आयुष्य कंठलेंच पाहिजे असा इतर धर्मांत असलेला निर्दय कायदा आपल्या धर्मांतून काढून हजरत पैगंबरांनीं स्त्रियांची कायमच्या निर्घृण दास्यांतून मुक्तता केली आहे. ज्या नवऱ्याशीं आपलें पटत नाहीं त्याच्याशीं जन्मभर आयुष्य कंठणें हा अधर्म आहे. बायको आवडत नाहीं या सबबीवर पुरुषांनीं त्या बायकोशीं काडीमोड करावी आणि नवरा आवडत नसला तरी बायकोला त्याच्यापासून अलग होतां येऊं नये हा निव्वळ अन्याय आहे. हा अन्याय दूर करण्याकरतां हजरत पैगंबरांनीं स्त्रियांस घटस्फोटाचा अधिकार दिला आहे.* नालायक नवऱ्याशीं जन्मभर आयुष्य कंठून आपल्या उभ्या जन्माचें मातेरें करून घेण्यापेक्षां त्या नवऱ्याशीं काडीमोड करावयाची परवानगी देऊन हजरत पैगंबरांनीं जगामध्यें एक अत्युच्च सुधारणा घडवून आणिली आहे. त्या काळीं सर्व जगांत परवशतेचें लंगर स्त्रियांच्या भोंवतीं आवळलें जात असतां लोकमताची पर्वा न करतां हजरत महंमद पैगंबरांनीं तें लंगर तोडून टाकून अखिल स्त्री-जातीस ऋणी करून ठेविलें आहे.

हजरत महंमद पैगंबरांची सर्वांत श्रेष्ठ सामाजिक सुधारणा म्हणजे त्यांनीं केलेला शिक्षण-प्रसार होय. त्यांनीं आपल्या अवतारकार्यांत शिक्षणास अत्यंत महत्त्वाचें स्थान दिलें आहे. जंगली व पशू बनलेल्या मनुष्यास सुसंस्कृत बनविण्याचें सामर्थ्य फक्त शिक्षणांतच असल्यामुळें हजरत पैगंबरांनीं आपल्या अनुयायांच्या अंतःकरणांवर शिक्षणाचें महत्त्व बिंबविलें. मानवांच्या प्रगतीस खीळ घालणाऱ्या मूर्खपणाच्या समजुती, असंतोषाचा वणवा पेटविणारी

* या घटस्फोटास "खुला" अशी संज्ञा आहे.

अन्यायी वृत्ती यांना सप्तपाताळांत दडपून टाकून समाधानाचें साम्राज्य प्रस्थापित करण्याचें महत्कार्य शिक्षण घेतलेल्या सुसंस्कृत माणसांकडूनच होतें. फक्त पुरुषांनींच शिक्षण न घेतां तें स्त्रियांनींहि अवश्य घेतलें पाहिजे असा हजरत पैगंबरांनीं उपदेश केला आहे. शिक्षण घेणें हें स्त्रीपुरुषांचें आद्य कर्तव्यकर्म आहे अशी त्यांनीं शिकवण दिली आहे. स्त्रिया या उद्याच्या जगाच्या माता आहेत; उद्याच्या पिढीचें भवितव्य त्यांचा हातीं आहे; त्यांनीं दाखवून दिलेल्या दिशेकडे जग मार्ग आक्रमण करणार आहे. एवढ्याकरितां स्त्रियांना सुविद्य राहण्याविषयीं हजरत महंमद पैगंबरांनीं इषारा दिला आहे. हजरत महंमद पैगंबरांनंतर मुसलमान लोकांनीं साऱ्या जगभर शिक्षणाचा जो झपाट्यानें प्रसार केला त्याचें सर्व श्रेय हजरत पैगंबरांसच दिलें पाहिजे. ज्या वेळीं युरोप अज्ञानांधःकारांत धडपडत होता त्या वेळीं मुसलमानांनींच युरोपांत ज्ञानदीप प्रज्वलित केला. जगांतील पहिलें विश्वविद्यालय प्रस्थापित करण्याचा मान मुसलमानांनींच मिळविला आहे. जगांतील उत्कृष्ट वाङ्मयाची निपज मुसलमान बादशहांच्या कृपाछत्राखालीं झाली आहे. ज्ञानाचा उत्कर्ष ज्या ज्या मार्गांनीं होईल ते ते सर्व मार्ग हजरत पैगंबरांच्या उपदेशानुसार मुसलमानांनीं चोखाळले आहेत. आपल्या अनुयायांना शिक्षणप्रवृत्त करण्याकरितां हजरत महंमद पैगंबरांनीं कशी शिकवण दिली याचा आपणांस थोडक्यांत विचार करावयाचा आहे. हजरत पैगंबर म्हणतात,

> **" प्रत्येक व्यक्तीनें जन्मापासून मरेपर्यंत विद्यार्जन केलें पाहिजे. "**

आपण आपल्या आयुष्याच्या ठराविक कालापर्यंत ज्ञान संपादन केलें किंवा पदवी मिळेपर्यंत विद्याभ्यास केला कीं आपला कार्यभाग संपला असें कोणींहि समजूं नये. प्रत्येक मनुष्य आजन्म विद्यार्थी असतो. त्यानें आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत ज्ञान मिळवीत राहिलें पाहिजे. पुढें हजरत पैगंबर म्हणतात,

> **" ज्ञान संपादन करण्याकरितां चीन देशास जा. "**

आपल्या शहरांत किंवा देशांत पुरेसें ज्ञान मिळत नाहीं म्हणून आपण स्वस्थ बसतां कामा नये. वेळ पडल्यास सातासमुद्रांपलीकडे जाऊन आपण शिक्षण घेतलें पाहिजे. हजरत पैगंबरांनीं 'चीन देश' हा जो शब्द वापरला आहे तो वरील अर्थानेंच होय. त्या वेळीं चीन देशास जाणें म्हणजे अत्यंत दुर्घट व मुष्किलीचें कार्य होतें. हल्लींप्रमाणें त्या काळीं वाहतुकीचीं कोठल्याहि प्रकारचीं साधनें नव्हतीं. चीन देशास जावयास निघणें म्हणजे जवळजवळ आपल्या देशास परत यावयाची आशा सोडण्यासारखें होतें. अशी परिस्थिती असतां देखील हजरत पैगंबर 'चीन देशास जा' असा आपल्या अनुयायांना उपदेश करीत आहेत. स्वतःच्या जीवितापेक्षां हजरत पैगंबरांना शिक्षणाची किती मातब्बरी वाटत होती हें वरील वाक्यावरून सिद्ध होण्यासारखें आहे.

आपण शिक्षण घेऊन ज्ञानसंपन्न झाल्यावर त्या ज्ञानाचा उपयोग इतर लोकांस करून दिला पाहिजे. आपण स्वतः ज्ञानी होऊन बसलों तर त्या ज्ञानाचा सदुपयोग झाला असें आपणांस कधींहि म्हणतां येणार नाहीं. दुसऱ्यांना शिक्षण देऊन त्यांना सुसंस्कृत करण्याचें ध्येय आपल्यासमोर ठेविलें पाहिजे. दुसऱ्यांना ज्ञान देणें म्हणजे परमेश्वराची भक्ति करण्यासारखेंच आहे. हजरत पैगंबर म्हणतात,

> **"रात्रभर प्रार्थना करीत बसण्यापेक्षां रात्रीचा एक तास दुसऱ्यांना शिकविण्यांत किंवा ज्ञानदान करण्यांत खर्च केला तर तो अधिक चांगला."**

हजरत महंमद पैगंबरांच्या दृष्टीनें शिक्षणाकरितां आपलें आयुष्य वाहणाऱ्या ज्ञानी माणसाची योग्यता अत्यंत श्रेष्ठ आहे. कोठल्याहि व्यक्तीला मान दिला नाहीं इतका मान हजरत पैगंबरांनीं ज्ञानी माणसास दिला आहे. विद्वान् मनुष्य म्हणजे अमरकोटींतला असतो असें ते समजतात. हजरत पैगंबर म्हणतात,

> **"शिक्षणास आयुष्य वाहणारा अमर असतो."**

जगांतील महान् व्यक्ति, मोठे लोक, राजेमहाराजे काळाच्या उदरांत गडप होतात. त्यांच्या आयुष्यांबरोबरच त्यांच्या मोठेपणाचा शेवट होत असतो. पण विद्वान् माणसाचा मोठेपणा त्याच्या मागें चिरंजीव राहतो. विद्वान् माणसाची योग्यता अत्यंत थोर असते. त्याच्याइतका मान-सन्मान जगांतील कोणत्याही व्यक्तीला मिळणें शक्य नाहीं. हुतात्म्याची योग्यता अत्यंत श्रेष्ठ मानली जाते; पण हजरत महंमद पैगंबर हुतात्म्यापेक्षां विद्वान् माणसाची योग्यता अधिक मानतात. ते म्हणतात,

> " हुतात्म्याच्या रक्तापेक्षां विद्वान् माणसाच्या लेखणींतला शाईचा एक थेंब अधिक पवित्र होय. "

हजरत पैगंबरांनीं विद्वत्तेचा गौरव किती सुंदर शब्दांत केला आहे तो पाहा. त्यांना शिक्षणाबद्दल किती आस्था वाटत होती व विद्वान् माणसाबद्दल त्यांच्या अंतःकरणांत केवढा आदर वास करीत होता हें वरील अविनाशी व नितांत-सुंदर वाक्यावरून सहज सिद्ध होणार आहे. त्यांच्या उदात्त शिकवणी-मुळेंच जंगली अरबस्तान देशानें युरोपचा गुरु होण्याचा बहुमान मिळविला.

## राजकारण–धुरंधर

हजरत महंमद पैगंबरांखेरीज आपल्या आयुष्यांत धार्मिक, सामाजिक व राजकीय सुधारणा करणारी व्यक्ति, जगाच्या इतिहासांत सांपडेल कीं नाहीं याची वानवाच आहे. धर्मप्रवर्तक म्हटला कीं तो सामाजिक सुधारणांविषयीं उदासीन असावयाचा, समाज-सुधारक म्हटला कीं त्याला राजकारणाचें वावडें असावयाचें, राजकारणी म्हटला कीं तो धार्मिक मतांकडे तुच्छतेनें पाहणारा निघावयाचा अशीं दृश्यें आपण आजवर पाहत आलों आहोंत. पण हजरत महंमद पैगंबरांच्या आयुष्याकडे अगदीं बारकाईनें नजर टाकली कीं, वरील परस्परविरोधी दृश्यांचा मागमूस आपणांस कोठेंच दृष्टीस पडणार नाहीं. उलट धर्मप्रवर्तक, समाजसुधारक आणि राजकारणी या त्रिविध भूमिकेचें सुंदर दृश्य हजरत महंमद पैगंबरांच्या ठिकाणीं दिसून येईल.

धार्मिक व सामाजिक सुधारणांप्रमाणेंच राजकीय सुधारणा करण्यांत हजरत पैगंबरांच्या शिरावर यशोदेवतेचा वरदहस्त कायम होता. त्यांनीं केलेली एकहि सुधारणा वायफळ गेली नाहीं किंवा अल्पायुषी ठरली नाहीं. सध्याच्या सुधारलेल्या व प्रगतीच्या काळांत देखील त्यांच्या राजकीय सुधारणांचें तेज तिळमात्र कमी झालें नाहीं. त्यांनीं केलेल्या राजकीय सुधारणांची उभारणी इतक्या भक्कम व अविनाशी पायावर केली आहे कीं, झंझावातासारखे कालाचे अनेक झोत त्यावरून गेले तरी त्या राजकारणास काडीमात्र धक्का पोहोंचला नाहीं. त्यांच्या या राजकारणाचा पाया म्हणजे मानवता (humanity) होय. त्यांचें राजकारण आपआपसांत लाथाळी करावयास प्रवृत्त करीत नाहीं, त्यांचें राजकारण दडपशाही करावयास शिकवीत नाहीं, त्यांचें राजकारण गोरगरिबांना भरडून काढण्याची प्रथा पाडीत नाहीं, त्यांचें राजकारण दुसऱ्या राष्ट्रावर धांवून जाण्यास उत्तेजन देत नाहीं, त्यांचें राजकारण अत्याचारी व्हा अशी जाहीर घोषणा करीत नाहीं. त्यांचें राजकारण म्हणजे सहकार्याची, स्वातंत्र्याची, समतेची, आंतरराष्ट्रीय प्रेमाची आणि अनत्याचाराची शिकवण होय. त्यांनीं प्रस्थापित केलेल्या लोकशाहींत त्यांच्या राजकारणाचें स्वच्छ प्रतिबिंब आपणांस पाहावयास सांपडेल.

आजचीं पाश्चात्य राष्ट्रें ज्या लोकशाहीचा मोठा अभिमान बाळगीत आहेत, ती लोकशाही प्रस्थापित करण्याचा पहिला मान हजरत महंमद पैगंबरांनीं मिळविला आहे असें प्रत्येक इतिहासज्ञ मोठ्या अभिमानानें म्हणेल! ज्या काळांत अरबस्तानामध्यें लोकशाहीची मुहूर्तमेढ रोंविली त्या काळांत पाश्चात्य राष्ट्रांमध्यें बेबंदशाही बोकाळली होती, अनाचाराचें साम्राज्य माजून राहिलें होतें; किंबहुना आपणांस असें म्हणतां येईल कीं, पाश्चात्य राष्ट्रांचें जंगली युग अजून संपलें नव्हतें. हजरत पैगंबरांच्या लोकशाहीनंतर कितीतरी वर्षांनीं पाश्चात्य राष्ट्रांत लोकशाहीच्या कल्पना लोकांच्या अंतःकरणांत मूळ धरूं लागल्या. इसवी सन १६४१ सालीं राजा व प्रजा यांमधील यादवीस तोंड लागून त्याचें पर्यवसान

१६८८ सालच्या फ्रेंच क्रांतीमध्यें झालें. तेथूनच प्राश्चात्य राष्टांतील लोकशाहीस सुरुवात झाली असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. या लोकशाहीच्य-जवळजवळ हजार वर्षे अगोदर हजरत महंमद पैगंबरांनीं आपल्या राष्ट्रांत लोकशाही प्रस्थापित करून लोकांनीं निवडून दिलेला सर्वाधिकारी होण्याचा जगांतील पहिला मान त्यांनीं मिळविला होता. हजरत महंमद पैगंबरांनीं आपली लोकशाही सर्व बाजूंनीं निष्कलंक राहील अशी विलक्षण खबरदारी घेतली आहे. लोकशाहीच्या गोंडस नांवाखालीं वाटेल त्याला धिंगाणा घालण्याची त्यांनीं एकही सोय करून ठेविली नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. जनतेस लोकशाही म्हणजे 'उचल्यांचा बाजार' न वाटतां सुखाचें साम्राज्य वाटावें अशीच त्यांच्या लोकशाहीची घटना आहे.

हजरत पैगंबरांची लोकशाही स्वार्थमूलक पक्षपद्धती ( Party system ) पासून अगदीं अलिप्त होती. सध्यां पाश्चात्य राष्ट्रांत चालू असलेल्या पक्ष पद्धतीचे निघत असलेले धिंडवडे आपण प्रत्यहीं पाहत आहोंत. राजकारणांत हुजूरपक्ष, मजूरपक्ष, जहालपक्ष वगैरे पक्षोपपक्ष राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अत्यंत घातुक ठरतात. एखादा पक्ष अधिकारारूढ झाला म्हणजे फक्त आपल्या पक्षाचें कल्याण एवढेंच ध्येय तो आपल्यासमोर ठेवून वागतो. आपल्या पक्षाखेरीज इतर पक्ष अस्तित्वांत आहेत, त्यांच्या कल्याणाची जबाबदारी आपल्या वर आहे वगैरे गोष्टींचें त्याला भान राहत नाहीं. अधिकाराच्या जोरावर इतरांचे हक्क पायदळीं तुडवून आपला स्वार्थ कसा साधेल या विवंचनेंत तो नेहमीं मग्न असतो. जो पैसा आपण आपल्या पक्षाच्या कल्याणाकरितां खर्च करीत आहोंत तो पैसा आपल्या पक्षाचा नसून साऱ्या राष्ट्राच्या मालकीचा आहे. अर्थात् तो पैसा सर्व राष्ट्राच्या कल्याणाकरितां खर्च केला पाहिजे या गोष्टीची आठवण त्यास राहत नाहीं. अशा प्रवृत्तीचें पर्यवसान राष्ट्रामध्यें असंतोषाचा डोंब उसळण्यांत होतें. अशा पक्षपद्धतीस हजरत पैगंबरांनीं अजिबात फांट दिला होता. आपलें राष्ट्र कोणत्याहि एका पक्षाच्या मालकीचें

नसून तें सर्वांच्या सारख्या मालकीचें आहे असा त्यांनीं पुकारा केला. त्यांनीं आपल्या लोकशाहींत पक्षपद्धतीला स्थान न दिल्यामुळें त्यांची अधिकारी मंडळी फक्त स्वजातीयांच्या किंवा आप्तेष्टांच्या कल्याणाकरितां न झटतां साऱ्या राष्ट्राच्या कल्याणाकरितां झटत असे. राष्ट्राचा पैसा एका विवक्षित जातीकरितां किंवा पक्षाकरितां खर्चला न जातां तो सर्वांकरितां सारखा खर्चिला जात असे. उदाहरणादाखल म्हणून 'जकात' नांवाच्या फंडाकडे आपणांस अंगुलि-निर्देश करतां येईल. ठराविक उत्पन्नावर प्रत्येक व्यक्तीला जो पैसा द्यावा लागे त्याला 'जकात' अशी संज्ञा होती. हा पैसा सरकारी खजिन्यांत जमा होई. आणि तो राष्ट्राच्या मालकीचा समजून राष्ट्रांतील गोरगरीब गरजू लोकांकरितां सारख्या प्रमाणांत खर्च होत असे. हाच पैसा गुलामांना मुक्त करण्याकरितां गुलामांच्या मालकांना देण्यांत येत असे. वरील उदाहरणावरून राष्ट्राचा पैसा सर्वांच्या कल्याणाकरितां कसा खर्च होई याची कल्पना येईल.

लोकशाहीची सुस्थिती राष्ट्राच्या आर्थिक स्थिरतेवर अवलंबून असते. राष्ट्राची आर्थिक स्थिती बिघडली कीं लोकशाहीला ग्रहण लागतें. राष्ट्रामध्यें संपत्तीची विषम विभागणी झाली, ठराविक लोकांजवळ कल्पनातीत पैसा जमला व बाकीचे लोक एक पैशाला देखील महाग झाले कीं राष्ट्रामध्यें असंतोष फैलावूं लागतो. हा असंतोष फैलावणें हें लोकशाहीस अत्यंत विघातक ठरतें. हजरत पैगंबरांच्या लोकशाहींत आर्थिक विषमतेचा पूर्ण अभाव होता. धनाढ्य माणसाजवळ कोट्यवधि रुपयांचा ढीग पडून राहावयाचा आणि गरीब माणसाजवळ एका वेळेच्या जेवणापुरते पैसे देखील असावयाचे नाहींत असे देखावे दृष्टीस पडत नसत. श्रीमान् व्यक्तींनीं चैनीकरितां पाण्यासारखा पैसा खर्चावा आणि ज्यांच्या जिवावर या व्यक्ति श्रीमान् झाल्या त्यांनीं आणि त्यांच्या कच्च्याबच्च्यांनीं उपाशींतापाशीं तडफडत राहावें हा अक्षम्य अन्याय हजरत पैगंबरांस कधींहि पाहवला नाहीं. संपत्तीची विषम वांटणी म्हणजे राष्ट्राचा असंतोष ही खूणगांठ त्यांनीं मनाशीं बांधून ठेविली होती. संपत्तीच्या

मदानें धुंद होऊन श्रीमान मनुष्य गोरगरिबांची गळचेपी करूं लागतो. या श्रीमान मनुष्यास उन्मत्त बनविणारी पैशाची निशा त्याच्यावर चढणार नाहीं अशी हजरत पैगंबरांनीं पूर्ण व्यवस्था करून ठेविली आहे.

संपत्तीची भूमितिश्रेढीनें वाढ करणारा व्याजबट्ट्याचा व्यवहार त्यांनीं निषिद्ध ठरविला. पैशांवर व्याज घेणें म्हणजे धर्मबाह्य वर्तन करणें होय, अशी त्यांनीं शिकवण दिली. व्याज घेणारा माणूस इस्लाम धर्मांत अत्यंत हीन दर्जाचा समजला जातो. व्याज निषिद्ध ठरविल्यामुळें संपत्तीची होणारी अकारण वाढ खुंटली गेली. व्याज न घेतां एकाद्याजवळ अफाट संपत्ती जमली तर त्यांनीं तीवर नियंत्रण घातलें आहे. त्या संपत्तीचा वारस फक्त वडील मुलगा होऊं शकत नाहीं. इस्लाम धर्माच्या कायद्याप्रमाणें ती इस्टेट सर्व मुलांमध्यें वांटली जाते; इतकेंच नव्हे तर मुलींना देखील त्या इस्टेटीचा वांटा मिळतो. अशा रीतीनें ही प्रचंड इस्टेट विभागली जाते. पण अशी इस्टेट विभागूनहि प्रत्येकाच्या वांट्यास पुष्कळ संपत्ती येऊन तो छोटासा भांडवलवाला व्हावयाचा संभव असतो. यावरहि त्यांनीं उपाय शोधून काढला आहे. ज्यांच्याजवळ संपत्ती आहे अशा लोकांनीं दरवर्षीं शंभर रुपयांस अडीच रुपये ‘ जकात ’ दिलीच पाहिजे असें त्यांनीं धार्मिक बंधन घालून दिलें. उदाहरणार्थ, दोनच भाऊ असून प्रत्येकाच्या वांटणीस पांच पांच लाख रुपये आले आहेत. वरील धार्मिक बंधनाप्रमाणें दर शंभर रुपयांस अडीच रुपयांप्रमाणें प्रत्येकानें आपल्या ५ लाख रुपयांच्या इस्टेटीबद्दल साडेबारा हजार रुपये याप्रमाणें दोघा भावांनीं पंचवीस हजार रुपये जकात दरवर्षीं दिलीच पाहिजे. ज्याच्याजवळ संपत्ती आहे, मग ती कितीहि असो, अशा प्रत्येक व्यक्तीनें दर शंभर रुपयांस अडीच रुपयांप्रमाणें जकात द्यावीच लागते. हा जकातीचा सर्व पैसा गोर-गरीब, अनाथ, पंगू या लोकांकरितां खर्च करावयाचा असतो. या ‘जकाती’च्या पद्धतीमुळें गरजू लोकांची पैशाच्या अभावीं नाहक होणारी कुचंबणा टळून त्यांना आपली जीवितयात्रा सुखकर करण्यास सुलभ जातें. श्रीमंतांचा पैसा

गोरगरिबांस मारक न होतां तो तारक कसा होऊं शकतो हें हजरत पैगंबरांनीं जगाला उत्कृष्टपणें दाखवून दिलें आहे. वरील विवेचनावरून त्यांनीं आपल्या लोकशाहींत भांडवलशाहीचा बींमोड करण्याचा कसा पद्धतशीर उपक्रम केला हें स्पष्टपणें सिद्ध होईल.

हजरत पैगंबरांच्या लोकशाहींत प्रत्येक नागरिकास पूर्ण स्वातंत्र्य होतें. त्यांनीं काढलेलीं राजकीय फर्मानें पाहिलीं म्हणजे परधर्मीयांच्या आचार व विचारस्वातंत्र्याबद्दल ते किती दक्ष होते हें सहज दिसून येणार आहे. आपलें मुसलमानी राष्ट्र आहे, या राष्ट्रांत परधर्मीयांना कोठल्याही प्रकारचा वाव देऊं नये अशी कल्पना त्यांच्या मनास कधींच शिवली नाहीं. त्यांच्या राज्यांत ज्यू लोकांचें फार मोठें प्रस्थ होतें. त्यांच्या हातांत लक्ष्मी खेळत होती. आपला धर्मप्रसार त्यांनीं नेटानें चालू ठेवला होता. मुसलमानांचा ते उघड हेवादावा करीत. पण हजरत पैगंबरांनीं अधिकाराच्या जोरावर त्या लोकांची मुस्कटदाबी करण्याचा कधीं प्रयत्न केला नाहीं किंवा त्यांची संपत्ती जप्त करून टाकली नाहीं. आपल्या धर्माविरुद्ध वाटेल त्या खोट्यानाट्या कंड्या पिकवितात म्हणून त्यांनीं ज्यू लोकांस जरब दाखविली नाहीं किंवा मुसलमानांचा उघडउघड द्वेष करतात म्हणून त्यांचे खून पाडले नाहींत. आपल्या राज्यांत प्रत्येक व्यक्तीला किंवा ज्ञातीला इतकें स्वातंत्र्य दिल्याचीं उदाहरणें आपणांस फारच थोडीं सांपडतील.

हजरत पैगंबरांच्या लोकशाहीचें वैशिष्ट्य म्हणजे समता. समता ही खऱ्या लोकशाहीची प्रतीक असते. ज्या राष्ट्रांत काळागोरा हा भेदभाव केला जातो, वर्णावर योग्यता ठरविली जाते, उच्चनीचपणा दाखविला जातो, धनिक आणि गरीब असे कप्पे पाडले जातात त्या राष्ट्रांनीं आपल्या लोकशाहीचा कितीही डांगोरा पिटला तरी ती लोकशाही आदर्शभूत अशी कधींच होणार नाहीं. इतकेंच नव्हे तर ती लोकशाही नसून लोकशाहीचें विडंबन आहे असेंच सुज्ञ जग म्हणत राहणार. लोकशाही म्हटली कीं, त्या ठिकाणीं स्पृश्यास्पृश्यता,

भेदाभेद, उच्चनीचपणा, किंवा जादा मेहेरबानगी काडीमात्र दिसतां कामा नये. सगळ्यांना सारखें स्वातंत्र्य, सारखा न्याय, सारख्या सवलती म्हणजेच खरी लोकशाही होय. अशा प्रकारची लोकशाही प्रस्थापित करण्याचा अपूर्व मान हजरत महंमद पैगंबरांनींच मिळविला आहे.

त्यांच्या राज्यांत सर्वाधिकाऱ्यापासून तों तहत गरिबापर्यंत सर्व नागरिक समतेनें राहत होते. त्यांच्यामध्यें सर्वाधिकारी म्हणून त्याला अधिक सवलती, श्रीमंत म्हणून त्यांची अगोदर वर्णी, उच्च जातीचे म्हणून त्यांना अधिक मान, अल्पसंख्याक म्हणून त्यांस अधिक सवलती, असे असमतेचे व मेहेरबानगीचे प्रकार हजरत पैगंबरांच्या लोकशाहींत दृष्टीस पडत नसत. त्या ठिकाणीं अरब-नीग्रो असा भेदाभेद नव्हता. मुसलमानांना एक कायदा आणि ज्यू लोकांना एक कायदा असा पंक्तिप्रपंच दृष्टीस पडत नव्हता. हजरत पैगंबर राष्ट्राचे सर्वाधिकारी होते म्हणून त्यांनीं आपल्या आप्तेष्टांवर अगर अनुयायांवर खास मेहेरबानगी कधींहि दाखविली नाहीं किंवा आपल्या जातभाईचें तट्टू राजकारणांत ढकललें नाहीं. तसेंच त्यांचें लक्ष जातीवर किंवा वशिल्यावर नसून व्यक्तीच्या कर्तब-गारीवर व योग्यतेवर होतें. त्यांच्या लोकशाहीमध्यें सैन्याचा सर्वाधिकारी झैद नांवाचा गुलाम होता; त्याचप्रमाणें मुख्य मशिदींत आजान देण्याचा बहुमान बिलाल नांवाच्या नीग्रोस देण्यांत आला होता.

हजरत पैगंबरांच्या राज्यांत मालक व नोकर यांमध्यें देखील आदर्शभूत अशा प्रकारची समता होती. नोकरापेक्षां आपण श्रेष्ठ आहोंत असें माल-काला कधींच वाटत नसे. स्वतःला पंचपक्वान्नें आणि नोकरास कोंडाभाकर असा प्रकार तेथें कधींच दृष्टीस पडत नसे. आपण खातों तेंच अन्न आपल्या नोकरांस द्या अशी हजरत पैगंबरांची आज्ञा असल्यामुळें मालक जें अन्न खाई तेंच अन्न नोकरांस मिळत असे. त्याप्रमाणेंच नोकरास वाजवीपेक्षां जास्त काम कधींच देण्यांत येत नसे. एकाद्या वेळीं नोकरास कामाचा जास्त ताण पडला तर खुद्द मालक त्याच्या मदतीस जात असे. मालकानें घोड्यावर

बसून जावयाचें आणि नोकरानें त्याच्याबरोबर पळत सुटावयाचें असे अमानुषतेचे प्रकार त्या वेळीं क्वचितच दृष्टीस पडत. एक दिवस एक गृहस्थ उंटावर बसून चालला होता आणि त्याचा नोकर त्या उंटामागून धांवत होता. हजरत पैगंबरांचे स्नेही अबू हुरेरा यांनीं हा प्रकार पाहिला व ते त्या उंटावर बसलेल्या गृहस्थास म्हणाले, " भल्या गृहस्था, तुझ्या नोकरास उंटावर तुझ्यामागें बसवून घे. तो तुझा नोकर नसून बंधु आहे असें समज. तुझ्यासारखा त्यालाहि पण आत्मा आहे ही गोष्ट विसरूं नकोस. " उंटावर बसलेला गृहस्थ शरमिंदा झाला व त्यानें आपल्या नोकरास आपल्यामागें उंटावर बसवून घेतलें.

मालक व नोकर यांमध्यें हजरत पैगंबरांनीं घालून दिलेला समतेचा उपक्रम त्यांच्या अनुयायांनीं किती इमानें इतबारें चालू ठेविला हें पुढील उदाहरणावरून सिद्ध होण्यासारखें आहे. मदिनेचे सर्वाधिकारी हजरत उमर तहाच्या बाटाघाटीसाठीं जेरुसलेमकडे जावयास निघाले. निघतांना त्यांनीं फक्त एक नोकर बरोबर घेतला होता. बसावयास एकच उंट असल्यामुळें हजरत उमर व त्यांचा नोकर आळीपाळीनें उंटावर बसून जेरुसलेमचा रस्ता आक्रमूं लागले. हजरत उमर उंटावर बसले कीं त्यांचा नोकर पायीं चालत असे; कांहीं अंतर गेल्यावर हजरत उमर नोकरास उंटावर बसवीत व आपण पायीं चालत. ज्या वेळीं जेरुसलेमजवळ हजरत उमर आले त्या वेळीं त्या नोकराची उंटावर बसण्याची पाळी आली होती. शहर जवळ आलें म्हणून तो नोकर उंटावर बसावयास कांकूं करूं लागला. पण हजरत उमर यांच्या आग्रहामुळें त्याला उंटावर बसावें लागलें. नोकर उंटावर व हजरत उमर पायीं चालत असतां ते दोघे जेरुसलेमच्या वेशीजवळ आले. हजरत उमर यांचा सर-सेनापति अबू उबेद हा त्या वेशीजवळ तळ देऊन बसला होता. नोकर उंटावर व राजा पायीं चालत असलेला पाहून जेरुसलेमचे लोक तुच्छतेनें हंसतील म्हणून त्यांच्या सेनापतीनें हजरत उमर यांस सूचना दिली

व त्यांना उंटावर बसण्याचा आग्रह केला. त्यावर हजरत उमर म्हणाले, "तुमच्यासारखा उपदेश मला आतांपर्यंत कोणीं केला नाहीं. आपला हा उपदेश मुसलमानांची नाचक्की करील. आतांपर्यंत आपली अधोगती झाली होती व आपला सगळीकडे धिक्कार होत होता. परंतु आपल्या इस्लाम धर्मा-मुळें आम्हां सर्वांस मान व मोठेपणा मिळाला आहे. आपण सांगतां त्या-प्रमाणें मी वागेन तर पुन्हां आपली पूर्वीप्रमाणें अधोगती झाली आहे हें सिद्ध होईल." वरील उद्गारांवरून इस्लामच्या लोकशाहींत मालक व नोकर यांमध्यें किती समता होती हें स्पष्टपणें कळून येईल.

हजरत पैगंबरांच्या लोकशाहींत समतेप्रमाणें न्यायाची अत्यंत कदर होती. न्याय जातीकडे पाहून दिला जात नव्हता किंवा पैशाच्या भावानें विकला जात नव्हता. गरीब असो, श्रीमंत असो, अमीरउमराव असो किंवा नोकरचाकर असो, मुसलमान असो किंवा परधर्मी असो, सर्वांना हजरत पैगंबरांच्या राज्यांत सारखा न्याय मिळत असे. त्यांच्यासमोर मुसलमान व ज्यू यांचा एक खटला आला असतां हजरत पैगंबरांनीं न्यायाप्रमाणें मुसलमानाला दोषी ठरविलें हें आपण मागें पाहिलेंच आहे. याच न्यायी वृत्तीमुळें हजरत पैगंबरांच्या लोकशाहीची सारखी भरभराट होत गेली. ज्या ठिकाणीं न्यायदेवतेची कदर होते त्या ठिकाणींच उत्कर्ष मूळ धरून राहतो. न्यायदेवतेची विटंबना सुरू झाली कीं तिचा शाप राष्ट्राला भोवल्याखेरीज राहत नाहीं. जेथें जेथें न्यायाची पायमल्ली झाली तेथें तेथें अधोगतीला सुरुवात झाली असें आपणांस दिसून येईल. जगांतील मोठमोठ्या राष्ट्रांच्या उत्कर्षाला जें खग्रास ग्रहण लागलें, त्याचें कारण न्यायाची विटंबना होय. पवित्र कुराणाच्या आज्ञेप्रमाणें हजरत पैगंबरांनीं न्यायास अत्यंत श्रेष्ठ स्थान दिलें आहे.

**"तुमच्या, तुमच्या आईबापांच्या, नातेवाइकांच्या किंवा गरीब श्रीमंत माणसांच्याविरुद्ध न्याय द्यावा लागला**

तरी त्याची पर्वा न करतां परमेश्वरास साक्ष ठेवून न्यायाचें परिपालन करा. ”

—पवित्र कुराण, ४:१३५

अमुक आपले आईबाप आहेत किंवा नातेवाईक आहेत म्हणून त्यांना अन्यायी कसें ठरवावें याचा काडीमात्र विचार न करतां आपण न्याय द्यावयास तयार झालें पाहिजे. त्याचप्रमाणें अमुक एक श्रीमंत गृहस्थ आहे, त्याच्या अन्यायी वृत्तीचा परिस्फोट केल्यास आपणांस त्रास सहन करावा लागेल ही भीति मनांत न बाळगतां त्याची अन्यायी वृत्ति चव्हाट्यावर मांडली पाहिजे. त्याचबरोबर एखाद्या गरीब माणसानें अन्याय केला तर दयामाया न करतां त्याला दोषी ठरविलें पाहिजे.

लांचलुचपतीमुळें न्यायी वृत्तीचा भंग होण्याचा संभव असतो; म्हणून कुराणाच्या दुसऱ्या अध्यायांत लांचलुचपत निषिद्ध मानली गेली आहे. लांचलुचपतीप्रमाणें मानमरातबापुढें न्यायी वृत्ती निष्प्रभ होतां कामा नये. राजाचा मानमरातब अत्यंत मोठा असतो, त्याचा दर्जा अत्यंत श्रेष्ठ समजला जातो म्हणून त्याला न्यायाच्या कक्षेबाहेर ठेवण्याची हजरत पैगंबरांनीं सक्त मनाई केली आहे. राजा, महाराजा किंवा साम्राज्याधिपति असला तरी त्यानें वेळ पडल्यास न्यायासनासमोर उभें राहिलें पाहिजे, असा हजरत पैगंबरांनीं दंडक घालून दिला आहे. राजा गुन्हा करूं शकतो व त्याला शिक्षा होऊं शकते; राजा व प्रजा यांच्यामध्यें भेदाभेद नाहीं; एखाद्या गुन्ह्याकरितां प्रजाजनाला जी शिक्षा होते, त्याच शिक्षेस राजा पात्र होतो, हें हजरत पैगंबरांच्या राजकारणानें सिद्ध केलें आहे. न्यायासनासमोर गुन्हेगार म्हणून आलेल्या कैदी राजांचीं नांवें आपणांस इस्लामच्या इतिहासांत सांपडतील. या न्यायी वृत्तीस हजरत पैगंबरांच्या राजकारणांत प्राधान्य असल्यामुळें त्यांच्या राजकारणाचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत गेला.

हजरत पैगंबरांच्या राजकारणांत अन्यायाप्रमाणें स्वार्थाला वाव नव्हता. आपला स्वार्थ साधण्याकरितां आपण केलेले करारमदार किंवा तह मोडून टाकण्याचें पातक हजरत पैगंबरांच्या राजकारणानें कधींहि केलें नाहीं. तह म्हणजे कागदाचा चिटोरा नसून तो पवित्र दस्तऐवज समजून त्यांतील अटी पाळणें आपलें पवित्र कर्तव्यकर्म आहे, या महत्त्वाच्या गोष्टीची प्रचीति त्यांच्या राजकारणानें आणून दिली आहे. हुदिबियाच्या लढाईनंतर मक्केच्या कुरेशां-मध्यें व हजरत पैगंबरांमध्यें तह झाला. या तहान्वयें मक्केहून कोणी कुरेश आला तर त्याला थारा देतां कामा नये असें ठरलें होतें. पुढें मक्केहून दोन शूर सरदार आपण होऊन मदिनेस हजरत पैगंबरांकडे गेले व त्यांनीं हजरत पैगं-बरांस मदत करावयाची सदिच्छा प्रगट केली. त्या वेळीं बदरच्या लढाईचा काल समीप आला होता. अशा वेळीं हजरत पैगंबरांना एकेक माणसाची फार जरूर होती. मक्केहून आलेले सरदार रणधुरंधर होते. हजरत पैगंबरांना त्यांची मदत घेणें अपरिहार्य ठरलें असतें, पण त्यांनीं त्यांची विनंति साभार नाकारली. ते म्हणाले, "आपण आलांत तसे मक्केस परत जा. वाटेल तेवढी बिकट परिस्थिति आली तरी तहाच्या अटी आम्हांस मोडतां येत नाहींत. आम्हांला आमच्या शब्दांची फार किंमत आहे. आम्हांला परमेश्वराखेरीज आणखी कोणाचीहि मदत नको." स्वतःच्या फायद्याकरितां तह मोडून त्यावर सारवण घालावयाचा प्रयत्न हजरत पैगंबरांच्या राजकारणानें कधींहि केला नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शत्रूशीं व तोहि कट्टया शत्रूशीं झालेला तह पाळण्यांत हजरत पैगंबरांच्या राजकारणानें आपल्या खेळाडू वृत्तीचें ( Sportsmanship ) प्रत्यंतर सर्वांना पटवून दिलें आहे.

हजरत पैगंबरांच्या लोकशाहींत लष्करी सामर्थ्याचा निष्कारण बडेजाव नव्हता. लहानांपासून थोरांपर्यंत 'सज्ज व्हा' (To arms) असा महामंत्र अहोरात्र दिला जात नव्हता. लष्करी सामर्थ्य हेंच खऱ्या लोकशाहीचें सामर्थ्य अशी वेडगळ कल्पना त्यांच्या अंतःकरणास कधींही शिवली नाहीं. क्षुल्लक

कारणावरून उठल्यासुटल्या दुसऱ्या देशावर धांवून जाण्याचा त्यांनीं आततायी प्रयत्न केला नाहीं किंवा दुसरा देश गिळंकृत करण्याकरितां मानापमानाचें खुसपट काढून त्या देशावर हल्ला करण्याचा उन्मत्तपणा त्यांनीं कधीं दाखविला नाहीं. हजरत पैगंबरांच्या लोकशाहींत लष्करी सामर्थ्य होतें, पण या लष्करी सामर्थ्याचा उपयोग संरक्षणाव्यतिरिक्त त्यांनीं कधींही केला नाहीं. आपल्या राष्ट्रावर दुसऱ्यांनीं हल्ला केला तर आपल्या राष्ट्राचें संरक्षण करण्याकरितांच ते या लष्करी सामर्थ्याचा उपयोग करीत असत. या लष्कराचें ध्येय हल्ला नसून संरक्षण होतें.

हजरत पैगंबरांच्या लोकशाहींत लष्करी सामर्थ्याप्रमाणें स्वदेशाभिमान उतू जात नव्हता. स्वदेशापुढें साऱ्या जगास तुच्छ मानण्याची शिकवण त्यांनीं आपल्या अनुयायांस कधींही दिली नाहीं किंवा जगांतील इतर राष्ट्रांचा द्वेष म्हणजेच स्वदेशाभिमान असा आतताईपणाचा उपदेश त्यांनीं आपल्या अनुयायांना केला नाहीं. याचा अर्थ हजरत पैगंबरांना स्वदेशाभिमान नको होता असें मात्र नव्हे.

**" स्वदेशाभिमान हा धर्माचा एक भाग आहे. "**

अशी हजरत महंमद पैगंबरांची शिकवण आहे. ज्या देशांत आपण जन्मलों त्या देशाच्या कल्याणाची काळजी वाहिल्याखेरीज किंवा त्या देशाची सेवा केल्याखेरीज आपला धर्म परिपूर्ण होत नाहीं अशी हजरत पैगंबरांनीं घोषणा करून प्रत्येक 'मुसलमान' देशाभिमानी झाला पाहिजे अशी आज्ञा केली आहे. पण हजरत पैगंबरांचा स्वदेशाभिमान हा साऱ्या जगास लाथाडणारा "वेडा स्वदेशाभिमान" नाहीं. त्यांच्या स्वदेशाभिमानाच्या पोटीं इतर राष्ट्रांविषयीं बेपर्वाई नसून आपुलकी आहे. माझ्या राष्ट्राप्रमाणेंच जगांतील सर्व राष्ट्रांवर प्रेम करण्याचा आपला हक्क आहे या उदात्त विचारसरणीचा अवलंब हजरत पैगंबरांच्या स्वदेशाभिमानानें केला आहे. त्यांच्या स्वदेशाभिमानाचा अंतर्भाव विश्वबंधुत्वाच्या परिघांत होतो. आपल्या राष्ट्रावर

प्रेम करूनही इतर राष्ट्रांवर आपण प्रेम करूं शकतों हें हजरत पैगंबरांच्या स्वदेशाभिमानानें उत्कृष्ट रीतीनें सिद्ध केलें आहे. थोडक्यांत आपणांस असें म्हणतां येईल कीं आंतरराष्ट्रीय स्वदेशाभिमानाचा धडा हजरत महंमद पैगंबरांनीं आपल्या लोकशाहीस घालून दिला होता.

हजरत पैगंबरांच्या लोकशाहीचा लक्षांत ठेवण्यासारखा विशेष म्हणजे अनत्याचार होय. 'राजकारण हातीं घेतलें तर तें यशस्वी करण्याकरितां अत्याचाराचा कित्येक वेळा अवलंब करावा लागतो,' असे नामुष्कीचे उद्गार काढणाऱ्या मुत्सद्यांच्या तोंडास हजरत महंमद पैगंबरांनीं चांगलींच पानें पुसलीं आहेत. अत्याचाराचें अस्त्र हातीं न घेतां हजरत पैगंबरांनीं राजकारण यशस्वी करून दाखविलें आहे. अत्याचारी राजकारण जगाच्या इतिहासांत अत्यंत लांछनास्पद समजलें जातें. अत्याचाराचा वारंवार आश्रय घ्यावा लागणें हें कमकुवतपणाचें ढळढळीत चिन्ह आहे. जगांतील राजकीय उत्क्रांतीचा बारकाईनें विचार केल्यास, राजकारण सदैव निरोगी व जिवंत ठेवणारी संजीवनी म्हणजे अनत्याचार होय असें आपणांस शेवटीं म्हणावें लागेल. अनत्याचार ही राजकारणामधील एक प्रचंड शक्ति आहे. उत्कृष्ट राजकारणाचा दाखला म्हणून आपणांस अनत्याचाराकडे बोट दाखवितां येईल.

या अनत्याचाराचा हजरत पैगंबरांनीं अवलंब केला होता. राजकारण यशस्वी करण्याकरितां त्यांनीं अत्याचाराचा भस्मासूर कधींही निर्माण केला नाहीं. त्यांनीं लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवल्यापासून एकंदर राजकारणाचा विचार केला म्हणजे अत्याचाराचे अनेक प्रसंग त्यांनीं मोठ्या शिताफीनें टाळले हे लक्षांत यावयास फारसा वेळ लागणार नाहीं. उदाहरणादाखल म्हणून आपणांस एका प्रसंगाचा उल्लेख करतां येईल. हजरत पैगंबरांना बदनाम करण्याकरितां त्यांची लोकशाही उलथून पाडण्याचा कांहीं ज्यू लोकांनीं एक भयंकर कट केला. पण हा कट ऐन वेळीं उघडकीस आल्यामुळें ज्यू लोकांचा

बेत सपशेल फसला. न्यायासनासमोर त्यांची चौकशी होऊन त्यांना योग्य त्या शिक्षा झाल्या; पण तेवढ्यामुळें जनतेचें समाधान झालें नाहीं. ज्यांनीं हा कट करून राष्ट्रास धुळीस मिळविण्याचा प्रयत्न केला त्यांचीच काय पण 'एकजात सर्व ज्यू लोकांची कत्तल करा' अशा गर्जना शहराच्या कानाकोपऱ्यांतून ऐकूं येऊं लागल्या. तुमच्या हातून झालें नाहीं तर आम्हांस परवानगी द्या, आम्ही त्यांची कत्तल करतों, असें कांहीं लोक हजरत पैगंबरांस उघड उघड बोलूं लागले. दहा बारा ज्यू लोकांनीं चूक केली म्हणून त्याचें प्रायश्चित्त सर्व ज्यू लोकांना देणें म्हणजे धडधडीत अत्याचार होय असें हजरत पैगंबरांस वाटल्या-मुळें त्यांनीं ज्यू लोकांच्या हत्याकांडास संमति दिली नाहीं किंवा त्यांच्यावर कडक नियंत्रणें पण घातलीं नाहींत.

लढाईचा काळ म्हणजे अत्याचाराचा मोसम. अशा काळांत विचारी दृष्टी आंधळी बनते, सदसद्विवेकबुद्धी कर्तव्यमूढ होते आणि अंतःकरणाचा प्रेमळ ओलावा सुकून जातो. अत्याचारास ही परिस्थिती अनुरूप अशीच असते. अशा वेळीं रणांगण सोडून अत्याचाराचा सैतान शहरांतून धुमाकूळ घालीत असतो. अर्भकांच्या किंकाळ्या, अनाथ स्त्रियांचे आर्तस्वर आणि म्हाताऱ्या-कोताऱ्यांचे हुंदके यांनीं दशदिशा भरून जातात. सैनिकांच्या विकट हास्यांनीं या भीषण परिस्थितींत अधिकच भर पडत जाते. लढाईच्या त्वेषानें राष्ट्र-धुरीणांच्या सर्व भावना बधिर होत असल्यामुळें ते करुण स्वर, ते हृदयद्रावक देखावे, तो हलकल्लोळ यांचा काडीमात्र परिणाम त्यांच्यावर होत नाहीं. अत्या-चार हें त्यांचें एक ध्येय होऊन बसतें. राष्ट्रधुरीणांची ही अवस्था, मग त्यांचा हुकूम अधिक प्रमाणांत शिरसावंद्य मानणाऱ्या अधिकाऱ्यांची किंवा सेनानींची गोष्ट सांगावयासच नको. तेंच हजरत महंमद पैगंबरांच्या अनत्याचारी धोरणाकडे पहा. लढाईच्या वेळीं स्त्रिया, मुलें व वृद्ध नागरिक यांना काडी-मात्र दुखवूं नका किंवा त्यांचा छळ करूं नका, असें ते आपल्या सैनिकांना स्पष्ट हुकूम देत. एखाद्या सैनिकानें चुकून त्या हुकुमाचा भंग केला तर

त्यांना अत्यंत वाईट वाटत असे. ज्या नागरिकाला त्रास होईल त्याला प्रेमळपणें बोलावून सैनिकांनीं केलेल्या अपराधाबद्दल ते स्वतः दिलगिरी प्रदर्शित करीत व त्या नागरिकाला नुकसानभरपाई देत.

आपल्याप्रमाणेंच ही अनत्याचारी वृत्ती आपल्या अधिकाऱ्यांच्या अंगीं बाणावी याबद्दल ते फार दक्ष असत. ज्या वेळीं हजरत पैगंबरांनीं महाज-बिन-जबलची यमनवर गव्हर्नर म्हणून नेमणूक केली त्या वेळीं त्याला त्यांनीं पुढील-प्रमाणें उपदेश केला.

> "तुम्हीं प्रजाजनांस अत्यंत दयाळूपणानें व विचारानें वागविलें पाहिजे. तुम्हीं त्यांच्याशीं कठोरपणानें वागतां कामा नये किंवा त्यांची संपत्ती लुटतां कामा नये. दुःखितांचा शाप आपणांस भोंवतो हें नीट लक्षांत ठेवा. त्रस्त लोकांचे सुस्कारे परमेश्वरचरणीं लवकर रुजू होतात या गोष्टीची आठवण असूं द्या."

वरील उद्गारांवरून व हजरत पैगंबरांच्या धोरणावरून त्यांचें राजकारण किती अनत्याचारी होतें हें तेव्हांच लक्षांत येईल. अडाणी व अत्याचारी वातावरणांत हें अनत्याचारी राजकारण टिकून राहिलें; इतकेंच नव्हे तर तें यशस्वी झालें. यावरून राजकारण सकस करणारी 'अनत्याचार' ही एक प्रचंड शक्ति आहे असा निष्कर्ष सहजच निघतो.

वरील लोकशाहीचा निःपक्षपातीपणें विचार केल्यावर अशी आदर्शभूत लोकशाही प्रस्थापित करणारे हजरत महंमद पैगंबर अव्वल दर्जाचे राजकारणी होते असा निर्वाळा द्यावा लागेल.

भाग ७ वा

# व्यक्ति-माहात्म्य

" तुम्ही जगांत सर्वश्रेष्ठ, ज्ञानी व आदर्शभूत आहांत ".

—पवित्र कुराण, ६८:२९

हजरत महंमद पैगंबर यांचा जीवन-वृत्तान्त पाहिल्यावर पैगंबर ही एक अभूतपूर्व व आदर्शभूत व्यक्ति होऊन गेली असें प्रत्येकाला वाटल्याखेरीज राहणार नाहीं. त्यांच्या आयुष्यांतला प्रत्येक क्षण मानवजातीच्या उद्धाराकरितां खर्ची पडत होता. जगांत आपल्यास किती उच्च दर्जाचें काम पार पाडावयाचें आहे याची त्यांना अहर्निश जाणीव होती. जगांत धिंगाणा घालणारी अनीति व पाप घालवून जग हें शांति व सुख यांचें आगर कसें करतां येईल याचा त्यांना निदिध्यास लागला होता. तत्त्वनिष्ठा व दीर्घोद्योग यांच्या जोरावर त्यांच्या आशा सफल झाल्या व खुद्द त्यांच्याच हयातींत त्यांच्या अविश्रांत व भगीरथ परिश्रमाचें गोड फल त्यांना पाहावयास मिळालें.

ते जन्माला आले त्या वेळची अरबस्तानची भीषण परिस्थिति पाहिली म्हणजे अरबस्तानचा उद्धार होईल अशी आशा प्रदर्शित करणेंदेखील वेडेपणाचें ठरलें असतें. रूढींच्या बंधनांनीं अरब लोक इतके जखडून गेले होते कीं रूढीच्या मगरमिठींतून त्यांची सुटका होणें अशक्यप्राय व दुरापास्त होतें. " अरब लोकांच्या खुळचट समजुती व त्यांचें गाढ अज्ञान यांच्यापुढें ब्रह्मदेवाचीही मात्रा चालणार नाहीं. " अशा प्रकारचे उद्गार तेथील ज्यू व ख्रिश्चन लोक अनेक वेळां काढीत असत. खुद्द त्या दोन धर्मांच्या पुढाऱ्यांनीं अरब लोकांना आपल्या धर्माची दीक्षा देऊन त्यांची सुधारणा करण्याकरितां जंग जंग पछाडले; पण बिचाऱ्यांची अखेर निराशाच झाली. अशा निराशाजनक परिस्थितींत ज्यांनीं आपल्या धर्माचा प्रसार करून अरब लोकांत

आमूलाग्र क्रांति घडवून आणली त्यांची मुक्त कंठानें स्तुति करावयास त्यांच्या शत्रूंना देखील धन्यता वाटेल. अधःपाताच्या शेवटच्या कक्षेंत गेलेले लोक ज्यांच्या परिश्रमानें उद्धार पावले त्या हज़रत महंमद पैगंबरांच्या कार्याचा आढावा काढतांच आतांपर्यंत जगांतील कोठल्याहि व्यक्तीनें अशा तऱ्हेचें कार्य केलें नाहीं असें प्रत्येकाला म्हणावें लागेल. आपण ज्या ठिकाणीं जन्म घेतला त्या अरबस्तानाचीच उन्नति व्हावी किंवा इस्लाम धर्म स्वीकारणाऱ्या आपल्या अनुयायांचाच उद्धार व्हावा अशा प्रकारचें हजरत पैगंबरांचें ध्येय नव्हतें. जगांत होऊन गेलेल्या धर्मसंस्थापकांचा विचार केल्यास कांहीं धर्मसंस्थापकांचें ध्येय आपल्या देशापुरतें किंवा अनुयायांपुरतें मर्यादित होतें असें आपणांस दिसून येईल. त्याबरोबरच 'आपला काय तो ईश्वरी धर्म' अशी दंवडी पिटविण्याचें कार्य त्यांनीं केलें आहे असें आपणांस कबूल करावें लागेल. हजरत पैगंबरांनीं अशा तऱ्हेचें आकुंचित ध्येय आपल्यासमोर तरी ठेविलें नाहीं. जगांतील यच्चयावत् व्यक्तींचा उद्धार व्हावा अशा तऱ्हेचें विशाल व उदार ध्येय आपल्यासमोर त्यांनीं ठेविलें होतें. सर्व लोक परमेश्वराचीं लेकरें आहेत, सर्वांचें कल्याण झालें पाहिजे, सर्वांना सौख्य व शांतीचा लाभ झाला पाहिजे, अशी हजरत पैगंबरांनीं जाहीर घोषणा केली आहे. आपल्या धर्माप्रमाणेंच प्रत्येक धर्मांत परमेश्वरानें आपला पैगंबर पाठविला आहे; त्या पैगंबरांना वंद्य मानिलें पाहिजे अशी हजरत पैगंबरांनीं आपल्या अनुयायांना शिकवण दिली आहे.

हजरत पैगंबरांचें व्यक्तिमाहात्म्य आणखी एका बाबतींत श्रेष्ठ ठरत आहे. इतर धर्मसंस्थापकांनीं परिस्थितीचा फायदा घेऊन आपापला धर्म प्रस्थापित केला. त्या त्या कालीं लोकांत ज्ञानलालसा होती, त्यामुळें त्यांच्या गळीं कोठलेंहि तत्त्व उतरावयास फारसा त्रास पडत नव्हता. पण हजरत पैगंबरांची गोष्ट अगदींच निराळी होती. त्यांच्या वेळची परिस्थिती इतकी भीषण होती कीं नवीन धर्मांचें नुसतें नांव काढणें म्हणजे मृत्यूला आव्हान करण्यासारखें होतें. त्या वेळचें लोकमत इस्लाम धर्मांतील तत्त्वांच्या अगदींच

उलट होतें; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इस्लाम धर्माचें मूळ धरावयास अरबस्तानची जमीन अगदींच खडकाळ होती. त्यांनीं आपल्या अविश्रांत परिश्रमांनीं अरबस्तानची खडकाळ जमीन सुपीक केली आणि त्याच ठिकाणीं इस्लाम धर्माचें बीजारोपण करून दाखविलें. जें कार्य करण्याकरितां कित्येक धुरीणांचे परिश्रम फुकट गेले, कित्येकांची विद्वत्ता वायां गेली, कित्येकांचें सामर्थ्य फोल ठरलें, कित्येकांची सत्ता संपुष्टांत आली, कित्येकांचें तपोबल निस्तेज ठरलें, कित्येकांचा पुण्यसंचय खलास झाला, तें कार्य हजरत पैगंबरांनीं अवघ्या वीस वर्षांत करून दाखवून, जगाच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें.

**वैशिष्ट्य**

हजरत महंमद पैगंबरांचें व्यक्तिमाहात्म्य चिरकाल टिकविण्यास व तें साऱ्या जगास पटवून देण्यास त्यांचें वैशिष्ट्य कारणीभूत झालेलें आहे. कांहीं धर्मसंस्थापकांच्या कार्याबद्दल साशंक राहणाऱ्या चिकित्सकांचें ह्या वैशिष्ट्यानें पूर्ण समाधान केलें आहे असें आपणांस दिसून येईल. जगांतील धर्मसंस्थापकांच्या हातून राहून गेलेल्या गोष्टी त्यांच्या वैशिष्ट्यामुळें परिपूर्ण झालेल्या आहेत. त्यांच्या वैशिष्ट्याचा परिचय सामान्य माणसापासून तों तहत शास्त्रज्ञांपर्यंत सर्वांच्या अंतःकरणांत त्यांच्याबद्दल प्रेम उत्पन्न केल्याखेरीज राहणार नाहीं. याच वैशिष्ट्याची आपणांस थोडक्यांत ओळख करून घ्यावयाची आहे.

परधर्मसंस्थापकांबद्दल आदर हें हजरत पैगंबरांचें पहिलें वैशिष्ट्य होय. एका धर्मसंस्थापकानें दुसऱ्या धर्मसंस्थापकाविषयीं प्रशंसेचे उद्गार काढलेले आपणांस कोठें आढळून येणार नाहींत. याच्या उलट आपल्या धर्माची प्रतिष्ठा वाढविण्याकरितां दुसऱ्या धर्माची व धर्मसंस्थापकाची कुचेष्टा केल्याचीं पुष्कळशीं उदाहरणें आपणांस दाखवून देतां येतील. इतकेंच काय पण परधर्मसंस्थापक व त्यांचे अनुयायी यांना एकदम उचलून नरकांत फेंकलेलीं दृश्येंहि आपणांस दिसतील. स्वतःच्या धर्माचा बडेजाव वाढावा येवढ्या-

करितां परधर्मसंस्थापकांना तुच्छ लेखणें व त्यांना शिवीगाळ करणें हें अत्यंत हीनपणाचें आहे. हजरत पैगंबरांनीं असला हीनपणा कधींही केला नाहीं किंवा तशा प्रकारची आपल्या अनुयायांस शिकवणही पण दिली नाहीं. ' जगांत असणारे परमेश्वरनिर्मित धर्म व त्यांचे संस्थापक यांच्याविषयीं आदर-भाव राखा ' असा त्यांनीं आपल्या अनुयायांस धडा घालून दिला आहे. इतकेंच नव्हे तर पवित्र कुराणाच्या ३ ऱ्या अध्यायांतील ८३ व्या श्लोकामध्यें त्या त्या धर्माच्या पैगंबरांवर प्रत्येक मुसलमानानें विश्वास ठेवला पाहिजे अशी हजरत पैगंबरांची स्पष्ट आज्ञा आहे. एखाद्या प्रसंगावरून किंवा शब्दावरून हजरत महंमद पैगंबर असहिष्णु ठरतील असा एकहि प्रसंग त्यांच्या हयातींत सांपडणार नाहीं, किंवा असा एकहि शब्द धुंडाळूं गेल्यास मिळणार नाहीं. त्यांच्या वेळीं ज्यू आणि खिश्चन लोकांत आपापल्या धर्मप्रवर्तकांच्या श्रेष्ठपणा-विषयीं लढालढी चालली होती. आपल्या धर्मप्रवर्तकाचा श्रेष्ठपणा सिद्ध करण्याकरितां दुसऱ्या धर्मप्रवर्तकावर शिवीगाळ, अपशब्द, दूषण यांचा मारा एकमेकांनीं चालू केला होता. असहिष्णुतेचा उत्कृष्ट नमुना म्हणून इतिहास-काराला या प्रसंगाचा निर्देश करतां येईल. हजरत महंमद पैगंबरांना असा प्रसंग म्हणजे कपिलाषष्ठीचा योग होता. या प्रसंगाचा भरपूर फायदा घेऊन आपल्या धर्माची टिमकी वाजविण्याला त्यांना उत्कृष्ट संधि मिळालेली होती. पण हजरत पैगंबरांची वृत्ति ज्यू किंवा खिश्चन लोकांप्रमाणें असहिष्णु नव्हती. त्यांनीं ज्यू-खिश्चन वादांत आपला सूर न मिळवितां सहिष्णुतेच्या मार्गाचा अवलंब केला. ज्यू आणि खिश्चन धर्मप्रवर्तकांवर उडविलेले शिंतोडे आपल्या हातांनीं हजरत पैगंबरांनीं पुसून काढले आणि सदाचाराचे मूर्तिमंत पुतळे म्हणून त्या धर्मप्रवर्तकांचा गौरव केला. इतकेंच नव्हे तर आपल्याप्रमाणेंच आपल्या अनुयायांनीं त्या धर्मप्रवर्तकांस मान दिला पाहिजे अशी सक्त ताकीद देऊन त्यांनीं अभूतपूर्व अशी सहिष्णुवृत्ति जगाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

प्रांजलपणा हें त्यांचें दुसरें वैशिष्ट्य होय. आपण आपली चूक कबूल केली तर आपलें महत्त्व कमी होईल अशा तऱ्हेची विचारसरणी कांहीं थोर लोकांची असते. या विचारसरणीमुळें त्या चुकीस मान्यतेचा शिक्का मिळून वेळ पडल्यास ती आधारादाखल दाखविली जाते. 'आमच्या धर्मधुरीणांनीं दखील कधीं आपली चूक कबूल केली नाहीं, मग आम्ही ती नाकबूल करावयास कोणची हरकत आहे?' असा लोकापवाद आपणांस ऐकूं येऊं लागतो; आणि यामुळें लोकांस एक प्रकारचें वाईट वळण लागतें. पण या धर्मधुरीणांना समाजाच्या कल्याणापेक्षां स्वतःची मातबरी जास्त वाटत असल्यामुळें स्वतःच्या फायद्याकरितां आपल्या चुकीवर पांघरूण घालावयास त्यांना काडीमात्र दिक्कत वाटत नाहीं. हजरत पैगंबरांचें ध्येय याच्या उलट होतें. आपल्या हातून एखादी चूक झाल्यास ती कबूल करण्यांतच मोठेपणा आहे अशी त्यांची समजूत होती. चूक कबूल करण्यानें आपलें महत्त्व कमी न होतां तें वाढतें, असेंच त्यांना वाटत होतें. एकदां एका सरदाराबरोबर बोलत असतां एक भिक्षुक त्यांच्याजवळ आला आणि त्यानें याचना केली; पण हजरत पैगंबर बोलण्याच्या ओघांत असल्यामुळें त्यांनीं त्या भिक्षुकाकडे दुर्लक्ष केलें. घरीं गेल्यावर हजरत पैगंबरांना आपल्या वर्तनाचा अत्यंत विषाद वाटला व आपल्या हातून कधींही न होणारी चूक झाली याबद्दल त्यांचें मन त्यांना खाऊं लागलें. सकाळीं त्या भिक्षुकाला बोलावून त्याच्यासमोर आपल्या हातून झालेली चूक कबूल करून त्यांनीं त्याची क्षमा मागितली. चूक होती साधी आणि ती कधींही न होणारी; पण त्यांना ती क्षुल्लक चूक कबूल केल्याखेरीज राहवलें नाहीं!

अंधश्रद्धेचा त्यांनीं केलेला जोराचा इनकार हें त्यांचें तिसरें वैशिष्ट्य होय. आपण सांगूं त्यावर चिकित्सा न करतां जनतेनें मुकाट्यानें विश्वास ठेवला पाहिजे असें सर्वसाधारण धर्मप्रसारकांना वाटत असतें. चिकित्सा सुरू झाली कीं, जणूं कांहीं आपल्या धर्माची इतिश्री झाली असें समजून

चिकित्सा करणारावर धर्मलंडपणाचा आरोप करावयास त्यांना काडीमात्र खंत वाटत नाहीं. आपल्या धर्माचा काळजीपूर्वक अभ्यास करणाऱ्या दहा माणसांपेक्षां धर्माचा अभ्यास न करतां त्यावर अंधश्रद्धा ठेवणारीं हजार माणसें आणि धनगराकडून हुसकलीं जाणारीं मेंढरें यांमध्यें कांहीं फरक नसतो, या गोष्टीची त्यांना कशी कल्पना येत नाहीं कोण जाणे! हजरत पैगंबरांना अंधश्रद्धा ठेवणारीं माणसें नको होतीं. आपल्या प्रत्येक अनुयायानें धर्माचा काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे असें त्यांचें मत होतें. अंधश्रद्धेपेक्षां विचारवृत्तीची त्यांना अत्यंत मातब्बरी वाटत होती.

> "ज्या गोष्टीचें तुम्हांला ज्ञान नाहीं, त्या गोष्टीचा तुम्ही अंगिकार करूं नका. (खरोखरीं ज्ञान संपादन करते वेळीं) खरोखरी दृष्टी आणि अंतःकरण यांचा उपयोग करून घेतला पाहिजे."
>
> —पवित्र कुराण, १७ : ३६

ज्या गोष्टीचें आपणांस ज्ञान नाहीं तिजवर विश्वास ठेवण्यांत व तिचा अंगिकार करण्यांत अर्थ नाहीं. प्रथम त्या गोष्टीचा आपण अभ्यास केला पाहिजे. आणि अभ्यास केल्यानंतर ती गोष्ट आपल्या अंतःकरणास पटली पाहिजे. या दोन बाबी अंमलांत आणल्या म्हणजे त्या गोष्टीचें ज्ञान झालें असें म्हणावयास हरकत नाहीं. वरील वाक्यावरून हजरत महंमद पैगंबरांनीं विचारशक्तीस केवढा वाव दिला आहे याची वाचकांस थोडक्यांत कल्पना येईल. या विचारशक्तीपुढें अंधश्रद्धेचा कधीं टिकाव लागेल काय?

चमत्कारविरहित आयुष्य हें त्यांचें नवथें वैशिष्ट्य होय. त्यांनीं आपल्या उभ्या आयुष्यांत कधींही चमत्कार करून दाखविले नाहींत. त्या काळच्या सर्व धर्मप्रसारकांनीं किती तरी चमत्कार करून दाखविल्याचें आपण वाचतो. लोकांना धर्माच्या सत्य स्वरूपाचें ज्ञान करून देऊन त्यांना

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

धर्मांचें महत्त्व पटविण्यापेक्षां चमत्कार करून धर्मांचें व त्याबरोबर आपलें महत्त्व वाढविण्याचा पायंडा त्या काळीं पडला होता. किंबहुना चमत्कार हाच धर्मांचा आत्मा होऊन बसला होता. पण आज चमत्कारांच्या जोरावर धर्मांचें महत्त्व पटवितां येईल व उद्यांच्या शास्त्रीय युगांत त्या चमत्कारांचा फोलपणा नजरेंत भरून त्यावर उभारलेली धर्मांची इमारत ढांसळून पडेल या गोष्टीचा त्यांना पूर्णपणें विसर पडला होता. हजरत महंमद पैगंबरांना हे अल्पजीवी व अंधश्रद्धा निर्माण करणारे चमत्कार नको होते. चमत्कार करण्यापेक्षां धर्माचें सत्य स्वरूप पटवून देण्यानेंच धर्माची खरी कदर होणार आहे, असें विधान करणारे १३०० वर्षांपूर्वीचे हजरत पैगंबर आजच्या शास्त्रीय युगांत श्रेष्ठ व आदर्शभूत ठरावेत यांत नवल तें कोणतें? पूर्वी धर्मप्रवर्तकांनीं केलेले चमत्कार आज आपणांस हास्यास्पद वाटूं लागतात. याचें कारण चमत्कारांची शास्त्रीय शोधांशीं ठरणारी विसंगतता होय. आपण शास्त्रीय काळांत राहत आहोंत. या काळांत त्या अक्कल गुंग करणाऱ्या चमत्कारांच्या कथा वाचल्या म्हणजे त्या आपणांस अशक्य कोटींतल्या व मूर्खपणाच्या वाटूं लागतात. यामुळें चमत्कारांच्या वेष्टनांत गुंफून गेलेल्या धर्माबद्दल मन साशंक होऊं लागतें. त्या चमत्कारपूर्ण धर्मावर विश्वास ठेवावा तर आजचे शास्त्रीय शोध चुकीचे ठरतात आणि निसर्गाची पायमल्ली केल्यासारखें होतें. शास्त्रीय शोध आणि निसर्गाची क्रिया यांना श्रेष्ठ स्थान दिलें कीं, धर्मावरील विश्वास नाहींसा होऊं लागतो. मनुष्याची अशी द्विधा वृत्ति होऊं नये म्हणून हजरत पैगंबरांनीं धर्माची उभारणी चमत्कारावर न करतां निसर्गावर केली आहे. आजचे शास्त्रीय शोध म्हणजे निसर्गाची ओळख. कितीही शास्त्रीय संशोधन केलें तरी त्या संशोधनामुळें इस्लाम धर्मास काडीमात्र धक्का पोहोंचणार नाहीं. उलट, इस्लाम धर्मातील प्रत्येक मनुष्य आपल्या धर्माइतकेंच या शास्त्रीय संशोधनाकडे आदरपूर्वक पाहील. हजरत पैगंबरांनीं शास्त्र व संशोधन यांचें महत्त्व मुसलमान लोकांस पटवून दिलें आहे.

**" संशोधनाकरितां खर्च केलेला एक प्रहर प्रार्थनेकरितां खर्च केलेल्या अनेक प्रहरांपेक्षां किती तरी पटीनें चांगला. "**

**—हजरत महंमद पैगंबर**

चमत्कारापेक्षां संशोधनास महत्त्व देणारे हजरत महंमद पैगंबर २० व्या शतकांतले आहेत असा कोणीं शेरा दिला तर तो यथायोग्य ठरल्याखेरीज कसा राहील ?

आत्मप्रौढीचा तिटकारा हें हजरत पैगंबरांचें पांचवें वैशिष्टय होय. त्यांचा दर्जा किती तरी मोठा होता, त्यांची योग्यता किती तरी थोर होती, त्यांचा महिमा किती तरी दांडगा होता. सर्वश्रेष्ठ म्हणून ते मिरवले असते तर तें क्षम्य ठरलें असतें. मी देव आहें असें त्यांनीं सांगितलें असतें तरी त्यांच्या देवपणाबद्दल कोणीं शंका घेतली नसती. पण त्यांस मुळांतच आत्मप्रौढीचा तिटकारा होता. लोकांनीं आपलें अवडंबर माजवावें, आपली स्तुती करावी अशी कल्पनादेखील त्यांच्या अंतःकरणाला शिवली नाहीं. आपल्या मोठेपणाचा गाजावाजा त्यांनीं कधीं केला नाहीं, मी देव आहें अशी शेखी मिरवली नाहीं, किंवा मी देवाचा पुत्र आहें अशी घोषणाही केली नाहीं.

**" मी तुमच्यासारखाच एक साधा माणूस आहें. "**

**--पवित्र कुराण, १८ : ११०**

या कुराणाच्या साध्यासुध्या शब्दांतच त्यांनीं जगास आपली ओळख करून दिली आहे. त्याबरोबरच 'माझें अवडंबर माजवूं नका' अशी सक्त ताकीद केली आहे. ऐवढ्या थोर व्यक्तीचा साधेपणा लोकांचीं अंतःकरणें काबीज केल्याखेरीज राहील काय ?

सर्वसाधारण माणसाच्या पचनीं पडतील अशीं त्यांनीं प्रतिपादलेलीं तत्त्वें, हें त्यांचें सहावें वैशिष्टय होय. आपल्या तत्त्वांचें परिपालन करतांना कोणासही प्रयास पडूं नयेत किंवा हीं तत्त्वें लोकांना अशक्यप्राय वाटूं नयेत, याकरितां

त्यांनीं अत्यंत दक्षता बाळगलेली आहे. मोक्ष मिळविण्याकरितां ते लोकांस सर्वसंग-परित्याग करून अंगाला राख फासण्याला सांगत नाहींत. संसारास तिलांजली देणें किंवा तपश्चर्या करीत बसणें हीं तत्त्वें लोकांच्या पचनीं पडण्यास फार कठीण आहेत. जीं तत्त्वें सर्वसाधारण माणसाच्या आवाक्याबाहेर आहेत तीं करावयास त्यांनीं कधींही सांगितलें नाहीं. संसारांत राहून प्रत्येक माणसास मोक्ष मिळवितां येईल व ऐहिक कर्तव्य करीत असतां प्रत्येकास परमार्थ साध्य करून घेतां येईल अशीच त्यांनीं शिकवण दिली आहे. अरण्यांत जाऊन तपश्चर्येचें फळ एकट्यानें घेण्यापेक्षां संसारांत राहून प्रत्येकाचें कल्याण करणें हें जास्त पुण्यप्रद आहे, अशी हजरत पैगंबरांची भावना होती. त्यांनीं प्रतिपादिलेलीं तत्त्वें अत्यंत कठीण आहेत असा कोणालाही आक्षेप घेतां येणार नाहीं. हीं सुबोध तत्त्वें जगाचें लक्ष वेधल्याखेरीज राहणार नाहींत.

त्यांचें शेवटचें वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांना मिळालेले एकनिष्ठ अनुयायी होत. एकनिष्ठ अनुयायी मिळणें हें फारच थोड्या धर्मप्रवर्तकांच्या नशिबीं असतें. आतांपर्यन्त जगांत होऊन गेलेल्या अनेक धर्म किंवा तत्त्वप्रवर्तकांचा इतिहास आपण नजरेसमोर आणल्यास जिवास जीव देणारे, व शेवटपर्यन्त इमानानें वागणारे अनुयायी असण्याचें भाग्य फारच थोड्यांच्या वाट्यास आलेलें आहे असें आपणांस आढळून येईल. बहुतेक अनुयायी वेळ पडल्यास पगडी फिरविणारे असतात किंवा संकटकाळीं आपल्या पुढाऱ्यांस एकटा सोडून पोबारा करणारे भेटतात. जोंपर्यन्त आपल्या पुढाऱ्यांचा सन्मान होत असतो तोंपर्यंत आपण त्यांचे एकनिष्ठ अनुयायी आहोंत असें जगास भासविण्याचा ते परोपरीनें प्रयत्न करीत असतात; पण त्याच पुढाऱ्याचा पडता काळ सुरू झाला कीं, हेच अनुयायी त्याला आपली ओळखदेखील देत नाहींत. कांहीं अनुयायी आपल्या पुढाऱ्यांपासून नुसते नामानिराळे होऊन न राहतां, त्यांच्यावर शिव्याशापांची लाखोली वाहतात. अशा अनुयायांचा भरणा सगळीकडे आपल्या दृष्टीस पडतो.

उदाहरणार्थ, येशू ख्रिस्ताच्या चरित्राकडे दृष्टिक्षेप करा. त्यांचे एकनिष्ठ म्हणविणारे अनुयायी संकटकाळीं त्यांना सोडून गेले; त्यांची मुक्तकंठानें प्रशंसा करणारे अनुयायी त्यांच्यावर शिव्याशापांचा वर्षाव करूं लागले; त्यांच्या जिवाला जीव देण्याच्या गप्पा मारणाऱ्या अनुयायांनीं त्यांना ऐन वेळीं दगा दिला. तेंच हजरत पैगंबरांच्या भाग्यशाली चरित्राकडे पाहा. धर्मप्रसाराच्या सुरुवातीपासून तों तहत त्यांच्या अंतापर्यन्त जे अनुयायी मिळत गेले, ते अत्यंत एकनिष्ठ व इमानी होते, असें आपणांस कबूल करावें लागेल. हजरत पैगंबरांवर होणाऱ्या विरोधाच्या अग्निवर्षावांत त्यांच्या अनुयायांचें इमान तावूनसुलाखून निघालें आहे. त्यांचें अनुयायित्व सोडविण्याकरितां छातीवर भला थोरला दगड देऊन तप्त वाळूवर निजविलेल्या गुलामानें आपल्या मालकास जें बाणेदारपणाचें उत्तर दिलें तें इस्लाम धर्माच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखें आहे. कित्येक पुण्यात्म्यांनीं आपल्या पंचप्राणांची आहुति देऊन त्यांचें अनुयायित्व शाबूत राखलें आहे.

संकटकाळीं त्यांचे अनुयायी त्यांच्यापासून दूर पळून न जातां, त्यांच्याजवळ राहून संकटनिवारण करण्याचा प्रयत्न करीत. कित्येक वेळां हजरत पैगंबरांवरची अलाबला टाळण्याकरितां त्यांच्या अनुयायांनीं आपले जीव धोक्यांत घातले आहेत. ओहोद लढाईच्या वेळीं हजरत महंमद पैगंबर जखमी होऊन पडले होते. त्यांच्या अंगांतून रक्ताच्या धारा निथळत होत्या. अशा स्थितींत शत्रू त्यांच्यावर शेवटचा हल्ला करणार इतक्यांत त्यांचे अनुयायी त्यांच्याभोंवतीं गोळा झाले. त्यांनीं त्यांच्याभोंवतीं कोट करून शत्रूंच्या बाणांचे वर्षाव आपल्या छातीवर घेतले. बाणांच्या वर्षावानें हजरत पैगंबरांचा एकेक अनुयायी धारातीर्थीं पडत होता. पण त्यांची जागा लगेच दुसरा अनुयायी भरून काढीत असे. हजरत पैगंबरांच्या अनुयायांनीं आपल्या शौर्याची कमाल करून सोडलीच; पण स्त्रियांनींदेखील हजरत पैगंबरांच्या संरक्षणार्थ आपल्या तरवारी उपसल्या. उम्मी नसीबा, उम्मी सलमा आणि आयेषा या तीन शूर

स्त्रिया शत्रूशीं अखेरपर्यंत लढत होत्या. असे जिवास जीव देणारे अनुयायी मिळविल्याबद्दल हजरत महंमद पैगंबरांना प्रत्येक जण धन्यवाद दिल्याखेरीज राहणार नाहीं.

## संस्कृति-प्रस्थापक

सहाव्या शतकांत सुधारलेलें जग अधःपाताच्या वाटेस लागलें होतें. प्रत्येक राष्ट्रांतील महात्म्यांनीं प्रज्वलित केलेला संस्कृतीचा दीप विझूं लागला होता. अनाचाराचा अंधार पसरावयास सुरुवात झाली होती. चार हजार वर्षांच्या परिश्रमानें झालेली सुधारणा मातीमोल होऊन अखिल मानवजात पुन्हां रानटी अवस्थेंत पदार्पण करण्याच्या विचारांत होती. अशा दुर्धर कालांत हजरत पैगंबरांनीं जन्म घेऊन अधःपाताच्या मार्गावर लागलेल्या जगाला मागें परतविलें. कल्पान्तापर्यंत टिकणारी संस्कृति निर्माण करून, जगाच्या सौख्याचा आणि शांतीचा मार्ग दाखवून दिला. त्यांच्या संस्कृतीचें श्रेय पैसा नव्हता किंवा ऐषआराम नव्हता. समाजांत उच्चनीचपणा निर्माण करणें किंवा वर्णभेद प्रस्थापित करणें असले उपद्व्याप करण्यासाठीं त्यांनीं संस्कृति निर्माण केली नाहीं. हजरत पैगंबरांची संस्कृति अत्यंत श्रेष्ठ दर्जाची होती. पैशापेक्षां अंतःकरणांची जास्त योग्यता समजणें, ऐषआरामापेक्षां परोपकार श्रेष्ठ मानणें, वर्णप्रेमापेक्षां विश्वप्रेमाकरितां तनमनधन खर्च करणें, या सुंदर तत्त्वांचा अंतर्भाव हजरत पैगंबरांच्या संस्कृतीमध्यें झाला आहे.

या सुंदर तत्त्वांचा अवलंब केल्यास पैशाचिक वृत्तीस जाळून खाक करणारें आध्यात्मिक सामर्थ्य माणसास मिळवितां येतें. या आध्यात्मिक सामर्थ्यापुढें वर्णभेदाचे अभेद्य डोंगर दुभंगून जातात, जातिभेदाचे पापुद्रे विदीर्ण होतात, पारतंत्र्याच्या अवजड शृंखला गळून पडतात, मनावर चढलेलीं रूढींचीं पुटें झाडून निघतात आणि अंतःकरणाचें मालीन्य धूवून जाऊन तें निर्मळ बनतें; जगांत सौख्य व शांति प्रस्थापित करणारें हे आध्यात्मिक सामर्थ्य माणसांच्या अंगीं यावें अशी खटपट हजरत पैगंबरांची संस्कृति करीत आहे.

याच आध्यात्मिक सामर्थ्याचा पुरस्कार लेसिंग, मेंडलन्सन, व्हॉल्टेअर, लॉक ह्यूम व सॅप्टसबरी या जगद्विख्यात तत्त्वज्ञान्यांनीं अत्यंत जोरानें केला आहे. आपण नाहीं पण आपल्या पूर्वजांनीं अशा प्रकारचें आध्यात्मिक सामर्थ्य मिळविलें होतें, अशी शाब्दिक बडबड करणाऱ्यांचा हजरत पैगंबरांच्या संस्कृतीस अत्यंत तिटकारा आहे. बापजाद्यांच्या मोठेपणावर तुमचा मोठेपणा अवलंबून नाहीं; हा मोटेपणा, हें सामर्थ्य तुम्हीं स्वतः कमावलें पाहिजे अशी उज्ज्वल शिकवण हजरत पैगंबरांची संस्कृति देत आहे.

बदलणाऱ्या कालास टक्कर देण्याचें सामर्थ्य अंगांत नसल्यामुळें जगांतील कित्येक संस्कृती कालाच्या उदरांत गडप झाल्या आहेत; कित्येक निष्प्रभ ठरल्या आहेत. भविष्यकाळीं जग प्रगतीच्या मार्गावर झपाट्यानें मार्गक्रमण करणार आहे, या गोष्टीकडे कानाडोळा करून फक्त त्या त्या काळालाच अनुकूल होईल अशा तऱ्हेचें त्या संस्कृतींचें ध्येय असल्यामुळें आजच्या काळांत त्या संस्कृतींच्या अंगीं जगाचें लक्ष आपल्याकडे ओढून घेण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. त्या संस्कृतींनीं ज्या तत्त्वांचा उदो उदो केला तीं तत्त्वें आज आपणांस त्याज्य वाटत आहेत. ज्या ध्येयांचा त्यांनीं पुरस्कार केला तीं ध्येयें आकुंचित स्वरूपाचीं ठरत आहेत. कित्येक वेळां त्यांना संस्कृती हें नांव तरी शोभेल काय असा बारीकसा संदेह मनांत उद्भूत होतो.

हजरत पैगंबरांच्या संस्कृतीचा अभ्यास केल्यास याच्या उलट परिस्थिती दिसून येईल. बदलणाऱ्या कालास पचवून टाकावयाचें सामर्थ्य त्यांच्या संस्कृतीमध्यें आहे. निरनिराळ्या काळांत अभिनव कल्पना प्रसृत होण्याचा संभव आहे हें लक्षांत ठेवून त्या कल्पनांशीं सुसंगत दिसेल अशा तऱ्हेनेंच त्यांनीं संस्कृतीची घटना केली. ही घटना करतांना त्यांनीं निसर्गाकडे कानाडोळा केला नाहीं; किंबहुना निसर्गाच्या पायावरच त्यांनीं इस्लामी संस्कृतीची प्राणप्रतिष्ठा केली असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. निसर्गाविरुद्ध दिसणारी एकही गोष्ट आपणांस या संस्कृतीमध्यें दिसणार नाहीं. निसर्ग हा

नेहमीं जेता राहणार ही खूणगांठ बांधूनच त्यांनीं निसर्गास आपल्या संस्कृतीचा आत्मा बनविला आहे. प्रख्यात तत्ववेत्ता **थॉमस कार्लाइल** म्हणतोः--

> **" पैगंबरांचा शब्द म्हणजे थेट निसर्गाच्या अंतःकरणांतून निघालेली हांक होय. "**

हजरत पैगंबरांची ही निसर्गसिद्ध संस्कृती यावच्चंद्रदिवाकरौ प्रभावशाली ठरल्याखेरीज राहणार नाहीं.

हजरत पैगंबरांची संस्कृती दुसऱ्या संस्कृतीचा द्वेष करीत नाहीं किंवा स्वतःविषयीं अहंमन्य भाव बाळगीत नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. दुसऱ्या संस्कृतीमधील उपयुक्त तत्त्वांचा अंगीकार करण्यास ती नेहमीं सज्ज असते, इतकेंच नव्हे तर अशा तत्त्वांचा अंगीकार करतांना तिला एक प्रकारचा आनंद व अभिमान वाटतो. जगांतील निरनिराळ्या संस्कृतींमधील अत्युत्कृष्ट तत्त्वें आत्मसात करण्याचें ध्येय आपल्या समोर ठेविल्यामुळें त्यांची संस्कृती दिवसेंदिवस संपन्न होत जात आहे. याखेरीज ही संस्कृती अत्यंत स्वागतप्रेमी आहे. जगांत होणाऱ्या तात्त्विक व शास्त्रीय प्रगतीचें स्वागत हजरत पैगंबरांची संस्कृती अंतःकरणपूर्वक करीत असल्यामुळें, या संस्कृतीचा व जागतिक प्रगतीचा उभा दावा कधींच दृष्टीस पडत नाहीं. आजच्या शास्त्रीय युगांत देखील ही संस्कृती ताजीतवानी दिसते याचें कारण तरी हेंच होय. प्रत्येक काळाचें आनंदपूर्वक स्वागत करणारी ही उदारमतवादी संस्कृती चिरंजीव झाल्याखेरीज कशी राहील ?

या संस्कृतीचें दृश्य फल कसें असतें याचें सुंदर वर्णन, जगांतील अखिल ख्रिश्चन लोकांच्या वुल्व्हरहॅंप्टन येथें भरणाऱ्या चर्च कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून रेव्हरंड कॅनन ऐझाक टेलर नांवाच्या एका विद्वान् धर्मोपदेशकांनीं केलें आहे. जगांतील ख्रिश्चन लोकांची परिषद आणि त्या ठिकाणीं पैगंबरांच्या संस्कृतीचा गौरव या दोन गोष्टी पैगंबरांच्या संस्कृतीची श्रेष्ठता बिनविरोध

ठरवीत आहे. रेव्हरंड टेलर यांचें भाषण लंडन टाइम्स व सेंट जेम्स् गॅझेट या प्रमुख इंग्लिश पत्रांतून प्रसिद्ध झालें आहे. रेव्ह. टेलर म्हणतात:--

> " नीग्रोसारख्या जंगली जातीनें इस्लाम धर्माचा अंगीकार केला कीं त्यांच्यामधील मूर्तिपूजा, जादूगिरी, नरमांसभक्षण, नरयज्ञ, चेटूक वगैरेसारखे प्रकार चटदिशीं नाहींसे होतात, अथितिसत्कार धार्मिक कृत्य समजलें जातें, दारुबाजी नष्ट होते, जुगार बंद होतो, अश्लील नृत्य आणि स्त्रीपुरुषांचे अनियंत्रित संभोग थांबतात. स्त्रियांचें पातिव्रत्य सद्गुण समजला जातो, आळशीपणा जाऊन उद्योगी वृत्ती येते, शिस्त आणि विचारी वृत्तीचा प्रादुर्भाव होतो. रक्तपात, प्राण्यांशीं आणि गुलामांशीं होत असलेली क्रूर वृत्ती निषिद्ध मानली जाते. मानवता, कल्याण करण्याची वृत्ती आणि बंधुतेची भावना अंगांत बाणली जाते......इस्लाम धर्मानें कुजकी वृत्ती व शकुनभोळेपणा यांचा नायनाट केला आहे.इस्लाम म्हणजे पोकळ वेदान्ती बडबडीविरुद्ध पुकारलेलें बंड होय. ब्रह्मचर्य हा धर्मनिष्ठेचा मुकुट आहे, या कल्पनेचा या धर्मानें धिक्कार केला आहे. इस्लाम धर्मानें विरक्तवृत्ती नष्ट करून वीरवृत्ती जागृत केली. परमेश्वरभक्ति, विचारवृत्ती आणि बंधुत्व या बाबतींत आम्हांस इस्लाम धर्मानें धडा घालून दिला आहे. हा धडा घेण्यांतच आपलें कल्याण आहे. "
>
> —रेव्हरंड सी. आय्. टेलर

## मानवतेचा त्राता

हजरत महंमद पैगंबर यांनीं प्रस्थापित केलेल्या संस्कृतीचा बारकाईनें विचार केला म्हणजे मानवतेची शिकवण हेंच तिचें ध्येय आहे असें आपणांस

कबूल करावें लागेल. जगांतील प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणावर हें ध्येय संक्रान्त व्हावें एवढ्याकरितां त्यांनीं अविश्रांत मेहनत घेतली; आपल्या जिवाचा आटापिटा केला. अनाचाराच्या गर्तेत लोळणाऱ्या पातकी लोकांस सदाचारी बनविणें, व्यसनांमुळें मातीमोल झालेल्या बेवकूब लोकांस सन्मार्गावर आणणें, कर्तबगार लोकांस शेळयामेंढ्या बनविणाऱ्या पारतंत्र्याच्या शृंखला तोडून टाकणें, उन्मत्त माणसांच्या टांचेखालीं चिरडल्या जाणाऱ्या गरीब माणसांस सोडविणें, साऱ्या जगास जन्म देणाऱ्या स्त्रियांची मानहानि करणारी पुरुषांची जुलमी सत्ता नष्ट करणें हीं सत्कृत्यें हजरत पैगंबरांनीं मानवांच्या कल्याणाकरितां केलीं.

> " अखिल मानवजातीच्या उद्धाराकरितां तुम्हांस पाठविलें आहे. "
>
> —पवित्र कुराण, ३४ : २८

आपण ज्या देशांत जन्मलों त्या देशांतील लोकांचें कल्याण व्हावें, किंवा आपण ज्या धर्माचे प्रवर्तक आहोंत त्या धर्मांतील लोकांचा उद्धार व्हावा असें मर्यादित ध्येय त्यांनीं आपल्यासमोर कधींहि ठेविलें नाहीं. त्यांच्या ध्येयाच्या विस्तारामध्यें साऱ्या जगाचा अंतर्भाव झाला होता. जगाच्या पाठीवर वावरणारी प्रत्येक व्यक्ति, मग ती स्त्री असो किंवा पुरुष असो, स्वजातीय असो किंवा परजातीय असो, स्वदेशबांधव असो किंवा परस्थ असो, स्पृश्य असो वा अस्पृश्य असो, अशा प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाकरितां हजरत पैगंबरांचा जन्म होता. आपल्या कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीच्या हिताकरितां आपण जसें मनोभावानें झटतों त्याप्रमाणें हजरत महंमद पैगंबर जगांतील प्रत्येक व्यक्तीच्या हिताकरितां सदोदित खपत. त्यांना सारें जग म्हणजे एक कुटुंब वाटत असे. जगांतील प्रत्येक व्यक्तीकडे ते आपलेपणानें पाहत. रात्रीं झोंपते वेळीं ते किती सुंदर प्रार्थना करीत असत तें पाहाः—

"वकान दुआउहू बिल्लैली अशहदुअन्न इबादल्लाहा कुल्लुहुम् इख्वतुन्."

म्हणजे 'परमेश्वराचे सर्व भक्त ( लोक ) एकमेक बंधू आहेत याबद्दल मी स्वतः साक्षी आहें.' जगांतील प्रत्येक व्यक्तीशीं त्यांच्या भावना कशा समरस झाल्या होत्या याचें स्पष्ट प्रत्यंतर म्हणून वरील प्रार्थनेकडे पाहतां येईल. त्याबरोबरच ते अहोरात्र म्हणत:--

"अत्तालेहो ली"

म्हणजे जगांतील सर्व गोरगरीब, बहिष्कृत, अस्पृश्य, पददलित आणि तुच्छ मानलेले लोक परमेश्वरानें माझ्याकडे सोंपविलेले आहेत. जगाला या लोकांबद्दल सहानुभूती वाटत नसते; त्यांच्याकडे आपुलकीच्या भावानें पाहण्यांत जगाला कमीपणा वाटत असतो; त्यांच्या सौख्याबद्दल जग नेहमीं उदासीन असतें. अशा लोकांस सहानुभूती दाखवून त्यांचा दुःखभार हलका करणें, त्यांच्याशीं आपलेपणानें वागून संकटांपासून त्यांचा बचाव करणें, त्यांच्या सुखाविषयीं जागरूक राहणें आपलें कर्तव्यकर्म आहे, असें हजरत पैगंबर समजत व त्याप्रमाणें आचरण करीत.

आपल्याप्रमाणेंच अखिल मानव जातीवर प्रेम करा अशी आपल्या अनुयायांना त्यांनीं शिकवण दिली आहे. परमेश्वराची कृपादृष्टी आपल्यावर व्हावी असें आपणांस वाटत असेल तर परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्रत्येक मानवावर आपण प्रेम करावयास शिकलें पाहिजे. ते म्हणतात:--

"जो परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रावर प्रेम करीत नाहीं त्याच्यावर परमेश्वर कधींही प्रेम करणार नाहीं."

ज्या ठिकाणीं प्रेम नाहीं त्या ठिकाणीं उदार बुद्धी नाहीं, त्याग नाहीं किंवा कल्याणही पण नाहीं. परमेश्वरास आवडणाऱ्या वरील तीन्ही गोष्टी ज्या गोष्टीमुळें साध्य होत नाहींत ती गोष्ट आपण केली तर परमेश्वर आपल्यावर

कधींही संतुष्ट होणार नाहीं किंवा आपल्यावर प्रेम करणार नाहीं. आज आपण मानवांची सेवा केली, त्यांच्यावर आपण प्रेम केलें तरी ती सेवा, तें प्रेम परमेश्वरचरणीं रुजू होईल. आपण मानवांना प्रसन्न केलें तर परमेश्वराला प्रसन्न केल्यासारखें होणार आहे. मानवांची काळजी वाहा, परमेश्वर तुमची काळजी वाहील; मानवांच्या सौख्याकरितां झटा, परमेश्वर तुम्हांस सुखी करील; मानवांवर प्रेम करा, परमेश्वर तुमच्यावर प्रेम करील, असें आपणांस हजरत पैगंबर सांगत आहेत.

मानवांवर प्रेम करतांना हजरत महंमद पैगंबरांनीं शत्रू व मित्र असा भेदभाव ठेविला नाहीं. जितक्या प्रेमानें ते मित्रास उपयोगी पडत तितक्याच प्रेमानें ते शत्रूच्या मदतीस धांवत. जितक्या प्रेमानें ते आपल्या अनुयायांशीं बोलत तितक्याच प्रेमानें परधर्मीयांशीं संभाषण करीत. एखादा मनुष्य संकटांत सांपडला तर तो परधर्मी म्हणून त्यांनीं त्यास मदत करण्याचें कधींहि नाकारलें नाहीं; किंवा तो परधर्मी म्हणून त्याची गळचेपी करण्याचें पातक त्यांनीं कधींही केलें नाहीं. तो आपला शत्रू आहे म्हणून त्याला शाप देण्याची वृत्ती त्यांनीं केव्हांही पत्करली नाहीं. हजरत पैगंबरांना रक्तबंबाळ करून सोडणाऱ्या शत्रूंना शाप द्या असा आग्रह कांहींजण करूं लागतांच ते म्हणाले,

**"मी मानवजातीस शाप देण्याकरितां अवतरलों नाहीं.**
**मी मानवजातीवर प्रेम करण्याकरितां अवतरलों आहें."**

रणांगणावर त्यांच्या शत्रूंनीं त्यांना रक्तबंबाळ केल्यावर देखील 'परमेश्वरा, या लोकांस क्षमा कर' असेच उद्‍गार त्यांच्या तोंडून आले. आपला जीव घ्यावयास टपलेल्या कर्दनकाळ शत्रूंवर हजरत पैगंबरांनीं केवढी मेहेरनजर केली हें मागें पाहिलेंच आहे. शत्रूंवर नुसती दया करून न थांबतां, त्यांचें कोटकल्याण करण्याची श्रेष्ठतम कामगिरी हजरत पैगंबरांनीं बजाविली आहे. आपल्या शत्रूनें आपलें वाईट केलें म्हणून आपणहि त्याचें वाईट न करतां

त्याचें कल्याण करावयास तयार झालें पाहिजे. अशी वृत्ती आपण ठेवूं तर मानवतेस विघातक होणाऱ्या शत्रुत्वाचा व द्वेषाचा नायनाट व्हावयास फारसा वेळ लागणार नाहीं.

आज आपण मानवांना छळलें, त्यांचे अनन्वित हाल केले तर परमेश्वर आपल्यावर कधींही प्रसन्न होणार नाहीं. इकडे मनुष्याला त्रास द्यावयाचा आणि तिकडे परमेश्वरास प्रसन्न करून घेण्याकरितां रात्रंदिवस प्रार्थना करावयाची या विसंगत गोष्टी परमेश्वरास आवडत नाहींत. परमेश्वर असल्या प्रार्थनेनें कधींच प्रसन्न होणार नाहीं. हजरत पैगंबर म्हणतात,

> **" जो आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यास त्रास देतो त्यानें परमेश्वराची कितीहि प्रार्थना केली तरी परमेश्वर त्याच्या प्रार्थनेची पर्वा करीत नाहीं. "**

आपण आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं अत्यंत चांगलेपणानें वागलें पाहिजे; त्यांच्या अडीअडचणी दूर केल्या पाहिजेत. जणूं कांहीं ते आपले आप्त आहेत अशा भावनेनें त्यांच्याशीं वागणूक ठेवली पाहिजे. हजरत पैगंबर म्हणतात,

> **" जो स्वतः पोटभर जेवतो व शेजाऱ्यांना उपाशी ठेवतो तो पक्का मुसलमान नव्हे. "**

आपले शेजारी उपाशी-तापाशी असतील तर त्यांना आपली अर्धी भाकरी नेऊन दिली पाहिजे. इतकेंच नव्हे तर वेळ पडल्यास आपण अर्धपोटीं राहून शेजाऱ्यांना पोटभर अन्न दिलें पाहिजे. अशा तऱ्हेनें वागणाऱ्यासच सच्चा मुसलमान म्हणतां येईल.

दुसऱ्याचें अंतःकरण दुखविलें जाईल अशा प्रकारची भाषा वापरण्यास देखील ते मनाई करीत आहेत. कित्येक लोक अंतःकरणास घरें पडतील अशी भाषा वापरतात; ही भाषा हजरत पैगंबरांनीं त्याज्य ठरविली आहे.

अशा प्रकारची भाषा वापरणाऱ्या मनुष्याकडे परमेश्वर कधींही सहृदयतेनें पाहणार नाहीं. ते म्हणतात,

**" लोक आपली संगत सोडून फटकून राहतील अशा प्रकारची कडक भाषा वापरणारा मनुष्य परमेश्वराचे दृष्टीनें अत्यंत वाईट होय.. "**

एकाद्या मनुष्याची कडक भाषा दुसऱ्याच्या जिव्हाग्रीं लागून तो पहिल्या माणसापासून फटकून राहतो; यामुळें एकमेकांत प्रेमसंबंध न वाढतां निष्कारण वितुष्ट वाढतें. हें वितुष्ट मानवतेची हानी करणारें असल्यामुळें कडक भाषा वापरण्याची मनाई केली आहे. आपल्या अनुयायांची व्याख्या करतांना त्यांनीं लोकांना न दुखविण्याची वृत्ती किती स्पष्टपणें निदर्शनास आणून दिली आहे तें पाहा. ते म्हणतात,

**" आपल्या वाचेनें अथवा वृत्तीनें मानवजातीस जो दुखवीत नाहीं तो मुसलमान होय. "**

मुसलमान म्हटला कीं त्यानें कोठल्याही रीतीनें मानवजातीस यत्किंचितही दुखवितां कामा नये. लोकांचें मन दुखविलें जाईल अशा प्रकारची कृती तर बाजूला राहोच, पण नुसती भाषा देखील मुसलमान म्हणविणारानें वापरतां उपयोगी नाहीं. मुसल्मान म्हटला कीं तो दिलदार वृत्तीचा व खुल्या अंतः-करणाचा असला पाहिजे. त्यानें आपल्या गोड भाषणानें व आचरणानें लोकांचीं त्रस्त मनें आनंदित केलीं पाहिजेत.

फक्त लोकांना दुखवावयाचें नाहीं असें धोरण ठेवून स्वस्थ न बसतां, त्यांच्या कल्याणाकरितां आपण खटपट केली पाहिजे; प्रसंगीं झीजही सोसली पाहिजे. लोककल्याण ही श्रेष्ठतर कामगिरी परमेश्वरानें आपल्यावर सोंपविली आहे असें प्रत्येक मुसलमानानें समजलें पाहिजे.

**" परमेश्वरास सर्वस्वीं शरण जाणारा मुसलमान दुसऱ्यांचा कल्याणकर्ता असतो. "**

**—पवित्र कुराण, २ : ११२**

लोकांचें कल्याण करणें हें प्रत्येक मुसलमानाचें कर्तव्यकर्म आहे असा स्पष्ट उल्लेख करून इस्लाम धर्मानें मुसलमान लोकांस मानवतेचा उत्कृष्ट धडा घालून दिला आहे. जितकी दुसऱ्यास न दुखविण्याची जबाबदारी मुसलमानावर आहे तितकीच दुसऱ्यांचें कल्याण करावयाचीही जबाबदारी त्याचेवर आहे हें प्रत्येक मुसलमानानें विसरतां कामा नये. लोककल्याण हा परमेश्वरास प्रसन्न करून घेण्याचा राजमार्ग आहे हें प्रत्येकानें लक्षांत ठेवलें पाहिजे.

> **" परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रांचें कल्याण करा. कारण जे कल्याण करतात त्यांच्यावर परमेश्वर प्रेम करतो. "**
>
> —पवित्र कुराण, २ : १९१

परमेश्वराला प्रसन्न करून घेण्याकरितां लोकांची धडपड व प्रयत्न चालू असतात. यांपैकीं कांहीं प्रयत्न अंधश्रद्धा व रूढी यांना अनुसरून असल्यामुळें ते फलद्रूप होत नाहींत. कित्येक वेळां असले प्रयत्न आपणांस चमत्कारिक व हास्यास्पद वाटतात याचें कारण तरी हेंच होय. असे प्रयत्न करण्यापेक्षां इस्लाम धर्मानें एक खात्रीचा मार्ग सांगितला आहे. हा मार्ग म्हणजे प्राणिमात्रांचें कल्याण करणें हा होय. सर्व प्राणिमात्र परमेश्वरानें निर्माण केले आहेत; या प्राणिमात्रांचें कल्याणें करण्याचें ध्येय जर आपण ठेवलें तर परमेश्वर आपल्यावर प्रसन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं.

मनुष्यांत चांगुलपणा आल्याखेरीज लोकांचें कल्याण करण्याची प्रवृत्ति त्यांच्यामध्यें निर्माण होत नाहीं. हा चांगुलपणा मिळवावयास आपल्या अंगीं त्यागी वृत्ति बाणली पाहिजे. आपणांस आवडणारी गोष्ट लोकांच्या कल्याणाकरितां खर्च केली पाहिजे. लोककल्याणाकरितां जोंपर्यंत आपण त्याग केला नाहीं तोंपर्यंत तो चांगुलपणा आपणांस संपादन करतां येणार नाहीं.

> **" ज्या गोष्टीबद्दल तुम्हांला प्रेम वाटतें, ती गोष्ट लोककार्याकरितां जोंपर्यंत खर्च केली नाहीं तोंपर्यंत**

तुम्हांस कोठल्याही मार्गानें चांगुलपणा संपादन करतां येणार नाहीं. ”

—पवित्र कुराण, १७ : २८

एखाद्या धनाढ्यास पैशाबद्दल अत्यंत प्रेम वाटतें; पण जोंपर्यंत हा पैसा लोकांच्या कल्याणाकरितां खर्च केला नाहीं तोंपर्यंत त्याला चांगुलपणा मिळवितां येणार नाहीं. कांहीं लोकांना अधिकार मिळवावयाची अत्यंत आवड असते. ही आवड परिपूर्ण करण्याकरितां आपल्या भोंवतालच्या लोकांचीं मनें दुखविण्यापर्यंत पाळी जाते; इतकेंच नव्हे तर त्यांच्यांत व इतर लोकांत झगडे निर्माण होतात. लोकांत झगडे लागले तरी हरकत नाहीं पण आम्ही अधिकार मिळविणार, अशी महत्त्वाकांक्षा त्यांच्या अंतःकरणांत निर्माण होते. अशा माणसांना ते चांगले आहेत असें केव्हांही म्हणतां येणार नाहीं. त्यांना चांगुलपणा मिळवावयाचा असेल तर लोककल्याणाकरितां लोकांमध्यें झगडे माजूं नयेत म्हणून आपल्या अधिकाराचा हट्ट त्यांनीं सोडून दिला पाहिजे; थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास त्यांनीं त्यागी बनलें पाहिजे.

मानवजातीचें कल्याण करण्यापासून मोठें पुण्य आपल्या पदरीं पडणार आहे; इतकेंच नव्हे तर आपणांस सर्वश्रेष्ठ लोकांच्या मालिकेंत जाऊन बसण्याचा मान मिळणार आहे. हजरत पैगंबर म्हणतात,

“जो मानवजातीचें कल्याण करतो तो सर्वश्रेष्ठ होय.”

सर्वश्रेष्ठपणा अफाट संपत्तीमध्यें नाहीं, मानमरातबांत नाहीं, विद्वत्तेंत नाहीं, पराक्रमांत नाहीं, जन्मावर नाहीं, मुत्सद्दीपणांत नाहीं; सर्वश्रेष्ठपणा मानवांचीं संकटें दूर करण्यामध्यें आहे, मानवांस सदाचरी बनविण्यामध्यें आहे. मानवांचें कल्याण करणारा हा ज्याला किताब मिळाला त्याच मनुष्यास जगानें सर्वश्रेष्ठ समजलें पाहिजे. सर्वश्रेष्ठपणा मिळवावयास मिजासखोरांची हांजीहांजी करावयास नको, अफाट संपत्तीचा चक्काचूर करावयास नको किंवा मुत्सद्दीपणाचा डाव लढवावयास नको. तुम्ही मानवजातीचें कल्याण

करावयाचें कार्य सुरू केलेंत कीं तें महत्पद आपोआप तुमच्याकडे चालून येणार आहे. हजरत पैगंबर म्हणतात,

**“ मानवांची सेवा ही परमेश्वराची सर्वश्रेष्ठ भक्ति होय. ”**

परमेश्वराची भक्ति करण्याचे अनेक मार्ग आहेत. प्रत्येक मनुष्य आपल्या बुद्धीप्रमाणें निरनिराळ्या मार्गांनीं परमेश्वराची भक्ति करीत असतो. पण इस्लाम धर्मांत मानवांची सेवा ही अत्यंत श्रेष्ठ दर्जाची भाक्ति मानली गेली आहे. आपत्तींनीं गांजलेल्या, रोगांनीं पीडलेल्या, भुकेनें व्याकुळ झालेल्या, कर्जानें हैराण बनलेल्या, जुलमी सत्तेमुळें त्रस्त झालेल्या मानवांच्या साहाय्यार्थ धांवून जाणें व त्यांना संकटमुक्त करून त्यांच्या अंत:करणाला विसांवा व आनंद देणें हींच मानवसेवा होय, अशा तऱ्हेची मानवसेवा परमेश्वरास अत्यंत आवडते. परमेश्वराला प्रसन्न करण्याकरितां सुखवस्तु लोकांच्या हजारों पंक्ति उठविण्यांत किंवा मंदिर शृंगारण्यांस आपण अफाट पैसा खर्च केला तरी परमेश्वर कधींही प्रसन्न होणार नाहीं. पण हाच पैसा आपण संकटांत सांपडलेल्या लोकांच्या साहाय्यार्थ खर्च करूं तर मात्र परमेश्वर प्रसन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं. त्याचा अर्थ फक्त धनिक लोकांसच मानवसेवा करणें शक्य आहे असा मात्र नव्हे. अत्यंत गरीब माणसांस देखील मानवसेवा करतां येईल. तहानेनें व्याकुळ झालेल्यास पाणी पाजणें, रोग्याची शुश्रूषा करणें, अनाथ स्त्रीची अब्रू वांचविण्याकरितां धांवणें, एकाद्याच्या कामास हातभार लावणें, अडाणी माणसांस सदुपदेश करणें, सवडीच्या वेळीं लोकांना शिक्षण देणें अशा तऱ्हेच्या लोकोपयोगी गोष्टी करून एकादा गरीब देखील मानवसेवा उत्कृष्ट रीतीनें करूं शकतो, व परमेश्वराच्या सर्वश्रेष्ठ भक्तीचें श्रेय मिळवूं शकतो, हें हजरत पैगंबरांनीं साऱ्या जगास दाखवून दिलें आहे.

हजरत महंमद पैगंबरांनीं आपल्या अनुयायांना मानवतेची किती उत्कृष्ट शिकवण दिली याचें आपण विहंगमावलोकन केलें आहे. आपल्या साऱ्या आयुष्यभर अशा तऱ्हेची शिकवण देण्याचा त्यांनीं उपक्रम ठेविला होता.

मानवतेचा पुरस्कार करणारीं त्यांच्या तोंडून बाहेर पडलेलीं वाक्यें इस्लामी वाङ्मयांत आपणांस इतस्ततः सांपडतील. त्यांतील कांहीं उत्कृष्ट वाक्यें खालीं संकलित केलीं आहेतः--

> "दया हें धर्माचें चिन्ह आहे; ज्याच्याजवळ दया नाहीं त्याच्याजवळ धर्म नाहीं....जो परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रांवर दया करतो, त्याच्याकडे परमेश्वर दयार्द्र दृष्टीनें पाहतो; म्हणून जगांतील प्रत्येक व्यक्तीवर–ती चांगली असो किंवा वाईट असो–दया करा. वाईट माणसांवर दया करणें म्हणजे वाईटपणापासून त्या माणसांस परावृत्त करणें होय...संकटाच्या वेळीं जो प्राणिमात्रांस मदत करतो किंवा त्रस्त झालेल्या माणसांच्या मदतीस धांवून जातो त्याला संकटकाळीं परमेश्वर वांचवितो...एकलकोंडया मुसलमानापेक्षां, जो दुसऱ्यांशीं मिळूनमिसळून वागतो व त्यांच्या सुखदुःखांत समभागी होतो तो मुसलमान अत्यंत चांगला होय.... या जगांतील सर्वश्रेष्ठ संपत्ति म्हणजे मानवांचें कल्याण करणें होय."

हजरत पैगंबरांच्या वरील वाक्यांचा मथितार्थ लक्षांत घेतला, त्यांनीं आपल्या अनुयायांना दिलेली मानवतेची शिकवण पाहिली आणि आपल्या आयुष्यांत मानवांच्या कल्याणाकरितां त्यांनीं केलेल्या भगीरथ प्रयत्नांकडे नजर टाकली म्हणजे जगद्विख्यात जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनीं हजरत पैगंबरांना दिलेली 'मानवतेचा त्राता' ही उपमा अगदीं यथार्थ आहे असें प्रत्येक सहृदय माणसास कबूल करावें लागेल.

---

# भाग शेवटचा

## विद्वान् परधर्मीयांच्या चष्म्यांतून

**" जगांतील सर्व धर्मसंस्थापकांत हजरत महंमद पैगंबर अत्यंत यशस्वी ठरलेले आहेत. "**

**—ब्रिटानिका ज्ञानकोश**

हजरत महंमद पैगंबरांचें विशाल कार्यक्षेत्र, त्यांची उदात्त विचारसरणी व त्यांचें निर्मल चारित्र्य या सगळ्या गोष्टींचा व आतांपर्यंत झालेल्या विवरणाचा काळजीपूर्वक विचार केल्यानंतर हजरत महंमद पैगंबर जगाच्या इतिहासांत किती अढळ स्थान पावले आहेत याची वाचकांस नीट कल्पना येईल.

या शेवटच्या भागांत विद्वान् परधर्मीयांच्या चष्म्यांतून प्रस्तुत चरित्राचें अवलोकन करावयाचें आहे. मुसलमान वाङ्मयभक्तांनीं हजरत पैगंबरांच्या चरित्रावर अमूल्य ग्रंथ लिहून ठेविले आहेत; पण स्वधर्मी पैगंबरांची स्तुती कोणीहि करणारच असा आक्षेप पुढें येण्याचा बराच संभव आहे. या आक्षेपास उत्तर म्हणून विद्वान् परधर्मीयांचीं मतें या शेवटच्या भागांत संकलित केलीं आहेत. या भागांत ग्रथित केलेलीं मतें जगास भूषणभूत होऊन राहणाऱ्या थोर थोर पुरुषांचीं आहेत. हीं मतें वाचल्यानंतर हजरत महंमद पैगंबर जगांत किती मान्यता पावलेले आहेत व त्यांच्या सुंदर तत्त्वांचा किती बोलबाला झाला आहे याची सर्वसाधारण कल्पना आल्याखेरीज राहणार नाहीं.

जगांतील **महान् तत्त्ववेत्ते कार्लाइल** यांनीं विभूतिपूजेवर सबंध इंग्लंडमध्यें खळबळ उडवून टाकणारी व्याख्यानमाला गुंफली. या व्याख्यानांतील दुसरें पुष्प त्यांनीं हजरत पैगंबरांवर गुंफलें. प्रस्तुत व्याख्यान अत्यंत विद्वत्ताप्रचुर व हजरत पैगंबरांच्या अवतारकार्यावर स्वच्छ प्रकाश पाडणारें आहे.

या व्याख्यानांत त्यांनीं हजरत पैगंबरांच्या उज्ज्वल ध्येयाबद्दल मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे. हजरत महंमद पैगंबरांवर शिंतोडे उडवून त्यांच्या सुंदर तत्वांविरुद्ध जनतेंत गैरसमज पसरविण्याबद्दल आमची आम्हांला लाज वाटूं लागली आहे, असा स्पष्ट कबुलीजबाब त्यांनीं दिला आहे.

तसेंच अगदीं अलीकडच्या काळांतील साऱ्या जगास आपल्या लेखणीनें वेड लावणारे नाटयाचार्य **जॉर्ज बर्नाड शॉ** यांनीं देखील कार्लाइल यांच्या मार्गाचा अवलंब केला आहे. आपल्या चक्षूंना भरीव दिसणाऱ्या तत्त्वाचे नेमके दोष हुडकून काढण्यांत त्यांची लेखणी किती निष्णात आहे याची ओळख साऱ्या जगास पटलेली आहे. त्यांच्या दृष्टिपथांत आलेल्या प्रत्येक तत्त्वाच्या अवगुणावर दयामाया न करतां त्यांनीं ताशेरा झाडलेला आहे. त्यांच्या टीकास्त्रानें इतका प्रभाव गाजविला आहे कीं त्या टीकास्त्राच्या तडाक्यांतून सहीसलामत सुटलेली व्यक्ति किंवा तत्त्व अवगुणरहित व चिरंजीव समजली जाते. ज्वलज्जहाल टीकास्त्र बाळगणाऱ्या या जॉर्ज बर्नार्ड शॉनीं हजरत महंमद पैगंबरांच्या तत्त्वांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे, ही गोष्टी निःसंशय अभिमान बाळगण्याजोगी आहे. विशेषतः इस्लामधर्मातील समता, बंधुत्व व भांडवलशाहीचा बींमोड या सुंदर तत्त्वांची त्यांनीं अत्यंत प्रशंसा गाइली आहे. सध्यां युरोपमध्यें अव्यवस्था झाली आहे, अस्वस्थता माजली आहे, असमाधान नांदत आहे, अशी धोक्याची सूचना शॉनीं दिली आहे. त्याबरोबरच हा धोका टाळण्याकरितां हजरत महंमद पैगंबरांनीं १३०० वर्षापूर्वी प्रस्थापित केलेला खरा समाजसत्तावाद, इंग्लंडला स्वीकारावा लागेल, अशी शॉनीं जाहीर घोषणा केली आहे. ते म्हणतात,

**"शंभर वर्षांनीं इंग्लंड व पाश्चात्य राष्ट्रें यांना इस्लाम धर्म स्वीकारावा लागेल."**

वरील एकच वाक्य हजरत महंमद पैगंबर यांच्या यशस्वी अवतारकार्याची ओळख पटवावयास पुरेसें आहे. हजरत महंमद पैगंबर यांजबद्दल जॉर्ज बर्नाड शॉनीं काढलेले खालील उद्गार किती तरी सुंदर आहेत.

“ महंमद पैगंबरांचा धर्म विलक्षण सामर्थ्यवान असल्यामुळें तो मी अत्यंत प्रशंसनीय समजतों. बदलणाऱ्या परिस्थितीस पचनीं पाडण्याची ताकद असणारा, माझ्या दृष्टीनें हा एकच धर्म आहे; हा धर्म प्रत्येक काळाचें आपल्याकडे लक्ष वेधल्याखेरीज राहणार नाहीं. माझ्याप्रमाणेंच थोर लोकांनीं केलेलीं भविष्यें, जगानें निःसंशय मोठ्या महत्त्वाचीं समजलीं पाहिजेत. उद्यां युरोप देशास हजरत महंमद पैगंबरांचा धर्म स्वीकारावा लागेल, असें मी भविष्य करतों. आजच युरोपमध्यें हा धर्म स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. मध्ययुगीन पाद्री लोकांनीं, अज्ञानामुळें असो वा धर्मवेडामुळें असो, इस्लामधर्म काळ्याकुट्ट स्वरूपांत रंगविला आहे. महंमद पैगंबर व त्यांचा धर्म यांचा द्वेष करण्याचें बाळकडू त्यांना मिळालें होतें. त्यांना महंमद पैगंबर म्हणजे ख्रिस्ताचा शत्रू वाटत असे. मी पैगंबरांच्या–त्या थोर व्यक्तीच्या–चरित्राचा अभ्यास केला आहे. माझ्या मतानें त्यांना ख्रिस्ताचा शत्रू म्हणण्यापेक्षां मानवतेचा त्राता ( Saviour of humanity ) असें म्हटलें पाहिजे. त्यांच्यासारख्या व्यक्तीनें हल्लींच्या जगाचीं सूत्रें ( Dictatorship ) आपल्या हातांत घेतलीं तर ज्यामुळें सौख्य व शांति प्रस्थापित होईल असे निकडीचे प्रश्न सोडविण्यांत त्यांना नक्की यश येईल अशी मला खात्री वाटते. ”

—जॉर्ज बर्नार्ड शॉ

याखेरीज अखिल जगांत अग्रपूजेचा मान मिळविणारे परमपूज्य महात्मा गांधी यांनीं हजरत पैगंबरांविषयीं केवढा आदरभाव दाखविला आहे, तो

त्यांच्या पुढील उताऱ्यांत दिसून येईल. महात्माजींचा प्रत्येक शब्द अत्यंत मोलाचा असतो. त्यांच्या शब्दांनीं झालेली स्तुति हा जगन्मान्य पुरावा झाल्या-खेरीज राहणार नाहीं.

" उत्कर्षाच्या ऐन अमदानींत इस्लामधर्म असहिष्णु नव्हता. साऱ्या जगानें इस्लाम धर्माचीं स्तुतिस्तोत्रें गायिलीं आहेत. ज्या वेळीं पाश्चात्य राष्ट्रें अंधःकारांत खितपत पडलीं होतीं, त्या वेळीं पौर्वात्य राष्ट्रांत एक देदीप्यमान तारा चमकला आणि त्यानें अस्वस्थ जगास दिव्य ज्ञान आणि सौख्य दिलें. इस्लाम धर्म हा खोटा धर्म नाहीं. जर हिंदुलोक इस्लामधर्माचा आदरपूर्वक अभ्यास करतील तर माझ्याप्रमाणेंच त्यांच्या अंतःकरणांत त्या धर्माबद्दल प्रेम उत्पन्न होईल.

" ज्या वेळीं मी पैगंबरचरित्राचा दुसरा भाग वाचून संपविला त्या वेळीं त्या थोर पुरुषाच्या चरित्रापैकीं वाचा-वयाचें कांहीं शिल्लक राहिलें नाहीं याबद्दल मला अत्यंत वाईट वाटलें. त्या काळांत तलवारीच्या जोरावर इस्लाम धर्म फैलावला नाहीं याबद्दल माझ्या मनाची पक्की खात्री झाली. हजरत पैगंबरांची अत्यंत साधी वृत्ती, विलक्षण स्वार्थत्याग, वचनबद्धता, आपल्या अनुयायां-वरील निस्सीम प्रेम, अचाट धैर्य, निधडा स्वभाव, आपल्या कार्यावर व परमेश्वरावर अढळ विश्वास या बहुमोल गुणांमुळें—तलवारीमुळें नव्हे—प्रत्येक संकट निवारण होऊन हजरत पैगंबरांचें कार्य यशस्वी झालें... प्रत्येक माणसाच्या पचनीं पडतील अशींच तत्त्वें हजरत पैगंबरांनीं प्रतिपादिलीं आहेत."

—महात्मा गांधी

" हजरत पैगंबर एक थोर व दृढनिश्चयी सुधारक होते. अविश्रांत खटपट करून शतकानुशतकें अधःपात पावलेल्या जनतेस त्यांनीं सरळ रस्ता दाखविला आणि तिला परमेश्वरभक्तीचा धडा दिला. त्या वेळीं सर्व अरबांची जंगली वृत्ति होती. हजरत पैगंबरांनीं त्यांना दुष्ट कृत्यांपासून परावृत्त करून त्यांच्या अंतःकरणांत समता, प्रेम आणि विश्वबंधुत्व निर्माण केलें. हजरत महंमद पैगंबर यांनीं दुष्ट वृत्ती व रक्तपात निषिद्ध ठरविला. खरोखरी हजरत महंमद शांतीचे श्रेष्ठ पुरस्कर्ते होण्याकरितां या जगांत अवतरले होते. त्यांनीं आपल्या असामान्य बुद्धिमत्तेनें जनतेंत विलक्षण चळवळ उत्पन्न केली. पैगंबरांच्या एकंदर आयुष्यक्रमाचा ऐहिक व आध्यात्मिक दृष्टीनें विचार केला, तर ते कोट्यवधि लोकांस सन्मार्ग दाखविणारे सच्चे पैगंबर व गुरु होते असें विधान करावयास मला काडीमात्र शंका वाटत नाहीं. "

—महर्षि कौंट टॉलस्टॉय

" महंमद पैगंबर हे धोकेबाज व मूर्तिमंत लुच्चे आहेत, त्यांचा धर्म ढोंगी व खुळचट आहे, अशी बनलेली आमची सर्वसाधारण कल्पना खरोखरी आतां कोणालाही पटणार नाहीं. हजरत पैगंबरांविषयीं ज्या खोट्यानाट्या कंड्या आम्हीं पिकविल्या त्यांबद्दल आम्हीं लाजेनें खालीं माना घातल्या पाहिजेत. पैगंबरांचे शब्द खोटे नव्हते किंवा त्याचें कार्य हलक्या दर्जाचें नव्हतें. ते गाजावाजा न करणारे थोर पुरुष होते.

निसर्गतः ते सहृदय होते. त्यांचा शब्द म्हणजे थेट निसर्गाच्या अंतःकरणांतून निघालेला आवाज होता. लोकांनीं कोठल्याही गोष्टीकडे लक्ष न देतां हा आवाज ऐकलाच पाहिजे—यापुढें बाकीच्या सर्व गोष्टी रद्द व क्षणभंगुर आहेत."

—तत्त्ववेत्ता थॉमस कार्लाइल

"पहिल्या धर्मांतील सत्य, पावित्र्य आणि त्या त्या धर्मसंस्थापकांचे सद्गुण व आत्मिक शक्ति यांवरच आपला धर्म प्रस्थापित झाला आहे असें हजरत महंमद समजत असत. परमेश्वराच्या सिंहासनासमोर अरबस्तानच्या मूर्ति भंग पावल्या; प्रार्थना, उपवास आणि दानधर्मानें रक्ताचा सूड शुचिर्भूत झाला. आपल्या देशबांधवांस नैतिक व राजकीय शिक्षण देणें पैगंबरांच्या आटोक्याबाहेर होतें. परंतु हजरत पैगंबरांनीं त्या लोकांत औदार्याचें नवजीवन ओतलें, सद्गुणांची शिकवण दिली, आणि कायद्यानें व उपदेशानें सूडाच्या संतप्त भावनेस आणि अनाथांवर होणाऱ्या जुलमास पायबंद घातला. एकमेकांशीं हाडवैर करणाऱ्या टोळ्यांस एकत्रित व आज्ञाधारक बनविलें. हजरत महंमद पैगंबरांची शिकवण सत्याच्या पायावर उभारली होती असेंच प्रत्येक माणसास कबूल करावें लागेल."

—जगप्रसिद्ध इतिहासकार एडवर्ड गिबन.

"हजरत महंमद पैगंबर परमेश्वरास अत्यंत प्रिय होते; त्यांनीं परमेश्वरी कार्याकरितां आपलें सर्वस्व अर्पण केलें होतें; त्यांचें नांव परमेश्वराच्या नामसंकीर्तना-

बरोबर घेणें जरूरीचें आहे. आजच्या अस्थिर काळांत जनतेस फक्त कुराणच मार्गदर्शक होणार आहे...... साधुसंत, सुधारक, हुतात्मे, धर्मगुरु, सरदार वगैरे लोकांनीं हजरत महंमद पैगंबर यांचें नामस्मरण केलें तर त्यांचें अत्यंत कल्याण होईल. हजरत महंमद पैगंबरांबद्दल आदरभाव नसल्यामुळेंच जनता अस्वस्थ झाली आहे."

—गुरु बाबा नानक.

"एका साध्यासुध्या पैगंबरांनीं आपल्या देशांत सर्वत्र विखुरलेल्या व तापट बनलेल्या बेमुर्वतखोर टोळ्यांना एकत्रित व आज्ञाधारक बनविलें आणि त्यांच्यामध्यें जगांतील नव्या कल्पना व नवें ध्येय प्रसृत केलें. या ध्येयामुळेंच अवघ्या तीस वर्षांत मुसलमानांनीं कॉन्स्टांटिनोपलच्या बादशहाचा पराभव केला; पर्शियाच्या राजांना सिंहासनावरून ओढलें; सिरिया, मेसापोटेमिया आणि इजिप्त या देशांना नमविलें; ॲटलांटिक महासागरापासून कॅस्पियन समुद्रापर्यंत विजयाचा झेंडा फडकावला आणि आजपावेतों १२०० वर्षें एका स्पेन देशाखेरीज वर निर्देशित केलेल्या परिसीमांमध्यें राजकीय प्रभुत्व राखलें. हल्लीं हेंच ध्येय (इस्लाम) उत्तर आशिया, मध्य आफ्रिका यांमध्यें झपाट्यानें प्रसार पावत आहे. ज्यांच्या उत्साहानें आणि बुद्धिप्रभावानें अशा प्रकारचें ध्येय प्रस्थापित झालें ते महंमद पैगंबर खरोखरी ईशप्रेषित होते."

—विद्वान ग्रंथकार जॉन डेव्हनपोर्ट

“ महंमद पैगंबरांवर टीका करणारे गृहस्थ किती अज्ञानी आहेत हें इतिहासानें चांगलें सिद्ध केलें आहे. इतके साधे, इतके वीररसप्रधान, इतके उच्च प्रतीचे आणि अत्यंत थोर अशा ऐतिहासिक व्यक्तींपैकीं ठरलेल्या हजरत महंमद पैगंबरांचें चारित्र कित्येक लोकांना माहीत नाहीं. जर अरबस्तानच्या या थोर पैगंबरांच्या चरित्राचा अभ्यास केला; त्यांनीं कशा प्रकारची शिकवण दिली, त्यांनीं स्वतः कालक्रमणा कशी केली याची माहीत काळजीपूर्वक घेतली तर या पैगंबरांबद्दल कुणाच्याही अंतःकरणांत आदर उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं. त्यांच्या तोंडांतून बाहेर पडलेली शिकवण अत्यंत सुंदर होती; त्यांचें उदाहरण म्हणजे मूर्तिमंत प्रेरक शक्ति होय. ”

—डॉ. ॲनी बेझंट

“हजरत महंमद पैगंबर यांच्या काळच्या परिस्थितीचें अवलोकन केलें, त्यांच्यावरील अनुयायांचें निस्सीम प्रेम लक्षांत घेतलें आणि त्या वेळच्या ख्रिस्ती धर्मगुरूंची व साधुसंतांची पैगंबरांशीं तुलना केली तर माझ्या मनाला अत्यंत आश्चर्य वाटण्याजोगी एक गोष्ट आढळते व ती म्हणजे हजरत पैगंबरांनीं कधींच चमत्कार करून दाखविले नाहींत ही होय. त्यांनीं एकादी गोष्ट केली म्हणजे त्यांचे अनुयायांना त्या गोष्टीस चमत्कार समजण्याचा मोह आवरत नसे; पण वेळोवेळीं तो चमत्कार नव्हे असें हजरत पैगंबर सांगत असत. त्यांच्या सहृदयतेचें यापेक्षां उत्कृष्ट उदाहरण कोठें सांपडले काय ? आपल्या

आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्यानीं आपली ही वृत्ती सोडली नाहीं. एक दिवस, जगांतील अत्युत्कृष्ट तत्त्वज्ञान व खरा ख्रिस्तिधर्म यांना पैगंबरांस परमेश्वराचा खरा प्रेषित या नात्यानें संबोधणें भाग पडेल असें मी धाडसानें म्हणतों."

—बॉस्वर्थ स्मिथ

"विश्वबंधुत्वाच्या प्रसारार्थ नवीन घटना तयार करण्याकरितां ज्या महान् तत्त्वाचा विचार सध्यां सारें जग करीत आहे, त्याच तत्त्वाचा उपदेश वालुकामय प्रदेशांतल्या एका उंट हाकणारानें तेराशें वर्षांपूर्वीं केला आहे. बुद्ध धर्माचा प्रसार झाला खरा पण त्या वेळीं लोकसत्ताक राज्य म्हणजे काय याची कुणालाच कल्पना नव्हती. ख्रिस्ताला क्रॉसला बांधून ठार मारण्यांत आलें त्या वेळीं देखील विश्वबंधुत्वाचा इनकार केला गेला, इतकेंच नव्हे तर हेटाळणी केली गेली. अशा परिस्थितींत साऱ्या जगांतील सर्व धर्मांच्या, सर्व पक्षांच्या व सर्व दर्जांच्या लोकांत समता आणि विश्वबंधुत्व यांची ओळख करून देण्याचें महत्कार्य अरबस्तानचे उंट हाकणारे हजरत महंमद पैगंबर यांनींच केलें."

—देवी सरोजिनी नायडू

"अरबस्तानचे थोर पुरुष हजरत महंमद पैगंबर आणि त्यांचा धर्म, त्यांचें सार्वजनिक आणि खाजगी आयुष्य आणि त्यांच्या कालांतील परिस्थिती यांचा, सर्व राष्ट्रांच्या व पंथांच्या मुसलमान लोकांच्या सहवासांत सतत चाळीस वर्षें अभ्यास केल्यानतर, जगामध्यें

इतिहास करून ठेवणाऱ्या प्रभावशाली बादशहामध्यें पैगंबरांनीं उच्च स्थान मिळविलें आहे ही गोष्ट मला कबूल केली पाहिजे. लोकांचा नेता, राजकारणी, रणमर्द टोळ्यांचा संचालक या नात्यानें पैगंबरांनीं मुत्सद्दी, शत्रू आणि मित्र यांमध्यें स्वतःविषयीं आदरभाव उत्पन्न केला आहे व त्यांना ओळखणाऱ्या सर्व लोकांकडून प्रेम, सन्मान व वाहवा मिळविली आहे."

—मेजर जनरल फॉरलाँग

"निराशा, धमक्या, तिरस्कार आणि छळ यांचा मारा अव्याहतपणें १३ वर्षं होत असतां जें कार्य हजरत महंमद पैगंबर यांनीं करून दाखविलें, तशा प्रकारचें कार्य जगाच्या इतिहासांत कोणींही करून दाखविलें नाहीं. मूठभर पण इमानी स्त्री-पुरुष अनुयायी असतां देखील उज्ज्वल भविष्याकडे लक्ष देऊन त्यांनीं अपमान व हाल-अपेष्टा सोसल्या......त्यांच्या परिश्रमांमुळें विश्वबंधुत्वाचा प्रसार झाला, अनाथ मुलांचा प्रतिपाळ करण्याचा प्रघात पडला, गुलामांना चांगल्या रीतीनें वागविण्यांत येऊं लागलें, कैफ आणणाऱ्या पेयांवर बहिष्कार घातला गेला आणि दुसऱ्या धर्मांस अपरिचित असणारी व अभिमान वाटण्याजोगी सारासार विचारशक्ति इस्लाम धर्मांत निर्माण झाली."

—प्रसिद्ध चरित्रकार सर वुइल्यम् मूर

"शेवटचे पैगंबर हजरत महंमद हे अत्यंत साध्या वृत्तीचे असून त्यांच्या तोडीचा सद्गुणी गृहस्थ सांपडणें शक्य नाहीं. त्यांची विचार करण्याची शक्ति असामान्य

होती; ते अत्यंत विनयशील होते; त्यांचें भाषण गोड असे. बाष्कळ बडबड करण्याचा त्यांना अत्यंत तिटकारा होता. त्यांचें आचरण पवित्र व आदर्शवत् होतें. हजरत महंमद पैगंबर आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत पापी जनतेस सन्मार्ग दाखविण्यांत दंग होते."

—सुप्रसिद्ध लेखक वॉशिंग्टन आयर्व्हिंग

"अरबस्तानसारख्या वातावरणांत आपल्या अभिनव कल्पना प्रसृत करण्याचा हजरत महंमद पैगंबरांचा मार्ग धर्माच्या इतिहासांत अभूतपूर्व ठरल्याखेरीज राहणार नाहीं. त्या काळच्या निरनिराळ्या जातींचा दर्जा वाढविणारें जें कार्य ज्यू व ख्रिश्चन लोकांनीं केलें नाहीं, तेंच कार्य त्या काळच्या हजरत महंमद पैगंबरांनीं करून दाखविल्यामुळें त्यांनीं चिरकाल श्रेय संपादित केलें आहे; इतकेंच नव्हे तर पैगंबरांनीं प्रस्थापित केलेल्या संस्कृतीमुळें अरबस्तानचेंच नव्हे तर साऱ्या जगाची हजरत महंमद पैगंबरांनीं अमूल्य सेवा बजाविली आहे."

—आल्फ्रेड मार्टिन

यांखेरीज आम्हांला वंदनीय असणाऱ्या पवित्र वेदांत हजरत महंमद पैगंबर यांचा आदरपूर्वक उल्लेख केलेला आढळून येईल. ( अथर्ववेद, अल्लोपनिषद्, श्लोक ६ वा ).

जगांतील थोर पुरुषांनीं हजरत महंमद पैगंबरांस वाहिलेली सुमनांजली पाहून, सत्याची चाड असणाऱ्या कोठल्याहि व्यक्तिस हजरत पैगंबरांविषयीं सादर प्रेम व आपलेपणा वाटल्याखेरीज राहणार नाहीं.

हजरत पैगंबरांनीं घालून दिलेल्या उज्ज्वल मार्गावर कोटयवधि लोकांनीं पदार्पण केलें आहे व करीत आहेत. आज इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया,

अमेरिका वगैरे पुढारलेल्या राष्ट्रांत इस्लामधर्मीयांची संख्या झपाट्यानें वाढत आहे. ज्या ज्या ठिकाणीं इस्लाम धर्मातील सुंदर व अविनाशी तत्त्वांचा प्रसार झाला त्या त्या ठिकाणीं इस्लाम धर्माचें बीज रुजलें आहे. एवढा विराट-स्वरूप धर्म संस्थापन करणाऱ्या हजरत महंमद पैगंबरांचें नामसंकीर्तन सध्यां जगांत पसरलेले ४० कोट मुसलमान अत्यंत आदरानें करीत आहेत.

जगांत सौख्य आणि शांति नांदावी, विश्वबंधुत्वाचा प्रसार व्हावा, अशी सदिच्छा बाळगणाऱ्या प्रत्येक मुमुक्षूनें त्रिखंडकीर्ती हजरत महंमद पैगंबरांच्या उज्ज्वल चरित्राचा एक वेळ अवश्य अभ्यास करावा.

‘ परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो. ’

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| १ | झिरत-उल-अरब | जझीरत-उल-अरब |
| १ | अद्धान | दहना |
| २ | नेज्द | नज्द |
| २ | अरब-उल-बैद | अरब-उल-बायदा |
| २ | अरब-उल-मुतरीब | अरब-उल-मुतअर्रिबा |
| २ | अरब-उल-मुस्तरीब | अरब-उल-मुस्तारिबा |
| ५ | अल्-लाट | लात |
| ५ | मन्नत | मनात |
| ५ | अल-उझ्झा | उझ्झा |
| १२ | यामेन | यमन |
| १२ | झोरी | जहरा |
| ,, | अमीनाबी | आमिनाबी |
| १६ | हलीफ-उल् फझुल | हल्फुल फुझूल |
| १९ | अब्दुल रहीमान | अब्दुर्रहमान |
| ,, | झबीर | झुबैर |
| २३ | यासर | यासिर |
| ,, | नेगस | हबश |
| ,, | मुहाजिरात | मुहाजरत |
| ३३ | हिजरात | हिजरत |
| ३९ | अबु ज्याहिल | अबू जहल् |
| ४० | थियाम | तिहामा |
| ,, | अबू सुफियन | अबू सुफियान |
| ४४ | खायबर | खयबर |

| पृष्ठ | शुद्ध | अशुद्ध |
|---|---|---|
| ४५ | हॅबिक्कियास | हेऱ्याक्कियस |
| ,, | खुश्रु परविझ | खुस्रौ परवेझ |
| ५२ | झवर | झुबैर |
| ५३ | हिजराचे | हिजरीचे |
| ५४ | ताय | तै |
| ,, | आदि | अद्दी |
| ५५ | जिल्हाद | झिलहज्ज |
| ८४ | सहाव्या शतका पुरत्या | सातव्या शतका पुरत्या |
| ८९ | अस्सलामालेकुम् | अस्सलामु अलैकुम् |
| ९५ | स्नोक हुर ग्रोरीज | स्नोक हर ग्राँज |
| १०१ | मेहेर | महर |
| ९९ | अन्न्निसा | अन्निसा |
| ११३ | अबू हुरेरा | अबू हुरैरा |

[ आणखी कांहीं अशुद्धें चुकून राहिलीं असल्यास तीं पुढच्या आवृत्तींत अवश्य दुरुस्त केलीं जातील. ]

# निवडक अभिप्राय

" मानवतेचे व जातिधर्मभेदविरहित राज्यपद्धतीचे जे चाहते आहेत, यांनीं या चरित्राचा अवश्य अभ्यास करावा. ग्रंथकारानें अत्यंत परिश्रम करून विषयाची मांडणी इतकी स्पष्ट व आकर्षक केली आहे कीं चरित्र वाचतांना मनास अत्यंत आल्हाद वाटतो. "

—शेख अबदुल अजीझ, एम्. एस्सी. ( लंडन ),
एम्. आर. एस्. आय्.

" ग्रंथकारानें बिनचूक व सप्रमाण माहिती देऊन एक अत्यंत जरूरीचें कार्य केलें आहे. सदरहू चरित्र अत्यंत लोकप्रिय होईल अशी मला खात्री वाटते. सुरवातीपासून अखेरपर्यंत तें सुंदर व सुबक मराठी भाषेंत लिहिलें आहे. लेखनशैली अतिशय उत्कृष्ट आहे. मराठी जाणणाऱ्या सद्‌गृहस्थांनीं हें चरित्र अवश्य वाचावें अशी मी जोराची शिफारस करतों."

—डॉ. अबदुल हमीद, एम्. ए., पीएच. डी.

" मराठी भाषेमध्यें हजरत पैगंबर (स्व) यांच्या चरित्राची माहिती करून घेणारास हा एकच उत्कृष्ट मार्ग आहे. ग्रंथकार अमीन यांनीं सदर चरित्रांत खोल अभ्यास, उच्च विचारसरणी व लेखनचातुर्य प्रदर्शित केलें आहे. संशोधन करून लिहिलेल्या या मौल्यवान चरित्रामुळें मराठी वाङ्मयांतील मोठी उणीव भरून निघाली आहे."

—मौलाना नुरुद्दीन, अरबी महाविद्यालय, मदीना

" मि. अमीन यांनीं अत्यंत परिश्रमानें माहिती मिळवून व ती नव्या पद्धतीनें लिहून इस्लाम व मुसलमान यांची फारच मोठी सेवा केली आहे. चरित्रामधील अत्यंत महत्त्वाचीं प्रकरणें इतक्या बुद्धिमत्तेनें व कुशलतेनें रेखाटलीं आहेत कीं ग्रंथकाराविषयीं धन्योद्गार बाहेर पडतात. या अमूल्य ग्रंथामुळें हिंदुस्थानांतील जातीजातींत उत्कट एकी व प्रेम उत्पन्न होईल."

—मौलाना इनायतउल्ला, लखनौ युनिव्हर्सिटी

" हजरत महंमद पैगंबर ( स्व ) चरित्रावर जे पहिल्या दर्जाचे ग्रंथ तयार झाले आहेत, त्यांमध्यें सदर ग्रंथाचा समावेश होईल. इतकें सुंदर व विद्वत्ताप्रधान चरित्र लिहिल्याबद्दल ग्रंथकाराचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे."

—मौलाना अबदुर रहीम

" विद्वान् व सहृदय ग्रंथकार मि. अमीन यांनीं आशियाखंडांतील एका थोर, तत्त्वज्ञानी सत्पुरुषाचें लिहिलेलें हें चरित्र छोटेंसें पण आल्हादकारक आहे."

—मॉडर्न रिव्ह्यू, कलकत्ता

" हल्लींच्या अस्थिर परिस्थितींत असें पुस्तक प्रसिद्ध करून सय्यद अहमद यांनीं खरोखरीच एक महत्त्वाची कामगिरी बजाविली आहे. त्यांच्यासारख्यांनीं शुद्ध व अभिजात मराठी भाषेंत असें पुस्तक लिहावें ही गोष्ट त्यांना भूषणावह आहे. "

—ज्ञानप्रकाश, पुणें

" पैगंबरांच्या चरित्राची सर्व बाजूंनीं थोडक्यांत आटपशीर रीतीनें व साध्या भाषेंत माहिती या पुस्तकांत दिली असून, पुस्तक अतिशय उपयुक्त झालें आहे. "

—महाराष्ट्र नागपूर

" पैगंबरांचें हें चरित्र लक्षपूर्वक वाचलें म्हणजे अरबांच्याच नव्हे तर सगळ्या जगाच्या उद्धारासाठीं पैगंबरांचा आत्मा तळमळतो आहे असें पदोपदीं दिसतें. "

—प्रगति, मुंबई

" सांप्रत मुसलमान समाजांतील कित्येक चालीरीतींवरून त्या धर्माविषयीं व धर्मसंस्थापकाविषयीं जे गैरसमज रूढ झाले आहेत ते निघून जाण्याला अशा पुस्तकांचा उपयोग खचित आहे. "

—नवाकाळ, मुंबई

" सय्यद अहंमद यांची मातृभाषा उर्दू असून शुद्ध व सुंदर मराठींत त्यांनीं हजरत महंमद पैगंबरांचें चरित्र लिहिलें आहे हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे. "

—महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ठाणें

" चरित्राची मराठी भाषा भारदस्त व शुद्ध आहे. सय्यद अहमद यांचें मराठी भाषेवरील प्रभुत्व कौतुकास्पद आहे यांत शंका नाहीं. "

—रत्नाकर, पुणें

[ फक्त वृत्तपत्रांचे अभिप्राय पहिल्या आवृत्तीवर मिळालेले आहेत. ]

नं........
नं........